


# अनुक्रमणिका

**4**
अध्यक्षीय- जयंत पाटील
अवस्था भ्रमिष्टाची!

**5**
प्रबंध संपादकीय- दिलीप वळसे पाटील
विरोधी राज्यांना केंद्राची सावत्र वागणूक

**6**
संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे
इंजिनदादांची 'भोंगेगिरी'

**10**
कोल्हापूर संकल्प सभा, भाषणे-
१) शरद पवार-१०
२) अजित पवार-१८
३) जयंत पाटील-२२
४) प्रफुल पटेल-२८
५) छगन भुजबळ-३०

**34**
मूळ प्रश्नांवरुन जनतेचे
लक्ष उडविण्याच्या युक्त्या
- अनंत बागाईतकर

**41**
शरद पवार, पत्रकार परिषद, मुंबई
शाहू, फुले, आंबेडकरांचा उल्लेख ही
शिवरायांच्या विचारांची मांडणी- शरद पवार

**48**
राष्ट्रवादी पदाधिकारी मेळावा, अमरावती, भाषणे
१) शरद पवार-४८
२) जयंत पाटील-५२
३) प्रफुल पटेल-५७

**60**
९५ वे मराठी साहित्य संमेलन, उदगीर
साहित्यिकांनी राज्यकर्त्यांच्या ओंजळीने
पाणी पिऊ नये
- शरद पवार

**66**
श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यक्रम, अमरावती
शेतकरी आणि कष्टकऱ्यांसाठीचे
भाऊसाहेबांचे काम अतुलनीय
- शरद पवार

**74**
राजर्षी शाहू महाराज आणि धर्मविचार
डॉ. जयसिंगराव पवार

**84**
कृषी स्वराज्याची संकल्पना आणि
आयडिया ऑफ इंडिया संकल्पना
- प्रा. डॉ. प्रकाश पवार

**90**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
- प्रा.डॉ. गणेश राऊत

**94**
घंटाकर्ण-
कानोकानी (राजकीय किस्से)

**102**
शेवटचे पान-
भागवत धर्माची पताका
महाराष्ट्राने फडफडत ठेवावी
-हेमन्त टकले

**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने ओम साई मिलन एंटरप्रायझेस
रूम नं. १०९, हाऊस नं. ३२३,
सिद्धीविनायक महिमा सेक्टर १९/बी,
कोपर्कखैरणे, नवी मुंबई-४००७०९
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला,
वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२०
येथून अंक प्रकाशित केले.

अग्रलेख



# अवस्था भ्रमिष्टाची!

तोडपानी प्रसिद्ध, सुपारी बहाद्दरांचे १ मे रोजी औरंगाबादेत झालेले ५० मिनिटांचे भाषण आपण सर्वांनी ऐकले आहे. शिळ्या कढीला ऊत आणणाऱ्या या भाषणात एकही मुद्दा नवीन नव्हता आणि वैचारिकही नव्हता; आक्रस्ताळेपणाचा बुडबुडा मात्र सतत फुटत होता. भाषणातला जवळपास निम्मा वेळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि देशातील थोर जाणते नेते मा. शरदराव पवार साहेब यांच्यावर टीका करून, त्यांची उणीदुणी काढण्यासाठी खर्च केला. बरं, टीकेचे मुद्दे तरी काय होते. १) पवार साहेब भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेत नाहीत. २) ते नास्तिक आहेत. देवाला मानत नाहीत. ३) त्यांनी जातीयवाद वाढविला आहे. ४) जेम्स लेनच्या लेखनाला पुढे करून शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना म्हातारपणी त्रास दिला आणि ५) मराठ्यांना फूस लावून आरक्षणाचे आंदोलन उभे केले.

आता वरील पाचही मुद्द्यांचा परामर्श घेण्यापूर्वी आपण पवार साहेबांच्या मागील ५५-६० वर्षांच्या राजकीय-सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनकार्याकडे अगदी ओझरती नजर टाकू या. आपल्या असे लक्षात येईल की, साहेब हे सतत समाजाचा, राष्ट्राचा व मानवजातीचा विकास व प्रगती कशी होईल याचाच ध्यास घेऊन त्या दिशेने धोरणांची आखणी करून कार्य करत राहिले आहेत. आज वयाच्या ८३ व्या वर्षीही ते अव्याहतपणे हेच काम करताहेत. महाराष्ट्र आणि देशातली जनता जी पवार साहेबांना अगदी जवळून पाहात आली आहे व बारकाईने ओळखून अनुभवसिद्ध आहे ती असल्या बोलघेवड्या गांडुळतोंडी नेत्याच्या टीकेला भीक तर घालणारच नाही; पण हा नेता किती उथळ, दुतोंडी, अहंगंडाने पछाडलेला आणि स्वार्थाने बरबटलेला आहे असा शेरा मारल्याशिवाय राहणार देखील नाही. या नेत्याचे खरे दुखणे वेगळेच आहे. पण ते त्याला जाहीरपणाने बोलता येत नाही ही त्याची अडचण आहे. म्हणून ताकाला जाऊन भांडे लपविण्याचा प्रकार चालू आहे. राजकीय जीवनात पूर्णपणे अपयश आणि त्यामुळे नैराश्य आलेल्या इंजिनाला जी कुंठितावस्था प्राप्त झाली आहे त्याच्यातून बाहेर पडण्यासाठी तो केविलवाणी धडपड करतो आहे आणि त्यासाठी तरूणांची, बेरोजगारांची, रिकाम्या हातांची माथी भडकविण्याचे काम करतो आहे. या भाषणांमधून नोकरीसाठी धडपडणाऱ्या, दोन वेळची पोटाची खळगी भरण्यासाठी तडफडत असलेल्या तरूणांच्या पदरात काय पडणार आहे? यांच्या पक्षाकडे कोणताही विकासाचा कार्यक्रम नाही, ध्येयधोरण नाही, जनतेच्या जीवनात आर्थिक स्थिरता आणण्याचा, रोजगार निर्मितीचा विचार नाही, फक्त झोडा आणि तोडा व तुटून पडा असलेल्या वांझोट्या घोषणा व कार्यक्रमाने पोटातल्या भुकेचा डोंब शांत होत नाही हे आता तरूणांच्याही लक्षात येऊ लागले आहे. त्यामुळे एका विनोदी नकलाकाराचे भाषण या पलिकडे त्याला फारसा अर्थ नाही. भाषणाने थोडी करमणूक होते. अर्वाच्य शिवीगाळ क्षणभर सुखावते म्हणून लोक भाषण ऐकायला जातात. पण ती मतदान सूज्ञपणाने करतात आणि असल्या थिल्लर विचारांना जागेवरच मूठमाती देतात हे आपण आजपर्यंत पाहात आणि अनुभवित आलो आहे.

आता राहिला मुद्दा भोंग्यांचा. हा मुद्दा काही नवीन नाही. सर्वोच्च न्यायालयाने त्यासंबंधी स्पष्टपणे निर्देश दिलेले आहेत. या निर्देशांची कठोरपणे अंमलबजावणी करणे हे सरकार व प्रशासनाचे काम आहे. त्यांनी ते करावे याबद्दल दुमत नाही. पण मी सांगतो त्याच प्रमाणे करावे ही भूमिका आततायीपणाची व हुकूमशाहीला खतपाणी घालणारी आहे. भारताची राज्यघटना आणि सर्वोच्च न्यायालय यापेक्षा 'राज' तू काही मोठा नाहीस हे त्याला कुणीतरी बजावून सांगायला हवे. डोक्यात काही प्रकाश पडला तर ठिक. अन्यथा अवस्था भ्रमिष्टाचीच आहे !



प्रबंध संपादकीय



# विरोधी राज्यांना केंद्राची सावत्र वागणूक

महागाई, बेरोजगारी, वाढत चाललेली आर्थिक विषमता व गरिबी हे आज देशातील जनतेसमोरचे महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यांचा संबंध रोजच्या जगण्या-मरण्याशी आहे. लोकशाहीमध्ये किंवा कुठल्याही प्रकारच्या अर्थव्यवस्थेमध्ये हे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी राज्यव्यवस्था सांभाळणाऱ्या सरकारची असते. सरकार समाजवादी, साम्यवादी की भांडवलशाहीच्या चौकटीत काम करणारे आहे याला इथे फार अर्थ नसतो. त्या देशातील जनता सुखासमाधानाने दोन वेळचे अन्न मिळवू शकते की नाही हाच कळीचा मुद्दा असतो. या मुद्द्याकडे कळत-नकळत का होईना जर सरकारचे दुर्लक्ष झाले तर जनतेमध्ये असंतोष निर्माण होतो आणि ती उठाव केल्याशिवाय राहात नाही. 'सेन्सा' या विचारवंताचे एक वाक्य फार प्रसिद्ध आहे. - ''भुकेलेल्या पोटी मनुष्य तत्त्वज्ञान ऐकत नाही, न्याय-अन्यायाचा विचार करीत नाही आणि प्रार्थनेसाठीही कुणापुढे वाकत नाही.'' मागील दोन-तीन वर्षांपासून आणि विशेषतः कोरोना महामारीच्या संकटानंतर देशातल्या सर्वसामान्य गोरगरीब जनतेची अवस्था अत्यंत बिकट व दयनीय झाली आहे. दिल्लीसारख्या शहरात भिकाऱ्यांची संख्या वाढली आहे हे जनगणनेतून लक्षात आले आहे. अनेक लोकांचा रोजगार गेला आहे. व्यापार, उद्योगधंदे बंद पडले आहेत. छोट्या छोट्या व हातावर पोट असणाऱ्या व्यावसायिकांची तर पार वाट लागली आहे. लाखो लोकांचे संसार रस्त्यावर आले आहेत. उपाशीपोटी झोपाव्या लागणाऱ्या आणि अर्ध्या भाकरीचा चंद्र कधी एकदा पाहायला मिळतो अशा आशेने तडफडणाऱ्या जीवांची संख्या वेगाने वाढते आहे. दारिद्र्य व गरिबीने जनतेला अस्वस्थ केले आहे. तापलेल्या बॉयलरचा सेफ्टी व्हॉल्व जर बराच काळ बंद केला तर अखेरीस त्याचा स्फोट होतो हा शास्त्रीय सिद्धांत व नियम आहे. तो आमच्या मायबाप सरकारला आणि केंद्रातल्या राज्यकर्त्यांना कळत नसेल अशातला काही भाग नाही. पण तरी देखील या मुख्य व ज्वलंत आणि जिवंत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून, कानाडोळा करून ज्याचा रोजच्या जगण्याशी सुतराम व काडीमात्र संबंध नाही अशा मशिदीवरील भोंगे उतरावेत, राममंदीराची उभारणी करावी, नागरिकत्व कायद्यात दुरूस्ती करून अल्पसंख्यांक समाजाला छळून सळो की पळो करावे, जाती-धर्मात विद्वेष वाढीला लावून दंगली घडवून आणाव्यात, मांस भक्षण करावे की नाही अशा अर्थहीन, फालतू, फोकनाड व तकलादू गोष्टींकडे केंद्र सरकार प्राधान्याने का लक्ष देत आहे, हा प्रश्न सर्वसामान्य जनतेला आज छळतो आहे.

२०१४ साली सत्तेवर येताना ब्रह्मांड नायकांनी जी प्रचंड मोठमोठी आश्वासने दिली होती उदा. अच्छे दिन आयेंगे, प्रत्येक नागरिकाच्या खात्यात १५ लाख रूपये जमा करू, दरवर्षी दोन कोटी लोकांना नवा रोजगार देवू, महागाई कमी करू, गॅस सिलेंडरच्या किंमती निम्म्याने खाली आणू, महिलांच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा उतरवू, प्रत्येक घराला नळाने पाणी देऊ, सर्वांना राहण्यासाठी घर देऊ वगैरे वगैरे, किती म्हणून आश्वासनांचा पाऊस पाडला होता. त्यातले एक तरी आश्वासन पूर्ण केले का? उलट सगळे उलटे करून ठेवले आहे आणि याबाबत विचारले तर भाजपचे नेते निर्लज्जपणाने म्हणतात, 'हा चुनावी जुमला आहे.' म्हणजे निवडणुकीत जनतेची मते पदरात पाडून घेण्यासाठी, तिला फसविण्यासाठी या घोषणांचा पाऊस पाडण्यात आला होता. आता जनतेलाही हे कळून चुकले आहे की मोदी सरकारने आपल्याला मूर्ख बनवून आपल्या संसाराची व सुख समाधानाची राखरांगोळी केली आहे. आज पेट्रोलचा भाव ११६ रूपये लिटर झाला आहे. डिझेल १०३ रूपयांच्यापुढे आहे. डाळींनी १२० रूपयांचा टप्पा पार केला आहे. खाद्यतेल १८० ते २०० रूपये किलोवर पोहोचली आहेत. सर्व वस्तुंचे भाव प्रचंड वाढले आहेत. त्यामुळे जनता अनंत अडचणींचा सामना करीत असतानाच जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार केंद्र सरकारने चालविला आहे तो म्हणजे जवळपास १८० वस्तुंवरचा 'जीएसटी' कर आणखीन वाढविला आहे. केंद्र सरकारने केंद्रीकरणाचे धोरण अवलंबून सर्व पैसा स्वतःकडे कसा गोळा होईल याच दिशेने पाऊले टाकली जात आहेत आणि राज्यांना भिकेला लावण्याचे प्रकार चालू आहे. जिथे भाजपची सत्ता आहे त्या राज्यांना केंद्र मदतीचा मोठा हात देते आहे पण विरोधी सरकारे असलेल्या महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, राजस्थान, छत्तीसगड, केरळ या राज्यांना सावत्रपणाची वागणूक देऊन त्यांचा निधीतला वाटा अडवून धरला जात आहे. केंद्र सरकारचे हे वागणे देशाच्या एकात्मता व शांततेला धोका पोहोचवणारे आहे.



संपादकीय



# इंजिनदादांची ‘भोंगेगिरी’

कुंभकर्णाला जाग यावी त्याचप्रमाणे ‘इंजिन’दादांना महाराष्ट्रात महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या हालचाली सुरु झाल्यानंतर ‘भोंग्यां’नी जाग आलेली आहे. मशिदींवरचे भोंगे काढा अन्यथा मशिदींसमोरच प्रतिभोंगे लावून हनुमानचालिसाचे पाठ करू असा विलक्षण दम त्यांनी दिला आहे. यांना आवाजाची फारच ॲलर्जी व्हायला लागली असं म्हणावं तर मशिदीवरील भोंग्यांना प्रत्युत्तर म्हणून हे पण भोंगे लावणार आहेत म्हणजेच भोंग्यांची संख्या दुप्पट होऊन ध्वनिप्रदूषणही दुपटीने वाढणार असा याचा अर्थ होतो. मग या इंजिनदादांचे कान किटणार नाहीत काय? कमाल आहे यांची! यांच्या इंजिनाला काय शिट्टी वगैरे नाही काय? की यांचे इंजिन बिनाशिट्टीचेच चालते? जसे यांचे इंजिन भाजपच्या कोळश्यावर झुकझुक करतंय तसेच यांच्या विनाशिट्टी इंजिनाची शिट्टी पण दुसरेच वाजवत आहेत असे मानायचे काय? पण, उगाच प्रश्न विचारत कशाला बसायचं? साधी गोष्ट आहे की भाजपला जे उघडपणे करण्याचा पुरुषार्थ नाही तो भाजपच्या जिवावर इंजिनदादा दाखवत आहेत. यामध्ये आपण भाजपच्या हातचे खेळणे झालो आहोत हे इंजिनदादांच्या अद्याप नीटपणे लक्षात आले नसावे. अर्थात कळेल तेव्हा फार उशीर झाला असेल.

मशीदीवरील भोंग्यांवरुनचा वाद नवा नाही. वेळोवेळी आणि विशेषतः निवडणुका जवळ आल्या की धार्मिक ध्रुवीकरण, धार्मिक उन्माद निर्मिती आणि त्यातून आपल्याला बहुसंख्यक समाजाची मते कशी भरघोसपणे पडतील यासाठी खेळला जाणारा विशुध्द राजकीय स्वार्थाचा खेळ आहे. हा वाद उत्पन्न करणाऱ्यांनी कितीही अभिनिवेशाने ‘मी धर्मांध नाही पण धर्माभिमानी आहे’ अशी सवंग, टाळीबजाव भाषणे केली तरी त्यामागील हेतु निव्वळ आणि निव्वळ राजकीय स्वार्थाने बरबटलेलाच आहे हे लोकांनी ध्यानात घेणे गरजेचे आहे. हे मुद्दे उकरणाऱ्या नेत्यांचा उद्देश एकच असतो की समाजात तेढ-तणाव निर्माण व्हावा आणि एकदा अशांतता निर्माण झाली, आग पेटली की हे त्यांच्या राजकीय पोळ्या भाजायला बसलेच म्हणून समजा! यांना समाज गुण्यागोविंदाने नांदायलाच नको आहे. सतत अशांतता, अस्वस्थता, अस्थिरता निर्माण करीत रहायचे म्हणजे यांचे धर्मांध राजकारण तेजीत राहते. ही एक अत्यंत नतद्रष्ट जमात भारतीय राजकारणात प्रविष्ट झाली आहे आणि सूज्ञ, समजूतदार, समंजस व शांतताप्रेमी नागरिकांनी या जमातीचा नायनाट करण्याची वेळ आली आहे. या विघ्नसंतोषी मंडळींना आता त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आलेली आहे. ज्या देशातले सामान्य नागरिक साध्यासाध्या गोष्टींनी त्रस्त आहेत. महागाई या सामान्यजनांच्या मागे हात धुऊन लागलेली आहे. त्याबद्दल हे इंजिनदादा काय किंवा त्यांच्या इंजिनाला काळ्या कोळश्याचे इंधन पुरविणारे भाजपवाले हे महागाईबद्दल बोलताना आढळतात का? नाही ना? मग याचा अर्थ काय? महागाईचे चटके जाणवू नयेत यासाठी धर्मांधतेचे हे इंजेक्शन देऊन तुम्हाला धार्मिक गुंगी आणण्याचे हे कारस्थान आहे. त्याला बळी पडायचे की नाही हे नागरिकांनी ठरवायची वेळ आली आहे. आणि हो, वर कोळश्याचा उल्लेख केलाय ना त्यावरुन आठवण झाली! सध्या तुम्हाआम्हाला महागाईबरोबरच विजेचे चटके पण बसायला लागलेत किनई? उन्हाळ्याचे चटके आणि वर विजेचे चटके, महागाईचे चटके! नुसते चटकेच चटके की हो!

पण हे चटके भाजपला बसत नाहीत, हे चटके इंजिनदादांना बसत नाहीत त्यामुळे त्यांना भोंग्यांची आठवण येते! तर कोळश्याचा मुद्दा! सध्या देशभरात कोळश्याची टंचाई निर्माण झाली आहे. आता कोळसा आणि खनिज व खनन हा विषय केंद्राच्या अधिकारात येतो. सध्याचे केंद्रातले जे अतिशय जबरदस्त सरकार आणि राज्यकर्ते आहेत त्यांनी कोळश्याच्या वाहतुकीलाच अटकाव केला होता अशी माहिती पुढे येते आहे. म्हणजे खाणींपासून वीजनिर्मिती केंद्रापर्यंत कोळसा पुरविण्यासाठी रेल्वेने मालगाड्याच उपलब्ध केल्या नाहीत. मग कोळसा वाहून नेणार कसा?

आता चटके बसल्यानंतर केंद्र सरकार जागे झाले आहे. त्यांनी अनेक प्रवासी गाड्या रद्द करुन कोळसा भरुन नेणाऱ्या मालगाड्यांसाठी अग्रक्रमाने रेल्वेमार्ग उपलब्ध करण्यास सुरुवात केली आहे. आता रेल्वे विभागही केंद्राच्याच अधिकारात येतो ना?

याचा अर्थ राज्यांना वेळेवर कोळसा पुरवठा न झाल्याने वीजनिर्मितीला मोठा फटका बसला. म्हणजे उन्हाळ्यात विजेचा वापर अधिक असताना त्याचवेळी कोळश्याची पुरेशी उपलब्धता न करुन केंद्र सरकारने राज्यांना अडचणीत आणले व परिणामी सामान्य नागरिकांना वीजबंदी, लोडशेडिंग, वीज सारखीसारखी जाणे यासारख्या त्रासाला ऐन उन्हाळ्यात व तेही अत्यंत कडक अशा उन्हाळ्यात तोंड द्यावे लागले. आता हा मुद्दा जनसामान्यांच्या जीवनाशी निगडित आहे. पण भाजपवाले आणि इंजिनदादा यांना हा मुद्दा आठवला नाही. कारण उघड आहे. नागरिकांचे लक्ष या ज्वलंत प्रश्नांवरुन दुसरीकडे वळवून आपला राजकीय स्वार्थ साधणे हे एकमेव उद्दिष्ट! पण आपला मूळ विषय 'भोंगे-राजकारण' किंवा आपण याला नवे नाव देऊ 'भोंगेगिरी'! तर इंजिनदादांनी ही 'भोंगेगिरी' सुरु करताच त्यांना भाजपवाले पाठिंबा देण्यासाठी पुढे सरसावले.



आपल्याला जे उघडपणे करता येत नाही ते दुसऱ्याच्या करवी करणारी ही 'भ्याड जमात पार्टी' उर्फ 'बीजेपी' आहे. नेभळट मंडळींचा हा गोतावळा आहे. त्यांनी 'इंजिना'त कोळसा घातला आणि पेटवून दिला. आता ते 'भक भक' करून सैरावैरा धावू लागले आहे. तर, या भोंग्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने जे निर्णय दिले आहेत त्यावर नजर टाकण्याची गरज आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय असतात त्यांचे स्वरुप कायद्याप्रमाणे मानले जाते व त्याचे कायद्याप्रमाणेच पालन बंधनकारक असते. त्याचे पालन न करणे ही न्यायालयाची अवमानना असते. सर्वोच्च न्यायालयाने सर्वात पहिला निर्णय दिला होता त्यामध्ये त्यांनी रात्री दहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत जाहीर भोंग्यांना बंदी केली होती. परंतु ही प्राथमिक बाब होती. भोंगे किंवा डीजे म्हणून जे भलेमोठे कर्णकटू कर्कश्श लाऊडस्पीकर लावतात त्याने होणारे ध्वनिप्रदूषण भोंग्यांपेक्षा भयंकर असते. त्याविरुध्दही काही प्रदूषण विरोधी स्वयंसेवी संघटना व कार्यकर्ते न्यायालयात गेले होते आणि त्यांनी न्यायालयास या समस्येचा विचार ध्वनिप्रदूषणाच्या दृष्टिकोनातूनही करण्याची विनंती केली होती. त्यानुसार न्यायालयाने देखील त्याबाबत बारकाईने अध्ययन करुन दिवसा असो की रात्री असो ध्वनि-पातळी किती प्रमाणात राखायची याचे देखील प्रमाण ठरवून दिले आहे. ते प्रमाण किती आहे तेही लक्षात घ्यावे लागेल. त्यानुसार औद्योगिक परिसर किंवा क्षेत्रात दिवसा ७५ डेसिबल व रात्री ७० डेसिबल (डेसिबल हे ध्वनी-तीव्रता मोजण्याचे परिमाण-माप आहे), व्यापारी(कमर्शियल) विभागात दिवसा ६५ व रात्री ५५ आणि लोकवस्तीमध्ये दिवसा ५५ व रात्री ४५ डेसिबल पर्यंत ध्वनि तीव्रतेचे प्रमाण राखण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. हा निर्णय या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांनीही मान्य केला आहे. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंतची बंदी कायमच आहे. तर सांगायचा मुद्दा हा की सर्वोच्च न्यायालयाने निर्णय केलेला असताना आणि मुस्लिम समाजाच्या विविध प्रातिनिधिक संस्थांनी देखील या निर्णयाचे पालन करण्याची हमी दिल्यानंतर देखील हे इंजिनदादा 'भोंगेगिरी' करीत शिट्ट्या मारतच बसले आहेत. या इंजिनदादांच्या पुण्यातल्या नौटंकी नंतर त्यांनी जी पत्रकार परिषद घेतली त्यामध्ये त्यांनी एक वाक्य जरूर उच्चारले होते की न्यायालयाने यासंदर्भात दिलेल्या निर्णयाची बाब ते लक्षात घेतील. एवढे म्हटल्यानंतर देखील पुन्हा आपली भोंगेगिरी

सुरुच! म्हणजेच यांचे 'कहीं पे निगाहें, कहीं पे निशाना' असा काहीतरी कावेबाजपणा दिसतो. भाजपला महाविकास आघाडीशी मुकाबला करताकरता बहुधा दमछाक झाली असावी आणि म्हणून एखाद्या राखीव खेळाडूला मैदानात उतरवून काही काळ त्याच्याकडून खेळ करवून घ्यावा तसेच भाजपने आता इंजिनदादांनाही मदतीला घेतले असावे. पण भाजपने बिहारमध्ये नीतीशकुमार यांची काय अवस्था केली आहे हे इंजिनदादांना बहुधा ठाऊक नसावे. आणि ठाऊक नसणारच! कारण यांचे ज्ञान, माहिती ही महाराष्ट्रापुरतीच आणि तीही मुंबईच्या दादर परिसरापुरतीच मर्यादित व संकुचित आहे. स्वतःला वाघ किंवा वाघाची औलाद असल्याची फुशारकी मारताना महाराष्ट्राबाहेरही जाण्याचे धाडस दाखवावे ना या 'भोंगेश्वरां'नी! आपल्याच गल्लीत बसून फुशारक्या आणि वल्गनेच्या फुसक्या डरकाळ्या कशाला फोडत बसले आहेत?

करोना साथीचे आक्रमण दोन वर्षे चालले. करोना विषाणूने केवळ लोकांना नव्हे तर जागतिक अर्थव्यवस्थेला देखील ग्रासून टाकले. जागतिक सोडा परंतु भारतापुरता विचार करायचा झाल्यास अर्थतज्ञांचे मत काय आहे हे विचारात घेतले तर सूज्ञांचे डोळे उघडतील. अर्थतज्ञांच्या मते भारतीय अर्थव्यवस्था सावरण्याची प्रक्रिया सुरु झाल्याचा दावा केला जात असला तरी ही प्रक्रिया केवळ वरच्या पातळी किंवा स्तरापुरतीच मर्यादित राहिली आहे. सोप्या भाषेत बडे उद्योग, केंद्र सरकारची आर्थिक-वित्तीय स्थिती आणि सुखवस्तू किंवा श्रीमंत लोकांपुरतीच ही सावरण्याची प्रक्रिया सीमित आहे. अद्याप ती त्या खालच्या पातळीवर पोहोचलेली नाही. याचा अर्थ मध्यम व लहान उद्योग, घरगुती असंघटित उद्योग(ज्यांचे प्रमाण ८० टक्क्यांपर्यंत आहे), स्वयंरोजगार करणारे लोक, राज्य सरकारे यांच्यापर्यंत ही आर्थिक सावरण्याची प्रक्रिया पोहोचल्यानंतरच अर्थव्यवस्था सावरली असे म्हणणे उचित ठरेल. ताज्या आकडेवारीत औद्योगिक उत्पादन,वाढ तसेच रोजगारनिर्मिती व वाढ, बाजारपेठेतील खप (कन्झंम्शन) या सर्व आघाड्यांवर घसरण आहे. त्यामुळेच जागतिक बँकेसह अनेक वित्तीय संस्थांनी विकासदरात कपात केलेली आढळते. बाजारपेठेत खप व मागणी वाढावी यासाठी चलन किंवा मुद्राविषयक धोरण शिथिल करण्यात आले व परिणामी चलनवाढ आणि महागाईचे चटके बसू लागले आहेत. एक प्रकारच्या दुष्टचक्रात अर्थव्यवस्था अडकल्यासारखी झाली आहे. वर्तमान राज्यकर्त्यांतर्फे ज्या उपाययोजना केल्या जात आहेत त्या म्हणजे वाळूत किल्ले बांधण्यासारख्या आहेत आणि त्यामुळेच त्यांच्यात टिकाऊपणा नाही असे निरीक्षण एका विदेशी अर्थतज्ञाने नमूद केले आहे. थोडक्यात जगाप्रमाणेच भारतातही आर्थिक स्थिती अत्यंत आव्हानाची व तेवढीच चिंताजनक आहे. परंतु या संकटाशी सर्वांना बरोबर घेऊन आणि समंजसपणे मुकाबला करण्याऐवजी देशात, समाजात संघर्षाचे वातावरण निर्माण केले जात आहे. करोनाच्या नव्याने होऊ घातलेल्या संकटावर चर्चा करण्यासाठी बोलाविलेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत करोनाऐवजी राज्यांना पेट्रोल व डिझेलवरील राज्यांचे कर कमी करण्यासाठी प्रवचने दिली जातात. सर्व लोकशाही संकेत व शिष्टाचाराची पायमल्ली व अपमान करुन हे लज्जाहीन प्रकार केले जात आहेत. अशा वाचाळांच्या दिंडीत सामील होऊन स्वतःला धन्य समजणाऱ्या इंजिनदादांना केवळ सांप्रदायिक फूट आणि बहुसंख्यकवादाचा आधार घेऊन महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये आपल्या झोळीत काही मते पडतील काय याचीच फिकिर लागली आहे. त्यांचा आखूड मेंदू व्यापक विचार करु शकत नाही हे त्यांनी पुन्हा एकदा सिध्द केले आहे. सूज्ञ नागरिकांना एकच प्रश्न आहे की अशा या गंभीर स्थितीत 'भोंगे' हा काय प्राधान्याचा प्रश्न आहे? त्यावरुन एवढे वातावरण पेटविण्यासारखी ही स्थिती आहे? त्यामुळेच या सर्व प्रकारामागे केवळ सांप्रदायिक सलोखा बिघडवून महागाईने आधीच गांजलेल्या जनतेला आता सांप्रदायिक तणावालाही तोंड देण्यास भाग पाडणारे हे राजकारण आहे. हे परवडणारे नाही. हे प्रयत्न जनतेनेच हाणून पाडले पाहिजेत.

इंजिनदादा मुंबईत राहतात. या मुंबईने भारताला 'बॉलीवूड' दिले. त्यामध्ये भले अनेक दोष असतीलही पण या चित्रनगरीने निर्माण केलेले कलाकार, त्यांनी सादर केलेली कला ही खऱ्या अर्थाने भारताला एक करणारी होती. भारतीय संगीताने या देशात सामंजस्य आणि सलोखा निर्माण केला. ध्रुपद धमार हा शंकरभक्तीचा सांगीतिक प्रकार ज्यांनी जतन केला ते डागर बंधू हिंदू नव्हते. ध्रुपदमध्ये शंकरा राग गाताना, 'हे शंभो शिवशंकर प्रजापति' ही चीज गाताना डागर बंधूंना ते मुसलमान असल्याची जाणीव कधीच झाली नाही. शहनाई नवाज बिस्मिल्लाखान हे काशी विश्वनाथासमोर आपली कला सादर करताना त्यांना ते कधी मुस्लिम असल्याचे जाणवले नाही. याचे कारण या देशाने सर्वधर्मसमभावाचे तत्व अंगिकारले नव्हे तर पूर्णत्वाने आत्मसात केले आहे. दुर्दैवाने समाजाचे तुकडे करणारे सत्तेत आल्याने कट्टरपंथीयांच्या मदतीने ते आपली सत्ता टिकवू पहात आहेत. त्यांच्या टोळीत सामील होऊन आपल्यालाही काही तुकडे मिळतील काय या प्रयत्नात इंजिनदादा आहेत. ते ज्यांचा वारसा सांगतात त्याच्याशी हे विपरीत आहेच पण यात ते स्वतःची किंमत

कमी करुन घेत आहेत.

याठिकाणी एका जुन्या कृष्ण-धवल व गाजलेल्या हिंदी चित्रपटातल्या प्रसंगाची आठवण येते. 'मेरी सूरत तेरी आंखे' हे त्या चित्रपटाचे नाव होते. अशोककुमार यांनी त्यात एका विद्रूप गायकाची भूमिका साकारली होती. त्यांचे संगीत गुरु मुस्लिम असतात. या चित्रपटातील 'पूछो ना कैसे मन रैन बिताएं....!' हे अहिर भैरव रागातले गाजलेले गाणे सर्वांनाच माहिती असेल. या गाण्यापूर्वी अशोककुमार आणि त्यांचे गुरु यांच्यातील लहानसा संवाद आहे. गुरु मृत्युशय्येवर असतात आणि रात्रभर त्यांना झोप लागली नसल्याचे सांगतात. सकाळ झालेली असल्याने ते प्रार्थनेची वेळ झाल्याचे म्हणतात. त्यावर अशोककुमार त्यांना, 'या अशा अवस्थेत तुम्ही नमाज कशी पढणार' असे विचारतात. त्यावर ते मुस्लिम गुरु उत्तरतात, 'कलाकार की नमाज और इबादत उसका संगीत है. मंदिर की घंटियों और मुअज्जम की आवाज में एक ही पुकार है और इस पुकार का नाम है संगीत!' ही भारताची वर्षानुवर्षाची सलोख्याची परंपरा आहे. परंतु आता त्यावरच आघात करुन नष्ट करण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. 'भोंगेगिरी'चा खरा हेतु तोच आहे.


मशिदींवरील भोंग्यांबाबत तर्कसंगत भूमिका घेण्यास कुणाचीच ना नाही. जर एखाद्या ठिकाणी भोंग्यांची ध्वनि पातळी नियमापेक्षा जास्त असेल तेथे तक्रार जरूर करावी परंतु धमक्या देऊन भोंगे काढायला लावण्याचा हा प्रकार ही निव्वळ दादागिरी आहे आणि मुख्य म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन आहे आणि अवमानना आहे. धमक्या आणि दादागिरीचा अर्थ एकच असतो व तो म्हणजे तुम्हाला वैध मार्गाने आपले म्हणणे मांडायचे नसते. तुम्हाला बेकायदेशीरपणाच करायचा आहे. त्यामुळेच या शुध्द गुंडगिरीला लगाम घालण्याची वेळ आली आहे.. कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणेने आपले कर्तव्य बजावण्याची वेळ आली आहे. भोंगेगिरी करणारे आणखी एक राजकीय जोडपेही सध्या आक्रमक झाले आहे. या जोडप्याने थेट मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोरच हनुमानचालिसा पठणाचा घाट घातला. तो सफल झाला नाही कारण कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणेने उचित हस्तक्षेप केला. या दांपत्याचे प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे. त्यांना न्यायालयाने ज्या गोष्टी सुनावल्या. एका प्रसिध्द इंग्रजी वचनाचा संदर्भ देत न्यायालयाने त्यांना सांगितले, 'विथ ग्रेट पॉवर कम्स ग्रेट रिस्पॉन्सिबिलिटी!' याचा अर्थ जेवढे सामर्थ्य मोठे तेवढीच जबाबदारीही मोठीच असते. साध्या सोप्या भाषेत याचा अर्थ होतो की तुमच्याकडे मोठे सामर्थ्य असेल तर तुमचे वर्तन, आचरणही तेवढेच संयमपूर्ण आणि जबाबदारीचे असले पाहिजे. जे याचे पालन करीत नाहीत ते बेजबाबदार असतात आणि त्यांच्या सामर्थ्याचा दुरुपयोग करतात. आपला एक पक्ष आहे म्हणून त्या पक्षाच्या व्यासपीठावरुन समाजात तेढ निर्माण करणे, अप्रस्तुत व गैरलागू असे मुद्दे उपस्थित करुन तणाव निर्माण करणे हेच त्यांचे एकमेव उद्दिष्ट असते.

समाजात शांतता, सौहार्द राखणे, कुठेही विनाकारण तणाव निर्माण होऊ नये म्हणून प्रयत्नशील राहणे हे सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रथम कर्तव्य असते. भोंग्यांचा मुद्दा उपस्थित करणे हा स्वतःचे उपद्रवी मूल्य किती मोठे आहे हे दाखविण्याचाच प्रयत्न आहे. त्यामुळे अशा उपद्रवी शक्तींना वठणीवर आणावेच लागेल. मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर हनुमानचालिसा पठणाच्या घोषणांनंतर प्रतिस्पर्ध्यांनी देखील 'आम्ही पंतप्रधानांच्या घरासमोर कुराण पठण करु' असे सांगून प्रतिवाद केला आणि संबंधित राजकीय दांपत्याने केलेला प्रकार समर्थनीय नसल्याचे सूचित केले. या सर्व नतद्रष्ट व विघ्नसंतोषी मंडळींना महाराष्ट्रातले बिगर-भाजपचे सरकार खुपते आहे. त्यासाठी भोंगेगिरी कर, शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याबद्दल ताळंतंत्र सोडून वाक्ताडने करणे आणि कट्टरपंथीयांना चिथावणे हे उद्योग सुरु केले आहेत. महाराष्ट्रात काहीतरी करुन संघर्ष निर्माण करणे आणि मग महाराष्ट्रात अस्थिरता निर्माण झाल्याचे कारण पुढे करुन राष्ट्रपति राजवट लादता येऊ शकते काय यासाठी हा खटाटोप सुरु आहे. यामध्ये इंजिनदादा आहेत, राजभवन आहे आणि सरतेशेवटी दिल्लीपति राज्यकर्ते यांची हातमिळवणी आहे. ही सर्व सुमारबुध्दी मंडळी आहेत. या सर्वांचा सारांश एकच आहे की ही भोंगेगिरी नसून भोंदूगिरी आहे. ध्वनिप्रदूषण, आम्हाला भोंग्यांचा उपद्रव होतो असे म्हणणे हा भोंदूपणा आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने सर्व नियम तयार केलेले असताना त्यांना फाट्यावर मारण्याचा प्रकार हा न्यायालयाचा अपमान आहेच परंतु जाणूनबुजून समाजात संघर्ष निर्माण करण्याचे स्पष्ट कारस्थान आहे. इंजिनदादांना वाटतंय की आक्रमक हिंदुत्वाची भूमिका घेतली की त्यांना देखील योगी आदित्यनाथ यांच्यासारखे महाराष्ट्रात यश मिळेल. परंतु ते भ्रमात आहेत. महाराष्ट्र उत्तर प्रदेश नाही. महाराष्ट्राला छत्रपति शिवराय, शाहू-फुले-आंबेडकर यांचा वारसा आहे. येथील जनता समंजस आहे आणि ती ही भोंगेगिरी निश्चितपणे हाणून पाडेल यात तिळमात्र शंका नाही!

सांप्रदायिक विचाराला खड्यासारखं बाजूला करा

# केंद्रीय यंत्रणांच्या वापराने आवाज दबणार नाही

शरद पवार



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रागतिक महाराष्ट्राचा संकल्प घेणारी भव्य संकल्प सभा २३ एप्रिल रोजी प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत कोल्हापूरमधील तपोवन मैदान येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. प्रदेशाध्यक्ष ना. जयंत पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेली राष्ट्रवादी परिवार संवाद यात्रा १४ हजार किमीचा प्रवास करत २४० विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेत कागल विधानसभा मतदारसंघात आली आणि तेथे परिवार संवाद दौऱ्याचा समारोप झाला. या दौऱ्याची सांगता भव्य अशा संकल्प सभेने झाली. या सभेत झालेली काही प्रमुख भाषणे.



आजची ही सभा ऐतिहासिक अशा प्रकारची सभा आहे. आपण बघितलं गेलं वर्षभर अनेक संकटं असतानासुद्धा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये, तालुका तालुक्यामध्ये जाऊन जयंतराव पाटील यांनी युवक काँग्रेस असो, महिला विभाग असो, विद्यार्थी विभाग असो, अन्य सगळे घटक आहेत. त्या सगळ्यांना घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये त्यांनी प्रचंड दौरा केला. कार्यकर्त्यांशी, लोकांशी संपर्क साधला. तिथलं दुखणं काय आहे हे जाणून घेतलं आणि राज्याची सत्ता आल्याच्यानंतर त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्यासाठी या सगळ्यांनी कष्ट घेतले. या सगळ्या मोहिमेचा आज समारोप या शाहूनगरीमध्ये होतोय त्याचा मला आनंद आहे. जयंतराव आणि त्यांच्या सगळ्या आणि लोकांचा कौल आम्ही अंत:करणापासून स्वीकारला. पण, आपण बघतो आहोत, सत्ता हातात आल्याच्यानंतर त्या सत्तेचा उपयोग सामान्य माणसाच्यामध्ये एकवाक्यता कशी राहील, हा देश एकसंध कसा राहील, लोकांचं दुखणं कसं कमी होईल, समाजातले सगळे घटक एका विचाराने राहतील कसे ही जबाबदारी कोणत्याही राष्ट्रीय नेतृत्वाच्या आणि पक्षाच्या प्रमुखांची असते. पण, आज चित्र वेगळं दिसतंय. माणसामाणसामध्ये अंतर आलं.

आपण बघितलं, गेले काही दिवस देशाची राजधानी दिल्ली, त्या दिल्लीच्या काही भागामध्ये संघर्ष झाला. हल्ले झाले. जाळपोळ झाली. केजरीवाल यांच्या हातामध्ये दिल्लीची सत्ता असेल. पण दिल्लीचं गृह खातं त्यांच्या हातामध्ये नाही.



शरद पवार यांचे शाल घालून जयंत पाटील स्वागत करताना शेजारी हसन मुश्रीफ

सहकाऱ्यांना पक्षाध्यक्ष म्हणून त्यांचं अभिनंदन करतो. त्यांना धन्यवाद देतो की त्यांनी ही संकल्पना यशस्वी केली.

एका संघर्षाच्या काळातून आपण जात आहोत. आज हा देश एकसंध ठेवण्याचं आव्हान आपल्या सगळ्यांच्या समोर आहे. २०१४च्या पर्यंत देशातली स्थिती अलग होती. मनमोहन सिंगांच्या नेतृत्वाखालचं सरकार होतं. देशासमोरचे प्रश्न सोडवण्याच्यासाठी एकत्रितपणानं कष्ट घेतले गेले आणि अनेक क्षेत्रामध्ये या देशाची उन्नती कशी होईल, याची खबरदारी घेतली. २०१४ची निवडणूक ही वेगळी झाली आणि भारतीय जनता पार्टीच्या हातामध्ये सत्ता आली. लोकांचा कौल होता दिल्लीचं गृह खातं हे भाजपच्या हातामध्ये आहे. अमित शहांच्या हातामध्ये आहे. आणि गृह खात्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांनी ही देशाची राजधानी एका विचारानं, एकसंध राहील याची खबरदारी घ्यायची आवश्यकता होती. पण ते घेऊ शकले नाहीत. दिल्लीत काय घडलं तर त्याचा संदेश जगामध्ये जातो आणि जगामध्ये या देशामध्ये अस्थिरता आहे अशा प्रकारची भावना निर्माण होते. तुमच्या हातामध्ये सत्ता आहे आणि तुम्हाला दिल्ली सांभाळता येत नाही. ही एकच नाही. दोन दिवसाच्या पूर्वी मी कर्नाटक राज्यात होतो अणि मला कार्यकर्त्यांनी सांगितलं, की हुबळीसारख्या ठिकाणी

जातीय दंगली झाल्या. आश्चर्य वाटेल अशा प्रकारचे निर्णय त्याठिकाणी घेतले गेले. समाजातले लहान घटक आहे. आज कर्नाटकामध्ये समाजातल्या अल्पसंख्याक लोकांच्याबद्दल त्याठिकाणी जाहीर बोर्ड लावले. काय बोर्ड लावले? तर या गावात, या ठिकाणी अल्पसंख्याकाचं दुकान आहे. त्या दुकानात कुणी खरेदी करू नये. याठिकाणी अल्पसंख्याकानं चालवलेल्या रेस्टॉरंटमध्ये कुणी जाऊ नये. काय संदेश देतो आपण? आणि हा संदेश देणारे लोक सत्ताधारी पक्षाचे आहेत. हे चित्र शेजारच्या राज्यात आहे. दिल्ली असेल, शेजारचं राज्य असेल, जिथं जिथं भाजपाच्या हातामध्ये सत्ता आहे, त्याठिकाणची हीच अवस्था आहे. त्यामुळं एका प्रकारच्या आव्हानाची अवस्था आज आपल्या सगळ्यांच्यासमोर आहे.

त्यांच्या सहकाऱ्यांचंसुद्धा मी याठिकाणी अभिनंदन करतो. आज ही स्थिती आहे. या निवडणुकीमध्ये मत मागण्याचा अधिकार प्रत्येकाचा आहे. पण मत मागत असताना विद्वेष वाढेल असं काम करता कामा नये.

मला सांगण्यात आलं. एक कुणीतरी सिनेमा काढला. काश्मिरबद्दलचा सिनेमा. आणि त्या एका काळामध्ये काश्मिरमध्ये अतिरेक्यांनी त्याठिकाणी राहणाऱ्या पंडितांच्यावर हल्ले केले आणि शेवटी त्या वर्गाला काश्मिर सोडून देशाच्या अन्य भागामध्ये यावं लागलं. ही अत्याचाराची फिल्म याठिकाणी दाखवली गेली. त्याच्या पाठीमागचा हेतू हा होता, की तो जातीय संघर्ष वाढवायचा आणि त्या संघर्षातून मताचा जोगवा मागायचा. आणि हे काम याठिकाणी भाजपवाल्यांनी केलं.



**शरद पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन हसन मुश्रीफ स्वागत करताना शेजारी जयंत पाटील, प्रफुल पटेल, छगन भुजबळ**

मी कोल्हापूरच्या जनतेला धन्यवाद देतो, की देश अडचणीत न्यायचा प्रयत्न होत असताना इथं झालेल्या निवडणुकीमध्ये इथल्या जनतेनं जे काय उमेदवार होते, त्याच्यामध्ये काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी या सगळ्यांनी जो उमेदवार पुढे केला, त्याला मोठ्या मतानी आपण विजयी केलं. याबद्दल मी आपल्या सगळ्यांच्या या उत्तम भूमिकेबद्दल अंत:करणापासून तुमचं अभिनंदन करतो. मला राष्ट्रवादीचे याठिकाणी जे जे नेते आहेत, त्या सगळ्यांनी यासंदर्भात अतिशय उत्तम कामगिरी केली आणि आघाडीचा धर्म हा पाळण्याच्यादृष्टीनं काळजी घेतली. म्हणून हसन मुश्रीफ आणि

अनेकांना माहिती नाही वस्तुस्थिती काय आहे. ती जी काश्मिरची फिल्म होती, ती जी स्थिती होती, ती स्थिती ज्यावेळेला झाली, त्यावेळेला देशाची सत्ता विश्वनाथ प्रतापसिंगांच्या हातामध्ये होती आणि या सरकारला भाजपाचा पाठिंबा होता. केंद्रामध्ये गृह खात्याचा मंत्री भाजपाच्या पाठिंब्याचा होता. काश्मिरमध्ये असलेलं राज्य भाजपाच्या पाठिंब्यावर होतं. आणि म्हणून देशाची, राज्याची सत्ता त्यांच्याकडं असताना जे घडलं त्याचा गैरप्रसार संबंध देशामध्ये करून देशामध्ये, माणसामाणसामध्ये दुरावा वाढवायचं काम या माध्यमातून केलं. पण, कोल्हापूरची जनता ही समंजस,



शहाणी आणि राष्ट्रप्रेमी आहे आणि या सगळ्या चुकीच्या प्रचाराला योग्य धडा शिकवण्याचं काम त्यांनी त्याठिकाणी केलेलं आहे.

मी ऐकलं होतं, की काही नेत्यांनी अनेक गोष्टी सांगितल्या. इथले एक नेते आहेत. चंद्रकांत पाटील त्यांचं नाव. त्यांनी जाहीर केलं होतं, की निवडणुकीत पराभव झाला तर मी जाईन कुठंतरी. कुठं सांगितलं होतं? हिमालयात. पण, तुम्ही कोल्हापूरकर हुशार. त्यांची अवस्था बघून त्याचा बंदोबस्त तुम्ही केला. मला वाटतं, बरेच दिवस आरएसएसच्या शाखेवर गेले असं मी ऐकत होतो आणि शब्दाला पक्का असं ते नेहमी सांगतात. आणि म्हणून इथं जी त्यांनी घोषणा केली, ती घोषणा केल्याच्यानंतर जो निकाल लागल्याच्यानंतर माझी काळजी वाढली. कारण, चंद्रकांतदादा जाणार हिमालयात. पण ते हिमालयात जायला निघाले, तर नक्की तिथं जातायंत का नाहीत याच्यासाठी जयंतराव त्यांच्या पाठीशी निघाले. माझ्या वाचनात आलं जयंतरावांचं विधान, की मीही जातो. नंतर चौकशी केली, तुम्ही कशाला जाताय? नाही नक्की तिथंच जातायंत की नाही हे पाहायला मी जातो. ते तिथे एकदा गेले, बसले. मग मी शांतपणानं परत येईन. जो काय निकाल लागला, तो तुम्ही अतिशय चांगला लावला. हा निकाल फक्त कोल्हापूरपुरता सीमित नव्हता हा संदेश संबंध महाराष्ट्रामध्ये गेला. महाराष्ट्राच्या बाहेरसुद्धा गेलेलाच आहे.

आज ज्यांच्याकडं देशाची सत्ता असते, त्यांनी संबंध देशाचा विचार करायचा असतो. कधी कधी मला गंमत वाटते. भारत हा असा देश आहे, इथं जगातले नेते येतात. जगातले नेते आल्याच्यानंतर जवाहरलाल नेहरूंचा काळ आम्ही पाहिला, इंदिरा गांधींचा काळ पाहिला, राजीव गांधींचा काळ पाहिला, नरसिंहरावांचा काळ पाहिला, मनमोहन सिंगांचा काळ पाहिला, या सगळ्या काळामध्ये जगातले अनेक नेते या देशामध्ये येऊन गेले. आणि ते नेते आल्याच्यानंतर साहजिकच आहे, दिल्लीला जातात, देशाची राजधानी आहे. केंद्र सरकार त्यांचे इतर ठिकाणी दौरे करतात. कधी मुंबईला जातात, कधी हैदराबादला जातात. कधी बंगलोरला जातात. कधी कलकत्त्याला जातात. पण अलिकडचं राज्य आल्याच्यानंतर काय चित्र दिसतं? अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प हिंदुस्थानात आले. गेले कुठं? गुजरातला. आनंद आहे. गुजरात आमचं



**कोल्हापूरच्या महासभेत राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षांसह सर्व प्रमुख नेत्यांना एकाच हारात गुंफून त्यांचा सत्कार करण्यात आला.**

शेजारचं राज्य आहे. तिथं त्याठिकाणी गेले. मला आनंद आहे. चीनचे प्रधानमंत्री आले. गेले कुठं? गुजरातला. आज दोन दिवसाच्या पूर्वी इंग्लंडचे प्रधानमंत्री आले. गेले कुठं? गुजरातला. गुजरातबद्दल आमच्या मनात यत्किंचितही वेगळी भावना नाही. आमचा शेजारी आहे. जरूर त्याठिकाणी या. पण, देशाची सत्ता ज्यांच्या हातामध्ये आहे, त्यांना देशाच्या सगळ्या प्रांताच्याकडं लक्ष देण्याची भूमिका घ्यावी लागते.

तुम्ही लक्षात घ्या, की तुमच्या गावामध्ये समजा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री येणार आहेत म्हटल्याच्यानंतर गावचे रस्ते सुधारतात का नाही. गावात काहीतरी स्वच्छता दिसते का नाही. त्यानिमित्तानं त्या गावाचा चेहरा बदलतो. आणि जगातील विविध देशांचे प्रधानमंत्री ते याठिकाणी आल्याच्यानंतर ते एकाच राज्यात पाठवायचं काम केंद्र सरकार करत असेल तर संबंध देशाच्याबद्दलची भावना तुमच्या मनामध्ये काय हे यामधून स्पष्ट होतंय. हा संकुचित विचार हा देशाच्या हिताचा नाही, हे याठिकाणी मी सांगू इच्छितो.

अलिकडच्या काळामध्ये अनेक गोष्टी सुरु झाल्या. सत्ता येते आणि सत्ता जाते सुद्धा. पण, सत्ता मिळाल्यानंतर पाय जमिनीवर ठेवावे लागतात. सत्ता डोक्यात जाऊ द्यायची नसते. सत्तेचा गैरवापर करायचा नसतो. आज काय दिसतं? दोन वर्षाच्यापूर्वी या देशामध्ये ईडी नावाचा विषय माहिती होता? आज काय दिसतंय? याच्यावर धाड घाल, याच्या घरी जा. याला अटक करायचा प्रयत्न कर. ईडी पाठव, सीबीआय पाठव, इन्कमटॅक्सचे लोक पाठव. ठिकठिकाणी लोकप्रतिनिधी सन्मानानं काम करत असेल, त्याच्यावर एक प्रकारचा दबाव आणण्याच्याबद्दलचा हा प्रयत्न केला जातो. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन सहकाऱ्यांना तुरूंगात टाकलं. कुणाला टाकलं? अनिल देशमुखांना टाकलं. काय त्यांच्याबद्दलचे आरोप होते? त्यांच्याबद्दलचं आरोपपत्र सादर केलं गेलं आणि आरोपपत्रात सांगितलं असं, की शंभर कोटीचा घोटाळा आहे. नंतर चौकशी झाली आणि त्या आरोपपत्रामध्ये बदल केला, की शंभर कोटीचा नाही, चार कोटीचा आहे. नंतर पुन्हा एकदा ते आरोपपत्र बदललं. आणि आता सांगितलं, की १ कोटी आणि चार लाखाचा आहे. शंभर कोटीवरनं सुरूवात करायची

आणि शेवटी सांगायचं एक कोटीचा आहे. आणि काही कारण नसताना एखाद् दुसरा अधिकारी चुकीचा वागतोय, त्या अधिकाऱ्याच्या संबंधीची भूमिका घेतल्याच्यानंतर आज त्या अधिकाऱ्याची चौकशी चालू आहे. पण त्याला तुरूंगात टाकलं नाही. तो अधिकारी चुकीचा वागतोय, ही भूमिका घेणारे अनिल देशमुख, त्यांना तुरूंगात पाठवलं.

नवाब मलिक, त्यांना तुरूंगात पाठवलं. काय केस आहे? वीस वर्षाच्यापूर्वी एक जागा घेतली होती. त्या वीस वर्षात कधी दिसलं नाही. जागा घेतली. चेकने पैसे दिले. त्याठिकाणी छोटे-मोठे व्यवसाय चालू झाले. त्याच्यामध्ये यांचं नाव गाजलं गेलं आणि त्यांना त्याठिकाणी अटक केली. आज अनेकांना या पद्धतीची एक प्रकारे दमदाटी दिली जाते. केंद्र सरकारला वाटत असेल, की राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष असेल, अन्य विरोधी पक्ष असतील, तर ते विरोधी पक्ष या पद्धतीनं ईडीचा वापर करून, सीबीआयचा वापर करून, आणखीन कुणाचा वापर करून जर आम्ही त्याचं तोंड आणि त्याचं काम बंद करू शकू ही जर त्यांना खात्री वाटत असेल तर ते मुर्खांच्या नंदनवनात राहात आहेत. राष्ट्रवादीचा प्रत्येक कार्यकर्ता अशा प्रकारची कितीही संकटं आली, तरी तो मजबुतीनं त्या संकटाला तोंड देऊन त्यांचा योग्य प्रकारचा समाचार योग्य वेळी घेतल्याशिवाय राहणार नाही. ही खात्री मी याठिकाणी देतो.

एक सिनेमा कलावंत, त्याच्या मुलाला अटक केली आणि काय सांगितलं? त्याच्याकडं काहीतरी खाण्याचं सापडलं. काय चुकीच्या गोष्टी सापडल्या. १८-१९ वर्षाच्या तरूण मुलाला जेलमध्ये टाकलं. त्यानंतर सगळी चौकशी केल्यावर त्याच्याकडं कुठल्याच प्रकारचा अंमली पदार्थ नव्हता हे सिद्ध झालं आणि ज्यांनी हे काय केलं त्या अधिकाऱ्याबद्दलची आता चौकशी झालेली आहे. काही लोकांना सस्पेंड केलेलं आहे. सत्ता अशी वापरायची नसते. या पद्धतीनं आज तुम्ही सत्ता याठिकाणी वापरत आहात. एक वेगळं चित्र आणि हे चित्र ज्यावेळी दिसतं, त्यावेळेला सत्ताधारी पक्ष हा सत्तेचा गैरवापर केल्यासारखं वागणूक देतो, त्यावेळेला देशामधल्या लोकशाही विचाराच्या सगळ्या शक्तींनी काही विचार करण्याची गरज आहे. अनेक पक्ष आज याबद्दलचा विचार करतायंत.

काही संघटना आहेत. त्या संघटनांच्या माध्यमातून भाषणं करतात. बोलतात. टीका-टिप्पणी करतात. माझी काय त्याबद्दल तक्रार नाही. पण वस्तुस्थिती एक आणि सांगायची गोष्ट दुसरी हे बरोबर नाही. साधी गोष्ट आहे. माझ्यावर टीका केली, आधीच्या वक्त्यांनी सांगितलं ती गोष्ट खरी आहे, की नाव छापून येतं. महत्त्व मिळतं. काय टीका केली माझ्यावर? शरद पवार हे फुले-आंबेडकर-शाहूंचं नाव का घेतात. शिवाजी महाराजांचं नाव का घेत नाहीत. शिवाजी महाराजांचं नाव हे तुमच्या-माझ्या अंत:करणात लिहिलेलं आहे. शिवछत्रपती एक आगळा वेगळा राजा होऊन गेला. ज्यावेळेला संबंध महाराष्ट्र परकीयांच्या हातामध्ये होता. कुठं मोगलांचं राज्य, कुठं कुतुबशाहचं राज्य, कुठं आदिलशाहचं राज्य, ही अवस्था या महाराष्ट्रामध्ये असताना अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करून राज्य प्रस्थापित करण्याचं ऐतिहासिक काम कुणी केलं असेल तर ते शिवछत्रपतींनी केलं. या देशामध्ये राजे अनेक होऊन गेले. चंद्रगुप्त मौर्याचं राज्य येऊन गेलं. मोगलांचं राज्य येऊन गेलं. आदिलशाहचं राज्य येऊन गेलं. अनेकांचं राज्य येऊन गेलं. पण ३००-४०० वर्षाच्यानंतर सुद्धा सामान्य माणसाच्या अंत:करणामध्ये अनेक राज्यं येऊन गेली, त्या राज्याच्या कोणत्या राजाची आठवण तुम्हाला आहे हा प्रश्न विचारला तर एकच उत्तर येतं आणि ते म्हणजे शिवछत्रपतींचं. सामान्य माणसाच्या अंत:करणामध्ये स्थान प्रस्थापित केलेला हा नेता होता, आणि त्यांनी राज्य केलं, ते राज्य भोसल्यांचं राज्य नव्हतं. दिल्लीचं राज्य मोगलांचं राज्य होतं. देवगिरीचं राज्य यादवांचं राज्य होतं. आदिलशाहचं राज्य हे आदिलशाहचं राज्य होतं. शिवाजी महाराजांचं राज्य भोसल्यांचं राज्य नव्हतं, ते रयतेचं राज्य होतं. ते हिंदवी स्वराज्य होतं. आणि मग रयतेचं राज्य प्रस्थापित करण्याचा इतिहास ज्यांनी घडवला त्यांचं स्थान तुमच्या-माझ्या प्रत्येकाच्या अंत:करणात सखोल आहे. त्यासाठी कुणी सांगायची आवश्यकता नाही.

महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांची नावं घ्यायची नाहीत? शिवछत्रपतींचा इतिहास हा खऱ्या अर्थानं काव्यातनं सांगण्याचं पहिलं महत्त्वाचं काम कुणी केलं असेल, तर ते जोतिबा फुल्यांनी केलं. जोतिबा फुल्यांनी तो विचार सांगितला. समाजातलं स्वत्व जागा करण्याचं काम केलं. शाहू महाराज, आगळा वेगळा राजा होता. सामान्य माणसाच्या हिताची जपणूक हेच त्यांचं आद्यकर्तव्य होतं. खोट्या गोष्टीचा पुरस्कार हा त्यांनी कधी केला नाही. चुकीचा प्रसार त्यांनी कधी केला नाही. अनेक गोष्टी त्यांच्याबद्दलच्या सांगता येतील. मला आठवतंय. शाहू महाराजांची एक गोष्ट मी याच कोल्हापूरमध्ये सांगितली होती. शाहू महाराज हे अनेकदा त्यांच्या शेतावर जायचे. आणि शेतावर गेले असताना एक दिवशी कोल्हापुरातनं काही सरदार लोक त्यांना भेटायला गेले. त्यांनी सांगितलं, की महाराज, कर्नाटकातनं एक अतिशय विद्वान माणूस येतोय. तो फार विचारवंत आहे. त्याला उद्याचं सगळं कळतं. तुम्ही काही करून भेटा. महाराजांनी सांगितलं, की माझा असल्या लोकांच्यावर विश्वास नाही. माझा सामान्य लोकांच्या कर्तृत्वावर, कष्टावर विश्वास आहे. ज्याला उद्याचं कळतं हे सांगणारे लोक ढोंगी असतात. ते खोट्या गोष्टी

सांगतात. लोकांना फसवतात. मी काही भेटत नाही. पण सरदार लोकांनी फारच आग्रह केला. महाराज म्हणाले, ठीक आहे. महाराजांनी सांगितलं, गुरूवारी पाठवून द्या. गुरूवारी तो आला आणि महाराजांच्या पुढं जाऊन रडायला लागला. महाराजांनी विचारलं, की रडायला काय झालं? त्यानं सांगितलं, की मला इथं आणण्याच्यापूर्वी तुमच्या पोलिसांनी मला पकडलं. तुरूंगात टाकलं. मला मारझोड केली. महाराज म्हणाले, की तु आला कशाला इथं? माझं भविष्य सांगायला ना. तुला माहित नव्हतं, की इथं आल्याच्यानंतर तुझं भविष्य काय? तुला तुझं भविष्य कळत नाही. तु माझं भविष्य काय सांगणार? तात्पर्य हे, की शाहू महाराजांनी या असल्या खुळचट गोष्टींच्यावर कधी विश्वास ठेवला नाही. अशा प्रकारचे राजे होते.

आज मला एका गोष्टीचा आनंद झाला. इथं असलेल्या शाहू मिलमध्ये शाहू महाराजांचा सबंध इतिहास हा चित्ररूपानं ठेवलेला आहे. माझी विनंती आहे तुम्हाला, की ते जाऊन बघा. तुम्हाला अभिमान वाटेल, की असा राजा याठिकाणी होऊन गेला, आणि राज्य हे सामान्य माणसाच्यासाठी चालवायचं असतं हा आदर्श त्यांनी आपल्या सगळ्यांच्यासमोर ठेवला. त्यांनी या गोष्टीला पाठिंबा दिला. अनेकांना प्रोत्साहन दिलं. संघर्ष केला. मोठ्या मोठ्या लोकांनी त्यांच्याशी संघर्ष केला. पण त्यांनी सामान्य माणसाचा विचार कधी सोडला नाही. सामान्य माणसाची भलाई हीच आवश्यक गोष्ट ही भूमिका अखंडपणानं मांडली. आणि म्हणून आज शाहू महाराजांचं नाव घेणं याचा अभिमान तुम्हाला आणि मला सगळ्यांना होतो. तीच गोष्ट बाबासाहेब आंबेडकरांची आहे. आपण लोक नेहमी आंबेडकरांच्याबद्दल बोलतो. घटनेचे शिल्पकार म्हणून सांगतो. पण अनेकांना हे माहिती नाही, की या देशामध्ये स्वातंत्र्याच्या आधी एक जे सरकार झालेलं होतं, त्या सरकारमध्ये बाबासाहेब हे वीज आणि जलसंधारण खात्याचे मंत्री होते. त्यांच्या त्या काळामध्ये, ४७च्या पूर्वी, देश स्वतंत्र व्हायच्यापूर्वी अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांनी घेतले. भाक्रा-नांगलसारखं या देशातलं महत्त्वाचं धरण, याचा निर्णय आंबेडकरांनी घेतला. दामोदर व्हॅली याच्यासारख्या धरणाचा निर्णय हा आंबेडकरांनी घेतला. हा देश पुढं न्यायचा असेल तर जिथं वीज तयार होते, आणि जिथं वीज जादा आहे, ती जादा वीज जिथं वीज कमी आहे, त्या राज्यामध्ये दिली पाहिजे. त्याशिवाय ती राज्यं सुधारणार नाहीत, आणि त्यासाठी पॉवर ग्रीड कार्पोरेशन राज्याराज्यातली वीज अन्य राज्यांत नेण्याच्यासाठी सुविधा देणारं कार्पोरेशन हे बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलं. म्हणून विद्युत क्षेत्र असो, जल क्षेत्र असो या सगळ्या क्षेत्रामध्ये एक नवीन दिशा दिली, देशाची उन्नती करायची असेल, तर पाणी आणि वीज याची अत्यंत आवश्यकता आहे, ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्याच्या आधी आपल्या सगळ्यांना सांगितली. त्यांनी घटनेचं महत्त्वाचं काम केलंच. पण त्याचबरोबर या देशाचं भविष्य उज्ज्वल कसं होईल यासाठीसुद्धा त्यांनी अशा प्रकारचे निर्णय घेतले.



छत्रपती शाहू महाराजांचा पुतळा शरद पवार यांना भेट देऊन त्यांचा सत्कार करताना जयंत पाटील व हसन मुश्रीफ

आणि म्हणून फुले-आंबेडकर किंवा शाहू राजे यांचं नाव घेणं याचा अभिमान हा प्रत्येक माणसाला वाटला पाहिजे. जे फुले-शाहू-आंबेडकरांचं नाव का घेतो असं विचारतात त्यांना महाराष्ट्र समजला नाही एवढंच या ठिकाणी सांगतो. एवढ्या प्रचंड संख्येनं आपण याठिकाणी आलात. ही सभा यशस्वी केलीत. पण आजचा हा संवाद इथं थांबवायचा नाही. आपल्याला देशाचा नक्शा बदलायचा आहे. आज ज्यांच्या हातामध्ये देश आहे, त्या सांप्रदायिक विचाराला खड्यासारखं बाजूला करायचंय. देश एकसंध ठेवायचांय. नव्या पिढीची बेकारी घालवायचीय. महागाईच्या संकटातून सामान्य माणसाला बाहेर काढायचंय. कष्टकरी, शेतकऱ्याला सन्मानाने जगता येईल, त्याच्या अश्रूधारा, त्याच्या आत्महत्या संपतील, थांबतील आणि त्याचा प्रपंच सुधारला आहे हे चित्र बघायचं आणि हे करण्याचं काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानी एक जबाबदारी म्हणून आपल्या शिरावर घेतलेलं आहे. त्याला तुमची साथ मिळेल, अशा प्रकारची अपेक्षा याठिकाणी व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■

# विरोधकांच्या जाळ्यात न अडकता विकासाचा अजेंडा राबवा

## अजित पवार यांचे उद्‌गार



राष्ट्रवादी परिवार संवाद यात्रेची सांगता आज आपल्या कोल्हापुरच्या परिसरामध्ये होतेय. माझ्या आधीच्या वक्त्यांनी साधारण काय चाललेलं आहे हे सांगण्याचा प्रयत्न त्याठिकाणी केला. ही भूमी ही राजर्षी शाहू महाराजांची भूमी. त्यांचे विचार अतिशय व्यवस्थितपणे पुढं नेण्याचं काम हे आपण सगळेजणं करतोय. परंतु, अलिकडच्या काळामध्ये थोडंसं वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न हा राज्यामधल्या काही शक्तींचा चालू आहे आणि याची नोंद आपण सगळ्यांनी घेतली पाहिजे. तुम्ही पाहा, गुढीपाडवा २ एप्रिलला झाला. आपल्या मराठी वर्षाचं स्वागत आपण सगळ्यांनी उत्साहानं केलं. परंतु, त्याच्या नंतरच्या काळामध्ये ज्या घटना घडतायंत, त्याच्याकडं जर तुम्ही सहज नजर टाकली, तर आपल्या सगळ्यांच्या लक्षात येईल, की नवीन वर्षाची सुरूवात चांगली होत असताना काही जणांनी तेव्हापासून तुमच्या-माझ्या राज्यामध्ये जात, धर्म, द्वेषाचं विष पेरण्याचं काम त्याठिकाणी चालू केलेलं आहे.

साहेबांच्या घरावर हल्ला करणं, मातोश्रीवर जाण्याबद्दलचं काहीतरी वक्तव्य करणं. मला तुम्ही सांगा, गेली दोन-अडीच वर्षे करोनाचं संकट तुमच्या-माझ्यावर, देशावर, जगावर, महाराष्ट्रावर आलं. त्याच्यातून कसंतरी सावरण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी मिळून केला. सर्वांनी अंग झोकून काम केलं. काही लोकं तुम्हाला-मला सोडून गेली. त्यांनी मी यानिमित्तानं श्रद्धांजली अर्पण करतो. परंतु, त्या दोन वर्षांच्या काळामध्ये संपूर्ण देशात आणि राज्यामध्ये जे काही आर्थिक चक्र बिघडलं. कित्येक जणांच्या नोकऱ्या गेल्या. कित्येक जणांचा रोजगार गेला. कित्येक जणांची दुकानं बसली. काही जणांचे कारखाने बसले. याच्यातून पुन्हा तुम्हाला-मला सगळ्यांना सावरायचंय आणि तो सावरण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सगळेजण महाविकास आघाडीच्या माध्यमातून करतोय. आम्ही सगळेजणं आल्यानंतर खूप काही गोष्टी या महाराष्ट्राच्याकरता करायच्या होत्या. परंतु, जास्त वेळ करोनाच्या कामामध्ये गेला. त्याच्यातनं आपल्या प्रांताध्यक्षांनी ही यात्रा सुरू केली आणि याचा समारोप होत असताना आता इथून पुढच्या काळामध्ये आपली आपली काळजी घेत आपल्याला सगळ्यांना काम करावं लागणार आहे.

त्याच्यात अचानक लादलेली कोल्हापूरची निवडणूक. त्या निवडणुकीवर उभ्या देशाचं लक्ष होतंच, परंतु महाराष्ट्र फार बारकाईनं त्या निवडणुकीकडं बघत होता. मी तमाम कोल्हापूरकरांचं, मतदारांचं, विशेषत: जाधव ताईंचं तसंच आमचे हसन मुश्रीफ, सतेज पाटील आणि राजेश क्षीरसागर आणि असंख्य कार्यकर्त्यांचं, मतदारांचं आभार मानतो. त्यांना धन्यवाद देतो, की खऱ्या अर्थानं पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्रामध्ये एक चांगल्या प्रकारचं पाऊल उचलण्याचा प्रयत्न झाला. जाती-जातीमध्ये, धर्मा-धर्मामध्ये अंतर पाडण्याचं काम ज्या शक्ती करत होत्या, त्यांना त्याच्यातनं चपराक मिळालेली आहे. ही गोष्ट आपल्याला विसरून चालणार नाही.

मित्रांनो, एकंदरीतच यावेळेचा अर्थसंकल्प सादर करत असताना, मागं ज्यावेळेस आपलं सरकार आलं, त्यावेळेस काही घोषणा झाल्या. शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाणार. आपण सांगितलं काय आणि करतो काय. आपण कर्जमाफी केली. पण नियमित कर्ज फेडणाऱ्यांचं काय? आणि कालच्या अर्थसंकल्पामध्ये आपण त्याकरता निर्णय घेतला, आणि वीस लाख शेतकऱ्यांना दहा हजार कोटी रूपयांचा कर्जमाफीचा

निर्णय दिला. मी आज कोल्हापूरमध्ये पवार साहेबांच्या साक्षीनं सांगतो, बाळासाहेब पाटील आमचे सहकार मंत्री, आम्ही सगळेजण मिळून नजिकच्या काळामध्ये ते पैसे तुमच्या अकाऊंटला दिले जातील आणि ते काम पूर्ण झाले, की त्याच्यानंतर तिसरा जो आमचा निर्णय आहे, तोही निर्णय म्हणजे दोन लाखापेक्षा वरचं कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यांचं कर्ज फेडलं तर दोन लाखापर्यंतचं कर्ज माफ करण्याचा निर्णयदेखील आम्ही घेतल्याशिवाय गप्प बसणार नाही, हा शब्द आजच्या संकल्प यात्रेच्या समारोपाच्या निमित्तानं मी आपल्या सर्व सहकारी मित्रांना देऊ इच्छितो.

मित्रांनो, तिथंच आम्ही थांबलो नाही. भूविकास बँकेच्या ३५ हजार शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर भूविकास बँक होती.



जवळपास एक हजार कोटी रुपयांची कर्जमाफी त्यांची आपण केली. २७५ कोटी रूपये तिथले अधिकारी आणि कर्मचारी सातत्यानं आम्हाला भेटायचे, साहेबांना भेटायचे, सहकार मंत्र्यांना भेटायचे, जयंतराव, भुजबळ साहेब, हसन मुश्रीफ, सगळ्यांना भेटायचे. परंतु आम्हाला मार्ग काढता येत नव्हता. शेवटी आपलं सरकार आलं. आपण त्याच्यातून पण मार्ग काढला आणि हे पण दुखणं आपण दूर करण्याचा प्रयत्न केला.

मित्रांनो, यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये विकासाची पंचसूत्री कार्यक्रम आपण दिला. शेवटी पुन्हा एकदा माझ्या महाराष्ट्रातल्या गोरगरीब जनतेला, कष्टकऱ्यांना, अठरापगड जातीच्या माझ्या लोकांना, बारा बलुतेदारांना उभं करण्याच्याकरता वेगवेगळ्या महामंडळांच्या माध्यमातनं आपण मदत केल्याशिवाय गत्यंतर नाही. मित्रांनो, मी महाराष्ट्रामध्ये जेव्हा माझी बाईट घेण्याचा प्रयत्न माझे पत्रकार मित्र करतात, त्यावेळी ते विचारत असतात, की अमक्या अमक्या सभेत, तिथं अमकं अमकं झालं, तुमचं मत काय? मघाशी डॉ. अमोल कोल्हे म्हणाले ती गोष्ट खरी आहे. मित्रांनो, याच्यातून तुमच्या माझ्या रोजी-रोटीचा प्रश्न सुटणार नाही. कारण नसताना दोन समाजामध्ये तेढ निर्माण करून आपल्याला पुढं जाता येणार नाही. युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण, शाहू-फुले-आंबेडकरांची शिकवण ही लक्षामध्ये ठेऊनच आपल्याला पुढं जावं लागेल. लोकांचं लक्ष विचलित करण्याच्याकरता जाणीवपूर्वक अशा प्रकारच्या घटना घडवल्या जातात, त्याच्यातून लक्ष तिकडं डायव्हर्ट केलं जातं, त्याच्यातून पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढतात, तिकडं लोकांचं लक्ष जाऊ नये, गॅस सिलिंडरच्या किंमती, माझ्या आया बहिणी सांगत होत्या, की त्याचा टॅक्स कमी करा. मला तुम्हा सगळ्यांना सांगायचंय, की एक हजार कोटी रूपयांचा टॅक्स राज्य सरकारनी काढून टाकला. तरी त्याच्यानंतरच्या काळामध्ये सातत्यानी गॅसच्या किंमती वाढवण्याचं काम केंद्र सरकार करतंय.

महागाई वाढतेय. माझ्या ऊस उत्पादक शेतकऱ्याला वाटतंय, की माझा ऊस जाईल का नाही. आम्ही सगळेजण त्याच्याकरता लक्ष ठेऊन आहोत. माझ्या महाराष्ट्रातल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या ऊसाचं कांडं न् कांडं गेल्याशिवाय त्या त्या भागातले साखर कारखाने बंद करू दिले जाणार नाहीत. त्यांना त्याच्याकरता मदत केली जाईल. ट्रान्सपोर्ट सबसिडी असेल, रिकव्हरी लॉस असेल, त्याच्याहीबद्दलचे निर्णय घेऊ. काळजी करू नका. आपण सगळेजण तुमच्या बरोबर आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तुमच्या पाठीशी आहे. महाविकास आघाडीचं सरकार तुमच्या पाठीशी आहे. हे सगळं करत असताना हार्वेस्टर कमी पडतायंत. तुम्ही हार्वेस्टर इथून पुढं घ्या. त्यालाही सबसिडी देण्याचा निर्णय उद्याच्या काळामध्ये





शंभर टक्के घेतल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही.

मित्रांनो, एवढं करून फक्त चालणार नाही. इथून पुढच्या काळामध्ये जे काय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हे जे वेगवेगळे नॉन इश्यू सध्या चाललेले आहेत, समाजामध्ये फूट पाडण्याच्या शक्तीच्या कारस्थानांना आपण बळी पडता कामा नये. त्याच्या संदर्भामध्ये आपण निक्षून सांगितलं पाहिजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, केवळ विकासावर बोललं पाहिजे. सरकारने अडीच वर्षामध्ये काय चांगलं केलं. अनेक चांगले निर्णय घेतलेले आहेत, ते जनतेपर्यंत पोहोचवण्याचं काम आणि सरकारकडून काही राहिलं असेल तर त्यासाठी पण तुम्ही आग्रह धरा आमच्याकडं. आम्हाला सांगा, की फिरत असताना ही गोष्ट आम्हाला जाणवतेय. जरूर आपण त्याच्यामध्ये लक्ष घालू. कारण जनतेचे प्रश्न सोडवण्याच्याकरता, सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सोडवण्याच्याकरता हे सरकार आपण स्थापन केलेलं आहे. हा विसर तुम्हाला-मला कदापि पडता कामा नये.

उद्याच्या काळामध्ये सोमवारी सुप्रीम कोर्टामध्ये केस आहे. आम्ही ओबीसी समाजाला त्यांच्या संख्येच्या प्रमाणामध्ये लोकप्रतिनिधीत्व मिळालं पाहिजे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका, महानगरपालिका, त्याकरता आम्ही काही कायदे केलेत, एकमतानी ठराव केलेत. काही बदल केलेत. परंतु, सुप्रीम कोर्टामध्ये काहीजण गेलेत. चांगल्यातले चांगले वकील आम्ही देतोय. परंतु, कार्यकर्त्यांनो, यदा कदाचित उद्याच्याला सोमवारचा निर्णय वेगळा आला, तर सध्या तुमच्या-माझ्या प्रत्येकाच्या मनामध्ये आहे, की निवडणुका चार महिन्यांनी होतील. डोक्यातनं काढा. साहेबांच्यादेखत सांगतोय, सगळ्या नेत्यांच्यादेखत सांगतोय, पट्टदिशी सुप्रीम कोर्टाचा आदेश आला, शेवटी ते सर्वोच्च कोर्ट आहे. त्यांनी सांगितलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल. आणि नंतर तुम्ही म्हणाल, की आम्हाला तर वाटलंच नाही, की निवडणुका लागतील. आम्ही गहाळ होतो. आम्ही आता काय करायचं. हे डोक्यातनं काढा. इथून परत आपापल्या घरी जाताना तोही विचार मनामध्ये ठेवा आणि त्याच्यातनं निवडणुका लागल्या तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता तत्पर असला पाहिजे.

मघाशी खडसे साहेबांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे, कितीही मागच्या नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये आपण पहिल्या क्रमांकावर गेलेलो असलो, तरीदेखील आम्ही नेतेमंडळींनी



सभेसाठी लाखोंच्या संख्येने जमलेल्या कार्यकर्त्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार अभिवादन करताना.

कार्यकर्त्यांच्या पुढं कितीही भाषणं केली, जनतेच्या पुढं कितीही भाषणं केली, जोपर्यंत समोर बसणारा कार्यकर्ता पेटून उठत नाही, तोपर्यंत आपल्या जास्तीत जास्त जागा निवडून येऊ शकत नाहीत ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. हे आपण सगळ्यांनी लक्षामध्ये घ्या. आम्हाला पदं मिळाली. आम्हाला वेगवेगळ्या ठिकाणी संधी मिळाली. कोण खासदार झालं. कोण आमदार झालं, कोण मंत्री झालं. कोण उपमुख्यमंत्री झालं. परंतु, ज्यांच्यामुळं झालो, त्याही कार्यकर्त्यांना कुठं ना कुठं पदं मिळाली पाहिजेत. त्याकरता उद्याची निवडणूक महत्त्वाची आहे. नवीन चेहऱ्यांना आपल्याला संधी द्यायचीय. तरूणांना संधी द्यायचीय. आया-बहिणींना संधी द्यायचीय. आणि म्हणून त्याहीसंदर्भामध्ये निवडणुका लागल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढण्याचं काम आम्ही लोकं करू. परंतु, आपण त्या त्या भागातले वॉर्ड, त्या त्या भागातले वेगवेगळे जिल्हा परिषदेचे गट आणि पंचायत समितीचे गण इथं सगळीकडं बारकाईनं लक्ष ठेवलं पाहिजे. अशा प्रकारची माझी सगळ्यांना आग्रहाची विनंती आहे. यंदाचा सव्वा चार लाख कोटी रूपयांचा अर्थसंकल्प आपण सादर केला. दीड लाख कोटीची वार्षिक योजना दिलेली आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये कट लावायचा नाही, अशा पद्धतीचा निर्णय आम्ही सगळ्यांनी मित्रांनो घेतलेला आहे. इथून पुढच्या काळामध्ये पुढं जात असताना ही जी काय महागाई आहे, ही जी काय बेरोजगारी आहे, त्याच्या विरोधामध्ये संघर्ष करण्याचं काम हे आपल्या सर्वांना त्याठिकाणी करावं लागेल. हे पण आपण सगळ्यांनी लक्षामध्ये घ्या. विरोधकांनी आणि त्यांच्या हस्तकांनी टाकलेल्या जाळ्यामध्ये न अडकण्याचं आणि विरोधकांच्या अजेंड्यामध्ये फरफटत न जाता स्वत:चा विकासाचा अजेंडा हा निर्माण करण्याची हुशारी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दाखवली पाहिजे हे मी अतिशय स्पष्टपणे सांगतो. आम्ही सगळ्यांनीच समाजाच्या पुढं, मीडियाच्या पुढं बाईट देत असताना बोलत असताना तारतम्य ठेऊन बोललं पाहिजे. आपले नेते आदरणीय पवार साहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. कसल्याही प्रकारची संकटं आली, तरी त्याच्यातनं आपण अडचणीमध्ये न येता, नाउमेद न होता, कार्यकर्त्यांची ऊर्जा कशी वाढवता येईल याकरता प्रयत्न करायचा असतो. आणि कधी कधी कायतरी एखादं वाक्य बोलून कुठला तरी समाज आपल्यावर नाराज होतो. कुठल्या तरी घटनेमुळं कुठं ना कुठं मीडियामध्ये वेगवेगळ्या पद्धतीच्या बाईट तिथं दिल्या जातात. आणि त्याच्यातनं सोशल मीडिया नको त्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करत असतो. पवार साहेबांनी गेली पन्नास वर्षे महाराष्ट्राचं राजकारण आदरणीय पवार साहेबांच्या भोवती फिरतंय. आजपर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये असा कोणताही नेता जन्माला आलेला नाही, की त्यांच्या अवतीभोवती पन्नास वर्षे महाराष्ट्राचं राजकारण फिरतंय. हे भाग्य फक्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना मिळालेलं आहे. ही आठवण नेहमी मनाशी बाळगा आणि त्या पद्धतीनं आपण सगळ्यांनी काम करत राहा.

हसन मुश्रीफ साहेब, जयंतराव पाटील आपण सगळ्यांनी ज्या प्रचंड संख्येनी ही जाहीर सभा आयोजित केली, आणि ज्या प्रचंड संख्येनी आपण प्रतिसाद दिला. त्याबद्दल आपल्याला लाख लाख धन्यवाद देतो. लाख लाख आभार मानतो आणि मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■

महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, राजर्षी शाहू महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समतेचे प्रणेते महात्मा जोतिबा फुले, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर या सर्व थोर महापुरूषांना, अण्णा भाऊ साठेंना, ज्यांनी समाजाला नेहमी घडवण्याचं काम केलं, एक नवी दिशा देण्याचं काम केलं या सर्वांना वंदन करून मी माझ्या भाषणाची सुरूवात करतो. आज या अंबाबाईच्या भूमीत, ताराराणीच्या भूमीत, ज्या भूमीमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी समतेचा संदेश भारताला दिला, ज्या भूमीमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यासारख्या महान बुद्धीवान नेत्याला प्रोत्साहन देण्याचं काम राजर्षी शाहू महाराजांनी केलं, त्या भूमीमध्ये आम्ही सगळेजण उभे आहोत याची जाणीव आम्हा सगळ्यांना आहे.

गेले काही महिने मी महाराष्ट्राच्या अनेक भागात जाण्याचा प्रयत्न केला. आदरणीय पवार साहेबांनी मला पक्षाचा अध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली. पक्षानं दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणानं, निष्ठेनं, शेवटपर्यंत निभवायचं त्या दिवशी आम्ही सगळ्यांनी ठरवलं. वाईट दिवस आले. अनेक लोकं सोडून गेली. पण या व्यासपीठावर बसलेले हे सगळे दिग्गज पवार साहेबांच्या मागं ताकदीनं उभे राहिले आणि म्हणून आजचा दिवस पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आज आपण सामर्थ्यानं याठिकाणी एकत्र जमलेलो आहोत.

खरं म्हणजे महाराष्ट्रात फिरताना फ्रंटलचे आमचे सगळे प्रमुख, आमचा युवकांचा अध्यक्ष महबूब शेख आहे. कार्याध्यक्ष रवीकांत वरपे असतील, सूरज चव्हाण असतील. आमच्या महिला राष्ट्रवादीच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर असतील, आमचे विद्यार्थी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील गव्हाणे असतील, आमच्या सक्षणा सलगरसारखी युवती असेल. सामान्य घरातली, बहुजन समाजातली, आमच्या पक्षाचे नवे चेहरे महाराष्ट्रात सर्व ठिकाणी घेऊन जात असताना महाराष्ट्रातल्या प्रत्येक तालुक्यात पवार साहेब, सर्वांनीच आमच्या सगळ्यांचं जिव्हाळ्यानं स्वागत केलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आज महाराष्ट्रात सत्तेवर आहे. जनतेचे प्रश्न तर असतातच आणि आहेतच. पण त्याचबरोबर महाराष्ट्रात पवार साहेबांबरोबर राहिलेला ४०-५० वर्षांपासूनचा जो कार्यकर्ता आहे, जो राष्ट्रवादीचा कार्यकर्ता म्हणून त्याठिकाणी काम करतोय, २२ वर्षे पवार साहेबांना राष्ट्रवादीचा कार्यकर्ता म्हणून साथ दिली, त्यांच्या मनात काय आहे. त्यांच्या समस्या काय आहेत. त्यांच्या पक्षाकडून अपेक्षा काय आहेत. त्यांच्या आमच्या सरकारकडून अपेक्षा काय याचा संवाद साधण्याचा प्रयत्न महाराष्ट्रभर आम्ही केला.

सामान्य माणसाला बोलण्याची संधी मिळाली तर आदरणीय पवार साहेब, अनेक चांगल्या कल्पना पक्षाच्या



हिताच्या महाराष्ट्रातल्या असंख्य कार्यकर्त्यांनी मांडल्या. जवळपास गडचिरोलीच्या अहिरी भागातून आम्ही सुरू केलं. आमचा प्रवास जवळपास सर्व जिल्ह्यामध्ये झाला. जवळपास ३५३ तालुके, अडीचशे विधानसभा मतदारसंघ १४ हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतर आम्ही कापलं. या काळात महाराष्ट्रातल्या राष्ट्रवादीच्या जवळपास ३ लाख कार्यकर्त्यांशी आम्ही संवाद साधला. लोकांच्यात गेलं, की खरं कळतं की काय परिस्थिती त्या भागातली आहे. आणि म्हणून मला एक लक्षात आलं, या तीन-चार लाख लोकांना भेटत असताना आदरणीय पवार साहेब, या महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात,

जाईल त्या ठिकाणी पवार साहेबांना मानणारा फार मोठा वर्ग आहे, कार्यकर्त्यांचा आहे, जनतेचा आहे. नागरिकांचा आहे. या सर्वांना, कार्यकर्त्यांना जोडणारा एकच धागा, समान धागा आहे आणि तो म्हणजे आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब.

आज ही माणसं सगळी इथं आलेली आहेत. आम्ही ज्या ज्या ठिकाणी गेलो, माणसं आमच्यासाठी नाही, पवार साहेबांच्या पक्षासाठी त्याठिकाणी गोळा झाली. आणि त्यामुळं महाराष्ट्रातल्या प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक जिल्ह्यात पवार साहेबांना मानणारे कार्यकर्ते फार मोठ्या प्रमाणावर आहेत. आणि त्यामुळं याठिकाणी ही परिवार संवादची यात्रा संपली. काल आम्ही मुश्रीफ साहेबांच्या मतदारसंघात गेलो आणि शेवटची सभा त्याठिकाणी झाली. पवार साहेब, मला

# जातीयवादी शक्तींना बाजूला ठेवण्याशिवाय पर्याय नाही

## जयंत पाटील यांचे उद्‌गार

एक सांगितलं पाहिजे. प्रत्येक विधानसभेत, माझं आणि मुश्रीफ साहेब, आम्ही पाहुणे आहोत. मुश्रीफ साहेबांच्या मतदारसंघात मागच्या सहा निवडणुकांत माझी शेवटची सभा ही कागलमध्ये होते. आणि जेव्हा जेव्हा शेवटची सभा कागलला झालेली आहे. तेव्हा तेव्हा महाराष्ट्रात आपला देदिप्यमान विजय झालेला आहे. आणि मला हे सांगितलं पाहिजे, की कालची सभा ही कागलमध्येच झाली. हा योगायोग आहे का आपल्या सगळ्यांचं नशिब आहे. महाराष्ट्रात सगळ्यात मोठा पक्ष राष्ट्रवादी होईल, याच्यात आता माझ्या मनात शंका नाही. कारण, कागलच्या जन्मभूमीचा आशीर्वाद घेऊन आपल्या कार्याचा समारोप होतोय.

खरं म्हणजे सरकारमध्ये आमचा पक्ष आहे. आमच्या पक्षाचे मंत्री सरकारमध्ये आहेत. अजितदादांनी शेतकऱ्यांसाठी काय काय केलं ते आपल्याला सांगितलं. करोनामध्ये तिजोरी रिकामी असताना अजितदादांनी दोन लाखापर्यंतचं कर्ज माफ करण्यासाठी बाहेरून पैसे उचलले. पण महाराष्ट्राला दिलेला दोन लाखापर्यंतच्या कर्जमाफीचा शब्द त्याठिकाणी पूर्ण करून दाखवला. काल परवाच्या अर्थसंकल्पामध्ये त्यांनी पन्नास हजाराचा निर्णय घोषीत केलाय. आणखीनही पुढचा निर्णय सांगण्याचं काम त्यांनी केलंय. महाराष्ट्र आर्थिक अडचणीत असताना आमच्या सरकारचा हा गाडा अजितदादांनी फार चांगला सांभाळला. छगन भुजबळ साहेबांचं तर काय सांगायचं. भुजबळ साहेब, तुमच्या शिवभोजन थाळीवर महाराष्ट्रातली जनता एकदम खूष आहे. एवढी खूष आहे, की शिवभोजन थाळीमुळे गोरगरीबांचं, कष्टकऱ्यांचं पोट भरण्याचा एक फार मोठा मार्ग आपल्यामुळं झालाय.

राजेश टोपेंचं तर करोनाच्या काळात देशात कौतुक झालं. जितेंद्र आव्हाडांनी लोकांना परवडणाऱ्या घरासाठी अनेक चांगले निर्णय घेतले. मुश्रीफ साहेबांनी असंघटित कामगारांसाठी अनेक चांगले निर्णय घेतले. धनंजय मुंडेंनी सामाजिक न्याय खात्यामध्ये जे काम केलं, परवा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्तानं घराघरापर्यंत आपण एक माहितीपत्रक दिलं. अनेकांचं मला फोन आले, की एवढं काम दोन वर्षात सामाजिक न्याय विभागानं करून खरंच मागासवर्गीय समाजाला फार मोठी प्रेरणा आणि मदत केलेली आहे. त्याचं कौतुक सामान्य माणसाला आहे. आम्ही कधी सांगायला गेलोच नाही. करोनामुळं याचा प्रचारच होऊ शकला नाही. ही आमची अडचण आहे. आमचे राज्यमंत्री इथं सगळे बसलेले आहेत. त्यांचंही काम चांगलं आहे. पण आपल्या सर्वांना सामान्य घरातली माणसं पक्षात पुढं येतायंत. मी असाच धुळ्याला गेलो होतो. तिथं हिमानी वाघ म्हणून मुलगी आहे. तिला मी धुळ्याहून मुद्दाम आज बोलावलं.




राष्ट्रपती काँग्रेस पक्षाची उभारणी मजबुतीने करून राज्यातला पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनविण्याचा

मला ती इतकी खटपटीत, प्रयत्नात होती, आम्ही गेलो म्हटल्यावर एवढी उत्साही होती ती, हिची एवढी धडपड चालू होती, हिचे वडील शेती करतात. उपजिविकेचं साधन म्हणजे २०० कोंबड्यांचं एक कुक्कुटपालन केंद्र. त्यातनं ती पैसे मिळतात. स्वत:चं शिक्षण घेते. घरातल्यांनाही आधार करते. पण, माझ्या पक्षासाठी ही मुलगी वेळ देते हा तुमच्या-माझ्या सर्वांच्यासाठी मोठा आशेचा किरण आहे. आमच्या नव्या मुलांना, नव्या मुलींना आम्ही पुढं आणण्याचा प्रयत्न करतो. आमचा सुनील गव्हाणे विद्यार्थी राष्ट्रवादीचा, त्याला मी म्हटलं, मला आत्ता काय पुढारी नकोत तुमचे. २०२९ साली, २०३४च्या विधानसभा लढवताना राष्ट्रवादीची नवी पिढी तयार करायचं काम सुनील गव्हाणे विद्यार्थी दशेपासून आपण करूया. आज युवती राष्ट्रवादी काँग्रेसची त्याच पद्धतीनं आपण आणतोय. शेवटी भविष्यात २०२४च्याच नाही, तर २०३४च्या निवडणुकांपर्यंत लक्ष्य घेऊन कार्यकर्ता घडवण्याचं काम आपण सगळ्यांनी करायचंय.

गांधी, नेहरू, आंबेडकर यांच्या वाटेनं चालणारा आमचा भारत देश आज धर्माधतेकडे जबरदस्तीनं नेण्याचा प्रयत्न काही लोकं करतायंत. २०१४च्या आधी हा देश गांधींचा, बुद्धांचा देश म्हणून संबोधला जायचा. पण २०१४नंतर परिस्थिती बदलायला लागली. आपण बॅरिस्टर जिनांची आठवण मुद्दामहून आज करण्याची आवश्यकता आहे. त्या माणसानं हट्ट केला. पाकिस्तान वेगळं केलं. धर्मांध शक्तींचं पाकिस्तानमध्ये राज्य झालं. आणि धर्मांध शक्ती ज्यावेळी राज्य करायला लागतात.






निर्धार नेते व कार्यकर्त्यांनी शपथ घेऊन व्यक्त केला. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सर्वांना शपथ दिली.



त्यावेळी देश कसा रसातळाला जातो हे पाकिस्तानकडं बघून आज आपल्याला दिसतंय. कुठे पाकिस्तान आणि कुठे सर्वधर्मसमभाव असणारा आमचा भारत देश. याच्यातला साधा फरक आपण लक्षात घेतला तर तुमच्या लक्षात येईल, की जातीयवादी शक्तींना बाजूला ठेवण्याशिवाय आपल्याला पर्याय नाही. जातीयवादी शक्ती जर सतत सत्तेत बसल्या, आणि जे सध्या चाललेलं आहे महाराष्ट्रात ते जर करत राहिल्या, तर मित्रांनो पाकिस्तानमध्ये जी परिस्थिती झाली, तशी जात्यांध लोक निश्चितपणानं या देशात कदाचित करून ठेवतील. म्हणून द्वेषाचं राजकारण या देशात सुरू होऊ नये आणि त्यासाठी आपण सगळ्यांनी आपली वज्रमूठ एक केली पाहिजे.

खरं म्हणजे, लोकांची माथी भडकवायची, मूळ मुद्यावरून लोकांना दुसऱ्या मुद्यावर न्यायचं. अहो, पेट्रोल सव्वाशे रूपये झालं. सिमेंटची गोणी सव्वा चारशे-साडे चारशे झाली. आमच्या वेळेला दोनशे रूपयाला होती. पेट्रोल आमच्या मनमोहन सिंगांच्या सरकारच्या काळात ६० रूपयाला मिळत होतं. स्टील ८० रूपयाला गेलं. तुमचं घर जर तुम्ही तीन लाख रूपयाला बांधू शकला असता, पण आता ६ लाख मोजल्याशिवाय तुम्हाला ते बांधता येत नाही. ही परिस्थिती आहे अणि म्हणून आपल्या सर्वांना माझी विनंती आहे, की आपण या सगळ्या गोष्टींच्या बाबतीत ठामपणानं महाराष्ट्रात वज्रमूठ एकत्र करण्याची गरज आहे. महाराष्ट्र कधी दिल्लीच्यासमोर झुकला नाही. पक्ष फोडण्याचे प्रयत्न झाले. पक्ष बाजूला करण्याचे प्रयत्न झाले. पण महाराष्ट्र झुकला नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाटेनं जाणारा महाराष्ट्र शरद पवार साहेबांच्या मागं आज ठामपणानं उभा आहे. आणि तो महाराष्ट्र दिल्लीकरांपुढं कधीही झुकणार नाही हा आम्हा सर्वांचा आत्मविश्वास आहे आणि हीच शिकवण छत्रपती शिवरायांकडून आम्ही सगळ्यांनी घेतली आहे.

खरं म्हणजे भारतीय जनता पक्ष फार अवघड आहे. जे स्वत: करता येत नाही, त्याच्यासाठी बुजगावणी उभी करायची सवय आहे त्यांना. काल-परवा एसटीच्या संपात एक बुजगावणं उभं केलं. आता दुसरं एक बुजगावणं महाराष्ट्रात सध्या भोंगा वाजवायला लागलंय. २०१९च्या निवडणुकीला साहेबांना किती मतं पडली? सव्वा दोन टक्के पण पडली नाहीत. आज या देशामध्ये पवार साहेबांच्यावर टीका करणं भारतात आणि महाराष्ट्रात ही एक फॅशन झालेली आहे आणि त्याच्याशिवाय ते चर्चेत येत नाहीत. म्हणून उचलली जीभ, लावली टाळ्याला ही व्यवस्था महाराष्ट्रात झालेली आहे.

खरं म्हणजे साहेब, देशात बेरोजगारी फार वाढलेली आहे. ते पुन्हा येणार. समोर कोणी पैलवान दिसत नाही. अशा गर्जना करणारी लोकंदेखील बेरोजगार झालीत. त्यामुळं एकावेळी पवार साहेबांच्यावर १४ ट्विट घरात बसून. त्यांनी परवा सांगितलं, की भारतात राहणाऱ्या सर्व लोकांचा डीएनए एक आहे. मी कौतुक त्यांचं करतो, की उशिरा का होईना त्यांना कळलं की भारतातल्या सर्वांचा डीएनए एक आहे. जर डीएनए एक असेल तर आमच्या देशात मागं राहिलेले जे समाज आहेत, त्यांच्या आरक्षणाला तुम्ही विरोध का करता. मागं राहिलेल्या ओबीसी समाजाच्या आरक्षणात अडथळे एवढे का येतायंत. मराठा समाजाच्या आरक्षणाला सतत तुमचा विरोध का? तुमची कृती सतत या देशात मागं राहिलेल्या मागास लोकांच्या अडथळ्याची आहे, आणि म्हणून डीएनए एक आहे असं म्हणत असाल तर हे सगळे अडथळे कसे दूर करायचे तुम्हाला माहिती आहे, ते सगळे अडथळे दूर करा. महाराष्ट्रात ओबीसी आरक्षणाचा प्रश्न लवकरात लवकर सुटला पाहिजे. आम्हाला महाराष्ट्रात जी जी आरक्षणाची भूमिका मांडली, ती सगळ्या मागं राहिलेल्या आणि डीएनए एक असलेल्या लोकांना आरक्षण दिलं तर ती पुढं येतील ही सद्भावना आहे. आणि ती आरक्षणाची भूमिका त्यांनी मान्य करणं आवश्यक आहे असं मला वाटतं.

मी आपल्या सर्वांना आज एवढंच सांगेन, शाहू-फुले-आंबेडकरांच्या पाठोपाठ यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्र उभा करताना, महाराष्ट्राची जडणघडण करताना महाराष्ट्राचं मन, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्या त्या वेळेच्या नेत्यांना पुढं आणत त्यांना उभं करण्याचं काम केलं. आदरणीय पवार साहेबांनी फार लहान वयात माझ्यासारख्या कार्यकर्त्याला असेल, आर. आर. पाटील आज आपल्यात नाहीयेत. ते असतील, दिलीप वळसे-पाटील असतील, अनेक मान्यवर आहेत, ज्यांना संधी पवार साहेबांनी दिली. त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितलं, की मला नवा महाराष्ट्र घडवायचांय, नवी पिढी पुढं आणायचीय. म्हणून त्यांनी आम्हाला संधी दिली. आम्हाला जेवढं शक्य होतं, तेवढं काम केलं. पण आता आमचीसुद्धा जबाबदारी आहे, की राष्ट्रवादीची नवी पिढी पुढं आणण्याचं काम महाराष्ट्रात आम्ही सगळ्यांना केलं



**अजित पवार यांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि छत्रपती शाहूंचा पुतळा भेट देऊन जयंत पाटील यांचा सत्कार करण्यात आला तेव्हा शेजारी ए.वाय.पाटील, हसन मुश्रीफ, हेमंत टकले, जितेंद्र आव्हाड, सुनील तटकरे व राजेश टोपे व इतर**




कार्यक्रमस्थळी शाहीर पोवाडा सादर करताना

### ।। शिव-शाहू पोवाडा ।।

पुरोगामी महाराष्ट्राला संकल्प पाहिजे ।
या देशाला ताराय पवारसाहेब पाहिजे ।धृ।
धर्मांधशक्तीचे पांढरे साप माजले ।
विखारी विषाने समाज यांनी नासविले ।
बहुजन तरुण सारे इथे बिथरले ।
अशांत करुणी महाराष्ट्र पेटविले ।
या विध्वंसाच्या आगीला विझवाय पाहिजे
या देशाला ताराय पवारसाहेब पाहिजे ।धृ।
महागाईमुळे हा देश सारा भरडला ।
पेट्रोल, गॅस दर वाढीत जन चिरडला ।
सर्वसामान्यांच्या खिसा यांनी कापला ।
उपाशी पोटावर मानव यांनी मारला ।
इथे गरिबांच्या पोटाची सोय केली पाहिजे।
या देशाला ताराय पवारसाहेब पाहिजे ।धृ।
शिव-शाहू फुले आंबेडकरविचार ।
त्यांच्या विचाराने बाग इथे फुलवु रं ।
सर्वसमान्यांना पवारांचा आधार ।
पुरोगामी विचाराने जन गुंफुरं ।
या विचारांची माळ राष्ट्रकार्यास पाहिजे ।
या देशाला ताराय पवारसाहेब पाहिजे ।४।

पाहिजे. नव्या रक्ताला संधी दिली पाहिजे. नव्या लोकांना संधी देत असताना त्यातल्या जी कर्तबगारी आहे, लोकांना समजून घेण्याची जी पद्धत आहे, त्या सगळ्यांना प्रोत्साहन देऊन आम्हाला महाराष्ट्रात पुन्हा एकदा मोठी ताकद निर्माण करण्याचं काम करायचंय.

म्हणून आम्ही एक तास राष्ट्रवादीसाठी ही कल्पना मांडली. प्रत्येक गावात राष्ट्रवादीला मानणाऱ्यांनी महिन्याच्या पहिल्या शनिवारी एकत्रित बसायचं, चर्चा करायची, विचारविनिमय करायचा, त्या चर्चेत तुमच्या वॉर्डात, तुमच्या गावात बैठक ज्यावेळी होईल प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी, तुमच्याच लक्षात येईल, की राष्ट्रवादीच्या विचाराला पाठिंबा देणारी अनेक लोकं तुमच्या बैठकीला येऊन बसलेली आहेत. ही लढाई विचारांची आहे. शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार आपण खांद्यावर धरलेला आहे. आज या कार्यक्रमाची टॅगलाईन आहे, यल्गार पुरोगामी महाराष्ट्राचा आणि म्हणून सर्वसमावेशक असा निर्धार, सर्व समाजांना बरोबर घेऊन जाण्याचं काम आपल्याला करायचंय. मी आदरणीय पवार साहेबांचं आभार मानेन, की त्यांच्यामुळं महाराष्ट्र बघण्याची संधी मला मिळाली. मला आठवतंय, पवार साहेबांच्याबरोबर कधी गेलो, तर प्रत्येक गाव साहेब सांगायचे. प्रवासातले प्रत्येक शहर सांगायचे. महाराष्ट्रात सर्व कानाकोपऱ्यात जर कुणी गेलं असेल, तर मला वाटतं दुसरा कुणी नेता नाही, आदरणीय पवार साहेब महाराष्ट्रातल्या सगळ्या कानाकोपऱ्यात गेले आहेत.

महाराष्ट्र समजून घ्यायचा असेल, तर टीव्हीवर, मोबाईलवर आणि झूमवर नाही समजणार. महाराष्ट्र त्या अक्कलकुव्याच्या कोपऱ्यात गेल्याशिवाय कळत नाही. महाराष्ट्र अरमोरीला गेल्याशिवाय कळणार नाही. सावंतवाडीच्या खाली दोडामार्गला गेल्याशिवाय कळत नाही, एवढा महाराष्ट्र मोठा आहे आणि म्हणून या महाराष्ट्राला समजून घेण्याची संधी पक्षाचा अध्यक्ष या नात्यानं मला आपण दिलेल्या संधीमुळं मिळाली. माझ्याबरोबर माझे हे सर्व सहकारी, अव्याहतपणे त्यांनी साथ दिली आणि म्हणून मी त्यांचं सर्वांचं, प्रत्येक तालुक्यात, मतदारसंघात आल्यावर तुम्ही आम्हा सर्वांचं फार मोठं स्वागत केलं. सुनील शेळकेंसारख्या अनेकांनी मोठ्या सभा घेतल्या. मी सगळ्यांचा उल्लेख करू शकणार नाही. पण अनेकांनी अतिशय चांगल्या पद्धतीनं महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस किती भक्कम आहे हे दाखवून दिलं. आज आपण बूथपर्यंत जाण्याचा हट्ट करतोय. आपण शरद पवार साहेबांचं नाव घेतो. महाराष्ट्रात माझ्यासारख्या कार्यकर्त्यांची तुमच्याकडून अपेक्षा आहे. २०२४ला आम्ही आघाडी करू. तीन पक्षाची आघाडी होईल. सर्व बरोबर होईल. त्यात काही अडचण नाही. पण मागच्या वेळी आम्ही ११४ जागा लढवल्या. आम्ही ११४ लढवू, १४४ लढवू, हे त्यावेळी ठरेल. आज नाही. पण जे ठरवू त्यातली प्रत्येक जागा ही विजयीच झाली पाहिजे, हा आपल्या सगळ्यांनी संकल्प केला पाहिजे. उमेदवार पडण्यासाठी नाही, तर निवडून येण्यासाठी उभे करायचे आहेत.

■■

आज या कोल्हापूरच्या पावन भूमीमध्ये परिवार संवाद यात्रा जी जयंतरावांनी मागच्या वर्षी सुरू केली, त्याचा हा विशाल सांगता समारोह आज याठिकाणी होत आहे. मुश्रीफ साहेब आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना मी खूप खूप धन्यवाद देऊ इच्छितो. आम्ही या महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाचे, गोंदिया-गडचिरोली त्या भागापासून आज या हजार-बाराशे किलोमीटरच्या अंतरावर कोल्हापूर इथे आज हा कार्यक्रम आयोजित होत आहे. जयंतरावांनी कष्ट करून सर्व जिल्ह्यांमध्ये, सर्व शहरांमध्ये आणि प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा आढावा त्यांनी घेतला. आणि खरोखर पक्षाला बळकटीकरणासाठी त्यांचा हा प्रयोग कौतुकास्पद आहे.

मित्रांनो, आज आपल्याकडं विशाल नेतृत्व आहे. पवार साहेबांच्या माध्यमातून फक्त या महाराष्ट्रातच नव्हे, पण संबंध देशाला मार्गदर्शन मिळत आहे. मोदी साहेबांनी या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये येऊन किती कौतुक केलेलं आहे. आणि पवार साहेब हा ८२ वर्षांचा योद्धा आजही कुठेतरी थकला असं वाटत नाही. उलट एक नवीन ऊर्जा आणण्यासाठी स्फूर्तीनं या महाराष्ट्रात आणि देशात काम करत आहे. मित्रांनो, हा कोविडचा दोन वर्षांचा काळ गेला. आपल्यासारखी अनेक लोकं घरी बसत होते. घाबरून बसत होते. मास्क लाऊन बसत होते. आपल्याला कोविड झाला तर काय होईल? पण, पवार साहेब, या दोन वर्षामध्ये आपण सगळ्यांनी पाहिलं असेल, कोल्हापूरमध्ये असो, सातारा असो, सांगली असो, या राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये पवार साहेब जाऊन ते स्वत: फिरले. तिथल्या परिस्थितीचा आढावा घेतला. लोकांना औषध नसेल, बाकीच्या काही गोष्टी असेल, त्याचा दिलासा देण्याचं काम सुद्धा पवार साहेबांनी केलं.

मागच्या वर्षाच्या अधिवेशनाच्या विषयी मी सांगू इच्छितो. पार्लमेंटमध्ये लॉबीमध्ये आम्ही जात होतो आणि समोरून पंतप्रधान येत होते. मला पाहून त्यांनी मला थांबवलं आणि सांगितलं, की प्रफुल्लभाई जरा शरद पवार साहेबांना सांगा, कोविड एवढा फैलावला आहे. त्यांना जरा हिंडणफिरणं कमी करून घरी बसायला सांगा. प्रकृतीची काळजी घ्या म्हणावं. त्यावर मी म्हणालो, ते आमचे थोडेच ऐकणार आहेत. तुम्ही सांगून पाहा. पण त्यांचा स्वभाव पाहता ते काही घरी स्वस्थ बसणार नाहीत. त्यांना लोकांना भेटल्याशिवाय जमणार नाही. तेव्हा मला लोकांची सेवा करायची आहे हे पवार साहेबांचे शब्द होते. असं नेतृत्व, अरे महाराष्ट्रामध्ये अनेक वेळा आपल्याला त्यांच्या कामाची आठवणसुद्धा करून द्यावी लागत नाही. आम्ही तिकडे गोंदिया-गडचिरोली परिसरात राहतो. नलक्षवादाच्या विषयी तुम्हाला वर्तमानपत्रामध्ये बातम्या वाचायला मिळत असतील. पवार साहेब मुख्यमंत्री होते. बहुतेक ८६ची गोष्ट आहे. त्यावेळी गडचिरोली-गोंदिया या भागामध्ये नक्षलवाद खूप मोठ्या प्रमाणावर वाढला होता.



पोलिसांची त्यांनी आढावा बैठक घेतली. मी सुद्धा त्या बैठकीला होतो.

साहेबांनी पोलिसांना विचारलं, तुम्हाला काय आवश्यक आहे. काय काय मदत पाहिजे, हे मला सांगा. राज्याच्यावतीनं मी तुम्हाला सगळी मदत करायला तयार आहे. नक्षलवाद थांबवण्यासाठी. पोलिसांनी त्यांच्या स्टाईलप्रमाणे, आम्हाला बंदूक पाहिजे, आम्हाला गाडी पाहिजे. अमुक अमुक पाहिजे. साहेब म्हणाले, हे तर सगळं मी पुरवतो. पण नक्षलवादाचा मुकाबला करण्यासाठी तुमच्यासाठी महत्त्वाचं काय आहे, त्याचा इलाज माझ्याकडे आहे. सगळे शांत बसले. सगळे

थक्क झाले, की आता साहेब काय म्हणणार आहेत. साहेबांनी म्हटलं, की मी तुमच्यासाठी विशेष कृती योजना आखणार आहे. म्हणजे काय? साहेब म्हटले, या सगळ्या भागामध्ये चांगले रस्ते बनले पाहिजेत, चांगली शाळा तिथं झाली पाहिजे. तिथं चांगली रूग्णालयं उभारा. वीज पुरवठा झाला पाहिजे. शेतीला पंप मिळाले पाहिजेत. आणि विशेष कृती योजनेच्या माध्यमातून मी तुम्हाला सांगू इच्छितो, की पोलिसांच्या कामामध्ये त्यांच्या बंदूकपेक्षा जास्त साहेबांच्या विशेष कृती योजनेच्यामुळे त्या भागाचा विकास झाला आणि नक्षलवाद तिथे कमी झाला.

अशा अनेक गोष्टी आहेत. या राज्यातल्या शेतकऱ्यांची, देशातल्या शेतकऱ्यांची ऐतिहासिक कर्जमाफी, सगळ्यांचा सातबारा कोरा करण्याचं काम यूपीएच्या सरकारमध्ये कोणी केलं? शरद पवारांनी केलं. शेतकऱ्याच्या शेतीमालाला दुप्पट-तिपटीने आधारभूत किंमती वाढवून दिल्या. त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात भारत स्वयंपूर्ण होऊन आज २५ देशांना धान्य निर्यात करतो आहे. अन्नधान्याची स्वयंपूर्णतः पवार साहेबांमुळे देसाने पहिली एवढेच नव्हे तर त्यांनी स्वीकारलेल्या धोरणांमुळे जास्तीचे लाखो कोटी रुपये शेतकऱ्यांच्या घरात जाऊ शकले. देशाच्या अन्नधान्य स्वयंपूर्णते इतकेच महत्व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीलाही आहे असे पहिल्यांदा कृतीतून पवार साहेबांनी देशाला दाखवून दिले. मराठवाडा यूनिव्हर्सिटीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव देण्याचं काम कोणी केलं? शरद पवारांनी केलं. मुंबईतील बॉंबस्फोटानंतर सामान्य परिस्थिती निर्माण करण्याचं काम कोणी केलं? शरद पवारांनी केलं. लातूरच्या भूकंपानंतर परिस्थिती सांभाळण्याचं, लोकांना दिलासा देण्याचं काम, लोकांना लवकर घरं बांधून देण्याचं काम हे कोणी केलं असेल, तर शरद पवारांनी केलं. असं विशाल नेतृत्व आपल्याकडे आहे. पुरोगामी विचारांचं मोठं नेतृत्व आहे. आज आमच्यासारख्या लोकांना ३५-३५वर्षे साहेबांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली, चार वेळेला मी भंडारा-गोंदियामधून लोकसभेवर गेलो. दोन वेळेला राज्यसभेवर गेलो. दहा वर्षे केंद्रामध्ये मंत्रिमंडळामध्ये काम करण्याची संधी मिळाली. आज भुजबळ साहेब असो, धनंजय मुंडे असो, जितेंद्र आव्हाड असो, अजितदादा, काम करण्याचा पक्का निर्धार म्हणजे अजित पवार, सुप्रिया सुळे, आम्ही पंधरा वर्षांपासून पाहात आहोत, सुप्रिया सुळे ज्या पद्धतीनं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीनं या महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विविध प्रश्नांवर तिथं भाष्य करत असतात, ही आपल्या सगळ्यांच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

# २०२४ मध्ये राज्यात राष्ट्रवादी पहिल्या क्रमांकाचा पक्ष व्हावा

## प्रफुल पटेल यांचे उद्‌गार

आणि म्हणून मी आपल्या सगळ्यांना सांगू इच्छितो. आज जयंतरावनी ज्या पद्धतीनं या पक्षाला मागील अनेक वर्षापासून नेतृत्व प्रदान केलं, आज हा एवढा मोठा परिवार एका ठिकाणी आणण्याचं काम केलं असं नेतृत्व आज आपल्या पक्षाकडे आहे, आज पवार साहेबांसारखा मार्गदर्शक आपल्याकडं आहे, या राज्यामध्ये कधी कधी दु:खाची गोष्ट वाटते, की आजही आमचा पक्ष एकटा एक नंबरवर का नाही घेऊ शकलो. याचं कधी कधी आपण सगळ्यांनी मिळून चिंतन केलं पाहिजे. आज या विशाल समुदायाच्यासमोर आपल्या सर्वांना शुभेच्छा देतो, या शाहू महाराजांच्या भूमीमध्ये फुले-आंबेडकरांच्या विचारांना बरोबर घेऊन आपण आपल्या पक्षाला या राज्यामध्ये एक नंबरचा करण्याचा निर्धार करू. एवढंच बोलतो. धन्यवाद. शुभेच्छा! जय हिंद!! जय राष्ट्रवादी!!!

■■

आपल्या सगळ्यांचे हृदयस्थान आदरणीय पवार साहेब प्रांत अध्यक्ष जयंतराव, अजितदादा, प्रफुलभाई आणि ज्यांनी ही भव्य प्रचंड सभा आकारात आणली ती आमचे मित्र नामदार मुश्रीफजी माझे सर्व सहकारी बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो.

गेले काही महिने जयंतराव आपल्या सहकाऱ्यांसह सर्व महाराष्ट्रात फिरले, राष्ट्रवादीचा झेंडा घेऊन परिवार संवाद साधला. कोरोना काळामध्ये काही सहभाग घेता आल्या नाहीत, परंतु निश्चितपणे या राज्यांमध्ये जास्तीत जास्त सभांचा विक्रम या ही काळामध्ये कोणी केला असेल तर जयंतराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. या कोरोना काळामध्ये विकास आघाडी सरकारने जनतेची सेवा केली. त्याबद्दल जागतिकस्तरावर कौतुक झालं. राजेश टोपे असतील, आमचं पोलीस खातं, अगदी अन्नधान्य सुद्धा. बारा कोटी लोकांना कानाकोपऱ्यामध्ये अन्नधान्य पुरवण्याचं काम या महाविकास आघाडीने केलं. शिवभोजन थाळी ९ कोटीवर गेली. महाविकास आघाडी विकासाचं आणि गोरगरिबांचं रक्षण करण्याचं काम करते. समतेचा संदेश देणाऱ्या या कोल्हापूरामध्ये काही मंडळीनी धार्मिक चिखल उडवण्याचा प्रयत्न केला. पण शाहू महाराजांच्या या कोल्हापूरने महाविकासआघाडी वर विश्वास ठेवला आणि महाविकास आघाडीच्या पदरामध्ये विजयाचं दान टाकलं. धार्मिक देशाचं राजकारण करू पाहणाऱ्यांना आता समजायला हवं की, हा महाराष्ट्र छत्रपतींचा, शाहू, फुले आंबेडकरांचा आहे. शाहू महाराजांच्या कोल्हापुरने पुन्हा एकदा महाराष्ट्राला मार्ग दाखवलेला आहे, प्रकाश दाखवलेला आहे. या शाहू महाराजांची सहा मेला शंभरावी पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने आपण सगळ्यांनी हे वर्ष जे आहे, स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्व म्हणून महाराजांच्या कर्तृत्वाचे कार्यक्रम महाराष्ट्रभर केले पाहिजे. धर्मांध सत्तेच्या विरोधामध्ये उभे राहण्यासाठी फक्त शाहू, फुले, आंबेडकरांचे विचारच आपल्याला शक्ती देत असतात. पण आता देशात काय चालू आहे? आपण विकासाचं राजकारण करतो, इथल्या अनेक वक्त्यांनी सांगितलं, महागाई वाढतीय, बेरोजगारी वाढलेली आहे, गॅस सिलेंडरचे दर हजार रुपयांवर गेले, पेट्रोलचे दर वाढले, अर्थव्यवस्थेची वाट लागली, कोळशाचं संकट आलं, खाद्य तेलाचे भाव वाढले. जेव्हा केंद्रात पवार साहेब आणि सोनिया गांधींच यूपीएचं सरकार होतं तेव्हा महागाईचा दर हा साडेचार टक्के होता. आज हा महागाईचा दर साडेचौदा टक्क्यांवर गेला आहे. तुमच्या घरात रोज लागणाऱ्या वस्तू २०० ते ३०० टक्क्यांनी वाढल्या आहेत.

मोदी साहेब आले त्यानी नोटबंदी केली. वाट लागली. दोन कोटी रोजगार बुडाले पुन्हा उभे राहिले नाही. १५ लाख कधी कोणाला मिळाले नाही. जीएसटीचा घोटाळा सुरूच आहे. पन्नास हजार कोटींवर महाराष्ट्राची जीएसटी केंद्राच्या खिशात पडून आहे. महाराष्ट्राचे महत्त्व कमी करण्याचे काम सुरू आहे. डायमंड मार्केट सुरतला नेलं, कपडा मार्केट सुरतला नेलं, बेलापूरचे रासायनिक कारखाने दहेजमध्ये, आयटी हब अहमदाबादला, टाईल्सचा व्यवसाय वापीला, मुंबई बंदराची जहाजे वळली कच्छच्या अदानी पोर्टला. बुलेट ट्रेन अजून चालूच आहे, विकास गुजरात करायचा आहे. महाराष्ट्राचा



उद्योग संपवायचा, बेरोजगार वाढवायचे त्यांना मला सांगायचं की या महाराष्ट्राने देशाचे रक्षण केलं, आर्थिक दृष्ट्या आज सुद्धा हा महाराष्ट्र तुमच्या तिजोरीमध्ये प्रचंड पैसा जमा करतो आहे. त्या महाराष्ट्राला मारण्याचा प्रयत्न करू नका, त्यांच्या नेत्यांना डावलण्याचा प्रयत्न करू नका. सेनापती बापटांनी सांगितलं.

**महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले,**
**मराठ्यांविना राष्ट्रगाडा न चाले,**
**खरा वीर वैरी पराधिनतेचा**
**महाराष्ट्र आधार या भारताचा...**

भारताचा आधार बनला आहे. पण आज काय चाललंय? कशासाठी? भोंग्याच राजकारण करायच, आपण कशावर काय बोलायचं नाही, धार्मिक तेढ वाढवून द्यायचे काम सुरू आहे, ढंगी भडकवण्याचे काम सुरू आहे. इतर सगळ्या प्रश्नावर तुमचं लक्ष विचलित करण्याचे काम सुरू आहे, ढोंगी लावायची तर पेट्रोल पंपावर लावा आणि सांगा आज पेट्रोलचा भाव शंभर रुपयावर गेला, सव्वाशे रुपयावर गेला.. लोकांना कळेल तरी भाव वाढ किती झाली, आपण बोलायला लागलं की इन्कम टॅक्स घरी येतं. इडी येते, सीबीआय येते. भाजपच्या नेत्यांनी सांगितलं ईडी आलीच.

# राज ठाकरे यांची भूमिका पिंजरा चित्रपटातील कमळीच्या मागे लागलेल्या मास्तरांसारखी

## छगन भुजबळ यांचे उद्गार

शिखंडी सारखी लढाई भाजप लढतो आहे. राजकारणात राजकारणाची लढाई जनतेच्या कोर्टात लढा. आम्ही बोललो तर आमच्यावर कारवाई झाली, पण आम्ही घाबरणार नाही. हम जिंदा है इसलिये बोल रहे है, हमे पता है की गुंगो का कोई इतिहास नही होता. हम बोलते रहेंगे. का बरं ईडीची कारवाई, कारण जमीन लवकर मिळत नाही. भरडला जातो, सगळं कुटुंब भरडला जातं. वर्षानुवर्ष केसेस चालतात. कायद्याचा दुरुपयोग होतो. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलं होतं, संविधान अतिशय चांगले आहे पण वापरणाऱ्यांच डोकं कुचक आहे. या संविधानासारखं संविधान जगात नाही पण चुकीच्या माणसाच्या हातात देश गेला तर मात्र अडचण झाल्याशिवाय राहणार नाही. काय चाललेल आहे? राज ठाकरे साहेबांनी जास्त बोलायला नको. वाईट वाटतं म्हणून बोलतो, पवार साहेबां बरोबर चांगले संबंध सगळ्यांबरोबर चांगले संबंध आमच्याबरोबर बीजेपीवर टीका करणारे प्रेस कॉन्फरन्स अनेक झाल्या. बीजेपी ला बाहेर काढले पाहिजे टिपणी केली. आणि आज वेगळे चालला आहे. पवार साहेबांवर आज टीकाटिप्पणी सुरू झाली. ज्यांना बाहेर काढायचे त्यांचे गुणगान सुरू झालय. व्ही शांताराम साहेबांचा सिनेमा आला होता. पिंजरा.. ते मास्टर होते, डॉ. श्रीराम लागू. आणि ते मास्तर गावामध्ये आलेल्या तमाशाच्या विरुद्ध होते, हा तमाशा या गावांमध्ये होता कामा नये, पण त्या मास्तरांचे काय झालं. मास्तर त्या तमाशा मधील कमळीच्या मागे लागले आणि त्या तमाशातच तुम्ही तुनतुणा वाजवायला बसले. अरे आपल्याला नको हे तुम्ही म्हटलं होतं ना. मग कशासाठी परत हे. कशासाठीही वातावरण निर्माण केले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हे स्वराज्य मिळवलं. सर्व मावळे त्यांच्याबरोबर होते त्यांच्या मावळ्यांमध्ये मुस्लिम तरी किती होते, प्रचंड किती. नौ सेनेचे सेनापती सिद्धी संबल, गुप्तहेर सचिव मौलाना हैदर,.. एक दोन नव्हे कितीतरी सैनिक

होते.. इब्राहीम खान, सिद्धी इब्राहिम, नुरुखान बेग, सिद्दी हिलाल, मदारी मेहतर अनेक. रायगड बांधला जगदीश्वराचे मंदिर उभं राहिलं. जिजामातेने विचारलं आपल्या मुस्लिम सैनिकांसाठी प्रार्थनास्थळ कुठ आहे? महालाच्या समोर महाराजांनी मस्जीद बांधली.

एक वर्षापूर्वी ऑक्सिजनसाठी बेडसाठी लढत होता तोच देश लाऊड स्पीकर आणि मंदिर-मशिदीसाठी लढण्यासाठी तयार केला जात आहे. एक लक्षात ठेवा.. **मज्जिद को जानते है, ना शिवालय को जानते है.**

**भुके पेट तो सिर्फ रोटी को जानते है.**

दुसऱ्या देशांमध्ये शांतीचे अपील करणारे आमचे प्रधानमंत्री. आमच्या देशामध्ये दंगली घडत आहेत, बुल्डोजर चालवले जाताहेत. मुंबईमध्ये एखाद्या बिल्डरला नोटीस दिली का? शिवसैनिकांनी घातला गराडा, खालीच येता येईना त्यांना. आणि सकाळपासून तमाशा चालू होता. देवेंद्र फडणवीस काही बोलले नाही, आणि संध्याकाळी सांगतात. कोणाच्याही घरावर जाण्यासाठी भाजपच समर्थन नाही. मग सकाळपासून काय झोपला होतात का तुम्ही? साहेबांच्या घरावर जाताना उचकवताना लाज नाही वाटली तुम्हाला? पण एक लक्षात ठेवा तुकाराम महाराजांनी सांगितलं,

**मऊ मेणाहूनी आम्ही विष्णूदास**
**कठीण वज्रास भेदू असे,**
**मेले जित असो निजोनिया जागे,**
**जो जो जे मागे ते ते देऊ.**
**भले तरी देउ कासेशी लांगोटी**
**नाठाळाच्या माथी हाणू लाठी.**






तर हे सगळं ठोकशाही चालली आहे. पण ती मात्र नोटीस न देता रात्रीच्या बारा वाजता गोरगरिबांच्या संसारावर बुलडोझर चालून नेस्तनाबूत करणारे तुम्ही. कायद्याची बूज तुम्हाला नाही शेवटी सुप्रीम कोर्टाला मध्ये पडावं लागलं. दंगे वाढवण्याचे काम. भाजपा भारत जलावो पार्टी, लोकांना उचकून द्यायचं काम. कोणालाही उचकून द्यावं. तोडून गुणरत्न सदावर्ते. डायरेक्ट एकदम साहेबांच्या घरावर चालून गेला. एसटीसाठी साहेबांनी आणि महाविकासआघाडी ने प्रयत्नाची पराकाष्टा केली. एसटीला आणि कर्मचाऱ्यांना न्याय द्यायचं म्हणून. मग कशासाठी हे सगळं केलं? पवार साहेबांच्या घरावर जाण्याचे कारण काय? आजकाल राणा पती-पत्नी त्यांच्यामुळे हनुमान चालीसा. त्यांनी घरामध्ये बोलावं मंदिरात बोलावं. मुंबईमध्ये अहमदाबादला हनुमानाचे मंदिर आहे, तिकडे जावा. तिकडे

**प्यार से कोई फंक मारा तो बुज जायेंगे**
**नफरत से तो बडे बडे तुफान बुझ गये हमे बुझाने में..**
**प्रेमाने या बोला पण नफरत..**

आता एक नवीनच आमच्या अमोल मेटकरीच चालल.

नवीनच.. ब्रह्मवंद समाज आमचे ब्राह्मणबंधू चिडलेले आहेत. १६५ वर्षापूर्वी महात्मा फुल्यांनी एक नाटक लिहून ठेवल आहे. आता असं आहे की जोडे शिवणे हा आमच्या चर्मकार बंधूंचा धर्म नाही तो धंदा आहे, सुतार काम करणे हा सुतारांचा धंदा आहे धर्म नाही. तस पौराहित्य करणं हा पुरोहितांचा धंदा आहे धर्म नाही. हा धर्म असता तर त्र्यंबकेश्वरला स्थानिक ब्राह्मण विरुद्ध उत्तर प्रदेश ब्राह्मण तलवारी भाले घेऊन जातात एकमेकांवर. माझी त्यांना हात जोडून विनंती आहे. ते पौरोहित्य करतात ठीक आहे

आनंद आहे. परंतु ते जोड्यांच्या फॅक्टरी काढायला लागले. सोन्या चांदी मध्ये गेले सोनारांच्या पोटावर पाय दिला. पण देवळामध्ये मात्र शंभर टक्के आरक्षण फक्त तुमचं? पुण्याच्या घैसास गुरुजींच वेद भवन आहे. तिथे फक्त ब्राह्मणांना प्रवेश.. अरे द्या ना सगळ्यांना प्रवेश. शिकू द्या ना आम्हा सगळ्यांना, साडेचारशे जाती आहेत आमच्या. आम्हीपण शिकू काय समर्पयामी अमक तमक काय सहकार्य करू. तुमचा आरक्षण शाबित आरक्षणावर तुमची गदा. तुम्हाला बोलल्यावर रागवायचं काही कारण नाही. आम्हालाही शिकवा. मिटकरी पण येथील आम्हाला पण बोलू काहीतरी घराच्या घरी पूजा करू. पण ते नाही. तिथे फक्त तुम्ही. पण याच्यातून काय होणार आहे देशाचं?




बिहारमध्ये रोजगारासाठी आंदोलन केलं प्रचंड मारहाण झाली. बिहारच्या विद्यार्थ्यांनी सांगितलं मोदीजी आपने हमे पेठ पर मारा है ना, अगली बार हम आपको वोट से मारेंगे.

प्रत्येक क्षेत्रात खाजगीकरण सुरू आहे. पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था न्यायाची आहे. सगळं विकायचं काम जोरात सुरू आहे. पेट्रोलियम विकली, बीएसएनएल विकली, रेल्वे विकताहेत, पवनहंस विकताहेत सगळं विकायचं काम चालू आहे. आणि देशाचा विकास करायचं जे होतं त्याच सत्यानाश करायचं काम चालू आहे.

ओबीसीचा आरक्षणाच्या मुद्द्यात सुद्धा आडमार्गाने विरोध करणारे हेच आहेत. पण लक्षात ठेवा तुमच्या सर्वांच्या शक्तीने आणि पवार साहेबांच्या मार्गदर्शनाने महाविकास आघाडी ओबीसी आरक्षण केल्याशिवाय निवडणुका होणार नाही याची काळजी आम्ही निश्चित घेणार आहोत. धन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र.

■■

# मूळ प्रश्नांवरून जनतेचे लक्ष उडविण्याच्या युक्त्या

अनंत बागाईतकर








आर्थिक स्थिती पुन्हा गंभीर होऊ लागली आहे. ताज्या आकडेवारीनुसार घाऊक किमतींच्या निर्देशांकाबरोबरच किरकोळ किंमती निर्देशांकानेही जोरदार छलांग मारलेली आहे. सरकारी आकडेवारीनुसार देखील महागाई निर्देशांक सहा टक्क्यांच्या आसपास रेंगाळत आहे. क्रिसिल या क्रेडिट रेटिंग कंपनीच्या मार्च महिन्याच्या अहवालात वित्तीय स्थिती खालावल्याचे निदान करण्यात आले आहे. त्यांच्या वित्तीय स्थिती निर्देशांकानुसार भारतास 'शून्य' गुण मिळाले आहेत. ही संस्था या निष्कर्षासाठी पंधरा निकषांचा आधार घेते. यामध्ये इक्विटि, कर्ज किंवा ऋण, मुद्रा किंवा चलन व परकी चलन स्थिती यासारख्या निकषांचा समावेश होतो. जागतिक स्तरावरील अस्थिरता आणि भारतातील अंतर्गत आर्थिक अनिश्चिततेची

परिस्थिती यामुळे भारतीय बाजारातून भांडवल बाहेर जाण्यास सुरुवात होईल. किंबहुना तशी सुरुवातही झाली आहे. त्यामुळे देशांतर्गत आर्थिक स्थिती येत्या काही महिन्यात बिकट होत जाईल असा अंदाजही या संस्थेने वर्तविला आहे. केवळ क्रिसिलच नव्हे तर रिझर्व बँकेच्या मॉनिटरी पॉलिसी कमिटी(एमपीसी)च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या बैठकीतही वाढत्या महागाईचा मुद्दा प्रामुख्याने चर्चिला गेला. या समितीच्या तीन दिवसांच्या बैठकीत जागतिक पातळीवरील आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. जगात काही ठिकाणी सुरु असलेले संघर्ष, त्यांची वाढती व्याप्ती, त्यानिमित्ताने लादण्यात आलेले निर्बंध याचा परिणाम म्हणून इंधन, अन्नधान्य व खाद्यान्नाच्या जागतिक स्तरावर वाढत असलेल्या किमती यातून आर्थिक अस्थिरता निर्माण होताना दिसत आहे. वित्तीय बाजारातही कमालीचा चढ-उतार व अनिश्चिततेची स्थिती निर्माण झालेली आहे. क्रूड तेलाच्या किमतीत गेल्या चौदा वर्षातील उच्चांकी वाढ नोंदली गेली आहे. याचा एकच सार्वत्रिक परिणाम दिसत आहे आणि तो म्हणजे जीवनावश्यक तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तुंची 'महागाई' ! हे संकट आणखी काही काळ सामान्य लोकांना भरपूर सतावणार असल्याचा अंदाज या समितीने व्यक्त केला आहे. इंधन, खाद्यतेल या वस्तुंच्या किमतींवर आगामी काळात विशेष लक्ष ठेवण्याची सूचना

**परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी राज्यकर्त्यांतर्फे कोणतेही पाऊल उचलण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. इंधन दरवाढीचे ठळक उदाहरण सर्वांसमोर आहे. पेट्रोल व डिझेलचे दर वाढतच चालले आहेत. स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात देखील वाढ केली जात आहे. ही वाढ जनतेला असह्य होत चालली आहे याची किंचितशी देखील जाणीव सरकारने दाखविलेली नाही. जनतेला महागाईला तोंड द्यावे लागत आहे याचा साधा उल्लेख देखील राज्यकर्त्यांकडून कुठेही होताना दिसत नाही. इंधन दरवाढीसाठी रशिया-युक्रेन संघर्षाचे एक तोंडदेखले कारण सरकारला मिळाले आहे आणि त्याच्या नावाखाली बेलगाम-अनियंत्रित अशी इंधनवाढ केली जात आहे. या राज्यकर्त्यांना प्रश्न विचारायला विरोधी पक्ष नाहीत आणि कुणी प्रश्न करण्याचा प्रयत्न केलाच तर त्याचे तोंड विविध मार्गांनी म्हणजेच ईडी, सीबीआय किंवा तत्सम केंद्रीय संस्थांच्या माध्यमातून बंद केले जात आहे.**






रिझर्व्ह बँकेने दिली आहे.

इंडोनेशियातून पाम तेलाच्या आयातीवर निर्बंध घालण्याचे परिणामही सर्वसामान्य ग्राहकाला भोगावे लागतील आणि खाद्यतेलांसाठी त्याला अधिक पैसे खर्च करावे लागण्याची शक्यता आहे. थोडक्यात आगामी किंवा येणाऱ्या काळात महागाईच्या चटक्यांमध्ये वाढ होण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभमीवर अर्थव्यवस्थेचे इतर मापदंडही लक्षात घ्यावे लागतील. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताची राजकोषीय किंवा वित्तीय तूट ही ९.९ टक्क्यांपर्यंत (केंद्र व राज्ये यांची मिळून) पोहोचेल असे भाकित केले आहे. इंधन व अन्नाच्या वाढत्या किमतींमुळे ही स्थिती येईल असे नाणेनिधीने म्हटले आहे. हा अंदाज २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी आहे. दुसरीकडे स्टेट बँकेच्या संशोधन विभागातर्फे जारी करण्यात

अर्थव्यवस्थेच्या चिनी नमून्याचा (चायना मॉडेल) अवलंब न करता ज्या आर्थिक क्षेत्रांच्या द्वारे विकासदर वाढू शकतो त्यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. यामध्ये त्यांनी विशेषत्वाने सेवाक्षेत्राला प्रोत्साहन देण्याची गरज बोलून दाखवली. चीनच्या अर्थव्यवस्थेचा भर प्रामुख्याने उत्पादन आधारित मानला जातो. उत्पादन आणि निर्यात या दोन क्षेत्रांच्या आधारे चीनने विकासदराच्या उन्नत पातळ्या गाठल्या. भारताला ते शक्य झाले नाही. परंतु करोना काळात अचानक भारताच्या नेतृत्वाला 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेचा साक्षात्कार झाला आणि मग सर्व लक्ष या एका संकल्पनेवर केंद्रित करण्यात आले. करोना काळात जगभरात जी सार्वत्रिक अनिश्चितता निर्माण झाली त्या पार्श्वभूमीवर आत्मनिर्भर भारत संकल्पनेचा विचार करण्यात आला.



रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तिकांत दास हे बँकेच्या मॉनिटरी पॉलिसी समितीची बैठक घेताना

आलेल्या अध्ययनात वर्तमान आर्थिक वर्षात (२०२२-२३) चालू खात्यावरील तूट २.५ टक्क्यांहून अधिक होईल असा अंदाज वर्तविला आहे. चालू खात्यावरील तूट(करंट अकांउंट डेफिसिट - सीएडी) म्हणजे आयात-निर्यातीमधील तफावत होय. याचा थेट परिणाम परकी चलन गंगाजळीवर पडू शकतो. ही तूट अडीच टक्क्यांवर गेल्यास ती गेल्या दशकातील उच्चांकी तूट म्हणून नोंदली जाईल. थोडक्यात या आकडेवारीचा सारांश एवढाच आहे की येणारा काळ आर्थिकदृष्ट्या परीक्षेचा राहील. लोकांच्या व सर्वसामान्यांच्या सहनशीलतेचा असेल.

रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी इकनॉमिक टाइम्स या दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत भारताने

कारण या काळात निर्यात जवळपास थांबलेली होती. उत्पादनही थंडावले होते. त्यामुळेच अशा अनिश्चिततेत विकासदराचे सातत्य टिकविणे ही



सहज सोपी बाब राहिली नव्हती. परंतु उत्पादन आणि निर्यात यांच्याद्वारे विकासदरात वाढ करणे हा लांब पल्ल्याचा मार्ग आहे. मरगळलेल्या, मंदावलेल्या अर्थव्यवस्थेला तत्काळ धक्का देऊन गति निर्माण करण्यासाठी आतापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ राहिलेल्या सेवा क्षेत्रासारख्या विविध क्षेत्रांना प्रोत्साहन देऊन त्याद्वारे आर्थिक उन्नतीची प्रक्रिया सुरु झाली पाहिजे असा रघुराम राजन यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. अर्थात अर्थव्यवस्थेत दिवसागणिक बदल करता येत नसतात. त्यामुळे आता वर्तमान राज्यकर्त्यांनी जो आर्थिक मार्ग निवडलेला आहे तो लगेचच बदलणे शक्य नाही. त्याची जी काही फळे आहेत ती भोगण्याची तयारी जनतेने ठेवायला हवी एवढेच वास्तव

चीनी उत्पादने



आता सर्वांसमोर आहे. तसा इशाराही राजन यांनी दिला आहे की वर्तमान स्थितीत आंधळेपणाने चिनी अर्थव्यवस्थेचे अनुकरण करणे हे आर्थिक पेचप्रसंग व अडचणींना आमंत्रण ठरु शकते. राजन यांचे सल्ले हे राज्यकर्ते मानणार नाहीत कारण ज्या राजन यांना अशोभनीय पध्दतीने रिझर्व बँकेच्या गव्हर्नरपदावरुन या राज्यकर्त्यांमुळे जावे लागले. ते त्यांचा सल्ला ऐकण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळेच सामान्य जनांनी आता आर्थिक अडचणींना तोंड देण्याची तयारी ठेवण्यास सुरुवात केलेली बरी ! अर्थात एवढा त्रास सहन करुनही खोट्या प्रचाराच्या संमोहनात पडणारी ही जनता या परिस्थितीच्या विरोधात आवाज उठवणार काय हा प्रश्न मनाला सतावल्याखेरीज रहात नाही.

ही परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी राज्यकर्त्यांतर्फे कोणतेही पाऊल उचलण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. इंधन दरवाढीचे ठळक उदाहरण सर्वांसमोर आहे. पेट्रोल व डिझेलचे दर वाढतच चालले आहेत. स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात देखील वाढ केली जात आहे. ही वाढ जनतेला असह्य होत चालली आहे याची किंचितशी देखील जाणीव सरकारने दाखविलेली नाही. जनतेला महागाईला तोंड द्यावे लागत आहे याचा साधा उल्लेख देखील राज्यकर्त्यांकडून कुठेही होताना दिसत नाही. इंधन दरवाढीसाठी रशिया-युक्रेन संघर्षाचे एक तोंडदेखले कारण सरकारला मिळाले आहे आणि त्याच्या नावाखाली बेलगाम-अनियंत्रित अशी इंधनवाढ केली जात आहे. या राज्यकर्त्यांना प्रश्न विचारायला विरोधी पक्ष नाहीत आणि कुणी प्रश्न करण्याचा प्रयत्न केलाच तर त्याचे तोंड विविध मार्गांनी म्हणजेच ईडी, सीबीआय किंवा तत्सम केंद्रीय संस्थांच्या माध्यमातून बंद केले जात आहे.

अत्यंत गंभीर अशा आर्थिक परिस्थितीत सध्या देशात कोणत्या प्रश्नांची चर्चा होत आहे तर मशिदीवरच्या भोंग्यांची ! जे दिवस कधीही वाजतगाजत साजरे केले गेले नव्हते ते धूमधडाक्यात साजरे केले जात आहेत. एवढेच नव्हे तर ते साजरे करताना बहुसंख्यकवादाचा ठसा कसा गाज्यावाज्याने उमटविता येईल हेही पाहिले जात आहे. रमजानचा महिना चालू आहे हे माहिती असूनही मुद्दाम सायंकाळी मिरवणुका काढणे, प्रक्षोभक वातावरणनिर्मिती कशी करता येईल यासाठी मुद्दाम प्रयत्न करणे, त्यातून एखादा अप्रिय प्रसंग घडल्यास त्याचे भांडवल करुन दंगे करणे हे एक दंगलींचे नवे 'मॉडेल' तयार करण्यात आले आहे. दिल्लीतल्या जहांगीरपुरीत झालेली दंगल हे त्याचेच उदाहरण आहे. अल्पसंख्यक समाजाच्या सहनशीलतेची टोकाची परीक्षा घेण्याचा प्रकार सुरु करण्यात आला आहे. केवळ रामनवमीच नव्हे तर हनुमान

जयंती देखील भव्य प्रमाणात साजऱ्या केल्या जाऊ लागल्या आहेत. शोधूनशोधून सण साजरे करण्याची जणू स्पर्धा लागलेली दिसते. या सण साजरे करण्यामागील सूत्र एकच आहे की ज्यामुळे समाजात तणाव निर्माण होईल. जहांगीरपुरीत हनुमान जयंतीनिमित्त तीनतीन मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. शेवटच्या मिरवणुकीतील जमावाच्या हातात तलवारी, लाठ्याकाठ्या आणि तत्सम हत्यारे होती. अत्यंत प्रक्षोभक घोषणा देण्याचे प्रकार सुरु होते. यामागील हेतु स्पष्ट होता की ज्यामुळे तणाव किंवा संघर्ष निर्माण व्हावा. यामुळे या परिसरात उन्मादाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविकच होते. राम नवमी किंवा हनुमान जयंतीसारखे दिवस पूर्वी सर्वसाधारणपणे साजरे केले जात असत. मिरवणुका आणि ठिकठिकाणी मंडप उभारुन ते साजरे केले जात नसत. परंतु गेल्या काही वर्षात त्यांना उत्सवी स्वरुप देण्यात येत आहे. त्यातून विनाकारण तणावनिर्मिती होत असताना देखील बिनदिक्कतपणे साजरे केले जात आहेत. रामनवमीच्या दिवशी गुजरात (हिम्मतनगर-छपरिया), मध्य प्रदेश (खरगोन) या भाजपची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये दंगली झाल्या. हनुमान जयंतीच्या दिवशी दिल्लीत जहांगीरपुरीत दंगल झाली. दिल्लीतील दंगल गंभीर अशासाठी की तेथील कायदा व सुव्यवस्था ही थेट केंद्र सरकारच्या म्हणजे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या म्हणजेच सध्याचे द्वितीय पोलादी पुरुष व प्रति-वल्लभभाई पटेल असलेले अमितभाई शहा यांच्या अधिकारात येते. ते तर स्वतःला अत्यंत कर्तबगार व कार्यक्षम गृहमंत्री म्हणवितात. मग दिल्लीत दंगल कशी झाली ? याचा सरळ अर्थ हाच निघतो की या दंगली कोणत्या ना कोणत्या पातळीवर 'पुरस्कृत' आणि मुद्दाम होऊन घडवून आणलेल्या असाव्यात. या दंगलींना किंवा दंगेखोरांना अशा काही शक्तिकेंद्रांचे किंवा सत्ताकेंद्रांचे पाठबळ असावे की ज्यामुळे त्यांच्यात हे धाडस यावे. त्यामुळेच जोपर्यंत अशा दंगलींची निःपक्ष चौकशी होत नाही तोपर्यंत सत्य व वास्तव कधीच उजेडात येणार नाही.









देशातील ही परिस्थिती दिवसेंदिवस चिंताजनक होत चालली आहे. सामाजिक सलोखा निर्माण करण्याऐवजी तिरस्कारावर आधारित राजकारण केले जात आहे. या अस्वस्थतेबद्दल विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी नेहमीप्रमाणेच त्यांच्या नेहमीच्या खाक्याप्रमाणे तोंडात गुळणी धरलेली आहे. बाकीच्या सर्व विषयांवर बोलताना त्यांची जीभ थकत नाही. परंतु या ज्वलंत प्रश्नांवर मात्र त्यांना मौन सोयीचे वाटते. त्यामुळेच १०८ माजी सनदी अधिकारी, परराष्ट्र सचिव, पोलिस विभागातील उच्चाधिकारी यांनी पंतप्रधानांनाच एक पत्र पाठवून ही दिवसेंदिवस चिघळत चाललेली परिस्थिती सावरण्याची विनंती केली आहे. या विषयावरील आपले मौन 'कानठळ्या बसवणारे' आहे(युवर डीफनिंग सायलेन्स) अशी टिप्पणी करुन या अधिकाऱ्यांनी गेल्या काही वर्षात होत असलेल्या सांप्रदायिक दंगली, अल्पसंख्यक समुदायांच्या विरोधात केली जाणारी भाषणे व वक्तव्ये, विशिष्ट समुदायाच्या विरोधात तिरस्कार पसरविण्याचे केले जाणारे पध्दतशीर प्रयत्न यांचे स्वरुप निराळे आहे. पूर्वीही सांप्रदायिक दंगे झाले होते परंतु ते आटोक्यात आणून सामाजिक सलोखा पूर्ववत निर्माण करण्यावर भर दिला जात असे. आता गेल्या काही वर्षात यामध्ये स्पष्टपणे बदल झालेला आढळतो. सामाजिक सलोख्याऐवजी बहुसंख्यक समाजाचे वर्चस्व सार्वत्रिक असले पाहिजे आणि इतर

समुदाय व समाजांनी बहुसंख्यक समाजाच्या म्हणण्यानुसारच राहिले पाहिजे असा विचार, प्रवृत्ती आणि मनोवृत्ती केवळ बळावत नसून त्यांना हेतुपुरस्सर प्रोत्साहित केले जात असल्याचे आढळून येते. विशिष्ट ध्येयांना किंवा हा देश केवळ बहुसंख्यक समाजाचाच असल्याचा विचार पसरविला जात आहे हे अत्यंत चिंताजनक आहे. भारतीय राज्यघटनेच्या सर्व मूलभूत तत्वांशी हे विसंगत व विपरीत आहे असे या पत्रात म्हटले आहे. विशेष म्हणजे या प्रवृत्तींना अभय मिळाल्यासारखी स्थिती आहे असे निरीक्षण नोंदवून या सनदी अधिकाऱ्यांनी यातून देशाच्या लोकशाही व्यवस्थेला गंभीर धोका निर्माण झाला आहे असे म्हटले आहे. अशा अनेक उन्मादी प्रसंगांमध्ये पोलिस व प्रशासन








हे मूकदर्शक झाल्याचे चित्र भयावह असल्याकडेही त्यांनी महामहिम पंतप्रधान महाशयांचे लक्ष वेधले आहे. 'रॉ'(रीसर्च अँड ॲनालिसिस विंग) या गुप्तचर यंत्रणेचा माजी प्रमुख ए.एस. दुल्लत, माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार शिवशंकर मेनन, माजी परराष्ट्रसचिव श्याम सरन, माजी परराष्ट्र सचिव सुजाता सिंग, माजी गृहसचिव गोपालकृष्ण पिल्लई, दिल्लीचे माजी नायब राज्यपाल नजीब जंग, पंतप्रधानांचे माजी सचिव टीकेए नायर, दोन माजी अर्थ सचिव अशा अनेक वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी या पत्रावर सह्या केल्या आहेत. अल्पसंख्यक समाजाने सतत बहुसंख्यक समाजाच्या वर्चस्वाखाली दबलेल्या अवस्थेत राहिले पाहिजे असा विचार जाणीवपूर्वक पसरवला जात आहे. अल्पसंख्यक समाजाला सतत भीतीच्या दडपणाखाली ठेवण्याचे पध्दतशीर प्रयत्न केले जात आहेत.

राज्यघटनेने सर्वांना समान अधिकार दिलेले असतानाही विशिष्ट अल्पसंख्यक समुदायांना ते योजनाबध्द रीतीने नाकारण्याचे प्रकारही सुरु आहेत. ही परिस्थिती भयावह व भीतीदायक आहे. भारतातील लोकशाही व्यवस्थेच्या अस्तित्वालाच यामुळे गंभीर धोका निर्माण झाल्याचे या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. या अधिकाऱ्यांचे म्हणणे हवेत नाही. परिस्थिती तशीच आहे. ती पाहिल्यानंतरच त्यांनी हे पत्र लिहिले आहे हे येथे लक्षात ठेवावे लागेल. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात हरिद्वार, नंतर हिमाचल प्रदेशाची राजधानी शिमला येथे तथाकथित धर्मसंसद व संत संमेलने झाली होती. छत्तीसगढमध्ये झाली होती. या सर्व ठिकाणी मुस्लिम समाजाला नाव घेऊन लक्ष्य करण्यात आले होते. वाटेल ती शिवीगाळ करण्यात आली होती. अत्यंत अनुचित व अभद्र भाषेचा वापर करण्यात आला होता. हे सर्व हिंदू धर्माच्या नावाखाली करण्यात आले होते. आजतागायत या चिथावणीखोर व प्रक्षोभक भाषणे करणाऱ्यांविरुध्द कारवाई झालेली नाही. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या सर्व भाजप शासित राज्यांमध्ये हे प्रकार सर्रास सुरु आहेत आणि तेथील सरकार व प्रशासन या चिथावणीखोरांविरुध्द कारवाई करणे दूरच पण सोयीस्कर कानाडोळा करताना आढळतात. त्यामुळेच उत्तराखंडमधील रुडकी याठिकाणी झालेल्या धर्मसंसदेपूर्वी काही मुस्लिम सामाजिक कार्यकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करुन मुस्लिमांना लक्ष्य करणारी व समाजात तेढ, द्वेष पसरवून तणाव उत्पन्न करणारी भाषणे या धर्मसंसदेत केली जाऊ नयेत आणि केली गेल्यास प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी अशी मागणी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने

या याचिकेची दखल घेऊन उत्तराखंड सरकारला चांगल्याच कानपिचक्या दिल्या. राज्यघटनेतील तरतुदी, निरनिराळे कायदे पालन करण्यासाठी असतात आणि त्यांचे पालन करणे हे प्रशासनाचे आद्य कर्तव्यच आहे. जर कुणी प्रक्षोभक भाषणे केली आणि त्याला प्रतिबंध झाला नाही आणि तशी भाषणे करण्याबाबत उचित कारवाई न झाल्यास आम्ही त्याची योग्य ती दखल घेऊ हे राज्य सरकारने ध्यानात ठेवावे असे सर्वोच्च न्यायालयाने उत्तराखंड सरकारला स्पष्ट शब्दात सुनावले आहे. सर्वोच्च न्यायालयातर्फे इशारे दिले जातात परंतु जे राज्य सरकार त्याचे पालन करण्यात अपयशी ठरते त्याविरुध्द कारवाई काय होते हा एक अनुत्तरित प्रश्न आहे. त्यामुळेच न्यायालयीन आदेश व इशाऱ्यांचे पालन न करणाऱ्यांविरुध्द कारवाई होताना प्रत्यक्ष दिसणे आवश्यक आहे. म्हणजे न्यायालयांचा धाक व दरारा निर्माण झाला असे जनतेला वाटेल. अन्यथा इशारे दिले जातील आणि त्यांची अवहेलना देखील चालूच राहील. जहांगीरपुरीत दंगलीनंतर स्थानिक प्रशासनाने म्हणजेच महानगर परिषदेने या परिसरातील अवैध बांधकामे किंवा अतिक्रमणे पाडण्याची मोहिम हाती घेतली. कोणताही समंजस प्रशासक वातावरणातील तणाव निवळल्यानंतरच पुढील कारवाई करणे अपेक्षित असते. परंतु येथे प्रशासकांची भूमिका 'धडा शिकविण्याची' असल्याने त्यांनी बुलडोझरचा योगी आदित्यनाथ यांचा कित्ता गिरविण्यास सुरुवात केली. या कारवाईस दिल्ली उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतरही सुमारे दोन तास पाडापाडीचे काम चालू राहिले होते. याची किती गंभीर दखल न्यायालयाने घेतली हाच मोठा अनुत्तरित प्रश्न आहे. त्यामुळेच न्यायालये इशारे देण्याचे कर्तव्य पार पाडत असली तरी त्यांच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द ते कोणती कारवाई करतात त्यावरही न्यायालयाचा धाक व दरारा अवलंबुन आहे. तेव्हाच सामान्य माणसाला न्यायालयांकडून न्याय मिळण्याची खात्री होईल.

जहांगीर पुरी असो किंवा गुजरातमधील छपरिया–हिम्मतनगर असो एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य करुन त्यांचीच अतिक्रमणे पाडण्याचा पक्षपातीपणा सर्रासपणे सुरु आहे. यामध्ये कोणतीही लाज व शरम न बाळगता कामे केली जात आहेत. दुर्दैवाचा भाग हा आहे की प्रशासन व पोलिस हे कायद्याला बांधील असतात आणि त्यांनी कायद्यानुसार काम करणे अपेक्षित असते परंतु सध्या प्रशासन आणि पोलिस ही विशिष्ट विचारसरणीच्या राजकीय पक्षाला बांधील झाली आहेत की काय असा संशय यावा एवढे त्यांचे वर्तन व आचरण पक्षपाती व कायद्यांशी विसंगत व विपरीत होताना आढळते. त्यामुळेच या देशातील वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी देशात लोकशाही व्यवस्था टिकेल काय अशी शंका पंतप्रधानांसमोर व्यक्त केली आहे.



देशातील आर्थिक स्थिती बिकट आहे. सर्वसामान्यांना वाढत्या उन्हाळ्याबरोबरच महागाईचे चटके असह्य होत आहेत आणि मुख्य म्हणजे ते सहन करीत आहेत. याचे कारण त्यांना धर्म–संप्रदाय वर्चस्वाचे गुंगीचे इंजेक्शन वेळोवेळी दिले जात आहे. त्या धुंदीत त्यांना हे महागाईचे चटके बहुधा जाणवत नसावेत. ज्यामुळे धार्मिक व सांप्रदायिक भावना वाढीस लागतील, ज्यामुळे समाजात तणाव निर्माण होतील, धर्म व संप्रदायात तेढ निर्माण होऊन संघर्ष निर्माण होत राहतील यावर विशिष्ट राजकीय प्रवृत्तीचा कटाक्ष आढळून येतो. असे केल्याने त्यांचे राजकीय आसन व सत्ता हमखासपणे स्थिर रहात असल्याने त्यांच्या दृष्टीने या गोष्टी सतत घडणे आवश्यकच असते. त्यामुळेच त्यांचे या प्रकारांना प्रोत्साहन मिळणे हे देखील अपेक्षित मानावे लागते. हे वातावरण आणि ही स्थिती लोकशाहीच्या मुळावर येणारी आहेच परंतु भयावह अशा अराजकाकडे नेणारी आहे. स्वतःच्या अधिकार व सत्तेत मश्गुल असलेल्यांना याची जाणीव नाही. सत्ता उपभोगण्यात बधीर झालेली ही मंडळी आहेत. कोणताही राज्यकर्ता हा स्वतःच्या पलीकडे पाहणारा आणि त्याच्या हातून देशाचे, समाजाचे भले होईल अशी भावना बाळगणारा असतो. परंतु स्वयंप्रेमी, स्वकोषात मग्न राजकारणी नेते याची तमा बाळगत नाहीत. म्हणूनच फ्रान्समधील पंधराव्या लुईचे कुप्रसिध्द वचन याठिकाणी आठवल्याखेरीज रहात नाही. तो म्हणाला होता...... 'आफ्टर मी डिल्यूज' म्हणजे .... 'माझ्यानंतर (फक्त) प्रलय.... वाताहात !' भारताची वाटचाल या दिशेने होत आहे काय? उत्तर तुम्हीच शोधा !

■■



# शाहू, फुले, आंबेडकरांचा उल्लेख ही शिवरायांच्या विचारांची मांडणी

## शरद पवार

**राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा. शरद पवार यांनी मुंबई येथे १३ एप्रिल रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी ठाण्यामध्ये त्यांच्यावर केलेल्या आरोपांवर खरमरीत उत्तरे दिली. त्याचा हा वृत्तांत...**

**प्रश्न : राज ठाकरे यांची काल सभा झाली आणि त्याच्यामध्ये सर्वाधिक टीकेचं टार्गेट होतं, राष्ट्रवादी आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांवर. विशेषत: राष्ट्रवादी जातीयवादी पक्ष असल्याची टीका करण्यात आली.**

**शरद पवार :** असं आहे, की एखाद दुसरी व्यक्ती कधीतरी वर्षा-सहा महिन्यात एखादं वाक्य, एखादं स्टेटमेंट करून आपलं मत व्यक्त करतेय, तर ते फार गांभीर्यानं घेण्याचं नसतं. पण आता तुम्ही प्रश्नच विचारला आणि त्याच्यात दोन-तीन मुद्दे आले. त्यामुळं आता मला त्याच्यावर सांगावं लागेल. दोन-तीन गोष्टी माझ्या वाचनात आल्या सकाळच्या वृत्तपत्रात आणि टेलिव्हिजनवरून, की एक आनंद आहे, की त्यांनी शिवाजी महाराजांचं नाव मी घेत नाही अशा प्रकारचा एक उल्लेख त्याठिकाणी केला. दोनच दिवसापूर्वी मी अमरावतीला होतो. आणि जर तुम्ही तुमचे तिथं कोण सहकारी असतील, त्यांच्याकडून माझं अमरावतीचं भाषण हे जर मागवलं, तर त्याच्यामध्ये शिवाजी महाराजांचं योगदान याच्यावर माझं कमीत कमी २५ मिनिटांचं भाषण होतं. अनेक गोष्टी त्याच्यामध्ये मी सांगितल्या. अर्थात सकाळी उठल्याच्यानंतर वृत्तपत्रं वाचायची मला सवय आहे. पण, त्यासाठी मला लवकर उठावं लागतं. सकाळी वृत्तपत्रात काय काय लिहिलंय हे न वाचल्याच्यानंतर वक्तव्य करत असतील तर मी काय त्यांना दोष देणार नाही.

दुसरी गोष्ट अशी, की त्याच्यामध्ये त्यांनी सांगितलं, की फुले-आंबेडकर-शाहू यांचाच उल्लेख केला जातो.



माझं मत तेव्हा होतं, आजही आहे. आणि त्यासाठी मी निश्चितपणानं टीका केली.

आणि दुसरा गंभीर प्रश्न असा होता, की जेम्स लेननं जे काय लिखाण केलं, त्या लिखाणाचा आधार त्यांच्या लेखामध्ये त्यांनी स्वच्छ म्हटलेलं आहे, की ही माहिती मी पुरंदरेंच्याकडनं घेतली. त्यामुळे एक गलिच्छ अशा प्रकारचं लिखाण एखाद्या रायटरनी केलं आणि त्याला माहिती पुरवायची काम कुणी केलं हे तो उघडपणानी म्हणत असेल आणि त्याचा खुलासा त्यावेळेला कधी पुरंदरेंनी केला नाही आणि म्हणून जर त्याच्यावर टीका-टिप्पणी केली असेल तर मला त्याच्यात दु:ख वाटत नाही. मला अभिमान वाटतो. त्यामुळं याच्याबाबतीत कुणी काय म्हटलं असेल तर मला काय त्याच्याबद्दलचं फारसं सुचवायचं नाही.

दुसरी गोष्ट अशी, की आज खऱ्या अर्थानं प्रश्न काय होते? आज प्रश्न आहेत महागाईचे. आज प्रश्न आहेत किंमतवाढीचे. आज प्रश्न आहेत बेरोजगारीचे. हे सगळे जिव्हाळ्याचे प्रश्न आहेत. यातल्या एकाही प्रश्नाच्यासंबंधी अवाक्षर शब्द कुणी बोलत नाही.

याचा अभिमान आहे मला. आणि दुसरी गोष्ट माहिती असली पाहिजे, की या राज्यामध्ये शिवछत्रपतींच्या संबंधीचं सविस्तर वृत्त काव्याच्या माध्यमातून पहिल्यांदा कुणी लिहिलं असेल तर ते महात्मा जोतिबा फुल्यांनी लिहिलेलं आहे. त्यामुळं फुले काय, आंबेडकर काय, किंवा शाहू महाराज काय हे शिवचरित्र आणि शिवछत्रपती यांच्याबद्दल अतिव आस्था असलेले असे हे सगळे घटक आहेत. आणि महाराजांचा आदर्श लक्षात घेऊन आपल्या हातातल्या सत्तेचा वापर हा कसा करावा यासंबंधीची भूमिका या तिघांनीही मांडली आणि म्हणून या तिघांच्यासंबंधीचा उल्लेख करणं हा शिवछत्रपतींच्या विचारांची मांडणी करण्याचाच भाग आहे, हे याठिकाणी मी मुद्दाम सांगू इच्छितो.

आता त्यांनी काय तरी सांगितलं, पुरंदरेंच्याबद्दल मी बोललो होतो. हो, बोललो होतो मी. कारण, पुरंदरेंनी शिवछत्रपतींचा उल्लेख करताना त्यांनी जिजामातांनी शिवछत्रपतींचं व्यक्तीमत्त्व घडवलं हे सांगायच्याऐवजी दादोजी कोंडदेवनी त्याच्यामध्ये योगदान केलं अशा प्रकारचं विधान केलेलं होतं. त्याला माझा सक्त विरोध होता. शिवाजी महाराजांचं व्यक्तीमत्त्व हे राजमाता जिजामातेनं कष्टानं, सतत प्रशिक्षण करून उभं केलं आणि त्यामुळं त्या व्यक्तीमत्त्वाचं मोठेपण हे या पदापर्यंत पोचायला कुणाचं योगदान असेल, तर ते राजमातेचं योगदान होतं. बाबासाहेबांनी त्या बाबतीत एक वेगळं लिहिण्याचा प्रयत्न केला आणि तो योग्य नव्हता असं

ज्यांनी काल एवढं मोठं भाषण केलं, त्याच्यात सामान्य जनतेच्या सुख-दु:खाशी संबंधित एकाही प्रश्नाचा उल्लेख नाही. या पद्धतीचं राज्य भारतीय जनता पार्टीचं चालवते त्याचा उल्लेख त्याठिकाणी यत्किंचीतही नाही. आणि त्यामुळं त्या भाषणाशी संबंधित अधिक काय म्हणायचं कारण नाही.

जाता जाता त्यांनी सांगितलं, की सोनिया गांधी आणि माझ्याबद्दल ते काहीतरी बोलले. सोनिया गांधींनी देशाचं प्रधानमंत्री व्हावं की होऊ नये या प्रश्नावर माझं मत जाहीर होतं. पण मला एक गोष्ट निश्चितपणानं समाधानकारक सांगायचीय, की श्रीमती गांधींनी स्वत:हून मी सत्तेच्या या शिखरावर जाऊ इच्छित नाही, मी प्रधानमंत्रिपदाची उमेदवार नाही हे जाहीर केल्याच्यानंतर प्रश्न संपला. मतभिन्नता आमची होती, ती काँग्रेसशी नव्हती, सोनिया गांधींशी व्यक्तीगत नव्हती. प्रधानमंत्रीसंबंधीची जी चर्चा होती त्या चर्चेच्या संदर्भात होती. पण ती चर्चाच आणि त्याचं स्पष्टीकरण सोनियाजींनीच केल्याच्यानंतर आमचा वादाचा विषयच राहिलेला नाही. त्यामुळं त्यानंतर एकत्र येऊन काहीतरी करावं अशा प्रकारची सूचना अन्य काही सहकाऱ्यांनी केल्याच्यानंतर आम्ही एकत्र आलो. आजही आहोत. आज महाराष्ट्रामध्येसुद्धा सत्तेमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना हे सगळे एकच आहेत. त्यामुळं ही भूमिका काय मी ऐनवेळेला बदलली किंवा कारण नसताना बदललेली नाही. अर्थात एकच आहे, की पुन्हा तोच प्रश्न आहे, की हे जे सगळं त्या काळात घडलं त्याचं सविस्तर

वाचन केलं असतं, तर कदाचित अशा प्रकारचे उद्‌गार काढले गेले नसते.

आणि तिसरा मुद्दा त्यांनी जाता जाता सांगितला, की आता स्वत:च्या पक्षाबद्दल काय सांगायचं हा त्यांचा प्रश्न आहे. पण त्यांनी स्वत:च्या पक्षाबद्दल सांगताना सांगितलं, की हा पक्ष संपवणारा पक्ष आहे. ते म्हणतात ते खरं आहे. त्यांच्या संपवणाऱ्या पक्षाची नोंद महाराष्ट्रातल्या मतदारांनी योग्य पद्धतीनं घेतली आहे आणि त्याच्यामुळं या पक्षाला त्यांनी विधिमंडळामध्ये एकसुद्धा जागा दिलेली नाही. याचा अर्थ मतदारांनी यांची ओळख योग्य पद्धतीनं केलीय. सहसा लोक जातात. सभा मोठ्या होतात. त्यांच्या सभेमध्ये एक शिवराळ पद्धतीची भाषा असो, किंवा नकला असोत, किंवा धाडी वगैरे असे उल्लेख असोत, त्या सगळ्या गोष्टींच्यासंबंधी एक करमणूक होते. त्यामुळं लोक जातात. नाही असं नाही.

आता त्यांनी एक गोष्टी माझ्यावर आणखी सांगितली, की मी नास्तिक आहे म्हणून. मी माझा धर्म किंवा देव याच्याबद्दलचं प्रदर्शन कुठं करत नाही. मी आता तेरा-चौदा वेळा निवडणुकीला उभा राहिलो. माझा निवडणुकीचा नारळ कुठं फुटतो हे बारामतीच्या लोकांकडे जाऊन चौकशी करा. एक ठिकाण आहे. एकच मंदिर आहे, त्याठिकाणी होतो. त्याचा आम्ही कधी गाजावाजा करत नाही. पण, दुसरी गोष्ट सुद्धा आहे, की माझ्यापुढं काही आदर्श आहेत. त्या आदर्शांमध्ये प्रबोधनकार ठाकरेंचा आदर्श आहे. प्रबोधनकार ठाकरेंचं लिखाण तुम्ही वाचलं, तर यासंबंधीचं सविस्तर मार्गदर्शन तुम्हाला होईल. प्रबोधनकारांनी देव-धर्म यांच्या नावानी बाजार मांडणाऱ्या ज्या प्रवृत्तीं आहेत, त्याच्यावर प्रचंड टीका-टिप्पणी केलेली आहे. याचा अर्थ त्यांना अनादर आहे असा नाही. पण त्याचा गैरफायदा घेणारा कुणी जर घटक असेल तर त्याला ठोकून काढायचं काम हे प्रबोधनकारांनी केलेलं आहे. पण प्रबोधनकार यांनी केलेलं लिखाण आम्ही लोक वाचतो, सगळेच वाचतात, कुटुंबातले लोक वाचतात असं नसावं आणि म्हणून त्यामुळं मला असं वाटतं, की अशा प्रकारची विधानं केली गेली. यावर आपण अधिक बोलायची आवश्यकता नाही.

**प्रश्न : पवार साहेब, त्यांनी कुटुंबावर अशी टीका केली, की पहिल्यांदा अजित पवारांच्या घरी रेड पडते. सुप्रिया सुळेंच्या घरी रेड पडत नाही. दाखवायचे दात वेगळे, खायचे दात वेगळे.**

**शरद पवार :** हा काय प्रश्न आहे का? आता रेड पडते, हे ते ठरवतात का, मी ठरवतो का हे करतात. हा काय प्रश्न आहे?

**प्रश्न : राज ठाकरे यांनी राष्ट्रवादी हा जातीयवादी पक्ष**

**स्वत:च्या घरात गणपती बसवून शरद पवार सपत्नीक त्याची पूजा करतात हा फोटो पाहणारे लोक राज ठाकरे यांच्या शरद पवार नास्तिक आहेत, हे देवाला नमस्कार करीत नाहीत यावर विश्वास ठेवतील का? राज ठाकरे किती खोटे बोलतात हे या फोटोतून स्पष्ट होते.**



**असल्याचा आरोप तुमच्यावर केला आहे?**

**शरद पवार :** एनसीपी ही एक असा पक्ष आहे, की या पक्षाचं नेतृत्व सुरूवातीला छगन भुजबळांच्या हाती होतं. आठवतंय तुम्हाला. राष्ट्रवादी पक्षाचे महाराष्ट्रातील पहिले अध्यक्ष हे छगन भुजबळ होते. त्यानंतर विधिमंडळ पक्षाचे नेते मधुकर पिचड होते, जे आदिवासी समाजाचे होते. त्यानंतर पक्षाच्या नेतृत्वाची जबाबदारी धनंजय मुंडेकडे होती. धनंजय मुंडे पाहा, ओबीसी, छगन भुजबळ पाहा, सांगण्याची आवश्यकता नाही. मधुकरराव पिचड पाहा. सगळ्यांना माहिती आहे, ट्रायबल नेता आहेत. ज्या पक्षाचे सर्व नेतृत्व किंवा जबाबदार जागांवर अशा प्रकारचे लोक येतात, जबाबदारी घेतात, आणि या पक्षाचे नेतृत्व आणि पक्षाला जातीयवादी म्हणणे, यावर उत्तर देण्याची आवश्यकता मला वाटत नाही.

**प्रश्न : सध्या धार्मिक द्वेष पसरविण्याचं राजकारण होत असल्याचे बोलले जात आहे. महागाई, बेरोजगारीच्या मुद्यावर भडकवण्याचं काम केलं जातंय का? तुम्हाला काय वाटतं?**

**शरद पवार :** मी सुरूवातीलाच सांगितलं, की खरा प्रश्न बेरोजगारी आणि महागाई हा आहे. पण आत्ता जे वातावरण महाराष्ट्रात तयार करण्याचा प्रयत्न दिसतो, तो इथं सामाजिक ऐक्याला धक्का देण्याचा प्रयत्न दिसतो. इथं सांप्रदायिक विचाराला प्रोत्साहित करण्याचं चित्र दिसतं. आणि म्हणून माझं महाराष्ट्रातल्या जनतेला आवाहन आहे, की या सांप्रदायिक पद्धतीच्या विचाराची मांडणी करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक काही लोक करतायंत आणि या राज्यातली शांतता ही संकटात आणण्याच्या दृष्टीनं पावलं टाकतायंत. लोकांनी याला बळी पडू नये.





**प्रश्न : राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सरकारला ३ तारखेपर्यंतच अल्टीमेटम दिला आहे, की मशिदींवर असलेले भोंगे काढा म्हणून. शरद पवार : राज्य सरकार याबाबतीत गंभीरतेने विचार करेल.**

**प्रश्न : महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात लोडशेडिंग सुरू आहे. अख्खीच्या अख्खी गावं अंधारात गेलेली आहेत.**

**शरद पवार :** वीजेचे काही प्रश्न आहेत. कोळशाचे काही प्रश्न आहेत. पण ते प्रश्न सोडवायचा महाराष्ट्र सरकारचा सातत्यानं प्रयत्न आहे. काही ठिकाणी आम्हा लोकांचीही मदत घेतली गेली. कोठून वीज मिळेल का? कोळसा मिळेल का? आणि त्यादृष्टीनं त्यांचे प्रयत्न चालू आहेत. यंदा मोठी उष्णतेची लाट आहे. ज्यावेळेला उष्णतेची लाट मोठी असते, त्यावेळेला वीजेचा वापर अधिक वाढला जातो. विशेषतः ग्रामीण भागामध्ये शेतीला पंप वगैरे, मर्यादित कालावधीत चालवायचा असतो. पण ते तासन्तास चालवले जातात. अन्य कारणेही आहेत. त्या सगळ्याचा परिणाम हा आहे. पण आपण अपेक्षा करूया, यातनं मार्ग निघेल.

**प्रश्न : राज ठाकरे सक्रीय झाले आहेत. महाविकास आघाडीविरूद्ध, आपल्याविरूद्ध, एनसीपीविरूद्ध खूप बोलत आहेत. शिवसेना म्हणत आहे, की ही भाजपची बी टीम आहे.**

**शरद पवार :** ही स्पष्ट गोष्ट आहे, त्यांच्या भाषणात भारतीय जनता पार्टीच्या विरोधात एकही शब्द आला नाही. त्यांनी आमच्यावर टीका केली. ठीक आहे. त्यांना अधिकार आहे. पण त्यांच्यावर जी काही जबाबदारी कदाचित भाजपने दिली असेल, ते दाखवण्याची संधी लोकशाहीमध्ये त्यांना मिळाली आहे.

**प्रश्न : भाजपने काय जबाबदारी दिली असेल असे तुम्हाला वाटते?**

**शरद पवार :** त्यांचं अंडरस्टँडिंग काय आहे मला माहित नाही. एक शब्दही त्यांच्याविरोधात बोलत नाहीत.



**शरद पवार :** अरे, मी पार्लमेंटचा सदस्य आहे. पार्लमेंटचा एखादा मेंबर प्रधानमंत्र्यांना भेटू शकत नाही. अनेक विषय असतात. मी बोललो त्यांच्याशी. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी येथील



शरद पवार यांचा सिल्वहर ओक येथील बंगला. त्यावर दगडफेक करणारे एस.टी. कर्मचारी

याचा अर्थ काय? महागाई एवढी असताना, बेरोजगारीचा एवढा प्रश्न असताना. किंमतवाढसंबंधीची संबंध देशात चर्चा होत असताना. एखादा राजकीय नेता स्वत:ला जो समजतो, तो एक शब्दसुद्धा बोलत नाही. याचा अर्थ काय?

**प्रश्न : काल भाषणात त्यांनी बोलताना उल्लेख केला तो ईडीच्या संदर्भामध्ये, की पवार कुटुंबामध्ये अजित पवारांच्या संदर्भात ईडीची चौकशी होते.**

**शरद पवार :** अरे, हा काय प्रश्न आहे का? म्हणजे काय प्रत्येकाच्या घरातच ईडीने गेल्यावर त्यांची भूमिका योग्य आहे असं म्हणायचंय तुम्हाला? उगीच काहीतरी चार्जेससारखं त्यांनी भाषण त्याठिकाणी केलं. त्याचा काय उल्लेख करायचा? अजित पवारांच्याकडं जर काय झालं असेल, ते माझ्याकडं झालं याचा अर्थ. अजित पवार आणि मी वेगळं आहोत असं वाटतं का तुम्हाला. ते कुणी तिसरे आहेत. सुप्रिया आणि अजित हे काय बहीण-भाऊ नाहीत? हा काय राजकीय आरोप आहे? हा पोरकट आरोप आहे आणि पोरकट प्रश्न आहे.

**प्रश्न : राज ठाकरेंची भूमिका सातत्याने बदलत आहे. यामागचं गौडबंगाल काय आहे असं तुम्हाला वाटतं?**

**शरद पवार : साधी सरळ गोष्ट आहे. भारतीय जनता पार्टीचं मार्गदर्शन जे काय त्यांना झालं, ते काल भाषणाच्या माध्यमातून आपल्याला ऐकायला मिळालं.**

**प्रश्न : त्यांनी असंही म्हटलंय, की पवार मोदींना भेटतात. महाराष्ट्रातील नेते अडचणीत आल्यानंतर जास्त प्रेम दाखवतात.**

आमदारांच्या नॉमिनेशनची यादी त्यांना देऊन दोन वर्षे झाली. अजूनपर्यंत नियुक्त्या केल्या जात नाहीत. अशा परिस्थितीत कोणाशी बोलले पाहिजे? प्रधानमंत्र्यांशीच बोललं पाहिजे ना. ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली.

**प्रश्न : एसटी कर्मचाऱ्यांनी तुमच्या घरावर हल्ला केला. यामागं कोणाचं तरी प्रोत्साहन असल्याचं बोललं जातं.**

**शरद पवार :** एसटी कर्मचाऱ्यांना मी काय फारसा दोष देणार नाही. ते कामगार आहेत. त्यांच्या काय मागण्या असतील. त्या मागण्यांच्यासाठी महिनो न् महिने ते बसलेले होते. त्यांना चुकीचं नेतृत्व लाभलं. चुकीच्या नेतृत्वानी ज्या पद्धतीनं भाषणं केली, ज्या पद्धतीची टीका-टिप्पणी केली आणि संबंध त्यांच्या टीका-टिप्पणीचा रोख एक व्यक्ती असं समजत होती. प्रश्न कुणाकडं नव्हता? राज्य सरकारच्याकडं होता. राज्य सरकारवर टीका नाही. प्रश्न कोणाच्याकडं होता? एसटी महामंडळामध्ये जे काही निर्णय घेणारे अधिकारी आहेत त्यांच्याकडं होता. त्यांच्याबद्दलचा उल्लेख नाही. फक्त एकच माझं नाव घेऊन सातत्यानं त्यावर एक प्रकारची टीका-





टिप्पणी करून त्या कष्टकरी कामगारांच्या डोक्यात काहीतरी भरवलं गेलं. त्याचा हा परिणाम आहे. त्यामुळं माझ्या मते याच्यात कामगारांना दोष देऊन चालणार नाही. त्यांना या रस्त्याने नेण्याची भूमिका घेणारे जे कुणी घटक असतील, त्यांच्यासंबंधीची चौकशी झाली पाहिजे.

आदल्या दिवशी कोर्टाचा निकाल लागला. तो निकाल लागल्याच्यानंतर तो आमच्या बाजूनं लागला असं सांगितलं गेलं. गुलाल उधळला. कौतुक त्याठिकाणी व्यक्त केलं गेलं. अगदी टीमकी वाजवून सांगितलं. आणि दुसऱ्या दिवशी हा प्रकार केला. याचा अर्थ काय? याचा अर्थ एकच आहे, की जे चमत्कारी नेतृत्व आहे त्यांनी कुणाच्याबद्दलचा किंवा एका व्यक्तीच्या बद्दलचा द्वेष हा त्याठिकाणी बिंबवण्याचं काम केलंय. त्याची ही प्रतिक्रिया आहे.

**प्रश्न : हा सुनियोजित कट असल्याचं बोललं जातंय आणि होम डिपार्टमेंटनंसुद्धा याबाबतचा अलर्ट दिला होता. पण लक्ष दिले गेले नाही.**

**शरद पवार :** हा प्रश्न तुम्ही राज्य सरकारला विचारा.

**प्रश्न : तुम्ही म्हणालात की यामध्ये कर्मचाऱ्यांचा दोष नाही. पण त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

**शरद पवार :** अनिल परब या विभागाचे प्रमुख आहेत. त्यामुळं त्यांच्या अंडर असलेल्या यंत्रणेबद्दल त्यांना माझ्यापेक्षा अधिक माहिती असण्याची शक्यता आहे. आणि त्यांना पुन्हा प्रशासन करायचंय. ते प्रशासन करायचं असेल तर त्यांना काही निर्णय घ्यावे लागतील. ते निर्णय घेताना ते ज्या निष्कर्षाला आले असतील, त्यादृष्टीनं ते निर्णय घेतील. तो त्यांचा अधिकार आहे.

**प्रश्न : आपल्या घरावर जो हल्ला झाला, त्यामागं नागपूर कनेक्शन जोडलं जात आहे.**

**शरद पवार :** मला माहीत नाही. मी वाचलं. पण मला माहीत नाही नागपूर कनेक्शनचं.

**प्रश्न : आयएनएस विक्रांतसंबंधीचा प्रश्न सध्या गाजतोय. किरीट सोमय्यांवर आरोप करण्यात येत आहेत. त्याबद्दल..**

**शरद पवार :** आयएनएस विक्रांतसाठी पैसे गोळा केले गेले. त्याचा विनियोग काय झाला हा आता खरा प्रश्न आहे. मला पूर्ण माहिती नाही. पण माझ्या वाचनात आलं तुमचं वृत्त खरं असेल तर, की हे पैसे पक्षाकडे दिले असं कुणीतरी छापलंय. पैसे विक्रांतसाठी गोळा केले. लोकांच्या भावनेला हात घातला. लोकांच्याकडून जी काय रक्कम आली असेल ती पक्षाकडं का दिली? आर्म्स फोर्सेस वेलफेअर फंड आहे. समजा तिथं देता आली असती. जवानांचा एक निधी असतो. तिथं देता आली असती. पण तिथं न देता पक्षाकडे दिले. माझ्या मते हे आक्षेपार्ह आहे.

**प्रश्न : केंद्र आणि राज्य सरकारमध्ये ज्या पद्धतीने बदल्याचे राजकारण सुरू आहे, हे महाराष्ट्राला कुठं घेऊन जाईल. पहिलं असं नव्हतं.**

**शरद पवार :** आज सांगणं कठीण आहे. कारण दररोज काहीना काही आरोप करणे, कोणाविरूद्ध तरी वातावरण तयार करणे, काहीतरी कारवाई करणे या गोष्टी सातत्यानं चालू आहेत. विशेषत: दोन राज्यामध्ये, एक महाराष्ट्र आणि दुसरे पश्चिम बंगाल. सध्या या दोन्ही ठिकाणी याचा सामना करण्याची मानसिकता आम्हा लोकांची आहे.




**प्रश्न : पाच राज्यांच्या निवडणुका झाल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी बिगरभाजपशासित राज्यांना पत्र पाठवून बैठकीचे आयोजन करण्याची विनंती केली आहे. मुंबईमध्ये बैठक घ्यावी असं म्हटलं असल्याचं ऐकण्यात येतं.**

**शरद पवार :** त्यांनी मलाही पत्र पाठवलं आहे. माझ्याशी चर्चाही केली आहे. त्यांचं म्हणणं आहे, की मुंबईमध्ये कुठेतरी बैठक घेतली तर चांगले होईल. पण अन्य लोकांशी आमची चर्चा अद्याप झालेली नाही. आम्ही प्रोसेस करू.

**प्रश्न : राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दोन वर्षांच्या कालावधीनंतर मंत्रालयात येऊन प्रशासनाच्या कामाला सुरूवात केली आहे. याच्यावरून आरोप होत होते, की मुख्यमंत्री वर्षाच्या बाहेरच जात नाहीत.**

**शरद पवार :** त्यांची तब्येत ठीक नव्हती हे एक कारण होतं. मी अनेक राज्यांत बघतो, की मुख्यमंत्री हे अनेकवेळेला घरी बसून निर्णय घेत असतात. घरी सचिवालय व मंत्रालय असतं आणि आपल्याकडं तसं वर्षावर आहे. त्यामुळे ते आले, नाही आले, म्हणून राज्याचा कारभार काय थांबलेला नाही. राज्याचा कारभार चालू आहे. त्यांच्याकडे ज्या फाईल जातात, त्या वेळेवर क्लिअर करतात. निर्णय देतात आणि त्यामुळं त्याच्याबद्दलची चिंता माझ्या मनात नाही. मध्यंतरी त्यांच्या आरोग्याच्या प्रश्नामुळं काही मर्यादा होत्या. त्या कमी झालेल्या दिसतायंत. ते आलेत तर मला आनंद आहे.

**प्रश्न : दर सोमवारी लोकशाही दिन म्हणून साजरा होतो आणि अनेक लोक मुख्यमंत्र्यांकडं आपला विषय घेऊन येतात. मुख्यमंत्री नसल्यामुळे अनेकांची अडचण झाली. आता त्यामध्ये कंटिन्यूटी राहील?**

**शरद पवार :** मला असं कळलं, की उपमुख्यमंत्री वगैरे अशा कामांना भरपूर वेळ देतात. त्यामुळं अनेकांचे जे प्रश्न सीएमकडे जाणारे असतील, ते डेप्युटी सीएमकडं मांडतात. आणि माझी माहिती अशी आहे, नक्की नाही, तुम्ही कन्फर्म करा, की त्यांच्या कामाची सुरूवात सकाळी ७-८ वाजल्यापासून होते.

**प्रश्न : मघाशी तुम्ही धार्मिक तणावाचा उल्लेख केला. मागच्या काही दिवसांत मुंबईमध्ये मानखुर्द आणि मालवणीमध्ये अशा दोन घटना घडल्या. मालवणीच्या प्रकरणात एफआयआर पाहिला तर त्यामध्ये भाजप आणि बजरंग दलाच्या नेत्यांची नावे दिसतात. जेव्हा आपण म्हणता, की धार्मिक दंग्याच्या दिशेने वातावरण जात आहे. तेव्हा या दोन्ही घटनांकडे आपण कसे पाहता.**

**शरद पवार :** याठिकाणी कोणीही धार्मिक वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत असेल, तर कुणीही असो, कुठल्याही पक्षाचा असो, राज्य सरकारला कठोर पावले उचलावी लागतील. लोकांना शांती, बंधुभावाची जी स्थिती आहे याठिकाणची, ती कायम राहावी यासाठी लक्ष द्यावे लागेल.

**प्रश्न : तिसऱ्या आघाडीसंदर्भात काय सुरू आहे? काँग्रेसमधील अनेक नेते नाराज आहेत.**

**शरद पवार :** बिगरभाजप पक्षांना एकत्र करण्याची प्रक्रिया जी आम्हाला करायची आहे, यामध्ये काँग्रेस घेऊन पुढे जाण्याची आमची इच्छा आहे. काँग्रेसकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही.

■■

आजची बैठक थोडी घाईगर्दीमध्ये झाली. शिवाजी एज्युकेशन सोसायटीच्या एका महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी मी आलो होतो. या देशातल्या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याच्यासाठी आणि खेड्यापाड्यातील मुलांच्या शिक्षणाच्यासाठी ज्यांनी अतिशय कष्ट घेतले, अशा डॉ. पंजाबराव देशमुख यांचं स्मरण करण्याचा आजचा दिवस होता आणि त्यानिमित्तानं आज मी याठिकाणी होतो. मला आनंद आहे, की या घाईगर्दीच्या बैठकीमध्ये सुद्धा आपल्याशी



**अमरावती येथे १० एप्रिल रोजी झालेल्या अमरावती विभागातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा. शरद पवार यांनी केलेले भाषण....**

बोलायला मला संधी मिळाली. पण पक्षाच्या कामाची वाढ आणि कार्यकर्त्यांमध्ये असलेली अस्वस्थता ही नीट करायची असली, तर दोन दिवसांचं शिबिर घ्यायची आवश्यकता आहे. जयंतरावांनी आत्ता जाहीर केल्याप्रमाणं सगळ्यांशी चर्चा करून दोन दिवसांचं शिबिर आपण याठिकाणी घेऊ आणि प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनातली भावना ऐकून घेऊ.

राज्य आपल्या हातामध्ये आलंय. पण दिवस सोपे नाहीत. कारण, हे राज्य आपल्या हातात राहिलं नाही, त्यामुळं अस्वस्थ असलेला एक मोठा वर्ग राज्यामध्ये आहे. बेचैन आहे आणि त्यामुळं साहजिकच आहे, की देशाची सत्ता हातात असल्यामुळं त्या सत्तेचा वापर करून महाराष्ट्रातलं राज्य संकटात कसं आणता येईल यासाठी अखंड प्रयत्न सध्या चालू आहेत. अनेकांच्यावर खटले भरले जातात. चौकशा केल्या जातात. मंत्रिमंडळातल्या दोन मंत्र्यांना तुरूंगामध्ये टाकण्याचं काम केलं. सतत काही ना काही करून राष्ट्रवादी काँग्रेस असेल, शिवसेना असेल, काँग्रेस पक्ष असेल, त्यांना कसा त्रास देता येईल एवढा एककलमी कार्यक्रम आत्ता या देशामध्ये घडतोय. अशावेळेला शेवटी आपली एक सामूहिक शक्ती ही जर आपण उभी केली तर हे प्रयत्न हाणून पाडणं अशक्य नाही आणि ते काम आपण करायचंय.

काही लोकांनी, आत्ता आपल्या सहकाऱ्यांनी काल काय घडलं याचा उल्लेख केला. एसटी कामगारांचे प्रश्न असतील. एसटी कामगार हा समाजातला लहान घटक आहे. गेली ४०-५० वर्षे त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्यासाठी आपल्या सहकाऱ्यांनी कष्ट घेतले. साथ दिली. त्याच्या बदल्यात कामगारांना दोष देता येणार नाही. नेतृत्व चुकीची असलं, तर खूप वेळेला चुकीच्या रस्त्यानं सैनिकसुद्धा जातात. आणि एसटी कामगारांच्या बाबतीत काय घडलं, हे लोकांनी टेलिव्हिजनवरव पाहिलं, वर्तमानपत्रामध्ये वाचलं आणि त्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली, की सर्वसामान्य

एसटी कामगाराला भडकवणं, चुकीच्या रस्त्यावर नेणं असं काम काही लोकांनी केलं असं दिसतंय आणि त्याचे काही परिणाम झालेले आहेत.

राजकारणात, सार्वजनिक जीवनामध्ये संकटं येतात. अनेक प्रकारची संकटं येतात. काही आयोजित केलेली असतात. काही परिस्थितीनं आलेली असतात. पण त्या संकटांना तोंड द्यायची भूमिका घ्यायची असते. मला आठवतंय. मुंबईमध्ये मागं दंगली झाल्या होत्या. मी केंद्र सरकारमध्ये संरक्षणमंत्री होतो. मुंबईत दंगली झाल्याच्यानंतर त्यावेळेला नरसिंहराव हे प्रधानमंत्री होते. मुंबईमध्ये पंधरा दिवस आग लागली, ती मुंबई सावरण्याच्यासाठी मी मुंबईत जावं असा आग्रह नरसिंहरावनी त्यावेळेला केला आणि मला मुंबईला जावं लागलं. गेलेल्या पहिल्या दिवसापासून मी रोज दुपारी आणि संध्याकाळी ज्या भागात दंगली झाल्या, त्या भागांत जाऊन चर्चा करायला लागलो. लोकांना एकच सांगायला लागलो आणि त्याला यश मिळत होतं. एक आठवडा गेला आणि आठवड्याच्यानंतर मी ऑफिसमध्ये होतो आणि ऑफिसमध्ये मला काहीतरी आवाज ऐकायला मिळाला. चौकशी केली, की काय झालं? तर मला सांगण्यात आलं, की बाँबस्फोट झाला. मंत्रालयाच्याजवळ एअर इंडियाच्या बिल्डिंगमध्ये कुणीतरी बाँब फोडला. त्याची माहिती घेत असताना एका ठिकाणी बाँब फुटला. त्यानंतर दुसऱ्या ठिकाणी झाला, तिसऱ्या ठिकाणी झाला. अकरा ठिकाणी बाँबस्फोट केले. ३०० लोक गेले. आग लागेल अशी अवस्था होती. हिंदू-मुस्लिमांच्यामध्ये दंगल करण्याची साजिश होती. पण त्या परिस्थितीला तोंड देण्याचं आव्हान हे आपल्यावर होतं. पण मला अभिमानानं सांगावसं वाटतं, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता असो, काँग्रेसचा कार्यकर्ता असो, राज्य सरकारचे अधिकारी असोत, पोलिस दलाचे घटक असोत, सगळ्यांनी प्रयत्न केले. शुक्रवारी बाँब ब्लास्ट झाला, सोमवारी मुंबई शहर हे योग्य दिशेला जाईल याची आम्ही काळजी घेतली. शंभर टक्के कारखाने सुरू झाले. शंभर टक्के ऑफिस सुरू झाली. शंभर टक्के शाळा-कॉलेज सुरू झाली.

संकटं येतात, पण त्याच्यावर मात करण्याची हिंमत लागते. आणखी एक प्रसंग मला आठवतोय. गणपती विसर्जनाचा दिवस होता. गणपती विसर्जनाचा दिवस हा पोलिस दलाला, गृहखात्याला, मुख्यमंत्र्यांना तो काय सोपा जात नाही. कारण, शेवटचा गणपती जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत राज्य शांत आहे की नाही हे कळत नाही. आणि असंच झालं. मी



# जातीयवाद पसरविणाऱ्या लोकांविरुद्ध संघर्षासाठी राष्ट्रवादी सज्ज

**शरद पवार**

मुख्यमंत्री होतो. गणपती विसर्जन सुरू झालं. रात्री तीन वाजले. एका शहरातले गणपती हे जात नव्हते. दोन संस्थेमध्ये भांडण झालं. शेवटी तिथले गणपती विसर्जित झाले. तोपर्यंत ४ वाजले पहाटेचे. मी जागा होतो. कारण मला बघायचं होतं, राज्य शांत आहे की नाही. ४ वाजता मी झोपायला गेलो आणि पाच वाजता माझ्या घराच्या खिडक्या हलल्या. काचा फुटल्या. मला काही कळलं नाही कशानी झालं. असं फक्त भूकंप झाल्यावर होतं. महाराष्ट्रामध्ये कोयना नावाचं धरण आहे, तिथं भूकंप होतो. आणि म्हणून मी लगेच कोयना धरणावर फोन केला, विचारलं, की आपल्याकडं काय भूकंपाचा धक्का बसलाय का? त्यांनी सांगितलं, नाही. मग कुठं असेल? त्यांनी सांगितलं, लातूर जिल्ह्यात किल्लारी नावाच्या गावात या भूकंपाचं केंद्र आहे. पहाटे ५वाजता मला ही माहिती मिळाली आणि सकाळी ७ वाजता मी लातूरला पोहोचलो. गावागावात गेलो. तुम्हाला आश्चर्य वाटेल, ८०० लोक मृत्युमुखी पडले. १ लाख घरं उद्ध्वस्त झाली. एवढं मोठं संकट. गावात मी गेलो, तर रडण्याचा आवाज, प्रेतं पडलीत, रक्त वाहतंय, असं भयानक संकट होतं. पण त्या संकटाच्या काळातसुद्धा शासकीय यंत्रणा, कार्यकर्त्यांची मदत, सगळ्यांचं सहकार्य, यामुळं एका वर्षाच्या आत प्रत्येक माणसाचं घर बांधून दिलं. प्रत्येकाला मदत केली आणि त्या संकटातून आपण बाहेर पडलो.

त्यामुळं संकटं आल्याच्यानंतर काय घाबरायचं नसतं. त्याला तोंड द्यायचं असतं. कालचं संकट हे काय संकट नव्हे, ती कुणीतरी चिथावणी दिली. त्यामुळं काही गोष्टी घडल्या. त्याकडं अधिक लक्ष द्यायचं कारण नाही. आज आपल्याला वेगळ्या परिस्थितीतून जायचंय. एक वेगळं जातीय वातावरण


लातूरमधील भूकंप



देशात केलं जातंय. हिंदू-मुस्लिम दंगा करता येईल का? दलित-अदलित करता येईल का? सतत काहीना काहीतरी चाललंय. तुमच्या वाचनात अलिकडं एक गोष्ट आली असेल. काश्मिरमध्ये हिंदू समाज एकेकाळी रहात होता. काश्मिरी पंडित त्यांना म्हणतात. आणि एक काळ असा येऊन गेला, की काही दहशतवादी शक्तींनी कश्मिरी पंडितांच्यावर हल्ले केले. त्यांना कश्मिर सोडून जावं लागलं. अलिकडं एक सिनेमा काढला. एका गृहस्थानी एक सिनेमा काढला आणि त्या सिनेमामध्ये हिंदुंच्यावर अत्याचार कसे होतात हे दाखवलं. ज्यावेळेला एखादा लहान समाज संकटामध्ये जातो, आणि तिथला मोठा समाज त्यांच्यावर हल्ला करतो आणि तिथं मोठा समाज हा मुस्लिम आहे. तो हल्ला करतो हे दिसतं त्यावेळेला देशातल्या बहुसंख्य हिंदू समाजामध्ये एक प्रकारची अस्वस्थता निर्माण होते. ती अस्वस्थता निर्माण करण्याची जाणीवपूर्वक साजीश आज त्याठिकाणी होतीय आणि दुर्दैव हे आहे, की ज्यांच्या हातामध्ये देशाची सत्ता आहे, त्या लोकांनी हा सिनेमा बघितला पाहिजे अशा प्रकारची घोषणा केली.

आम्ही चौकशी केली. ज्यावेळी काश्मिरमध्ये हल्ले झाले पंडितांच्यावर तेव्हा राज्य कुणाचं होतं? तेव्हा राज्य होतं व्ही. पी. सिंगांचं. त्या राज्याला पाठिंबा कुणाचा होता? त्या राज्याला पाठिंबा होता भाजपचा. तेव्हा काँग्रेस सत्तेमध्ये नव्हती. राष्ट्रवादीचा तिथं जन्मही झाला नव्हता. आणि अशावेळेला भाजपच्या मदतीचं सरकार सत्तेवर असताना त्यांच्या प्रतिनिधीची हातात सत्ता असताना त्याठिकाणी हल्ले झाले त्या हल्ल्याची जबाबदारी भारतीय जनता पार्टीला टाळता येत नाही. आणि असं असताना त्यांनी देशामध्ये एक हिंदू-

मुस्लिम, त्याच्यामध्ये अत्याचार हे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करतायंत, ही देशाच्या ऐक्याला सुरूंग लावण्याचं काम आहे. ज्यावेळेला राज्यकर्ते या दिशेने जातात, त्यावेळेला अधिक चिंतेची स्थिती आहे आणि त्यामुळं ज्या लोकांचा समाजातल्या सगळ्या घटकांच्या हिताची जपणूक करण्याच्या विचारावर विश्वास आहे या सगळ्या घटकांनी आज एकत्र यायची गरज आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या गोष्टीमध्ये जातीय विचाराला कधीही पाठिंबा देणार नाही. जो जातीवाद करतो, जो धर्मा-धर्मामध्ये वाद वाढवतो, जो भाषे-भाषेमध्ये वाद वाढवतो अशांच्या विरूद्ध संघर्ष करण्याच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तयार आहे, ही तयारी आपण केली पाहिजे.

आज महाराष्ट्रामध्ये आपण तीन पक्षाचे सरकार केलं. प्रश्न छोटे-मोठे असतात. पण, आपण एकत्र बसून हे सरकार चालवतोय. लोकांच्या अडचणी कमी कशा होतील हे बघतोय. केंद्राचं सहकार्य नसलं तरी आपण त्याठिकाणी पुढं जातो आहोत. साधी गोष्ट आहे. आज देशाच्या पुढं सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न कोणता आहे? माझ्या मते महागाईचा प्रश्न आहे. पेट्रोलच्या किंमती, डिझेलच्या किंमती दर दिवसाला वाढतायंत. पेट्रोल-डिझेलची किंमत वाढली, की सगळ्या गोष्टींच्या किंमती वाढतात आणि त्याची किंमत सामान्य माणसाला, रोजच्या संसाराला द्यावी लागते. आज ते त्याठिकाणी घडतंय. दुसऱ्या बाजूला या देशामधली तरूण पिढी आज पदवीधर होऊनसुद्धा नोकरी मिळत नाही म्हणून वणवण हिंडतेय. या तरूणांच्या भविष्यासंबंधीचा विचार हा करण्याच्यासाठी सबंध देशाची सत्ता ही वापरायची आवश्यकता असताना, आज त्याच्याकडं सुद्धा मोदी सरकार ढुंकूनसुद्धा बघत नाहीये. आणि म्हणून देशासमोरच्या प्रश्नाला सहकार्य करायचं नाही, राज्यांना मदत करायची नाही.





घर सोडून गेलेले काश्मिरी पंडीत



राज्या-राज्यामध्ये अडचणी निर्माण करायच्या. या प्रकारची भूमिका घेऊन आज जर केंद्र सरकार चालत असेल, तर तुमची आणि माझी जबाबदारी आहे, की आपण एकत्र जाऊ. जे एका विचाराचे असतील त्यांना बरोबर घेऊन सामान्य माणसाचं दुखणं दूर करू आणि सांप्रदायिक विचार घेऊन माणसांमध्ये एक प्रकारचं अंतर निर्माण करण्याचं काम कुणीही करत असेल तर त्यांच्याशी जबरदस्त संघर्ष करण्याची तयारी ठेऊ. तो राष्ट्रवादीचा कार्यकर्ता करेल, अशा प्रकारची खात्री मी याठिकाणी देतो.

■■

# वाईट प्रवृत्तींना गाडण्यासाठी आपण बळकट झालं पाहिजे

**जयंत पाटील**




आपल्या सर्वांना आज एकत्रित करून पक्षाच्या व्यासपीठावरून चर्चा व्हावी, आणि आदरणीय पवार साहेब अमरावतीला येतायंत, त्याचा फायदा घेऊन आपणा सर्वांना एकत्रित करून पक्षाच्या या व्यासपीठावर थोडासा संवाद व्हावा, हा एक चांगला प्रयत्न संजय खोडके आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी केलांय, त्याबद्दल पहिल्यांदा त्यांचं आभार मानतो. कारण, अमरावती जिल्हा, यवतमाळ जिल्हा आणि वर्धा जिल्हा या तीन जिल्ह्यांमध्ये आम्हाला काळजीचं कारण आहे. या तिन्ही जिल्ह्यांमध्ये पक्ष अधिक बळकट करण्यासाठी आम्हाला विशेष प्रयत्न करणं आवश्यक आहे, याची मला आणि आम्हा सर्वांना जाणीव आहे. अकोला जिल्हा, वाशिम जिल्हा, तिथं कार्यकर्त्यांची काही कमी नाही. पण या तीन जिल्ह्यांमध्ये अधिक ताकद जर लावली तर आपल्याला अधिक चांगलं यश मिळेल अशी माझी स्वत:ची पूर्ण खात्री आहे.

आणि म्हणून महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी परिवार संवाद ज्यावेळी सुरू झाला, त्यावेळी प्रत्येक विधानसभा क्षेत्रात आपण गेलो. त्यावेळी पक्षाच्या अपेक्षा पदाधिकाऱ्यांच्याकडून काय आहेत, यादेखील सांगण्याचं काम आम्ही सर्वांनी केलं. तुमचं तर ऐकून घेतलंच घेतलं, तुमच्या व्यथा, तुमचे प्रश्न, पक्षाकडूनच्या अपेक्षा, सत्तेत असल्यानंतर पक्षाकडून तुमच्या कोणत्या अपेक्षा आहेत, याविषयी अतिशय बारकाईनं आपली सगळ्यांची चर्चा यापूर्वी झाली. पण, आमचे संजय खोडके यांनी अतिशय चांगली सूचना केली आणि आदरणीय पवार साहेबांनी देखील या सूचनेचा स्वीकार केलेला दिसतोय. आणि म्हणून या पाच जिल्ह्यातील किंबहुना विदर्भातील सर्वांना एकत्रित करून दोन दिवस पवार साहेब योग्य वेळी जेव्हा आपल्याला शक्य असेल त्यावेळी ते देणार आहेत, असं पवार साहेबांनीच आत्ता मला सांगितलं.

आपल्या पक्षाला सत्तेत असताना पक्षाच्या मंत्र्यांनी किंवा महाविकास आघाडीने एकत्रितपणानं महाराष्ट्रात काय प्रयत्न केले हे कमी अधिक प्रमाणात तुम्हाला माहित असेल असा मला विश्वास आहे. पण, या परिसराला महत्त्व आहे सोयाबीनचं, कापसाचं. अजितदादांनी अर्थसंकल्प जाहीर करताना एक हजार कोटी रूपये कापूस आणि सोयाबीनचं आपल्याला मूल्यवर्धन कसं करता येईल याच्यासाठी खर्च करण्यासाठी पुढच्या एक-दोन वर्षात एक विशेष कार्यक्रम हातात घेण्याचा निर्णय अर्थसंकल्पात केलांय. आमच्या सोयाबीनच्या उत्पादकांना त्यांचं उत्पन्न कसं वाढेल, कपाशीचं उत्पन्न कसं वाढेल याविषयीदेखील अर्थसंकल्पात जाणीवपूर्वक काही प्रोव्हिजन्स करण्यात आल्यात. आपल्याला कौशल्य विकासाच्याासाठी अमरावतीमध्ये एक तर शेतकरी वर्ग


आहे आणि दुसरा प्रचंड शिकलेला वर्ग आहे, याच्या रोजगाराविषयीदेखील कौशल्यावर आधारित आपल्याला काय उपक्रम करता येईल का याच्याविषयीदेखील सरकारमध्ये बराच प्रयत्न, आपल्याकडं पहिल्यांदा राजेश टोपे होते, आता नवाब मलिक होते. त्यांच्याकडं ती जबाबदारी आहे. मला खात्री आहे, की त्यातूनही काही मार्ग निश्चितपणानं निघेल.

वैधानिक विकास मंडळाला कुणाचा विरोध नाही. वैधानिक विकास मंडळ आपल्याला करायचंच आहे. पण ज्या पद्धतीनं बारा आमदारांच्या बाबतीत अजून राज्यपालांच्या राजभवनवरून पुन्हा उत्तर आलेलं नाही, तसं वैधानिक विकास मंडळाची नाव नेमताना सरकारने जी नावं सुचवतील, त्यापेक्षा वेगळी नावं पाठवण्याचा अधिकार त्यांना आहे आणि त्यामुळं प्रश्न नवे तयार होतील. तुम्हीच मग आम्हाला विचाराल, की तुम्हाला कळत नव्हतं का. आणि म्हणून वैधानिक विकास मंडळाला ज्या हिशेबानं निधी द्यायचांय, आपल्या विदर्भातला बॅकलॉग दूर करण्यासाठी ज्या विषयांना पैसे यायला पाहिजेत, अगदी अमरातवी विभागाचा बॅकलॉग जलसंपदाचा दूर करण्यासाठी जेवढा पैसा द्यायचांय, तो सगळा पैसा द्यायची व्यवस्था राज्याच्या अर्थसंकल्पात होतेय. तुम्ही कोणतीही चिंता करण्याचं कारण नाही.

आम्ही एक वेगळा प्रयत्न करतोय. अमरावती विभागातला जलसंपदा विभागाचा बॅकलॉग दूर करण्यासाठी पुढच्या दोन वर्षात जवळपास बरीचशी प्रगती झालेली दिसेल. पण त्याचबरोबर वैनगंगेचं पाणी खाली तेलंगणाला जातं, त्याच्यातला आपला वाटा जो आहे, तो आपण वैनगंगेपासून नळगंगेपर्यंत जोडला पाहिजे आणि तो या भागातनं जायला पाहिजे याची सूचना मला आदरणीय पवार साहेबांनी दिलीय. पवार साहेबांनी सांगितलं, की आपल्या वाट्याचं खाली वाहत जाणारं पाणी, पावसाचं अतिरिक्त असणारं पाणी हे तुम्ही वैनगंगेतून नळगंगेला आणण्याची व्यवस्था करा. सगळ्या विदर्भात जिथं जिथं पाणी कमी पडतंय, त्याठिकाणी हे पाणी वाटायची व्यवस्था करा असा आदेशच मुळात आपलं सरकार आल्यावर पवार साहेबांनी दिला. त्याची आता बरीच प्रगती झाली आहे. आम्ही पुढच्या दोन-तीन महिन्यांच्या कालखंडात याचा निर्णय आपल्यासमोर देऊ. त्यावेळी आपल्या लक्षात येईल, की वैनगंगेच्या खोऱ्यातलं अतिरिक्त असणारं पाणी हे नळगंगेपर्यंत आणण्याचं काम कशा पद्धतीनं आपलं सरकार करणार आहे.

मी यासाठी सांगतोय, की थोडंसं आपण या सगळ्या प्रश्नांत, विकासाच्या कामात कोरोना असतानाही कुठंही कमी पडलो नाही. आपलं सरकार सातत्यानं या विदर्भातल्या सगळ्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पुढं आहे. पण राज्यात दोन वर्षे, अडीच वर्षे आपलं सरकार येऊन झालं, या सरकारला पाण्यात पाहणाऱ्यांची संख्या काय कमी नाही. हे सरकार पडलं पाहिजे. या सरकारचे आमदार फुटले पाहिजेत. हे आमदार फुटतील आणि मी तिथे जाऊन बसेन अशी स्वप्नं बाळगणाऱ्यांची संख्या अलिकडं वाढलीय. पण, सुदैवाने आदरणीय पवार साहेबांनी ज्या बळकटीनं या तिन्ही पक्षांचं एकत्रिकरण करून महाविकास आघाडीची स्थापना केली आहे, त्यामुळं आता आमच्या विरोधकांचा भ्रमनिराश झाला. तिन्ही पक्षातला एकही आमदार फुटत नाही हे त्यांच्या लक्षात आलं. आता त्यांना तो नाद सोडायची पाळी आली. मागच्या महिन्यात ७ मार्चला सरकार पडणार म्हणून तारीख दिली. दर महिनाभरानं, पंधरा दिवसांनी तारीख येते आणि कार्यकर्ते आम्हाला विचारतात, की अहो, खरंच का हो. तुम्ही आता जरा उलटा विचार करायला


वैनगंगा नदी भंडारा जिल्ह्यातून वाहताना






सुरूवात करा. अडीच वर्षात ज्या तारखा दिल्या, एकपण तारीख खरी नाही. ते हे का करतात? तर त्यांच्यामागं भारतीय जनता पक्षात असणारं जे सैन्य आहे, ते फुटू नये, ते येऊन आपल्या बाजूला बसू नये, म्हणून सांगतात, की उद्या आमचं सरकार येणार आहे.

आपण सगळं ते बाळबोध पद्धतीनं बघतो. पण त्यांना चिंता वेगळी आहे. त्यांना चिंता आहे, आपण आपल्या पक्षात वेगवेगळ्या सत्तेची आमिषं दाखवून ज्या लोकांना पक्षात आणलेलं आहे, ही लोकं परत जातील का? ही त्यांच्या मनातली खरी भीती आहे. आणि म्हणून दर दोन महिन्याने, दीड महिन्याने आता आमचं सरकार येतंय. मग आमचं सरकार येतंय. सरकारमधल्या अधिकाऱ्यांनाही सांगायचं, हॅलो, आमकं आमकं काम करा. पुढच्या महिन्यात आमचं सरकार येणारच आहे. त्या अधिकाऱ्याही वाटतं, की एवढा मोठा माणूस असं सांगतोय म्हटल्यावर काहीतरी खरं असेल. त्यामुळं लोकांच्यात हा भ्रम निर्माण करायचा. लोकांना कायम अशा स्वप्नात ठेवायचं, की मी येत आहे. मी येणार आहे, येणार आहे हे जे चाललंय, तो त्याचा भाग आहे. बाकी तुम्ही त्याला फार महत्त्व देऊ नका.

आपलं काम लोकांच्यापर्यंत पोहोचण्याचं आहे. जेव्हा आमदार फुटत नाहीत, जेव्हा कोणता पक्ष दाद देत नाही, तेव्हा वेगवेगळ्या एजन्सीचा वापर महाराष्ट्रात आता सुरू झालांय. भारतामध्ये दुसऱ्या कुठल्याही राज्यात एवढ्या धाडी पडत नाहीत, तेवढ्या धाडी आमच्या महाराष्ट्रातल्या, त्याही महाविकास आघाडीतल्या नेत्यांच्यावर पडतायंत. आमचे अनिल देशमुखांचे चिरंजीव सलील इथं आहेत. किती धाडी पडाव्यात? एकदा समजा मी येऊन तुमच्या घरावर धाड टाकली, त्याच घरावर किती धाड टाकायची? अनिल देशमुखांच्या बाबतीत ११० ठिकाणी ११०वेळा धाडी घातल्या. म्हणजे मला हे यासाठी सांगायचंय, की अनिल देशमुखांचे चिरंजीव सलील देशमुख आजही उजळ माथ्याने, ठामपणाने पक्षाच्या बरोबर आज काम करतायंत. कारण, अनिल देशमुखांना आत गेल्यावर सांगण्यात आलं, की तुम्ही असे असे आरोप तुमच्या पक्षाच्या नेत्यांवर करा. तुम्हाला याच्यातनं मोकळं करतो. पण अनिल देशमुख म्हणाले, की मला तुरूंगात राहावं लागलं तरी चालेल. पण मी खोटं कधीही करणार नाही. त्या अनिल देशमुखांचंसुद्धा कौतुक करावं तेवढं कमी आहे. कोणत्याही परिस्थितीत वाकले नाहीत. ठामपणाने राहिले, हे आपण सगळ्यांनी समजून घेतलं पाहिजे.

नवाब मलिकांचा काय दोष होता? नवाब मलिकांनी केंद्रीय एजन्सीचं पितळ उघडं पाडलं. नवाब मलिकांनी केंद्रीय एजन्सीज्च्यामध्ये काम करणाऱ्या लोकांचे खोटे दाखले पुढे आणले. नवाब मलिकांनी आपल्याला उघडं पाडलंय हे कळल्यानंतर नवाब मलिकांच्या मागं लागायचं काम सुरू झालं. कुठंतरी २० वर्षापूर्वी तुम्ही जमीन घेतलीय. त्याचे सगळे पैसे देऊन झालेत. पण, तरीही महाराष्ट्र सरकारकडं तक्रार नाही. डायरेक्ट ईडीकडं तक्रार. ईडी यांच्या घरी पहाटे ६ वाजता. कागदपत्रं आहेत, करार आहे. योग्य पद्धतीनं रीतसर सगळ्या प्रोसिजर झालेल्या असतानादेखील नवाब मलिकांना आज काही महिने तुरूंगात राहावं लागतंय. न्याय या देशात

आहे किंवा नाही, हा प्रश्न आहे. अजून गुन्हा सिद्ध व्हायचाच आहे. गुन्हा या दोघांच्यावर सिद्ध व्हायच्या आधी ही दोघं तुरूंगात आहेत.

भुजबळ साहेबांच्यावरदेखील तीच परिस्थिती होती. म्हणजे या देशामध्ये विरोधात बोलणाऱ्या सरकारचा कणा मोडण्यासाठी पडेल त्या स्तरावर जाण्याची परिस्थिती आणि प्रयत्न काही लोकं या देशात आणि या राज्यात करतायंत, याची नोंद तुम्ही-आम्ही सर्वांनी घेतली पाहिजे. बरं हे सगळं करूनही कुणी ऐकत नाही म्हटल्याच्यानंतर राज्यातल्या वेगवेगळ्या संघटना आंदोलनं करतायंत. त्या संघटनांत शिरायचं, त्या संघटनांसमोर भाषणं करायची, प्रक्षोभक भाषणं करायची. शरद पवार साहेबांना टार्गेट करायचं. ना शरद पवार साहेब एसटी खात्याचे मंत्री, ना शरद पवार साहेबांना डायरेक्ट याच्याशी संबंध. पण, महाराष्ट्रात मी ३५-४० वर्षे बघतोय, जेव्हा जेव्हा महाराष्ट्रातल्या एसटी कामगारांच्यावर संकट आलं, जेव्हा जेव्हा महाराष्ट्रातल्या एसटी कर्मचाऱ्यांना आपली मागणी पदरात पाडून घ्यायची होती, त्यावेळी त्या सगळ्या एसटी कर्मचाऱ्यांनी आदरणीय पवार साहेबांना साकडं घातलं. गेल्या ४० वर्षांचा इतिहास आहे, महाराष्ट्रातल्या एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना पवार साहेबांच्या मध्यस्थीमुळे अनेकवेळा मदत झालेली आहे. चांगल्या पद्धतीनं त्यांच्या पगारवाढी वेळोवेळी झालेल्या आहेत.

यावेळीही पवार साहेबांनी सरकारच्यातलं आणि त्यांच्यातलं अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला. बऱ्याचशा गोष्टी सरकारला मान्य करायला लावल्या. काल-परवा कोर्टाचा निर्णय झाला. आझाद मैदानावर बसलेल्या लोकांनी पेढे वाटले. जल्लोष केला. सगळे घरी जाण्याची वाट मोकळी झाली आणि दुसऱ्या दिवशी आदरणीय पवार साहेब, आमचा सर्वांचा अभिमान असणारा हा नेता घरी असताना, काकी घरी असताना, त्यांची नात घरी असताना, हे तिघंच घरी असताना शंभर-दीडशेपर्यंत कार्यकर्ते कुणीतरी येतात, दगडफेक करतात, अर्वाच्च्य भाषा वापरतात. पवार साहेब नेहमी आम्हाला सांगतात, जास्त प्रोटेक्शन घेऊ नका. त्यांची आम्हाला शिकवण आहे, कशाला लागतात म्हणतात इतक्या गाड्या. घराच्यासमोरही ते पोलिस थांबू देत नाहीत. का? तर आपण साध्या पद्धतीनं राहावं. आपल्याला पोलिसांचा गराडा नसावा. या आदर्श विचाराने नेहमी पवार साहेब राहिलेले आहेत. त्यामुळं दोन गार्ड होते. एकदम घोळका आला. हे असे तसे नाही आले. आदल्या दिवशी पेढे वाटणारी लोकं शंभर टक्के इथं येऊन अशी कृत्यं करू शकत नाहीत. माझी तर शंका आहे, की ते आलेले होते ते एसटीचे कर्मचारी होते की नव्हते याची खरी चौकशी झाली पाहिजे. काही लोकं जरा जादा झाल्यामुळं अर्वाच्च्य शब्द वापरत होते. त्यांचीही टेस्ट झाली. त्यातनंही काही वेगळे प्रकार पुढे यायला लागले. एकत्रित करून पाठवण्याचं काम कुणी केलं? आणि याच्यामागं षडयंत्र कोणाचं आहे? हे महाराष्ट्र ओळखतो असं मला वाटतं.

महाराष्ट्राला माहिती आहे, की या सरकारला अडचणीत आणण्यासाठी गेली अडीच वर्षे कोण प्रयत्न करतंय. जाणीवपूर्वक प्रत्येक छोट्या छोट्या कारणाचा उहापोह करायचा आणि त्याठिकाणी त्यांचा असंतोष भडकवण्याचं काम कोण करतंय हे आता काय झाकून राहिलेलं नाही. पोलिसांनी कुणाला तरी अटक केलेली आहे. पण मला खात्री आहे, की पोलिस शेवटपर्यंत जातील आणि हे कृत्य कोणी केलंय हे हुडकतील. पण हे गणित एवढ्यावर संपेल असं मला



संवाद मेळाव्याचे संयोजक संजय खोडके हे प्रास्ताविक व स्वागत करताना

वाटत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पवार साहेबांच्यावर झालेला हल्ला हा एवढ्या साधेपणानं आणि सामान्य पद्धतीनं घेणं शक्य नाही. आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. आम्ही येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत, विधानसभा असो, जिल्हा परिषद असो, नगरपालिका असो, पवार साहेबांवरील हल्ल्याची किंमत समोरच्या लोकांना चुकती करायला लाऊ एवढ्या ताकदीनं महाराष्ट्रात पवार साहेबांना मानणारा कार्यकर्ता हा समोरच्या सगळ्यांचा मुकाबला करेल, असा मला ठामपणानं विश्वास आहे.

कायद्याचं राज्य आहे. पण कायदा हातात घेण्याची पद्धत काही लोकांनी सुरू केलेली आहे. आणि म्हणून मी आपल्याला एवढीच विनंती करेन, की आपण आपला मतदारसंघ, आपला तालुका, आपण जिथं काम करतो तिथं सक्षमपणानं काम करा. या अशा प्रवृत्ती गाडून टाकायच्या असतील तर आपण बळकट झालं पाहिजे. आपली ताकद जर तालुक्यात, जिल्ह्यात वाढली तर आपल्याला निश्चितपणानं महाराष्ट्रातली, विदर्भातली जनता पाठिंबा दिल्याशिवाय राहणार नाही. आणि खास करून मी आदरणीय पवार साहेबांना, प्रफुल्लभाईंना सांगतो, की माझं हे ठामपणानं मत झालेलं आहे, जेवढं विदर्भात आपण लक्ष घालू तेवढी विदर्भातली जनता आपल्याला प्रचंड प्रतिसाद देईल आणि तो प्रतिसाद निश्चितपणाने आमचे विदर्भातले कार्यकर्ते देऊ शकतील.

संजय खोडकेंना मी सांगितलं, हे पाच जिल्हे आपल्याला एकत्रित करायचे आहेत. त्यांना जबाबदारी दिली. जबाबदारी घेऊन ते कामाला लागले. आज सुरूवात करून आपल्या सगळ्यांना त्यांनी इथं एकत्रित केलंय. त्यांना मी सांगितलेलं आहे, पवार साहेबांच्या आदेशानं सांगितलंय, की आपल्याला या पाच जिल्ह्यांमध्ये संघटन अधिक मजबूत करायचंय. पक्ष बळकट झाला, तर तुमची-माझी मान ताठ राहू शकते. पक्ष बळकट झाला तर या भागातल्या कोणत्याही पक्षाला आपल्या पक्षाचं अस्तित्व दुर्लक्षित करता येणार नाही. आणि म्हणून ताकदीनं आपण एकत्रित, एकसंघपणानं राहावं आणि पक्ष बळकट करण्यासाठी मघाशी सांगितलं, की आता आपण जास्त वेळ आपल्या मतदारसंघात निवडून येण्याची शक्यता नसेल तर नव्या रक्ताला संधी देऊया. नवे चेहरे पुढे आणूया. विदर्भात एवढ्या मोठ्या प्रचंड प्रमाणात तरूण कार्यकर्ते आहेत, नगरपालिकेत आहेत, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये जाण्याची इच्छा आहे. बऱ्याचवेळा तर आम्ही आघाडी करतो आणि आमचे ७० टक्के कार्यकर्ते उभेच राहू शकत नाहीत. त्यामुळं आता आघाडी किती करायची. महाविकास आघाडीला प्राधान्य यात दुमत नाही. पण आम्ही आतापर्यंत विदर्भात आघाडी करून विधानसभेला प्रत्येक जिल्ह्यात एक, नाहीतर दोन जागा लढवल्यात. मला प्रफुल्लभाई असं वाटतंय, की भविष्यात याच्यात बदल करण्याची आवश्यकता आहे आपल्याला आणि आता आपली ताकदही वाढलीय.

महाराष्ट्रात जवळपास ५३ सदस्य आपले विधानसभेचे निवडून आलेले आहेत. आपण ताकदीनं काम करायला लागलो तर ही संख्या वाढेल. येणाऱ्या २३ तारखेला मधल्या परिवार संवाद यात्रेचा समारोप कोल्हापूरला होणार आहे. आदरणीय पवार साहेबांनी आम्हाला वेळ दिलेली आहे. त्याठिकाणी समारोप करत असताना त्याचा आढावा आम्ही थोडक्यात घेऊ. पण सगळ्यात महत्त्वाचा माझा अनुभव आहे, की पवार साहेब आपण कधीच जिथं विधानसभेच्या निवडणुका लढवलेल्या नाहीत, त्याठिकाणी आर्वीसारख्या ठिकाणी फार मोठ्या कार्यकर्त्यांचा संच आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये जिथं आम्ही निवडणूक लढवतंच नाही, खडसे साहेब, आम्ही ९९ पासून निवडणुका आघाडी मोडल्यावर काही उमेदवार उभे केले. पण बऱ्याचशा मतदारसंघात आम्ही निवडणुकाच लढवल्या नसतील विधानसभेच्या, त्याठिकाणीदेखील पवार साहेबांना मानणाऱ्या विदर्भातल्या गडचिरोलीच्या अहिरी तालुक्यापासून सगळीकडं कार्यकर्त्यांचा फार मोठा संच आहे. त्याला ताकद देण्याचं काम राष्ट्रवादी काँग्रेस भविष्यात करेल हाच विश्वास मी आपल्या सगळ्यांना देतो.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपालिका यांच्या तयारीला आता आपण लागा. आपण मनात न्यूनगंड ठेऊ नका. आपण लढणार आहे का नाही लढणार. आपल्याला तिकिट मिळणार आहे की नाही मिळणार. तुम्ही तुमचा मतदारसंघ सक्षम करा. आम्हाला थोडा जरी अंदाज आला, की आपली सीट निवडून येतेय, तर तुम्हाला ताकद देण्याचं काम पक्ष करेल, हा विश्वास पक्षाचा अध्यक्ष या नात्यानं मी देतो आणि मे महिन्यामध्ये पुन्हा मी गडचिरोलीच्या टोकापासून प्रत्येक जिल्ह्यात येऊन प्रत्येक जिल्ह्यातल्या प्रत्येक मतदारसंघातल्या कार्यकर्त्यांना काही मोजक्या कार्यकर्त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी बोलवून दोन-तीन तासाच्या बैठका घ्यायला मे महिन्यात सुरूवात करणार आहे. खडसे साहेबांचं आणि माझं आत्ता बोलणं झालं. धुळे, नंदूरबार, जळगाव, अकोला, वाशिम याठिकाणी खडसे साहेब मला म्हणाले, की मी तुमच्याबरोबर येतो. आपल्या या सगळ्या परिसरात प्रफुल्लभाई वेळ देतो म्हणालेत. डॉ. शिंगणे साहेब आहेत. त्यांना घेऊन या सगळ्या भागात आपण फिरून आपल्या पक्षाला मे महिन्यात पुन्हा एकदा उजाळी देण्याचा प्रयत्न आपण सगळे करणार आहोत. त्यातही आपलं सहकार्य राहील, हा विश्वास करतो आणि माझं भाषण थांबवतो.

■■

# पवार साहेबांपासून ऊर्जा घेत विदर्भात कामाला लागूया



## प्रफुल पटेल

मित्रांनो, आज ही संवाद बैठक अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांसाठी संजय खोडके यांनी आयोजित केली आहे. खरं म्हणजे आज ही पवार साहेबांच्या उपस्थितीत बैठक होत आहे, त्याचं एक वेगळं महत्त्व आहे. पवार साहेबांनी नेहमी विदर्भामध्ये आपण सगळ्यांनी मिळून एकत्र काम करावं, विदर्भाचे प्रश्न वेगळे आहेत, विदर्भाचा विकास आपण सगळे मिळून कसा करू शकू, ही नेहमी त्यांच्या मनामध्ये चिंता असते. जरी विदर्भामध्ये आपल्या पक्षाचं संख्याबळ कमी असेल, पण विचारांनी कधी पवार साहेबांनी विदर्भाला मागं टाकलं असं मला जाणवलं नाही.

महत्त्वाची गोष्ट ही आहे, की जसं जयंतराव आणि बाकीच्या वक्त्यांनीही सांगितलं, की विदर्भामध्ये आपण सुरूवातीपासून कमी जागा लढवत आलेलो आहोत. मागच्याच निवडणुकीचा जर आपण अहवाल बघितला, तर आपण चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकही जागा लढवली नाही. नागपूर शहरामध्ये एकही जागा लढवली नाही. अमरावती जिल्ह्यामध्ये एक जागा आणि एक जागा आपण पुरस्कृत केली. तशीच वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली. आणि त्यामुळं आज खालच्या स्तरापासून जी काही वरची बांधणी करावी लागते, जी पायरी चढायला सगळ्यांना काहीतरी मार्ग दिसला पाहिजे, ते विदर्भामध्ये आपण कुठंतरी कमी पडलोय याबाबतीमध्ये याच्यात काय शंका नाही. आणि ही चर्चा आमची जयंतरावांची, पवार साहेबांची अनेकवेळा झालेली आहे, की ज्यापद्धतीनं आपण इथं उमेदवार निवडतो कमी जागामध्ये, पण ज्या लोकांना आपण निवडत असतो ते योग्यरीतीनं आपण करत नाही. त्याचा परिणाम हे आहे, की आपल्या जागा इतक्या कमी निवडून येतात.

मागच्या विधानसभा निवडणुकीमध्ये पवार साहेबांमुळे एक नवी ऊर्जा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणि आपल्यामध्ये आणि काँग्रेस पक्षामध्ये त्यांच्यामुळं आपल्याला बघायला मिळाली. त्याचा फायदा फक्त राष्ट्रवादीलाच नव्हे, तर काँग्रेसलाही झालेला आहे. हे काय विसरता कामा नये. इलेक्शननंतर जी आज महाविकास आघाडी बनलेली आहे, त्याचे जनक आहेत फक्त आणि फक्त आपले पवार साहेब. त्यांच्या दृष्टीमुळं आज महाविकास आघाडी निर्माण झाली. अशक्य गोष्ट शक्य झाली. आणि म्हणून आपल्या सगळ्यांना आता येणाऱ्या काळामध्ये या महाविकास आघाडी सरकारचा फायदा घेऊन आपल्या आपल्या जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला वाढवण्याचं काम करायचं आहे.

ही खरी गोष्ट आहे, की आपले लोक या भागामध्ये कमी फिरत असतात. निकम ताईंनी मघाशी सांगितलं, की राष्ट्रवादीचे आपले जे जे काही मंत्री आहेत, त्यांनी महिन्यामध्ये किमान एक जिल्ह्यामध्ये यायला पाहिजे, तेव्हाच आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्याला त्याच्या पाठी कोणीतरी उभा आहे, असं वाटेल. आज हे स्वाभाविक आहे. आम्ही पण राजकारण करतो आमच्या जिल्ह्यामध्ये. आज खालच्या पातळीचा कार्यकर्ता, त्यांच्या काही अडीअडचणी असल्या, कुठे तहसील ऑफिस असेल, कुठे कलेक्टर ऑफिस असेल, बाकीचं कुठलंही काम असेल, इरिगेशनचं असेल, तर जाणार कुणाकडे. आपले काम कोणाकडून सोडवून घेणार. हा विषय अतिशय महत्त्वाचा असतो. आणि म्हणून जयंतराव आपण कितीही

पक्षाच्यासाठी प्रयत्न केले, पण आपण जिल्ह्याजिल्ह्यामध्ये काय लोकांना ही जबाबदारी देऊन सामान्य कार्यकर्त्यांच्या, सामान्य नागरिकांच्या अडीअडचणी दूर कराव्याच लागणार आहे. तेव्हाच लोकं आपल्या पक्षाबरोबर जुडतील.

जसं आपण अमरावती जिल्ह्यामध्ये, यवतमाळ जिल्ह्यामध्ये, आणखी काही असे जिल्हे आहेत विदर्भामध्ये, जिथे अजूनही आपण संपर्क मंत्री दिलेले नाहीत. त्यामुळे अमरावती जिल्ह्याचा माणूस, यवतमाळ जिल्ह्याचा माणूस किंवा इतर जिल्ह्यातला माणूस कोणाच्या दारात जाणार, मुंबईला ते कितीवेळा जाऊ शकणार आणि मुंबईला ठराविक लोक जाऊन आपले काम करू शकतात. पण सामान्य जनतेचं काम होऊ शकत नाही. म्हणून ही आपल्याला परिस्थिती बदलायची आहे. आम्ही सगळ्या लोकांनी, आता आम्हालाही, मी स्वत: आज पूर्व विदर्भामध्ये नागपूर असो, गडचिरोली असो, चंद्रपूर, वर्धा जिल्ह्यामध्ये प्रत्यक्ष लक्ष घालायला मी आता सुरूवात केली आहे. कारण, आपले अनेक मंत्री आज पदावर उपस्थित नाहीयेत. उद्या येतील नक्की.




पण आज जी पोकळी निर्माण झाली आहे पूर्व विदर्भामध्ये, म्हणून मी स्वत: प्रत्येक जिल्ह्यामध्ये आणि आपल्या लोकांचं काम मुंबईच्या स्तरावर किंवा कुठल्याही स्तरावर कसे करू शकते त्याच्यासाठी आम्ही लक्ष घालत आहोत.

म्हणून डॉ. शिंगणे साहेब, आपल्या या भागामध्ये, पाच जिल्ह्यामध्ये तुम्ही एकटे मंत्री आहात. माझी विनंती आहे, ठीक आहे, पाच जिल्हे जास्त असतात, तुमच्याकडे मंत्रालयाची पण जबाबदारी आहे. स्वत:च्या बुलढाणा जिल्ह्याची पण वेगळी जबाबदारी आहे. पण तरीदेखील आपण वेळात वेळ काढून आपण या भागामध्ये जास्त फिरले तर त्याचा फायदा होईल. कारण, तुम्ही स्थानिक आहात. लोक तुम्हाला ओळखतात. तुम्ही लोकांना ओळखता. कार्यकर्त्यांना ओळखता. हे काम करण्याची अत्यंत गरज आहे.

आज पवार साहेब या वयात, कोविडच्या दोन वर्षांच्या काळात एवढं भयंकर गेलं. पण कोणताही नेता देशामध्ये, महाराष्ट्रामध्ये नव्हे फक्त, देशामध्ये रस्त्यावर फिरला, जनतेमध्ये फिरला तो फक्त एकच नाव आहे, शरद पवारांचं नाव आहे. आणि म्हणून माझी आपल्या सर्वांना विनंती आहे. आपण पवार साहेबांकडून काहीतरी शिकायला पाहिजे. आज पवार साहेबांसारखी माणसं या वयामध्ये रात्रं दिवस फिरत असतात. आज एवढा ४०-४२चा पारा असूनही ते सकाळपासून इथे अमरावतीमध्ये आलेले आहेत. अजूनही त्यांच्या चेहऱ्यावर काहीच थकान दिसत नाही. म्हणून आपण सगळ्यांनी त्यांच्याकडून ऊर्जा घ्यायची आहे. प्रेरणा घ्यायची आहे. या विदर्भामध्ये एक नवीन प्रकारची बांधिलकी करायची आहे आणि खऱ्या अर्थानं मी तुम्हाला सांगू इच्छितो, त्याचं कारण आम्ही पण जबाबदार आहोत. असं नाही, की आम्ही जबाबदार नाही. फक्त दुसऱ्यांच्यावर जबाबदारी टाकायची नाहीये. आम्ही सगळ्यांनी या कामामध्ये लक्ष जास्तीत जास्त घातलं पाहिजे. संजय खोडके तुम्ही आज सुरूवात चांगली केलेली आहे. दोन दिवसांचं शिबिर घ्यायचा पण निर्णय केला तुम्ही, त्याला साहेबांनी पुरस्कृत केलं आहे. अतिशय चांगली गोष्ट आहे. पण फक्त शिबिरच नव्हे, तर जिल्ह्याजिल्ह्यामध्ये जाऊन आपण काही प्रमुख लोकांनी तिकडची परिस्थिती काय आहे, तिथल्या लोकांचे प्रॉब्लेम काय आहेत, ते आपण जाऊन सोडवले पाहिजेत. एकेक जिल्ह्यामध्ये एक महिन्यामध्ये जाऊन किमान चार, सहा लोकांनी जाऊन काम केलं, तर स्थानिक लोकांना ताकद मिळेल. त्यांचे स्थानिक प्रश्न आपण सोडवू शकू. तेव्हाच आपल्या पक्षाची एक चांगली पकड निर्माण होईल. एवढं मी आजच्या दिवशी सांगू इच्छितो.

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका-महापालिकेच्या निवडणुका येणार आहेत. ओबीसीच्या मुद्यावर तुम्हाला माहितच आहे, बरेच प्रश्न निर्माण झाले. आपण कितीवेळा आपल्या लोकांना न्याय देण्यासाठी आपण सुप्रीम कोर्टच्या दारावरती सुद्धा जाऊन आलो. पण तिथेही आपल्याला काही यश मिळालेले नाही. पण आता राज्य सरकारनी कायद्यामध्ये संशोधन करून आणि आता ओबीसीचा एक आयोग निर्माण करून इम्पेरिकल डाटा काढायचं काम सुरू केलेलं आहे. चार-सहा महिन्यामध्ये नक्कीच या राज्यामध्ये आणि आपल्या विदर्भामध्ये या सगळ्या निवडणुका लागणार आहेत आणि त्याच्यासाठी आपल्या लोकांना सज्ज राहायची गरज आहे. तुम्हाला शुभेच्छा देतो.

■■

# Nanded City, Pune
The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरुणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY ©
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com




शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचा बसवराज पाटील व संजय बनसोडे सत्कार करताना शेजारी शिवराज पाटील चाकूरकर व भारत सासणे

# साहित्यिकांनी राज्यकर्त्यांच्या ओंजळीने पाणी पिऊ नये

**शरद पवार**

सबंध विश्वामध्ये ज्यांचा आवाज हा प्रत्येकाच्या अंत:करणामध्ये, कानामध्ये अजूनही आहे आणि आपल्या स्वर्गीय आवाजानं सगळ्या जगाला ज्यांनी मंत्रमुग्ध केलं, संगीत विश्वात अजरामर झालेल्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचं नाव तुम्ही या संमेलन नगरीस दिलं, ती जी दृष्टी दाखवली, त्याबद्दल संयोजकांचं मी आभार मानतो. लतादीदींनी आपल्या अमृतमय कंठाद्वारे साहित्यातील गीत आणि काव्य प्रकाराला साज चढवला आणि कोट्यावधी रसिकांना मोहिनी घातली. साहित्यविश्वाने ह्याच ऋणानुबंधातून लतादीदींना दिलेली ही एक सार्थ आदरांजली आहे असे मी मानतो. मंगेशकर कुटुंबीयांनी हजारो गीते लिहिण्यासाठी कवी, गीतकार यांना प्रेरित केलं. ही गीतेसुद्धा साहित्याचा गुणगुणता येणारा अनमोल ठेवा आहे. ह्या उद्धाटनप्रसंगी लता मंगेशकर यांना मी आदरांजली अर्पित करतो. त्याचबरोबर गेल्या वर्षी सुप्रसिद्ध लेखक द. मा. मिरासदार व कवी सतीश काळसेकर, मराठवाड्यातील साहित्यिक तु.शं. कुळकणी यांचं निधन झाले. त्यांनासुद्धा ह्या साहित्यपीठावरून मी श्रद्धांजली अर्पण करतो.

आज मला आनंद आहे, की हे साहित्य संमेलन उदगीरसारख्या ऐतिहासिक नगरीत भरतंय. एक काळ असा होता, निजाम आणि रझाकारांच्या जुलमी राजवटीत मराठी अस्मिता टिकवून ठेवणं हे काय सोपं नव्हतं. पण या परिसरानं ही अस्मिता जपून ठेवली. चाळीसावं मराठवाडा साहित्य संमेलन देखील याच नगरीमध्ये झालं होतं. मराठवाडा हा मराठी भाषा, संस्कृती आणि साहित्याचा आधारवड आहे असं कौतिकराव नेहमी सांगत असतात. ते खरं आहे आणि त्यांचा अभिमानही खरा आहे. मराठवाडा साहित्य परिषदेची स्थापना १९४३ साली झाली आणि तेव्हापासून आजपर्यंत ही साहित्याची चळवळ अखंडपणानं चालू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मराठी वाङ्मय विभाग सुरू झाल्यावर इथे अनेक साहित्यिक घडले. ज्येष्ठ समीक्षक प्रा. वा. ल. कुलकर्णींचं नाव घ्यावं लागेल. डॉ. यु. म. पठाण, अनंत भालेराव, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. गो. मा. पवार, डॉ. गंगाधर पानतावणे, ना. धों. महानोर, नरहर कुरूंदकर, फ. मु. शिंदे, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. जनार्दन



**शरद पवार हे दीपप्रज्वलाने साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन करताना शेजारी भारत सासणे, संजय बनसोडे, बसवराज पाटील, कौतिकराव ढाले पाटील**

वाघमारे, लक्ष्मीकांत तांबोळी, दासू वैद्य, नरेंद्र नाईक, किती जणांची नावं घेऊ. ही अनेक अशा प्रकारची नावं घेण्यासारखी कर्तृत्त्ववान, दर्जेदार, शक्तीशाली साहित्यिक आणि कवी या सगळ्या परिसरामध्ये गेल्या अनेक वर्षात तयार झाले, त्याचा अभिमान आपल्या सगळ्यांना आहे.

साहित्य संमेलन सहसा आपण दरवर्षी भरवतो. एखाद् दुसरा अपवाद जर सोडला, तर कधी संमेलन झालं नाही, असं नाही. आणि मघाशी बोलत असताना अमित देशमुखांनी सांगितलं, की संमेलन म्हणल्याच्यानंतर बहुतेक उद्‌घाटनांना मी असतो. हा प्रघात असाच चालू राहिला तर एखाद्या वेळेला जास्तीत जास्त उद्‌घाटन केलेला म्हणून माझ्या नावानं विक्रम होतोय की काय अशी स्थिती माझ्यासारख्याला वाटायला लागली आहे. काही क्षेत्रं अशी आहेत, जी राजकारणाच्या बाहेरची आहेत, त्याच्यात मला आस्था आहे. उदाहरणार्थ खेळाचं क्षेत्र. देशी खेळांच्या क्षेत्रामध्ये मी अनेक

**लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे २२ एप्रिल रोजी अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा. शरद पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमातील त्यांचे भाषण...**



वर्षे काम केलं. राज्य पातळीवर काम केलं. देशाच्या पातळीवर काम केलं. आशिया खंडात काम केलं. क्रिकेट या क्षेत्रामध्ये मी मुंबईत काम केलं, देशाचा प्रमुख झालो. जगाच्या क्रिकेटचा प्रमुख झालो. ही सगळी क्षेत्रं नेहमीच्या म्हणजे राजकारणाच्या बाहेर गेल्याच्यानंतर मनाला एक प्रकारचा दिलासा देणारी असतात. ही जशी मला आवड आहे, तसाच मला पुस्तकांचा संग्रह करणं याचा छंद आहे. अनेक पुस्तकं माझ्याकडं असतात. कधी कधी एखाद् दुसरं पुस्तक माझ्याकडं आहे, आणि एखाद्यानी मला तेच पुस्तक मला आणून दिलेलं असतं, आणि म्हणून अशी काही पुस्तकं डबलसुद्धा होत असतात. मग मी कुठल्यातरी ग्रंथालयाला ते देऊन टाकतो.

या सगळ्या पुस्तकांचं सविस्तर वाचन माझ्याकडनं होतंच असं नाही. त्यातली काही पुस्तकं वाचतो, काही चाळतो. चाळून त्याच्यातला आशय समजून घेतो आणि पुस्तकाचं सार लक्षात आलं, की ते



पुस्तक, ते लिखाण मला संदर्भाच्यासाठी उपयोगी पडतं. माझ्या संग्रही असलेल्या पुस्तकांच्याकडं पाहिल्याच्यानंतर मला जाणवतं, की या साहित्यात अनेक गोष्टींची कमतरता दिसायला लागलेली आहे. मला एका गोष्टीचा आनंद आहे, की आज या संमेलनाला अध्यक्षपदाची जबाबदारी महामंडळानं सासणेंच्यावर टाकली. सासणेंचा आणि मराठवाड्याचा ऋनाणुबंध आहे. सासणे यांनी, ते ज्यावेळेला राज्य सरकारच्या सेवेमध्ये होते, त्यावेळेला बीडला कलेक्टर म्हणून त्यांनी काम केलंय. उस्मानाबादला भूकंप झाला, त्यावेळेला त्यांनी काम केलं कलेक्टर म्हणून. मला आठवतंय, की बीडच्या दुष्काळामध्ये देशाचा कृषी मंत्री म्हणून मी पाहणी करायला आणि काही निर्णय घेण्याच्यासाठी बीडमध्ये आलो, त्यावेळेला आजचे प्रमुख पाहुणे सासणे हे जिल्हाधिकारी म्हणून त्याठिकाणी उपस्थित होते. आणि ज्या काळामध्ये भूकंप झाला, त्या काळामध्ये काही दिवसांच्यासाठी उस्मानाबाद आणि लातूर या सगळ्या परिसरामध्ये मी गावोगाव जायचा प्रयत्न करत होतो. त्यावेळेला उस्मानाबादची काही प्रमाणात जबाबदारी ही सासणेंच्याकडं होती आणि त्यामुळं हा एक योगायोग आहे, की या साहित्य संमेलनाची प्रमुख व्यक्ती ज्याचं योगदान मराठवाड्यामध्ये संकटाच्या काळामध्ये उत्तमरितीनं झालेलं आहे. आणि त्यामुळं मला आनंद आहे, की आज ते याठिकाणी तुमचे प्रमुख पाहुणे म्हणून आलेले आहेत.

गेल्या वर्षी नाशिकला साहित्य संमेलन झालं. चांगलं संमेलन झालं. दोन गोष्टी मला दिसतात. एक, साहित्य संमेलनाला धरून जी काही ग्रंथ आणि त्यासंबंधीचं पुस्तकांचं प्रदर्शनं असतात, त्याठिकाणी मी चक्कर टाकण्याचा प्रयत्न करतो. नाशिकच्या संमेलनामध्ये जी पुस्तकं विक्रीची दुकानं होती, त्याठिकाणी नजर टाकल्याच्यानंतर एक गोष्ट मला जाणवली, की दिवसेंदिवस कवितेची पुस्तकं कमी दिसायला लागलेली आहेत. का? मला कारण माहित नाही. कदाचित त्याचं अर्थशास्त्र प्रकाशकानं परवडणारं नसेल. पण त्याचा विचार करण्याची मला गरज वाटते. अनेक लोकांना काव्याच्यासंबंधीची आस्था असते. मी स्वत: ग. दि. माडगूळकर, तात्यासाहेब शिरवाडकर यांचा चाहता आहे आणि त्यामुळं मला हे प्रकर्षानं जाणवतं, की काव्याच्या संबंधीचं लिखाण मराठीमध्ये कमी होतंय का काय आणि होत असेल तर त्यासंबंधी काय करायचं याचा विचार या क्षेत्रातल्या जाणकारांनी केला पाहिजे, एवढंच मला याठिकाणी सांगायचंय.

साहित्य विश्वासमोर अनेक आव्हानं आहेत. मघाशी भाषणामध्ये याचा उल्लेख केला, की अलिकडं ग्रंथाच्या निर्मितीचीही कमतरता आहे. नवे तंत्रज्ञान म्हणा, बदललेल्या सवयी म्हणा, परभाषेचे आक्रमण म्हणा, मनोरंजनाच्या साधनांची रेलचेल म्हणा, मराठी शिक्षणाकडे कमी होत चाललेला ओढा म्हणा, ग्रंथ प्रकाशन संस्थांची आर्थिक परिस्थिती खालावत चालली आहे. हे चित्र निराशाजनक आहे. ते बदलणे गरजेचे आहे. म्हणजे ही गोष्ट खरी आहे, की न्यायमूर्ती गोविंद महादेव रानडे आणि लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी पहिलं ग्रंथकार संमेलन या नावानं साहित्य संमेलन भरवलं आणि त्यामध्ये ग्रंथ प्रसिद्ध व्हायला प्रोत्साहन मिळावं या दृष्टीकोनातून त्यांनी काही प्रयत्न केले. मला असं वाटतं, की आज त्यादृष्टीनं विचार करायची वेळ आलेली आहे. आणि हे करायचं असेल तर राज्य सरकारनी सुद्धा अशा प्रकारच्या प्रकाशनाला कशी मदत करता येईल याचा विचार करायची वेळ आलेली आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय आणि साहित्य रसिकांच्या मदतीशिवाय हा साहित्याचा रथ खऱ्या अर्थानं गतीनं धावणार नाही. म्हणून याला लोकाश्रय पाहिजे, याला राजाश्रय पाहिजे. राजाश्रय आणि लोकाश्रय ही याची दोन चाकं आहेत असं मी मानतो.




जुना इतिहास आपण बघितला, तर विक्रमादित्य, हर्षवर्धन, यशोवर्धन इत्यादी राजांच्या पदरी मग कधी कालिदास, बाणभट्ट, भवभूती अशी श्रेष्ठ रत्नं होती. शिवछत्रपतींच्या दरबारी कवी भूषण होते. संभाजीराजेंच्या पदरी कवी कलश होते. अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. अगदी मुस्लीम राजवटीमध्ये सुद्धा भारतीय कलाकारांना दरबारी आश्रय होता. अल्लाऊद्दीन खिल्जी, सम्राट अकबर ही त्यातील काही उदाहरणे आहेत. आणि राजाश्रय असलेल्या कवी-लेखन व्यवस्थेला आव्हान करणारं लिखाण करण्याला मर्यादा येतात. पण साहित्यिक अंगाने आणि त्यांचं साहित्य उच्चकोटीतील आहे अशी जर असेल, तर समाजव्यवस्था बदलण्याची धार त्यांच्या लेखणीत असते. त्यांची लेखणी सार्वभौम व स्वायत्त नसेल, लेखक-विचारवंत विद्याधर गोखले यांनी म्हटले आहे की, लोकाश्रयापेक्षा राजाश्रयाच्या हत्तीवरील अंबारीत आम्ही साहित्य शारदेला बसवू लागलो तर 'अमृतातेहि पैजा जिंके' असे बोल तिच्या वीणेतून कसे उमटतील? थोडक्यात साहित्यिकांच्या हाती राजकर्त्यांचा अंकुश हवा पण राज्यकर्त्यांच्या हाती साहित्यिकांचा रिमोट कण्ट्रोल नको

साहित्याची खरी ताकद होती, ती कधी बघायला मिळाली? माझ्या मते फ्रेंच राज्यक्रांती ज्यावेळी झाली, त्यावेळी ही दिसून आली. फ्रेंच क्रांतीच्यामुळं जगाला हे समजलं, की लेखणी ही क्रांतीची मशाल होऊ शकते. रूसो असो, वॉल्टर असो, यांच्या तत्वज्ञानानं क्रांतीचा परिपोष केला, सामान्यांनी वर्गव्यवस्था लाथाडली आणि सोळाव्या लुईची जुलमी राजवट हीसुद्धा उलथवली. यावरून एक बोध घेता येतो की, हस्तिदंती मनोऱ्यातील साहित्यात सामर्थ्य नसते तर ते समाजाभिमुख असले तरच त्यात शक्ती येते.

मराठी साहित्याबाबत बोलायचे झाले तर दुसऱ्या बाजीरावाच्या काळात साहित्याला अवकळा होती. त्यानंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनी नोकर निर्माण करण्यासाठी शिक्षणाला मोकळीक दिली. परंतु साहित्यावर अनेक बंधने लादली. विष्णूशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला, स्वातंत्र्यवीर सावरकरकृत मॅझिनीचे चरित्र, खाडीलकरांची भाऊबंदकी यांवर ब्रिटिशांनी बंदी आणली. त्यामुळे१८७८ साली न्या. रानडे आणि लोकहितवादी यांनी संमेलन भरवण्याच्या दृष्टीने उचललेलं पाऊल मला अतिशय क्रांतीकारी वाटतं. कारण संमेलनाच्या दोन महिन्यांपूर्वी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी देशी वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी करणारा व्हर्न्याक्युलर प्रेस कायदा पास केला होता. त्याला ह्या दोघांनी एकप्रकारे आव्हानच दिले होते.

साहित्य आणि राजकारण यांचा तसा अतूट संबंध आहे. महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, स्वातंत्र्यवीर सावरकर, यशवंतराव चव्हाण हे उत्तम साहित्यिक होते. त्यामुळे स्वातंत्र्याच्यानंतर लोकशाही राज्यव्यवस्था स्थापित झाल्यावर अभिव्यक्ती, प्रसारमाध्यमं अथवा साहित्य हा लोकशाहीचा चौथा स्तंभ गणला गेला. राज्यकर्त्यांकडून त्याला राजाश्रय मिळाला. हा आश्रय ग्रंथ प्रकाशनाला प्रोत्साहन किंवा साहित्यिकांना अन्य प्रकारानं मदत या रूपानं दिला जाऊ लागला आणि आजही दिला जात आहे. अगदी विधिमंडळाचे सदस्य करणे, पद्म पुरस्कारासाठी निवड करणे येथपर्यंत साहित्यिकांना प्रोत्साहन दिले जाते. मला वाटते की, आश्रयदात्यांनी या प्रोत्साहन आणि मदतीचा उपयोग आपल्या कौतुकासाठी अथवा स्वार्थासाठी करू नये. मला वाटतं लोकशाहीचा हा चौथा स्तंभ आहे. तो जिवंत राहायला हवा. लेखन सार्वभौम आणि स्वतंत्र हवं. दुर्गा भागवत म्हणतात, की लेखन मेलं तर विचार मेला आणि विचार मेला की संस्कृतीचा क्षय होऊन विकृती जन्माला येते. जगाच्या इतिहासाकडे पाहिले तर एक लक्षात येते की, राजे-राज्यकर्ते जातात, पण ग्रंथ चीरकाल राहतात. लेखणीतून क्रांती घडली

आहे. त्यामुळे साहित्यिकांनी राज्यकर्त्यांच्या ओंजळीने पाणी पिऊ नये. राज्यकर्ते कोणतेही उपकार करत नाहीत, ते त्यांचे कर्तव्य आहे.

साहित्यिकांमध्ये आणि राज्यकर्त्यांमध्ये परस्पर समन्वयाचे आणि स्नेहभावाचे नाते असावे असे मला वाटते. साहित्य रसिकांनी डोळ्यात तेल घालून दक्ष राहावे. साहित्य हे मुक्त असावे असे मी म्हटले. याचा अर्थ ते कोणत्याही विचारधारेला बांधील नसावे. कारण अशा बांधिलकीतून मतप्रणाली तयार होते. ती बुद्धिभेद करणारी, ध्रुवीकरण करणारी, विषारी स्वरूपाची आणि राष्ट्रहिताला बाधा आणणारी



प्रस्तुत साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे हे लोकशाहीच्या कार्यकारी मंडळ स्तंभात एक सनदी अधिकारी होते. त्यामुळे शासन आणि साहित्यिक यांमधील समन्वय आणि स्नेहभाव वृद्धिंगत होत राहील याचे आशादायी चित्र मला दिसते. मी देखील अनेक वर्षे लोकशाहीच्या पहिल्या स्तंभाचे प्रतिनिधित्व करतो आहे. माझा देखील साहित्यिकांशी स्नेहभाव कायम राहिला. 'साहित्य म्हणजे प्रेम, जे माणसांना जोडते !' इतकी सोपी व्याख्या मधु मंगेश कर्णिकांनी केली आहे. मला ती खूप भावते. साहित्यिकांकडून मला खूप मोलाच्या सूचना मिळतात. मी त्यांकडे गांभीर्याने पाहतो.

समाजकारणी आणि राजकारणी यांच्या साहित्यातून विचारधारा जन्माला आली आणि विचारधारेतून अनेक वाद जन्माला आले. जसे की, गांधीवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद, समाजवाद, राष्ट्रवाद वगैरे! परंतु आजकाल ठराविक विचारधारेला पोषक साहित्यनिर्मितीवर काही घटक भर देत आहेत. ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. प्रोपागंडा साहित्य निर्मिती ही निरंकुशतेला निमंत्रण देते आणि अराजकता ओढवते. हिटलरने 'माईन काम्फ' पुस्तक आणि इतर माध्यमांद्वारे केलेला प्रोपागंडा हे त्याचे भयानक उदाहरण आहे. आपल्या देशात देखील असा विशिष्ट विचारधारेचा प्रोपागंडा फैलावताना दिसत आहे. साहित्यिकांनी आणि असू शकते. साहित्यिकांनी समान अंतरावर राहून त्याकडे त्रयस्थाप्रमाणे पाहावयास हवे. राज्यकर्ते असा प्रोपागंडा थेट करत नाहीत. त्यांनी साहित्य अथवा माध्यमाची कमकुवत अंगे न्याहाळली आहेत. प्रसारमाध्यमांच्या बाबतीत त्यांनी अत्यंत हुशारीने कॉर्पोरेट जगाची मदत घेऊन हा प्रोपागंडा राबवणे सुरू केले आहे. चित्रपट या कलाक्षेत्रात त्याचा उघड-उघड झालेला शिरकाव आपणास दिसतो आहेच. कॉर्पोरेटीकरण हे प्रोपागंडाचे अस्त्र होऊ पाहते आहे. हे कॉर्पोरेट जगत साहित्यात आले, तोट्यात असलेल्या प्रकाशन संस्था त्यांनी ताब्यात घेतल्या की, चौथा स्तंभ समूळ कोसळण्यास वेळ लागणार नाही. ह्या धोक्याच्या घंटेकडे मी आग्रहाने आपले लक्ष वेधू इच्छितो.

साहित्य आणि राजकारण यांचे अतूट नाते असल्याने साहित्यविश्वात देखील राजकारणाचा शिरकाव झाला आहे. विशेषत: संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड निवडणूक पद्धतीने सुरू झाल्यानंतर साहित्यिकांच्या अंतरंगात आमच्यातील राजकारणी घुसू लागला आहे. त्याचा अत्याधिक तोटा महिला साहित्यिकांना संभवतो. आजपर्यंतच्या साहित्य संमेलनांचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, पहिले साहित्य संमेलन इ.स.१८७८ मध्ये भरले तरी महिलेला अध्यक्षपदाचा मान मिळण्यासाठी १९६१ साल उजाडावे लागले. श्रीमती कुसुमावती देशपांडे या विदुषीला तो पहिल्यांदा मान मिळाला.

त्यानंतर श्रीमती दुर्गा भागवत, कवयित्री शांता शेळके, डॉ. विजया राजाध्यक्ष अशा थोडक्या महिलांना साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविता आले. चक्रधरस्वामींच्या महानुभाव पंथातील आद्य कवयित्री महदंबा ते जनाबाई, मुक्ताबाई तसेच सावित्रीबाई फुले, बहिणाबाई चौधरी, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक ते अरूणा ढेरे - संजीवनी तडेगावकरांपर्यंत असंख्य महिलांनी मराठी साहित्यात आपला अमीट ठसा उमटवला आहे. अध्यक्षपदासाठी निवडणूक प्रथा असल्याने महिलांसाठी ते अशक्यप्राय होऊ नये असे मला वाटते. महामंडळाने निवडणूक पद्धतीत एखादे महिला समावेशक धोरण आणले तर त्याचे प्रथम स्वागत मी करेन. मला वाटते महामंडळाच्या घटनेत सुधारणा करून संमेलनाच्या अध्यक्षपदी दर पाच वर्षांतून किमान एकदा तरी महिलाध्यक्ष नियुक्त व्हावी अशी तरतूद व्हावी. आज महिला धोरणाचा पुरस्कर्ता म्हणून मी येथे उभा राहिलो याची चर्चा साहित्य संमेलनात झाली तर त्याचा मला आनंदच आहे.

शेवटी मला एका वेगळ्या विषयाकडे लक्ष वेधायाचे आहे. मला साहित्यात संशोधनात्मक लिखाणाची वानवा जाणवते. संशोधनात्मक लिहिले जात असेल परंतु ते वाचकांपर्यंत पोहचत नसावे. विशेषत: ऐतिहासिक लिखाणात सखोल संशोधन व अभ्यास आवश्यक असतो. इतिहासकाराने सबळ पुराव्याआधारे न लिहिता ऐकीव व तार्किक माहितीआधारे लिहिणे हा मोठा प्रमाद आहे. तो अनेक दीर्घकालीन वाद-विवादांना जन्म देतो. असे लेखन वेळीच रोखले पाहिजे. नाहीतर जनमानसात त्या चूका मूळ धरू लागतात आणि ठाण मांडून बसतात. अशा वृत्तींना 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर!' असा रोखठोक सवाल विचारायला हवा. कयास आणि कल्पनाविलास करण्यासाठी इतर फिक्शनल साहित्य प्रकार आहेत. अशा प्रवृत्तींच्या लेखकांनी त्यासाठी लेखणी पाजळावी. मराठीत पी.एच.डी. करताना विषय देखील संशोधनायोग्य असावा. संदर्भग्रंथांचे संकलन करून प्रबंध केलेले पाहायला मिळतात. सखोल संशोधनाचा त्यात अभाव आढळतो. विद्यापीठांना विनंती आहे की, पी.एच.डी.साठी विषय देताना तो संशोधनक्षम असावा. केवळ संकलनक्षम नसावा याची दक्षता घ्यावी. सखोल संशोधनानंतर निर्माण झालेले साहित्य माहितीचे नवे भांडार ठरू शकते.



संमेलनाच्या समारोप प्रसंगी नितीन गडकरी भाषण करताना व्यासपीठावर भारत सासणे, संजय बनसोडे, नीलम गोऱ्हे, अमित देशमुख

आजच्या उद्घाटनप्रसंगी मी स्पष्ट बोललो. परंतु ज्ञानगंगेचा प्रवाह कोणत्या दिशेला जाऊ शकतो हे माझ्या मनाला जाणवले आणि बुद्धीला पटले म्हणून लोकशाहीच्या एका स्तंभाचा पाईक या नात्याने आपल्यापुढे माझी भूमिका मांडली. साहित्य संमेलनाचा एक हेतू विचारांचे अभिसरण आणि जनजागरण हा देखील असतो. मी ते कर्तव्यभावनेने केले आहे. साहित्य संमेलनात अनेक वाद-परिसंवाद रंगतील, काव्याच्या मैफली बसतील, लोकरंजनाचे कार्यक्रम होतील. मला खात्री आहे की, सारस्वतांचा हा मेळावा देखील साहित्यरसिकांच्या मनावर आपला ठसा उमटवील. संमेलनाचे आयोजक, साहित्यिक, प्रकाशक, समन्वयक, महामंडळाचे पदाधिकारी आणि साहित्य रसिकांना संमेलनाच्या यशस्वीतेसाठी माझ्या मनपूर्वक शुभेच्छा ! धन्यवाद.

■■

# शेतकरी आणि कष्टकऱ्यांसाठीचे भाऊसाहेबांचे काम अतुलनीय

## खासदार शरद पवार यांचे गौरवोद्गार

**देशाचे माजी कृषी मंत्री, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त १० एप्रिल रोजी अमरावती येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. संस्थेच्या सभागृहाचेही उद्घाटन यावेळी करण्यात आले. तसेच संस्थेसाठी मोलाचे योगदान देणारे रावसाहेब इंगोले यांचे नाव प्रवेशद्वाराला देण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी १९२३ साली ऑक्सफर्ड विद्यापीठात जो पीएच्.डी. चा प्रबंध लिहिला होता त्यावर ज्येष्ठ संशोधक संपादक डॉ. सुधीर भोंगळे यांनी 'वैदिक धर्ममीमांसा' हा ग्रंथ संपादित केला असून त्याचे प्रकाशनही यावेळी शरद पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमातील राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. शरद पवार यांचे भाषण...**

आजचा रामनवमीचा दिवस आहे. पण साधारणत: या दिवशी विशेषत: विदर्भामध्ये एक उत्साहाचं वातावरण असतं. या दिवशी शिवाजी शिक्षण संस्थेच्या संबंधी एक आदराची आणि प्रेमाची भावना तुमच्या मनामध्ये आहे. भाऊसाहेब देशमुखांबद्दलची कृतज्ञतेची भावना आपल्या मनात आहे. त्यामुळं आपण मोठ्या संख्येनं याठिकाणी उपस्थित राहिलात.

आज याठिकाणी आपण तीन कार्यक्रम घेतो आहोत. एक तर शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा त्याचं अनावरण. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावानं अमरावतीच्या संदर्भामध्ये रावसाहेब इंगोले, ज्यांनी संस्थेसाठी कष्ट घेतले होते त्यांच्या स्मृतीचं प्रवेद्वार आणि भाऊसाहेबांनी लिहिलेलं वैदिक धर्मग्रंथाची मीमांसा अशा सगळ्या कार्यक्रमांसाठी आपण आज याठिकाणी आहोत.

या संबंध देशामध्ये अनेकांची राज्ये होऊन गेली. मोगलांचं राज्य झालं. देवगिरीच्या यादवांचं राज्य झालं. राजस्थानमध्ये अनेकांची राज्यं होऊन गेली. दक्षिणेमध्ये अनेकांची राज्यं होऊन गेली. पण आपण कुणालाही प्रश्न विचारला, की त्या जुन्या काळातल्या राजांचं आणि राज्यकर्त्यांचं स्मरण तुम्हाला कुणाचं होत असं असा एक राजा सांगा, असं विचारलं तर



अमरावतीतील वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारात बसविण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे शरद पवार यांच्या हस्ते अनावरण झाले तेव्हा शेजारी हर्षवर्धन देशमुख, यशोमती ठाकूर, सुलभा खोडके, दिलीप इंगोले, नवनीत राणा.



**श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सुमारे १५ कोटी रूपये खर्च करून बांधलेल्या अद्ययावत सभागृहाचे फीत कापून शरद पवार उद्‌घाटन करताना शेजारी हर्षवर्धन देशमुख, यशोमती ठाकूर, सुनील केदार**

एकच नाव येतं, छत्रपती शिवाजी महाराज. आणि त्याचं महत्त्वाचं कारण, की ते राजघराण्यात जन्माला आलेले नव्हते. सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आले होते. शहाजीराजे हे महाराष्ट्राच्या बाहेर दुसरीकडं होते. जिजामाता शिवनेरीवर राहात होत्या. शिवाजी महाराजांवर योग्य प्रकारचे संस्कार त्यांच्या मातेने घडवले आणि त्या संस्कारातून हे परकीयांचं राज्य घालवलं पाहिजे, हा विचार त्यांच्या अंत:करणामध्ये रूजला गेला. आणि अठरापगड जातीच्या लोकांना त्यांनी एकत्रित केलं. त्याच्यामध्ये दलित होते. त्याच्यामध्ये साळी, कोळी, मुस्लिम, ओबीसी या सगळ्या जाती जमातीचे लोक होते. या सगळ्यांची एक शक्ती त्यांनी उभी केली आणि त्या सामूहिक शक्तीमधून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

हे राज्य एक वेगळं राज्य आहे हे त्यांनी लोकांच्यासमोर करून दाखवले. मघाशी मी सांगितल्याप्रमाणं दिल्लीचं मोगलांचं राज्य, देवगिरीचं यादवांचं राज्य, पण शिवाजी महाराजांचं राज्य हे भोसल्यांचं राज्य म्हणून कधी ओळखलं गेलं नाही. हिंदवी स्वराज्य, रयतेचं राज्य. सामान्य माणसाच्या हिताची जपणूक करणाऱ्या घटकांचं हे राज्य आणि म्हणून संबंध राज्य सगळ्या समाजाच्यासाठी उभं करण्याचं कर्तृत्त्व आणि शौर्य ज्यांनी दाखवलं, अशा महान व्यक्तीचा, महान योद्ध्याचा, महान राज्यकर्त्याचा, आदर्शाचा आपल्या प्रांगणामध्ये तुम्ही पुतळा बसवलात. माझी खात्री आहे, की या संस्थेमध्ये जी मुलं-मुली शिकतील त्यांना या पुतळ्यापासून प्रेरणा मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्याचबरोबर या सभागृहाला नावही शिवछत्रपतींचं देऊया.

संस्था ही भाऊसाहेबांनी उभी केली. अनेकांनी त्याला हातभार लावलेला. त्याच्यामध्ये रावसाहेब इंगोलेंचं नाव आहे. मला आठवतंय, की एका काळामध्ये बुलढाण्याचे पंढरीनाथ पाटील, यवतमाळचे बाबासाहेब धामणकर, वसंतराव धोत्रे अशा अनेक मंडळींनी अलीकडच्या काळात या संस्थेच्यासाठी कष्ट घेणारी मंडळी होती. भाऊसाहेबांचा विचार त्यांनी स्वीकारला होता आणि भाऊसाहेबांचा आदर्श पुढं ठेऊन या संस्थेचं विकसित स्वरूप कसं होईल, याची काळजी त्यांनी घेतलेली होती. त्यापैकीच एक रावसाहेब इंगोले होते आणि आज आपण प्रवेशद्वाराला त्यांचं नाव देऊन त्यांनी या संस्थेच्यासाठी जे काय कष्ट केले त्याचं स्मरण तुम्ही याठिकाणी केलेलं आहे.

आज भाऊसाहेबांची पुण्यतिथी. महाराष्ट्रामध्ये अनेक कर्तृत्त्ववान, वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काम केलेली लोकं होऊन गेली. शैक्षणिक क्षेत्रामध्ये जर आपण नामावली केली, त्याच्यामध्ये भाऊसाहेबांचं नाव प्रकर्षानं येतं. कर्मवीर भाऊराव पाटलांचं येतं. अशी अनेक नावं त्याठिकाणी येतात. पण वर्षानुवर्षे हजारो मुला-मुलींना ज्ञानदानाचं काम करणारी संस्था आणि ती अनेक गावागावांत पसरली गेली अशा संस्था कोणत्या हा प्रश्न उपस्थित केला, तर जसं रयत शिक्षण संस्थेचं नाव निघतं, तसंच शिवाजी एज्युकेशन संस्थेचं नाव हेसुद्धा

त्याठिकाणी येत असतं आणि ती दृष्टी भाऊसाहेबांची होती. भाऊसाहेब हे उच्चविद्याविभूषित होते. विद्या प्राप्त करण्यासाठी ते देशाच्या बाहेर गेले. अतिशय अडचणीची स्थिती असताना. जायला पैसे नाहीत. कुटुंबातनं कशीबशी मदत झाली. त्या मदतीनं बोटीनं इंग्लंडला गेले. आज आम्ही इंग्लंडला जायचं म्हटलं, तर साधारणत: आठ-साडे आठ तासांची फ्लाईट असते. त्यावेळेला बोटीनं जायचं म्हटलं, तर जवळपास तीन आठवडे समुद्रातून जावं लागायचं. भाऊसाहेब त्या पद्धतीनं त्याठिकाणी गेले. तिथं कष्ट केले आणि कष्टाच्या बरोबर शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी बॅरिस्टरची पदवी प्राप्त केली आणि त्याशिवाय अनेक विद्वत्तपूर्ण लिखाण करून अनेक उत्तम प्रकारच्या सन्मान व पदव्या या प्राप्त करण्याच्यासाठी ते यशस्वी झाले.

भाऊसाहेब परत आले. त्यांचं लक्ष या राज्यातल्या कष्टकऱ्याकडं होतं. शेतकऱ्याकडं होतं. नवीन पिढीकडं होतं. ते परत आले, त्यावेळेला आजचा महाराष्ट्र नव्हता. आजचा अमरावतीचा हा सगळ्या परिसर आजच्या महाराष्ट्रामध्ये नव्हता. विदर्भ आणि तो सगळा परिसर सेंट्रल प्रोव्हिन्स याचा घटक होता. ते आले परत. आल्याच्यानंतर पण त्यांची स्थिती चांगली नव्हती. आर्थिक संकटं होती. मुंबईला बोटीतून उतरले. पारशी समाजाचा त्यांचा एक मित्र होता. त्यांच्या घरी गेले. तिथे राहिले. आणि त्याच्यानंतर याठिकाणी परत आले. स्वातंत्र्याच्या कार्यात त्यांनी लक्ष घातलं. काँग्रेसच्या राजवटीत ते सहभागी झाले. त्यावेळच्या मंत्रिमंडळामध्ये त्यांचा सहभाग झाला आणि त्याच कालखंडामध्ये शिवाजी एज्युकेशन संस्थेची स्थापना त्यांनी केली आणि त्या संस्थेचं चित्र आज आपण याठिकाणी पाहतो आहोत.

केंद्रामध्ये काम करण्याची संधी त्यांना मिळाली. केंद्रामध्ये कृषी खात्यामध्ये त्यांनी दहा वर्षे काम केले. माझं भाग्य आहे, की मला पण त्या खात्यामध्ये दहा वर्षें काम करण्याची संधी मिळाली. माझा एक स्वभाव होता, की एखाद्या मंत्रालयात काम करायची संधी मिळाली, तर



रावसाहेब इंगोले प्रवेशद्वाराचे शरद पवार फीत कापून उद्घाटन करताना शेजारी दिलीपबाबू इंगोले, हर्षवर्धन देसमुख, सुनील केदार, यशोमती ठाकूर, हेमंत काळमेघ




**डॉ. सुधीर भोंगळे यांनी संपादित केलेल्या 'डॉ. पंजाबराव देशमुख कृत– वैदिक धर्ममीमांसा' या ग्रंथाचे शरद पवार प्रकाशन करताना शेजारी डावीकडून गजानन फुंडकर, सुलभा खोडके, सुनील केदार, हर्षवर्धन देशमुख, डॉ. सुधीर भोंगळे, यशोमती ठाकूर, दिलीप इंगोले, नवनीत राणा आणि नरेशचंद्र ठाकरे**

आपल्या आधीचे कर्तृत्त्ववान मंत्री जे होते, त्यांनी कोणत्या पद्धतीने निर्णय घेतले, कसा विचार केला यासंबंधीची माहिती आपल्याला व्हावी म्हणून जुने रेकॉर्ड काढून वाचायची मला सवय होती. कृषी खात्यामध्ये मी स्वत: दहा वर्षे असल्यामुळं मी भाऊसाहेबांच्या काळापासूनचे सुद्धा कागदपत्रे मी तपासली. वेळ मिळेल त्यावेळेला त्याचा अभ्यास केला आणि एक गोष्ट माझ्या लक्षामध्ये आली, की भाऊसाहेबांची दृष्टी ही अत्यंत व्यापक होती. शेती आणि कष्टकऱ्याचा विचार करताना ते काय महाराष्ट्र किंवा भारतापुरता सीमित विचार करत नव्हते. सगळ्या जगामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये काय बदल होतायंत, यासंबंधीची माहिती आत्मसात करणं आणि त्यासंबंधीचं ज्ञान, त्यासंबंधीची माहिती या देशातल्या शेतकऱ्यालासुद्धा व्हावी यासंबंधीची त्यांची अतिशय इच्छा होती. त्यामधून आंतरराष्ट्रीय अशा प्रकारचे कृषी प्रदर्शन त्यांनी दिल्लीमध्ये भरवलं. ते प्रदर्शन साधंसुधं नव्हतं.

आता आम्ही दरवर्षी प्रदर्शनं करतो. ती प्रदर्शनं असतात आठ दिवसाची, दहा दिवसाची. पण भाऊसाहेबांचं प्रदर्शन हे ८ दिवसापेक्षा जास्त होतं. या प्रदर्शनाला जगातले राज्यकर्ते आले. रशियाचे प्रधानमंत्री येतात. अमेरिकेचे राष्ट्रपती येतात. इंग्लंडच्या महाराणी येतात. चीनचा प्रधानमंत्री त्याठिकाणी येतो. जगातले मान्यवर लोक शेतीच्या क्षेत्रामध्ये भारत काहीतरी वेगळं करू पाहतोय, आणि त्याच्याबद्दलची माहिती आपण संपादन केली पाहिजे, अशा प्रकारची भावना ही जागतिक नेतृत्वाच्या मनामध्ये आली या दर्जाची ही प्रदर्शने भाऊसाहेबांनी उभी केली. ती जी जागा आहे, तिथं आजही प्रदर्शनं भरतात तो संबंध परिसर एकदम विकसित करून सातत्यानं त्याठिकाणी अशी प्रदर्शनं भरवता येतील याची कायमची सुविधा भाऊसाहेबांनी करून दिली. त्याचा उपयोग आजसुद्धा आम्ही लोक करत असतो. त्यामधून शेतीच्यासंबंधीचं ज्ञान हे प्रस्तूत करण्याचा प्रयत्न केला गेला.

दिल्लीमध्ये प्रदर्शने केली, त्याचा अर्थ खेड्यापाड्यातल्या लोकांना सहज ती बघता येतील अशी काही स्थिती नव्हती. मग त्यांनी काय केलं? प्रधानमंत्र्यांना सांगितलं, की हे आपण करतो आहोत याच्यात माझा कास्तकार कधी येणार आणि तो कसा येणार. तो यायचा असेल तर देशातल्या सगळ्या प्रांतातून त्यासाठी सवलतीच्या दरात रेल्वेच्या गाड्या सोडाव्यात आणि त्यांची जायची–यायची सगळी व्यवस्था सहजपणानं करा आणि हे सगळं केंद्र सरकारनं केलं पाहिजे हा आग्रह जवाहरलाल नेहरूंच्याकडं त्यांनी केला. त्यानंतर मंत्रिमंडळाचा असा निर्णय झाला आणि देशाच्या कानाकोपऱ्यातनं हजारो लोक रेल्वेनं त्याठिकाणी जात असत, येत असत. प्रदर्शनं भरत असत आणि शेतीच्या क्षेत्रात जे काय बदल होतायंत, त्या बदलाच्या संबंधातला अभ्यास करत असत.

भाऊसाहेबांना जसा शेतीमध्ये रस होता, तसं शिक्षणामध्येही त्यांचं अधिक लक्ष होतं. ही शिवाजी शिक्षण संस्था, हिची जी त्यांनी उभारणी केली, ही उभारणी एक आगळीवेगळी प्रकारची संस्था उभी केली. संस्था अनेक लोक काढतात. काही लोक आपल्या तालुका, जिल्ह्यापुरत्या संस्था




काढतात. पण, भाऊसाहेबांनी संबंध व्यापक विचार केला. आत्ता याठिकाणी भाषण करताना सुरूवातीला सांगण्यात आलं, की इतक्या इतक्या शाखा आहेत. इतक्या इतक्या संस्था आहेत. इतकी इतकी महाविद्यालये आहेत. मेडिकल कॉलेज आहे. कृषी महाविद्यालय आहे. अन्य प्रकारची विद्यालये आहेत. प्रचंड असं संस्थेचं काम भाऊसाहेबांच्या दृष्टीतून या भागात उभं राहिलं आणि ज्ञानदान आज सगळ्यांच्यासाठी सहजपणानं मिळेल याची काळजी या माध्यमातून घेतली याचा आनंद व अभिमान आज आपल्या सगळ्यांना होतोय. याच्या पाठीमागं भाऊसाहेबांची एक वेगळी दृष्टी होती. भाऊसाहेब या राज्यामध्ये स्वातंत्र्याच्या आधीच्या काळात महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज अशा विचारवंतांच्या माध्यमातून सत्यशोधक समाज नावाच्या संस्थेची उभारणी झाली आणि त्या सत्यशोधक समाजासंबंधीची आस्था ही भाऊसाहेबांना होती. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाजातल्या उपेक्षित वर्गाला सर्व ठिकाणची संधी मिळाली पाहिजे, विशेषत: ज्ञान संपादन करण्याची संधी मिळाली पाहिजे, हे सूत्र महात्मा जोतिबा फुल्यांनी पाळलं.

महात्मा जोतिबा फुल्यांचा विचार हा आधुनिकतेचा विचार होता. ते खेड्यापाड्यात जन्मलेले असतील. पण आधुनिक दूरदृष्टी त्यांच्यामध्ये होती. त्याचं उदाहरण सांगायचं झालं, तर स्वातंत्र्याच्या आधीच्या काळामध्ये या देशात इंग्रजांचं राज्य होतं. इंग्रज राज्यकर्ते कधीकाळी या देशामध्ये येत असत आणि असंच त्या काळामध्ये इंग्लंडचा राजा यांनी भारताला भेट द्यायचं ठरवलं. आपण मुंबईमध्ये जर गेलात, तर समुद्राच्या कडेला एक गेट वे ऑफ इंडिया नावाची कमान उभारली आहे. ते गेट जे बांधलं ते इंग्लंडच्या राजाचं स्वागत करण्यासाठी बांधलं. ताजमहल हॉटेलच्या जवळ आहे ते. आणि त्याठिकाणी इंग्लंडच्या राजाचं स्वागत करण्यासाठी संबंध इंग्रजांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्याच गेटच्या एका कोपऱ्यात एक खेडूत उभा होता. डोक्यावर फेटा, खांद्यावर उपरणं, हातात काहीतरी एक कागद. राजा आला. त्याची बोट लागली. राजा उतरला आणि पोलिसांनी सगळ्यांना बाजूला केलं. त्याच्यामध्ये या कष्टकऱ्यालासुद्धा बाजूला केलं. चुकून का होईना त्या राजाची नजर त्याच्याकडे गेली. त्यानं अधिकाऱ्यांनी विचारलं, की कोण आहे हा माणूस, त्याला कशाला हाकलून लावतांय. त्याला बोलवा. अधिकाऱ्यांनी महात्मा फुल्यांना बोलवलं. त्यांच्या हातात एक पत्र होतं. निवेदन द्यायचं होतं आणि ते निवेदन काय होतं? निवेदन असं होतं, की त्या काळामध्ये दुष्काळ पडला होता आणि दुष्काळ पडल्यामुळं दुष्काळग्रस्तांना रोजी-रोटी देण्याच्यासाठी खडी फोडायचं काम त्यावेळच्या इंग्रज सरकारनं दिलं होतं. महात्मा फुल्यांनी त्या निवेदनाद्वारे सांगितलं, की खडी फोडायची शिक्षा द्यायच्याऐवजी पडणाऱ्या पावसाचा थेंब न् थेंब हा अडवला आणि भूगर्भातली पाण्याची पातळी वाढवली तर या दुष्काळातून सुटका होण्याची शक्यता आहे. ही पहिली मागणी त्याठिकाणी केली.

दुसरी मागणी त्यांनी अशी केली, की झाडं लावण्याचा

कार्यक्रम घेतला पाहिजे. आणि तिसरी गोष्ट त्यांनी त्याच्यात सांगितली, की आमचा शेतकरी हा दुधाचा धंदा करतो. त्याच्या दारामध्ये चार-दोन गायी असतात. पण तीच ती गाय आणि तिच्यापासून तयार झालेला वळू, त्यामुळं पुढं चांगल्या दर्जाचं बीज हे तयार होत नाही आणि त्याच्यात सुधारणा करायची असेल, तर विलायतेतून वळू पाठवा आणि नवीन जात याठिकाणी तयार करा. ती अधिक दुधाची तयार झाल्याशिवाय राहणार नाही. कष्टकराला उत्पन्नाचं एक साधन मिळेल. ही मागणी त्याच्यात होती. हे सांगायचं कारण असं, या सगळ्या दृष्टीकोनाकडं भाऊसाहेबांचं लक्ष होतं. महात्मा जोतिबा फुल्यांनी हे जे लिहून ठेवलं याचा विचार भाऊसाहेबांनी अत्यंत सखोल केलेला होता आणि ते जे प्रदर्शन त्यांनी उभं केलं, त्या प्रदर्शनामध्ये हा आधुनिकतेचा विचार, हा फुल्यांचा विचार शेवटपर्यंत कसा जाईल याची काळजी घेतलेली होती. अशी दूरदृष्टी ही भाऊसाहेबांना होती.

भाऊसाहेब गेले. मला आठवतंय, मी नुकताच विधिमंडळामध्ये गेलो होतो. महाराष्ट्रातल्या तरूणांचं काम माझ्याकडं होतं आणि त्यावेळेला मी सगळ्या महाराष्ट्रात हिंडत असे. विशेषत: ज्या जिल्ह्यामध्ये मला जायला आवडायचं, त्या जिल्ह्याचं नाव अमरावती. त्याचं कारण आहे. अनेक लोक याठिकाणी आमचे मित्र होते. एक तर भाऊसाहेबांचं आकर्षण तर होतंच होतं. पण मला आठवतंय, की मी ज्यावेळेला याठिकाणी काम करत असे, त्यावेळेला अनेक आमचे तरूण मित्र होते, आज त्यातले काही लोक हयात नाहीत. परशुराम रेगे हे माझ्याबरोबर काम करत होते. बबनराव मिटकर हे माझ्याबरोबर काम करत होते. राजाभाऊ देशमुख हे माझ्याबरोबर काम करत होते. अनेकांची नावं मला आठवतात. आणि या सगळ्यांना घेऊन आम्ही याठिकाणी येत असू. याठिकाणी राहात असू. राजकमल चौकात आमचा अड्डा असायचा. आता काय आहे हे बघितलेलं नाही. पण या गोष्टी मी अनेकवेळेला याठिकाणी बघितल्यात.

भाऊसाहेब गेल्याच्यानंतर पोटनिवडणूक जाहीर झाली आणि काँग्रेस पक्षानी आम्हा दोन-तीन लोकांना सांगितलं, की प्रचाराची जबाबदारी घ्या. मला याठिकाणी पाठवलं होतं. त्यावेळेला मतदारसंघ जो याठिकाणचा होता अमरावतीचा, त्याच्यामध्ये विमलाबाईंना तिकिट दिलेलं होतं. भाऊसाहेबांच्या पत्नी. त्या निवडणुकीमध्ये त्यांचा प्रचार आम्ही लोकांनी घरोघर केला होता आणि त्याचवेळेला भाऊसाहेबांच्याबद्दलची आस्था जनमाणसांत किती आहे हे मला जवळून बघायला मिळालं होतं. त्यावेळेला आधीच अमरावतीचं आकर्षण होतं आणि त्याच्यामध्ये भाऊसाहेबांच्यानंतर त्यांच्या कुटुंबियांसाठी काही कष्ट करायची संधी मिळाली हे आपलं भाग्य आहे, या भावनेनं आम्ही सगळेजण त्याठिकाणी काम करत होतो.

आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आहे, की शेतीमालाच्या किंमतीचा प्रश्न ऐरणीवर आला. त्यानंतर आम्ही काही लोकांनी ठरवलं, की जळगावपासून नागपूरपर्यंत दिंडी काढायची. या दिंडीची सुरूवात आम्ही केली आणि मला आठवतंय, क अमरावतीमध्ये आम्ही शिरलो. जवळपास एक लाखाच्यापेक्षा जास्त लोकांनी त्या दिंडीचं स्वागत केलं आणि इथून आम्ही जात असताना संबंध रस्त्यानी आमच्या दिंडीमध्ये साधारणत: वीस-पंचवीस हजार शेतकरी असायचे. रस्त्यावरील प्रत्येक गावामध्ये अमरावती जिल्ह्यातल्या आमच्या आया-बहिणींनी ठिकठिकाणी आम्हाला थांबवून बैलगाडी भरून भाकऱ्या थापल्या होत्या. त्या आम्हाला




**संस्थेचे खजिनदार दिलीप इंगोले हे तैलचित्र शरद पवार यांना भेट देताना शेजारी हर्षवर्धन देशमुख, सुलभा खोडके, सुनील केदार, हेमंत काळमेघ, गजानन फुंडकर, नरेशचंद्र ठाकरे**

त्याठिकाणी दिल्या. जेवणाची व्यवस्था केली. या सगळ्या संकटामध्ये सगळ्या कष्टकऱ्यांनी एकत्र राहिलं पाहिजे आणि देशाच्या नेतृत्वापर्यंत कष्टकऱ्याचं दुखणं गेलं पाहिजे, हे सांगायला हा संबंध जिल्हा उतरला हे मी स्वत: अनुभवलं आहे. त्यामुळं साहजिकच या जिल्ह्याच्यासंबंधीची आस्था माझ्या मनामध्ये अतीव आहे. पण त्याला मुख्य कारण या जिल्ह्यात वातावरण तयार करण्याच्यामध्ये भाऊसाहेबांचं योगदान हे अतिशय होतं. अशाच पद्धतीनं काम ज्यांनी केलं, त्याचं आपण कायमचं स्मरण करण्याचं काम याठिकाणी करता आहात आणि त्यादृष्टीनं काही उपक्रम हातामध्ये घेतले याबद्दल मला स्वत:ला याबद्दलचा आनंद आहे.

आज या शैक्षणिक संस्थेची जबाबदारी हर्षवर्धन देशमुखांनी घेतलीय. कुठलंही काम करताना फारसा वाद विवाद यत्किंचीतही न करता त्या कामासाठी कष्ट करायचं हा त्यांचा स्वभाव आहे. राज्यातल्या मंत्रीमंडळातले मंत्री म्हणून, मला वाटतं शेती खातं त्यांच्याकडं होतं, त्यावेळी माझ्या पाहण्यात आलं, आणि आज गेल्या काही वर्षापासून तुमच्या सगळ्यांच्या पाठिंब्यानं आज त्यांनी हे काम हातामध्ये घेतलंय. हे काम निश्चितपणानं ते उत्तम करतायंत. मला एकच गोष्ट कळली नाही, मघाशी बोलता बोलता ते म्हणाले, की आम्ही त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवावी. त्यांच्यावर कृपा ठेवा असं काहीतरी भाषण केलं. माझे एक मित्र होते. सहकारी होते. माझ्याबरोबर मंत्री होते. आम्ही आमदार बरोबर होतो. पार्लमेंटला बरोबर होतो. त्यांचं नाव उदयसिंहराव गायकवाड. ते कोल्हापूरचे आणि या गायकवाडांच्या कन्या या हर्षवर्धनच्या पत्नी. आता आणखीन काय कृपा करायची? चक्क आमच्या घरातली मुलगी दिली. ती बिचारी कष्ट करतेय. सगळं सांभाळतेय. तुम्ही घरात असता-नसता, तरीदेखील सगळं समजून घेते. भरपूर कृपा तुमच्यावर केलेली आहे.

चेष्टेचा भाग सोडा. पण त्यांनी फार चांगलं काम हातामध्ये घेतलंय. माझी फक्त एकच तक्रार आहे त्यांच्याबद्दल आणि संस्थेच्या सगळ्यांच्याबद्दल, की एवढी मोठी संस्था भाऊसाहेबांनी उभी केली. ज्या परिसरामध्ये ही संस्था काम करते, त्या परिसरातल्या गरीब मुला-मुलींना खूप वेळेला आर्थिक संकटाच्यामुळं पूर्ण शिक्षण घेता येत नाही. त्यासाठी अशा संस्थेमध्ये कायमची शिष्यवृत्तीची योजना ही राबवली पाहिजे. ते काम तुम्ही याठिकाणी केलं नाही. मी अनेक संस्थांचा अध्यक्ष आहे. रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आहे. तिथं जवळपास चार लाख विद्यार्थी शिकतात. ७००पेक्षा जास्त शाखा आहेत. आम्ही सगळीकडून लोकांच्याकडून पैसे उभे केले आणि त्याठिकाणी शिष्यवृत्ती सुरू केली. मला असं वाटतंय, की भाऊसाहेबांच्या या स्मरण करण्याच्या दिवशी तुमच्या कमिटीने निर्णय घ्यावा, की आम्ही या संबंध परिसरातनं लोकांच्याकडून काय जे मिळेल ते पैसे, एक रूपया द्या, दहा रूपये द्या, पन्नास रूपये द्या, शंभर द्या, काहीही द्या आणि ती रक्कम गोळा करा. ती डिपॉझिटमध्ये ठेवा. तुमच्या शाखा खूप आहेत. सगळीकडं एकदम मदत करता येणार नाही. पण दोन ठिकाणी मदत करा. एक कृषी महाविद्यालय आणि दुसरं मेडिकल कॉलेज. यांच्या फी जास्त असतात. त्या फीतला काही भाग जी मुलं दलित समाजाची असतील, ओबीसी समाजातली असतील, आदिवासी समाजातली असतील, काष्टकरी घटकातील असतील अशा मुलांना, मुलींना शिक्षण देण्याच्यादृष्टीनं मदत देणारी भाऊसाहेबांच्या नावानी एक शिष्यवृत्ती पैसे उभारून सुरू करा. त्याची आज अत्यंत गरज आहे.

हे काम करण्याच्यासाठी आम्ही राजकारणातले सगळेच सहकारी एक संस्था चालवतो. तिचं नाव आहे, राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्ट. या ट्रस्टच्यावतीनं या शिष्यवृत्तीची सुरूवात करण्याच्यासाठी आम्ही एक कोटी रूपयाची मदत पहिल्यांदा याठिकाणी देतो. माझी विनंती ही आहे, ही एक कोट रूपयाची रक्कम आम्ही तुमच्याकडं देतो. ती रक्कम फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवा. त्याच्या व्याजातून तीन मुली या मेडिकल कॉलेजच्या आणि तीन मुली या ॲग्रीकल्चर कॉलेजच्या त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करा आणि बाकीच्यानं इतर मुलांची व्यवस्था करावी.

एकच गोष्ट जाता जाता सांगायची राहून गेली, की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं भाऊसाहेबांच्याबद्दल अतिशय प्रेम होतं. त्यांच्याबद्दलचा आदर होता. सगळ्या जगाला माहिती आहे, की या देशाची घटना ही बाबासाहेबांनी केली. घटना समितीचं महत्त्वाचं काम हे बाबासाहेबांनी केलं. ज्यावेळेला घटना समितीचं काम झालं आणि संसदेमध्ये बाबासाहेबांनी घटना मांडली, त्या घटना समितीचा तो आराखडा मांडत असताना त्यांनी सांगितलं, त्यांच्या भाषणात आहे, की डॉ. पंजाबराव देशमुख यांनी घटना समितीला ५०० दुरूस्ती सूचना केल्या. त्यांच्या सूचना अत्यंत अभ्यासपूर्ण व धारदार होत्या. म्हणून ही घटना अत्यंत धारदार व अभ्यासपूर्ण झाली. त्यांच्यासारखे लोक या समितीत नसते तर ही घटना शेळपट झाली असती. मला असं वाटतं, की याच्याशिवाय दुसरं कर्तृत्त्व भाऊसाहेबांचं सांगायची काही गरज नाही. आपण त्यांच्याबद्दलची आस्था अंत:करणात ठेऊन हे त्यांचं ज्ञानदानाचं काम पुढं नेण्यासाठी प्रयत्न करता आहात याबद्दल हर्षवर्धनजी आणि त्यांच्या सगळ्या सहकाऱ्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. माझे दोन शब्द संपवतो.

■■





**परिवर्तनाचे शिल्पकार**

**फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला**



# राजर्षी शाहू महाराज आणि धर्मविचार





डॉ.जयसिंगराव पवार

**परिवर्तनाचे शिल्पकार : फुले–शाहू–आंबेडकर या व्याख्यानमालेअंतर्गत राजर्षि शाहू यांनी धर्माचे माजलेले अवडंबर व त्यासंबंधी केलेल्या समाजसुधारणांचा राजर्षि शाहू चरित्राचे अभ्यासकार आणि ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी घेतलेला संक्षिप्त आढावा.**

गेली जवळजवळ दोन एक हजार वर्षे मानवी जीवनाच्या सर्व व्यवहारांच्या मध्यभागी धर्माचं स्थान राहिलेलं आहे. वेगवेगळ्या प्रकारचे धर्म स्थापन झाले. वेदातून निर्माण झालेला आपला धर्म. ख्रिश्चन लोकांचा धर्म. मुस्लिम धर्म पैगंबरांचा. हे सर्व नीती नियमांचे, मानवाला धडे देणारे. मानवाला जास्तीत जास्त माणुसकीनं जीवन कसं जगता येईल, बंधुत्त्वानं कसं जीवन जगता येईल. अतिशय चांगलं तत्त्वज्ञान या सर्व धर्मांनी दिलेलं आहे. पण, हळूहळू विशेषत: मध्य युगामध्ये मूळ जो गाभा आहे धर्माचा, तत्त्वज्ञानाचा गाभा आहे, नीती नियमांचा गाभा आहे, हा पाठीमागं पडला आणि कर्मकांड म्हणजेच धर्म अशा प्रकारे धर्माचं एक नवीन रूप पुढं आलं आणि प्रामुख्यानं मग रूढी, परंपरा, त्यात पुन्हा दुष्ट रूढी शिरल्या, त्याला धर्म म्हणायला लागले लोक. पती कितीही नालायक असला, तरी पत्नीनं त्याच्याशी एकनिष्ठ राहिलं पाहिजे एवढंच नव्हे, तर तो मेल्यानंतर त्याच्या शवाबरोबर तिनं स्वत:ला जाळून घेतलं पाहिजे हाही धर्म. म्हणजे धर्माची संकल्पना जी आहे, ती कशी बदलत गेली पाहा.



हा धर्म काय आपला पिच्छा सोडायला तयार नाहीये. आज २१व्या शतकामध्येसुद्धा धर्म एक मोठी राजकारणामधली आणि एकूण मानवी व्यवहारामधली एक मोठी समस्या होऊन बसलेला आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी एकेठिकाणी म्हटलेलं आहे, की धर्म ही एक अतिशय चांगली निर्मिती आहे माणसांची, चांगल्यासाठी निर्माण झाली. लोककल्याणासाठी निर्माण झाली. पण सर्वात जास्त जर अत्याचार कशाच्या नावाने झाले असतील, मानवाने मानवावर केलेले अत्याचार, सगळ्यात जास्त कशामुळं झाले असतील तर ते धर्मामुळं. आणि हे पटतंय. धर्म चांगल्यासाठी निर्माण झाला, पण धर्माच्या नावावर आतापर्यंत जितके अनन्वित जे अत्याचार झाले, त्याने चांगल्या माणसाला मान खाली घालावी लागेल. यालाच धर्म म्हणतात.

महाराष्ट्रापुरतं बोलायचं झालं, तर गेल्याच्या गेल्या शतकामध्ये १९व्या शतकामध्ये इंग्रजांचं राज्य आल्यानंतर आम्हाला आमच्या उणीवा, आमचे दोष आम्हाला कळायला लागले. आमच्याच मुली-बाळी आम्ही जाळत होतो. इंग्रजांना ते बंद करावे लागले. सतीची चाल बंद करावी लागली. आम्हाला कळायला लागलं, की आम्ही किती अत्याचार करतो आणि मग त्यातून दोन प्रकारचे विचारप्रवाह तयार झाले महाराष्ट्रापुरतं सांगायचं झाल्यास, उच्चवर्णियांमध्ये समाजसुधारक निर्माण झाले आणि कनिष्ठवर्णियांमध्येही समाजसुधारक निर्माण झाले. आता उच्चवर्णीयांमधले जे होते, त्यांचे विषय थोडे वेगळे होते. उच्चवर्णीय होते. स्त्री शिक्षण, केशवपन, संमती वयाचा कायदा या विषयांभोवती त्यांचे विचार फिरत होते. लोकहितवादींच्यापासून ते आगरकरांच्यापर्यंत हे होऊन गेले सगळे समाजसुधारक. आणि आमच्यामध्ये कनिष्ठ वर्गामध्ये पहिल्यांदा जर कुणी समाजसुधारणा नाही, समाजक्रांती म्हणूया आपण, समाजक्रांतीचे जर विचार मांडले असतील तर ते महात्मा फुल्यांनी मांडले. महात्मा फुल्यांच्या अनुयायांनी ते पुढं चालवले.

मघाशी मी तुम्हाला सांगितलं, की कर्मकांड म्हणजेच धर्म अशा प्रकारची जी एक परिस्थिती निर्माण झाली होती, त्याला सुरूंग लावण्याचं काम महात्मा फुल्यांनी केलं. हिंदू

धर्माचा मुख्य पाया जो आहे वेद, तोच महात्मा फुल्यांनी नाकारला. दुसरं लक्षण जे आहे, वेदावर श्रद्धा हे पहिलं लक्षण, दुसरं लक्षण आहे चातुर्वण्य. चातुर्वण्यही नाकारलं. वेद नाकारला. चातुर्वण्य नाकारला. त्यातून निर्माण होणारा जातीभेद नाकारला. आणि या सर्वातून निर्माण होणारी स्त्री-पुरूष विषमता ती नाकारली. म्हणजे जोतिबांचं जे कार्य आहे ते मुलभूत स्वरूपाचं आहे. क्रांतीकारक स्वरूपाचं आहे. आणि हेच कार्य माणसामाणसांमधलं अंतर नष्ट करणं, एक माणूस स्वत:ला ईश्वराचा प्रतिनिधी समजतो, माझ्याकडून गेला तरच तुम्हाला ईश्वरप्राप्ती मिळेल असं सांगतो आणि दुसरे लोक त्यावर स्वत:ची मान डोलवतात. जोतिबांनी सांगितलं, की ईश्वर आणि सामान्य माणूस, ईश्वर आणि मानव याच्यामध्ये आम्ही दलाल मानत नाही. हे सगळे दलाल आहेत. पुरोहित. पुरोहितशाहीला विरोध केला. या देशामध्ये पुरोहितशाहीला विरोध करणारे महात्मा जोतिराव फुले हे पहिले समाजक्रांतीकारक आहेत. आणि मग महात्मा जोतिबा फुल्यांचंच कार्य पुढं आमच्या शाहू महाराजांनी चालवलं. तेच कार्य. तोच विषय. तीच कार्यक्रमपत्रिका. आपणाला पुढं शाहू महाराजांनी पुढं चालवलेली दिसते.

असं झालं नाही, की शाहू महाराज लहानपणापासूनच क्रांतीकारक विचारांचे होते. शाहू महाराज हे ज्या राजघराण्यामध्ये वाढले ते अतिशय कर्मठ राजघराणं होतं. जातीभेद पाळणं. शिवाशिव पाळणं म्हणजेच धर्म असं जे धर्माचं विकृत स्वरूप १९व्या शतकात निर्माण झालेलं होतं, त्यापासून राजघराणं काय वेगळं नव्हतं आणि राजघराणंच जर वेगळं नसेल तर सामान्य माणूस कसा वेगळा असेल. एक आठवण सांगतात, की शाहू महाराजांचे एक शिक्षक सर फ्रेझर हे जेव्हा शिकारीला किंवा आऊटिंगला जात असत शाहू महाराजांना घेऊन, आणि दुपारी लंचची वेळ ज्यावेळी होत असे, त्यावेळेला फ्रेझर साहेब एका झाडाखाली आणि शाहू महाराज दुसऱ्या झाडाखाली बसून जेवत असत. म्हणजे फ्रेझर साहेबांचीसुद्धा शिवाशिव त्यांना चालत नसे. शाहू महाराजांनी एकेठिकाणी म्हटलंय, की मी एवढा कर्मठ होतो, की अस्पृश्याचा स्पर्श झाला तर मी आंघोळ करत असे. काहीवेळा स्पर्श न होतासुद्धा मला अशी भावना निर्माण होत असे, की मी अस्पृश्याला शिवलेलो आहे. म्हणजे शून्यापासून शाहू महाराजांची प्रगती आहे. उत्क्रांती ज्याला आपण म्हणतो.

मग जातीभेद, चातुर्वण्य, स्त्री-पुरूष असमानता, शूद्रातिशूद्रपणा याचा जो एक प्रत्यय आला, अनुभवातून शाहू महाराज शिकत गेले. याचा पहिला प्रत्यय शाहू महाराजांना आला, की आपणाला मनुष्यत्वाप्रमाणं वागवलं जात नाही. तो प्रत्यय आला तो वेदोक्ताच्या प्रसंगातून आणि त्यावेळी त्यांच्या लक्षात आलं, की हा पुरोहित वर्ग जो स्वत:ला श्रेष्ठ समजतो, जो आर्य समाजाचा चातुर्वण्यचा प्रसारक आहे, संरक्षक आहे,



तो मुळात चातुर्वण्य मानतच नाही. तो दोनच वर्ण मानतो, एक म्हणजे ब्राह्मण आणि दुसरा शूद्र अतिशूद्र. या जगामध्ये क्षत्रिय नाहीत, वैश्य नाहीत. सगळे शूद्र बनलेले आहेत. आणि म्हणून पंचगंगेच्या तिरी जेव्हा वेदोक्ताचा प्रसंग निर्माण झाला, त्यावेळेला त्या पुरोहितानं शाहू महाराजांना सांगितलं, की तुम्हाला वेदोक्ताचे संस्कार देता येणार नाहीत. वेदोक्ताचे मंत्र तुम्हाला देता येणार नाहीत. कारण तुम्ही शूद्र आहात. महाराज म्हणाले, मी क्षत्रिय आहे. पुरोहित म्हणाले, क्षत्रिय नाहीतच. या जगामध्ये सगळे क्षत्रिय बुडालेले आहेत. आता इथं शाहू महाराजांना स्पृश्य-अस्पृश्य, शूद्र-अतिशूद्र, ब्राह्मण आणि शूद्र या सगळ्या परिस्थितीचा दाहकपणा जो आहे, त्याचे जे चटके आहेत, ते बसलेले आहेत आणि तिथून मग त्यांचे विचारचक्र सुरू झालेले आहेत.



शाहू महाराजांच्या चरित्राचा विचार करत असताना, शाहू महाराज आणि धर्म विचार असा विचार करत असताना, त्यांचे जे आतापर्यंत चरित्रकार होऊन गेलेत, अगदी लठ्ठांच्यापासून अगदी धनंजय किरांच्यापर्यंत जे चरित्रकार होऊन गेले, या चरित्रकारांनी शाहू महाराजांना एकतर आर्य समाजी मानलेले आहे, नाहीतर सत्यशोधक मानलेलं आहे. आपणाला कल्पना आहे, की आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वतींनी मुंबईत केली १८७५ला. पण आर्य समाजाचा प्रसार सगळा उत्तर हिंदुस्थानात झाला. इथं फारशी काय आर्य समाजाची डाळ शिजली नाही. याचं कारण असं, की उच्चवर्णीयांमध्ये प्रार्थना समाज हा रूजला होता आणि कनिष्ठ वर्गामध्ये, शूद्रातिशूद्र असं ज्याला आपण म्हणतो, तिथं महात्मा फुल्यांचा सत्यशोधक समाजाचा प्रभाव होता. पण महाराज आर्य समाजाकडे आकृष्ठ झाले पहिल्यांदा. त्याचं कारण काय असावं? त्याचं कारण असं आहे, की आर्य समाज हा वेदांना मानतो. वैदिक संस्कृतीला, वैदिक तत्त्वज्ञानाला मानतो. बाकी कोणतंही तत्त्वज्ञान मानत नाही. म्हणजे प्युअर वैदिक तत्त्वज्ञान जे आहे, उपनिषदांचं तत्त्वज्ञान जे आहे, तिथं जातीभेद नाहीये. तिथं चातुर्वण्य वगैरे असल्या भानगडी नाहीयेत. हिंदू धर्माचं प्युअर असं तत्त्वज्ञान, जे आपल्याला गीतेमध्ये दिसतं. प्रतिबिंबित झालेलं आहे. तिथली समाजरचना त्या काळामधली. तशा प्रकारची समतेवर आधारित समाजरचना झाली पाहिजे. म्हणजे वैदिक तत्त्वज्ञान, वैदिक संस्कृतीला मानणारा हा धर्म आहे.

दुसरी गोष्ट, आर्य समाज हा मनुष्य-मनुष्यामध्ये भेदभाव करत नाही. हा उच्च, हा कनिष्ठ असं नाही. तिसरी गोष्ट, आर्य समाज आपल्या धर्मग्रंथाला म्हणजे वेदांना वाचण्याचा, श्रवण करण्याचा, त्याच्यावर लिहिण्याचा, बोलण्याचा अधिकार सर्वांना देतो. चौथी गोष्ट, आर्य समाज हा जातीभेद मानत नाही. पाचवी गोष्ट आर्य समाज हा पुरूष, ही स्त्री असा भेद मानत नाही. आणि म्हणून जेव्हा एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहण समारंभाला महाराज आगबोटीतून निघाले होते, तिथं इदारजी महाराज प्रतापसिंह यांच्याशी भेट झाली, जे स्वत: आर्य समाजिष्ठ होते. त्या काळी इंग्लंडला जायला बराच वेळ लागायचा. मग त्या काळात दररोज त्यांची चर्चा व्हायची आणि त्यांनी हळूहळू आर्य समाजाचं तत्त्वज्ञान महाराजांना सांगितलं. महाराज म्हणाले, की जर अशा प्रकारचा हा समाज असेल, म्हणजे तो एक पंथच होता, तर हा समतेचा पुरस्कर्ता आहे आणि मला हा आवडला. म्हणून महाराजांनी या आर्य समाजाचा स्वीकार नंतरच्या काळामध्ये उघड उघड केलेला दिसतो. मी आर्य समाजिष्ठ आहे, असं त्यांनी जाहीरही करून टाकलं. कोणत्या पार्श्वभूमीवर? इंग्लंडला महाराज निघाले १९०२ला आणि १८९९, १९०० हा जो कालखंड आहे, तो वेदोक्ताच्या स्फोटाचा कालखंड आहे. जिथं महाराजांना सांगितलं, की तुम्हाला वेदांचा अधिकार नाहीये. वेदांच्या मंत्रांचा अधिकार नाहीये. तिथं हा आर्य समाज म्हणतोय, की प्रत्येक हिंदू माणसाला कोणत्या जातीचा आहे हा विषय महत्त्वाचा नाहीये, शूद्रातिशूद्रांना सुद्धा वेदांचा अधिकार आहे. वेदपठण करण्याचा अधिकार आहे. म्हणून महाराज जोडले गेले हे समजून घेतले पाहिजे.


मी आर्य समाजिष्ठ आहे असं ते जाहीरपणे १९१५-१६नंतर सांगू लागले. किंवा नवसारीसारख्या एखाद्या आर्य समाजाच्या परिषदांमध्ये अध्यक्षपदावरुन बोलताना आर्य

समाज हा विश्वव्यापी धर्म झाला पाहिजे अशा प्रकारचं ते सांगत असत. आर्य समाज कुणाचा द्वेष करत नाही. बंधूभाव वाढला पाहिजे प्रत्येक मानवी समाजामध्ये. आणि आजचे यूरोपियनदेखील कोण आहेत? ते एकेकाळी आपले भाऊबंदच होते. आर्यच होते. त्यांनीसुद्धा या समाजाचा स्वीकार करायला हरकत नाही. किंबहुना यूरोपातले लोक जर म्हणाले, की आम्हाला आर्य समाजिष्ठ व्हायचंय, तर ती फार आनंदाची गोष्ट आहे. अशा अर्थानं आर्य समाज हा विश्वव्यापी समाज व्हायला पाहिजे, विश्वव्यापी धर्म व्हायला पाहिजे. अशा प्रकारे शाहू महाराजांनी आपली भूमिका, आपले विचार प्रकट केलेले दिसतात. मग चरित्रकार म्हणायला लागले, की स्वाभाविकच महाराजच म्हणायंत, की मी आर्य समाजिष्ठ आहे, तर मग महाराजांना आपण आर्य समाजिष्ठ म्हणून शिक्का मारायला काय हरकत आहे. मारला शिक्का. अनेकांनी मारले शिक्के, कारण ते स्वत:च म्हणतायंत.


पण बहुजन समाजातले जे इतिहासकार, चरित्रकार होते, ते म्हणाले, की शाहू महाराज खरं तर सत्यशोधक होते. आता वाद निर्माण झाला. आणि वाद अशासाठी निर्माण झाला, की अनेक ठिकाणी शाहू महाराजांनी नंतरच्या काळामध्ये, पत्र व्यवहारामध्ये म्हटलेलं आहे, की माझा सत्यशोधक समाजाशी काही संबंध नाही. हा मोठा इंटरेस्टिंग विषय आहे शाहू चरित्रामधला. आता सत्यशोधक समाजाची काय परिस्थिती होती? आणि त्या काळामध्ये शाहू महाराजांचे अत्यंत जवळचे असे सहकारी नामदार भास्करराव जाधवांच्यासारखे किंवा आण्णासाहेब लठ्ठेंच्यासारखे किंवा डोंगरेंच्यासारखे किंवा जवळकर म्हणा, किंवा मुकुंदराव पाटील यांच्यासारखे, ही सगळी मंडळी, बहुजन समाजातली मंडळी शाहू महाराजांना सत्यशोधक मानतायंत. आता आली पंचाईत. खुद्द शाहू महाराज



अण्णासाहेब लठ्ठे



मुकुंदराव पाटील



भास्करराव जाधव



नारायण मेघाजी लोखंडे

म्हणतायंत, की मी सत्यशोधक नाही. अशा प्रकारचे पुरावे आहेत. हे कसे निर्माण झाले तेही पुन्हा परिस्थितीनुरूप आपण पाहिले पाहिजेत.

हा जो १८७३ला सत्यशोधक समाज निर्माण झाला, तो महात्मा फुल्यांच्या अनुयायांनी कसाबसा जगवला होता. नारायण मेघाजी लोखंडे आणि त्यांचे सहकारी यांनी हा तगवून धरलेला होता. पण त्याचं पुनरूज्जीवन झालं पाहिजे आता असं महाराष्ट्रामधल्या, बहुजन समाजामधल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारख्या आणि रामय्या आयावारू यांसारख्या महात्मा फुल्यांच्या अनुयायांना वाटू लागलं, की फुल्यांचा सत्यशोधक समाज, त्याचं तत्त्वज्ञान याचं पुनरूज्जीवन झालं पाहिजे. तो सत्यशोधक समाज पुन्हा आपण जीवंत केला पाहिजे. म्हणून १९१०ला मुंबईमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंच्या अध्यक्षतेखाली पहिलं सत्यशोधक समाजाचं अधिवेशन सुरू झालं आणि त्याठिकाणी सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान जाहीरपणे पुन्हा मांडण्यात आलं. ते तत्त्वज्ञान काय होतं? त्यात प्रामुख्यानं दोन-तीन तत्त्वं होती, ती म्हणजे अशी, की सर्व माणसे समान आहेत. सर्व माणसे परमेश्वराची लेकरे आहेत. म्हणजे त्यांना समान अधिकार आहे. आणि नंबर दोन म्हणजे, ईश्वर, परमेश्वर या निर्मिक आणि माणूस यांच्यामध्ये दलाल अभिप्रेत नाही. दलाल नसायला पाहिजे आणि तिसरी गोष्ट ईश्वराची भक्ती करण्याचा अधिकार सर्वांना आहे.


खरं म्हणजे हे तत्त्वज्ञान संतांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानासारखंच आहे. काही वेगळं नाहीये. पण संतांचं धाडस झालं नाही, की दलाली, पुरोहितशाहीला ते इतका विरोध करू शकले नाहीत, की जो विरोध महात्मा फुल्यांनी केला. १९१०ची ही गोष्ट आहे. १९११ला कोल्हापुरामध्ये सत्यशोधक समाज स्थापन झाला आणि हा सत्यशोधक समाज शाहू महाराजांच्या

अगदी जवळची जी माणसं आहेत, म्हणजे नामदार भास्करराव जाधव आहेत, डोंगरे आहेत. आण्णा बाबाजी लठ्ठे आहेत, ढोणे आहेत, श्रीपतराव शिंदे आहेत, या सगळ्या लोकांनी १९११ला कोल्हापुरामध्ये सत्यशोधक समाज स्थापन केला आणि त्याचं नाव श्री शाहू सत्यशोधक समाज ठेवलं. १९१२ला दीडशे कार्यकर्ते एकत्र आले आणि महाराष्ट्रातली पहिली श्रावणी सोहळा ब्राह्मण पुरोहितांशिवाय मराठा पुरोहितांकरवी पार पाडला. मग सुरू झालं, की मराठा पुरोहितांतर्फेच आपली लग्नं लावायची, सगळे धार्मिक विधी करायचे. त्या काळातली त्याची आकडेवारी असं सांगतेय, की १९१२ साली २०० लग्नं सत्यशोधक पद्धतीनं झाली. १९१३ साली २६६ झाली. १९१४ साली २९९ लग्न विधी सत्यशोधक पद्धतीनं झाली. पुढं वाढतंच गेले.

आता या सर्व गोष्टी शाहू महाराजांना माहिती नव्हत्या, शाहू महाराजांच्या सेवेमध्ये असलेले लोक सत्यशोधक समाजात आहेत, समाजाचं नावसुद्धा शाहू महाराज सत्यशोधक समाज असं दिलं आहे, शाहू महाराजांनी दिलेल्या इमारतीमध्ये त्यांनी तो स्थापन केलेला आहे. तिथं दर आठवड्याला सभा भरतेय, तिथं सत्यशोधक शाळा या लोकांनी सुरू केलेली आहे पुरोहित निर्माण करण्यासाठी. भास्करराव जाधव यांनी घरचा पुरोहित नावाची एक पुस्तिका लिहिलेली आहे. अनेक लोक म्हणतात, की शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी किंवा सत्यशोधक समाजाचं काम म्हणून जी वैदिक शाळा सुरू केली, महात्मा फुल्यांच्या एकूण तत्त्वज्ञानाला हे सुसंगत नाहीये. वेद निर्माण केलेच, पण ब्राह्मण पुरोहित गेला आणि मराठा पुरोहित निर्माण झाला. रोकडे नावाचे महात्मा फुलेंचे एक सहकारी, त्यांनी



आद्य शंकराचार्य



करवीर पीठाचे शंकराचार्य



स्वरूपानंद सरस्वती द्विपिठाधीश्वर

एक आत्मचरित्र लिहिलं होतं. त्यावेळी हा विषय महात्मा फुल्यांच्यासमोर निघाला होता. त्यावेळी महात्मा फुले म्हणाले, की आपल्यातले पुरोहित निर्माण झाले पाहिजेत. विधी तर करायलाच पाहिजेत. नाहीतर लोक पुन्हा ब्राह्मण पुरोहितांकडे जातील. त्यांना असं वाटलं पाहिजे, की विधिवत आपलं कार्य झालं आहे. पण लग्नं किंवा वास्तुशांतीसारखे विधी करणार कोण? त्यासाठी एक पुरोहित वर्ग आपला, धार्मिक स्वातंत्र्य हे आपलं असलं पाहिजे. हे लोक आपले असले पाहिजेत. आणि शाहू महाराजांनी तीन महत्त्वाचे निर्णय सत्यशोधक समाजाच्या तत्त्वज्ञानाच्या निमित्तानं किंवा त्याला अनुसरून घेतलेल आहेत.


त्यातला पहिला निर्णय असा आहे, की राजवाड्याशी संबंधित जी काही मंदिरं, जी काही पुजास्थानं असतील, तिथं आत्तापर्यंत सगळे ब्राह्मण पुरोहित होते. त्या सगळ्यांना शाहू महाराजांनी काढल आणि त्याठिकाणी मराठा पुरोहित नेमले. दुसरी गोष्ट, मराठा पुरोहितांच्या हस्ते हे सगळे विधी व्हायला पाहिजेत. पण मराठा पुरोहित मिळायला पाहिजेत ना. आणि म्हणून मराठा पुरोहित निर्माण करणारी शाळा श्री शिवाजी वैदिक स्कूल नावाची एक प्रशाळा त्यांनी स्थापन केली. महाराजांचा तिसरा निर्णय म्हणजे क्षात्र जगद्गुरूंची निर्मिती. आता हासुद्धा मोठा वादाचा विषय आहे शाहू चरित्रामधला, की हा निर्णय महात्मा फुल्यांच्या तत्त्वज्ञानाशी विसंगत आहे. पण मला असं वैयक्तिक वाटतं, की हा विसंगत नाही, तर सुसंगतच आहे. माणूस आणि देव यांच्यामध्ये दलाल असता कामा नये हे तत्त्व महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचं आहे. आणि हे तत्त्व अंमलात आणण्यासाठी ज्या उपाययोजना शाहू महाराजांनी केल्या,

त्यासुद्धा सुसंगत आहेत. निर्मिक, देव किंवा ईश्वर आणि माणूस याच्यामध्ये क्षात्र जगद्गुरू हा दलाल नाहीये. हा मार्गदर्शक आहे. त्यावेळी संपूर्ण चातुर्वण्य, हिंदु समाजाचा गुरू, जसा कॅथॉलिकांचा पोप आहे, तसा हिंदूंचा कोण? तर जगद्गुरू शंकराचार्य. मग जगद्गुरू शंकराचार्य असताना शाहू महाराजांनी मग क्षात्र जगद्गुरू का काढला, असा स्वाभाविक प्रश्न निर्माण होतो. पण प्रश्न असा आहे, की हा जगद्गुरू शंकराचार्य सर्वांना समान लेखत नव्हता. चार शंकराचार्यांपैकी कोणताही शंकराचार्य घेतला आपण, तर हा शंकराचार्य वेदाचे अध्ययन, पठण करण्याचा अधिकार सर्वांना देत नव्हता. फक्त ब्राह्मणांनाच देत होता. म्हणजे हा शंकराचार्य माणसांमाणसांमध्ये भेद करत होता. वर्णावर्णामध्ये भेद करत होता. स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये भेद करत होता. हा शंकराचार्य आमच्या काय उपयोगाचा आणि मग त्याच्या प्रवाहातून जर आपल्याला निसटायचं असेल, तर आपल्याला स्वत:चा जगद्गुरू निर्माण करता आला पाहिजे.


यासंदर्भात जो जाहीरनामा शाहू महाराजांनी काढलेला आहे. त्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटलेलं आहे, की लिंगायतांचे स्वत:चे धर्मगुरू आहे. जैनांचे स्वत:चे धर्मगुरू आहेत. वैदिक संस्कृतीच्या विरोधामध्ये जाऊन या लोकांनी केलेलं आहे. एवढेच नव्हे, तर अतिशूद्रामध्ये जे मांग लोक आहेत, महार लोक आहेत, याच्यामध्ये स्वत:चे गुरु आहेत. मग क्षत्रियाचा गुरू का असू नये. आणि जेव्हा क्षात्र जगद्गुरू म्हणून बेणारीकर पाटलांचा जेव्हा पट्टा अभिषेक झाला, त्यानंतर लिहिलेल्या एका संदेशामध्ये, एका पत्रामध्ये शाहू महाराजांनी म्हटलेलं आहे, की तुम्ही इतर धर्मगुरूंसारखं वागायचं नाहीये. जगद्गुरू शंकराचार्य



बसवेश्वर



भगवान महावीर



शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी

ज्याप्रमाणं माणसांच्या खांद्यावरच्या पालखीतून दिवसा मशाली पेटवून मिरवतात. तसं नाही तुम्ही करायचं. तुम्ही माणसाला जनावर करायचं नाहीये. तुम्ही माणसाला माणूस म्हणून वागवायचं आहे. तेव्हा तुम्हाला घोडागाडी देतो. घोडागाडीतून फिरा. माणसांच्या खांद्यावरून हिंडायचं नाही. कोणापासूनही पाद्यपूजा घ्यायची नाही. हे शंकराचार्य पाद्यपूजा, दक्षिणा घेत होते.


आपणाला कदाचित माहित असतील, की कुर्तकोटी नावाच्या एका विद्वान ब्राह्मणाला कोल्हापुरामध्ये आणून शाहू महाराजांनी शंकराचार्यांच्या जागेवर नेमलं. त्यांनी सांगितलं होतं, की मी जातीभेद पाळत नाही. धर्मभेद पाळत नाही. मी अस्पृश्यता पाळत नाही. असं म्हटल्यावर महाराज खूश झाले. ते म्हणाले, की मला असाच माणूस पाहिजे होता शंकराचार्य म्हणून. आणि त्यांनी डॉ. कुर्तकोटी यांना शंकराचार्य बनवला. पण हळूहळू त्यानी आपले खायचे दात दाखवायला सुरूवात केली. अस्पृश्य मंडळींना त्यानं मठाच्या बाहेर उभं केलं वगैरे वगैरे. अनेक गोष्टी आहेत. तो विषय इथं महत्त्वाचा नाही. महाराजांनी अनेक प्रयोग केले. त्यातला हा एक प्रयोग होता. तोही अयशस्वी झाल्यानंतर महाराज म्हणाले, की आता आमच्याच जातीचा क्षात्र जगद्गुरू आम्ही निर्माण करू आणि म्हणून त्यातून त्यांनी क्षात्र जगद्गुरू पद निर्माण केलं. त्यांना आदेश देताना सांगितलं, की ईश्वर आणि मानव यांच्यामधली दलाली तुम्ही नष्ट करायची आहे. तुम्ही लोकांना मार्गदर्शन करायचंय, की खरा धर्म कोणता. तुम्ही चार शंकराचार्य ज्याप्रमाणं हिंडतात, त्याप्रमाणं हिंडायचं नाहीये. म्हणजे शाहू महाराजांना धार्मिकदृष्ट्या बहुजन समाज, आपली मराठी मंडळी ही स्वावलंबी बनवायची होती. त्यांचं

स्वतंत्र स्थान निर्माण करायचं होतं. धर्माच्या बाबतीमध्ये त्यांना स्वातंत्र्य मिळवायचं होतं.

शाहू महाराजांना वाटलं, की हे सत्यशोधक समाजाचं जे तत्त्वज्ञान आहे, त्याच्यापासून हे काय फारसं विलग नाहीये. आणि हे सगळं जे शाहू महाराजांनी केलं, ते अन्य कुणी सांगितलं अशातला भाग नाही. त्यांनी त्यांच्या चिंतनामधून हे निर्णय घेतले होते, की काय करायला पाहिजे. बहुजन समाज स्वावलंबी बनवायचा असेल, पुरोहितशाहीच्या वर्चस्वातून, त्यांनी लादलेल्या गुलामगिरीतून त्यांना मुक्त करायचं असेल, तर या उपाययोजना आहेत. या सत्यशोधकी उपाययोजना आहेत असं त्यांनी जाहीर केलेलं नाही. पण ज्या उपाययोजना त्यांनी केल्या, त्या सत्यशोधकी तत्त्वज्ञानामध्ये बसणाऱ्या होत्या. शाहू महाराजांचं निधन झालं त्यावेळी सगळ्यात जास्त दु:ख कोणाला झालं असेल तर ते सत्यशोधकांना झालं. भगवंतराव पालेकर हे जागृतीचे संपादक, त्यांनी काय म्हटलंय पाहा. महाराजांच्या जाण्यानी सत्यशोधक चळवळीचा उजवा हात गळून पडलांय. दुसरे पत्रकार खंडेराव बागल, यांचं हंटर हे पत्र प्रसिद्ध होतं. त्यांनी म्हटलंय, की महाराजांनी एका हातात सत्य समाज व दुसऱ्या हातात समता ही निशाणी घेऊन सर्व महाराष्ट्रभर महात्मा फुल्यांची तत्त्वे सर्वांसमोर मांडली. म्हणजे महात्मा फुल्यांचंच कार्य त्यांनी पुढं नेलं असं अगदी जवळची मंडळी म्हणतायंत.

आता सर्वात मोठी ट्रिब्यूट जर कुणी दिली असेल तर ती महात्मा गांधींनी दिलेली आहे. सत्यशोधक समाजाची जी केंद्रं स्थापन झालेली होती, त्यातलं एक केंद्र म्हणजे वाईजवळ केंजळ नावाचं गाव आहे, या केंजळ गावी सत्यशोधक समाजाची मंडळी कार्य करीत होती आणि ती महात्मा गांधी ज्यावेळी पाचगणीला आले त्यावेळेला त्यांना भेटायला गेले. त्यांनी गांधींजींना सत्यशोधक समाजाच्या





कार्याची माहिती दिली आणि कोल्हापूरचे नरेश राजर्षी शाहू छत्रपती यांचा पाठिंबा आहे आणि यांच्या प्रेरणेतून आम्ही हे काम करत आहोत. विशेषत: जातीभेद न पाळणं, अस्पृश्यता न पाळणं वगैरे वगैरे. सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार करणं. शाहू महाराजांचं कार्य आणि त्यांची महती ऐकल्यावर महात्मा गांधी काय म्हणाले, हे फार महत्त्वाचं आहे. हे आतापर्यंत कुणी कोट केलेले नाही. सत्यशोधक समाजाच्या हिरक महोत्सवामध्ये जो अहवाल प्रसिद्ध झाला त्या अहवालामध्ये हे वाक्य मला मिळालं. त्यात महात्मा गांधी म्हणतात, सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यता नष्ट केली आणि अशाप्रकारे त्यांनी खऱ्या अर्थानं स्वराज्याचा पाया रचला. अशा प्रकारे महात्मा गांधींनी शाहू महाराजांचं वर्णन स्वराज्याचा पाया घालणारे आणि खरंच आहे ते. स्वराज्याचा हक्क म्हणजे केवळ राजकीय हक्क नव्हेत किंवा राजकीय स्वातंत्र्य नव्हे. स्वराज्याचा अर्थ सामाजिक समता. सामाजिक बंधूभाव आणि अस्पृश्यता असताना सामाजिक समता कशी प्रस्थापित होऊ शकेल. सामाजिक विषमता जर अस्पृश्यामधून निर्माण होत असेल तर ती नष्ट करण्याचे काम हे स्वराज्याचंच काम आहे. असं व्यापक अर्थानं त्यांनी हा शब्द वापरला आहे.

ज्यावेळेला न.चिं. केळकरांसारखे केसरीचे संपादक शाहू महाराजांना स्वराज्यद्रोही छत्रपती म्हणत होते, त्यावेळेला हिंदुस्थानचे, भारताचे महात्मा गांधीजी हे शाहू महाराजांना स्वराज्याचा पारा रचणारे असे गौरवोद्गार काढत होते. हे सगळे आसपासचे लोक, सगळा महाराष्ट्र म्हणतोय, की शाहू महाराज हे आमचे सत्यशोधकी नेते आहेत. आणि शाहू महाराज मात्र इंग्रजांना लिहिलेल्या पत्रात म्हणतायंत, की माझा सत्यशोधकाशी काहीही संबंध नाहीये. मी सत्यशोधक नाहीये.

चरित्रकारांना जो चकवा पडतो तो इथं पडतो. ही ओळ घेऊन काही चरित्रकार म्हणतात, की पाहा खुद्द शाहू महाराजच असं म्हणतायंत, तर तुम्ही कशाला त्यांना सत्यशोधक ठरवता. गंमत अशी आहे, की शाहू महाराज असं का म्हणतात? ही एक शाहू महाराजांची डिप्लोमसी आहे. ही एक शाहू महाराजांचे राजकारण आहे. त्यात शाहू महाराजांनी आणखी एक गोष्ट केली. महात्मा फुल्यांचं तत्त्वज्ञान, सत्यशोधक समाजाचं तत्त्वज्ञान तळागाळात जाण्यासाठी सत्यशोधक जलसे निर्माण केले आणि या जलशाच्या माध्यमातून महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार कसा होईल हे त्यांनी पाहिलं. तमाशासारख्या जलशामध्ये मनोरंजनाबरोबरच समाज प्रबोधन करण्यात आलं. आता या समाज प्रबोधनामध्ये विषय कोणते असत? दारूचे व्यसन, खेडेगावातला सावकार कसा पिळवणूक करतो, पुरोहितशाहीचं वर्चस्व, पुरोहितशाही स्वत:च्या समाजातल्या स्त्रीवर कशा प्रकारचे अत्याचार करतात. भटभिक्षूक हे कसे नाडतात. असे अनेक सामाजिक प्रश्न घेऊन विनोदाच्या माध्यमातून, कवनांच्या माध्यमातून हे संगीत जलसे खेडोपाडी फिरत असत.

आपणाला सांगायला हरकत नाही, की जे कर्मवीर झाले, ते भाऊराव पाटील यांचाही एक सातारा जिल्ह्यात फार मोठा जलसा होता. अनेक जलसे खान्देशामध्ये, विदर्भामध्ये, मराठवाड्यामध्ये आणि त्याचं प्रात्यक्षिक दाखवायला शाहू महाराजांच्याकडे हे जलसेवाले येत असत. शाहू महाराजांच्या समोर ते जलशाचा खेळ दाखवत असत आणि नंतर ते जात असत. अहो, एवढं सगळं होतंय, आणि शाहू महाराज म्हणतायंत, की मी काही त्याच्यातला नाही. त्याचं कारण असं आहे, की या जलशातून ठिकठिकाणी जागृती निर्माण झाली. ब्राह्मण पुरोहितांवर बहिष्कार टाकले गेले. एका बाजूला ब्राह्मण पुरोहित आणि दुसऱ्या बाजूला बहुजन समाजातले जागृत झालेले लोक यांच्यामध्ये काही ठिकाणी मारामाऱ्या सुरू झाल्या. अनेक ठिकाणी ब्राह्मण पुरोहितांनी या सत्यशोधक कार्यकर्त्यांवर केसेस दाखल केल्या. आणि वर्तमानपत्रातून शाहू महाराज या सगळ्याच्या पाठीमागे आहेत, शाहू महाराजांचं प्रोत्साहन आहे अशा प्रकारची ओरड सुरू केली. शाहू महाराज म्हणाले, मी कशाला सांगू त्यांना. हा त्यांचा विषय आहे. माझ्या राज्यात काय होतंय का बघा. माझ्या राज्यात मी जबाबदार आहे. इंग्रजांच्या प्रदेशात काय होतंय याला मी जबाबदार नाही. तिथला कलेक्टर जबाबदार आहे. मी त्या गावचा नाही. मी कधीही स्वत:ला सत्यशोधक मानलेलं नाही. मी सत्यशोधक समाजाचा अनुयायी नाही. शिष्य नाही. काहीच नाहीये.

आता आपल्या लक्षात आलं असेल, की शाहू महाराज आणि धर्मविचार. कोणत्या धर्माच्या विचाराचे होते ते. आर्य समाजाच्या धर्मविचाराचे होते का की सत्यशोधक समाजाच्या धर्माच्या विचाराचे होते. मी आपणाला असं सांगेन, की ते या दोन्हीही समाजाच्या विचाराचे होते आणि

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकच्या काळाराम मंदिरात केलेला सत्याग्रह





दोन्ही समाजाच्या विचाराचे नव्हते. दोन्ही समाजाचे होते आणि दोन्ही समाजाचे नव्हते. आर्य समाजाचे होते म्हणावं, तर आर्य समाज मूर्तीपूजा मानत नाही. शाहू महाराज मूर्तीपूजा करतात. ठिकठिकाणी जे काही देवांचे छबिने असतात पूर्वापार चालत आलेले, ते छबिने चालवतायंत. मूर्तीपूजेला विरोध नाही त्यांचा. मग आर्य समाजिष्ठ कसे? बरं वेदावर महाराजांचा फार मोठा विश्वास होता असंही नाहीये. मग वेदाचा आग्रह का धरत होते? त्याला एक उत्तर म्हणजे असं, की काळाराम मंदिरामध्ये प्रवेश करण्याचा आग्रह डॉ. आंबेडकर का करत होते. काळाराम मंदिराबद्दल प्रेम आहे म्हणून नव्हे. पण तिथं जाण्याचा हिंदू म्हणून मला अधिकार आहे, हे सिद्ध करण्यासाठी. तसं वेदाबद्दल आहे. वेद धर्मग्रंथ आहे ना, मग तो वाचण्याचा अधिकार मला असला पाहिजे.

वेदाच्या संदर्भामध्ये एक गोष्ट आपणाला सांगू इच्छितो. अप्रकाशित आहे ती. पण मी माझ्या ग्रंथामध्ये घातलेली आहे. ही गोष्ट मला २५-३० वर्षापूर्वी सांगितली होती. बिराडे नावाचे गुरूजी, जे शाहू महाराजांच्या पहिल्या बॅचचे विद्यार्थी वैदिक स्कूलचे. ते म्हणाले, की एक दिवस महाराज आले आणि संचालकांना म्हणाले, की उद्या माझ्या वडिलांचं श्राद्ध आहे आणि त्यासाठी मुलं पाठवून द्या. तर संचालक म्हणाले, की या मुलांना काय येत नाही आणि वेद वगैरेसाठी दुसरा एखादा चांगला माणूस बघूया. तर महाराज म्हणाले, की मुलांनीच करायला पाहिजे. बाराखडी येतात की नाही त्यांना. बाराखडी म्हणू देत. बाराखडी हे बहुजन समाजाचे वेद आहेत. वेदावर एवढा विश्वास त्यांना होता. किती किंमत देत होते वेदाला? फार मोठी किंमत देत नव्हते ते. डॉ. आंबेडकर मंदिरांना किती किंमत देत होते? तेवढीच किंमत शाहू महाराज वेदांना देत होते. म्हणजे तुम्ही ज्या अर्थानं शाहू महाराज आर्य समाजिष्ठ होते असं म्हणता, त्या अर्थानं शाहू महाराज आर्य समाजिष्ठ नव्हते. सत्यशोधक समाजाबद्दल तर ते स्वत:च म्हणालेत, की मी सत्यशोधक समाजाचा नाही. पण सत्यशोधक समाज हा वेदांना अजिबातच मानत नाही. पण शाहू महाराज इकडं वेदाचा आग्रह धरतात, आर्य समाजिष्ठ असल्यामुळं माझा वेदावर विश्वास नाही असं शाहू महाराज म्हणतच नाहीत. पण विश्वास किती खरा, किती खोटा?

शाहू महाराज समजणं एवढी सोपी गोष्ट नाहीये. शाहू महाराज असं म्हणाले म्हणजे शाहू महाराज तेच होते असं नाही. कारण शाहू महाराजांची ही कसरत होती लक्षात घ्या. एका बाजूला ब्रिटीश आहेत. दुसऱ्या बाजूला ब्राह्मणी वर्चस्वाची वर्तमानपत्रं आहेत. आणि दोन्हींच्यामधून ते आपल्या बहुजन समाजाला पुढं नेत आहेत असं आपल्याला दिसतं. शाहू महाराज कशाचे पुरस्कर्ते आहेत? शाहू महाराजांचा धर्म हा मानवधर्म आहे. मानवधर्माचे पुरस्कर्ते आहेत ते आणि म्हणून त्यांनी एका ठिकाणी म्हटलेलं आहे, की जनी जनार्दन पाहा हाच खरा धर्म. लोकांमध्ये जनार्दन बघणं हाच माझा खरा धर्म आहे. धर्म हा सर्वांचा सारखाच आहे हो. त्यांनी फार चांगली उपमा दिलेली आहे. ते म्हणतात, मुंबईसारख्या शहरामध्ये जायला अनेक बाजूंनी रस्ते आहेत. पण या रस्त्यावरून जाणारे जे लोक आहेत त्यांना एकाच ठिकाणी जायचं असतं. त्यांनी एकमेकांचा द्वेष करण्याचं काही कारण नाहीये. तसंच धर्म शेवटी ज्या परमेश्वराप्रत जातो, त्याच्या वाटा जरी भिन्न भिन्न असल्या, तरी धर्म हा शेवटी सर्वांचा एकच आहे आणि तो आहे मानवता धर्म. निरनिराळ्या वाटेवरून जाणाऱ्या लोकांनी एकमेकाचा द्वेष करू नये. अशा प्रकारचं उच्च तत्त्वज्ञान शाहू महाराजांच्या भाषणामध्ये नंतर आपल्याला आढळतं.

शेवटी शेवटी तर ते म्हणतात, की ईश्वर, ईश्वर म्हणजे तरी शेवटी काय आहे? कोणी बघितलांय ईश्वर? इथंपर्यंत ते जातात. म्हणजे ईश्वर या संकल्पनेनं आपल्या समाजावर कशा प्रकारचा प्रभाव निर्माण केलेला आहे आणि शेवटी ईश्वर म्हणजे काय? हे कोणाला कळालेलं आहे अशा अर्थाची वक्तव्यं त्यांची आपणाला दिसतात. शेवटी महत्त्वाचा मुद्दा असा आहे, की माणसामाणसामधला भेद नष्ट करणं, एका माणसानं दुसऱ्या माणसाला बंधुभावानं वागवणं म्हणजे धर्म अशी संकल्पना शाहू महाराजांनी नंतरच्या काळामध्ये मांडलेली आपल्याला दिसते.

शाहू महाराज फुल्यांचे अनुयायी होते का, महर्षी दयानंद सरस्वतींचे अनुयायी होते का अशा प्रकारचा शोध घेतला जातो. पण मला असं वाटतं की शाहू महाराज असे कोणाचे अनुयायी नव्हते. शाहू महाराज मुळातच महापुरूष होते. कोणताही महापुरुष हा कोणाचा अनुयायी असू शकत नाही असं माझं मत आहे. महात्मा गांधी महात्मा होते, महापुरूष होते. ते स्वत:ला जरी गोखल्यांचे अनुयायी मानत असले, तर हा त्यांचा एक मोठेपणा आहे. पण महापुरूष हा स्वत:चा मार्ग स्वत: निर्माण करतो. स्वत:चं तत्त्वज्ञान स्वत: निर्माण करतो. तो स्वयंभू असतो. शाहू महाराज कोणत्याही पंथामध्ये बद्ध झाले नाहीत. फक्त एकच पंथ, तो म्हणजे मानवधर्म आणि हाच शाहू महाराजांचा धर्मविचार आहे.

■■



आधुनिक भारतातील विचारवंतांना छत्रपती शिवरायांच्या जीवन चरित्रामध्ये आयडिया ऑफ इंडिया ही संकल्पना सुस्पष्टपणे दिसत होती. महात्मा फुलें पासून ते यशवंतराव चव्हाण पर्यंत अनेक विचक्षण संशोधकांनी शिवरायांच्या जीवन चरित्राचे हे वैशिष्ट्य अधोरेखित केलेले आहे. शिवरायांच्या कार्याची पाळेमुळे कृषी जीवनाशी संबंधित होती. त्यांचा दृष्टीकोन कृषी संस्कृतीने घडविलेला होता. शिवरायांच्या कृषी स्वराज्याची चार मुख्य सुत्रे होती. एक, कृषी क्षेत्राला राज्यसंस्थेच्या पाठिंबा देणे. दोन, कृषी क्षेत्रातील खाजगी किंवा बाह्य हस्तक्षेप थांबविणे. तीन, कृषीशी संबंधित खेड्यांची पुनर्रचना करणे. चार, कृषीशी संबंधित समुहामधून राज्यकर्ता वर्ग (ruling class), बुद्धिजीवी वर्ग (intellectual class) ) आणि संरक्षक वर्ग (warrior class) घडविणे. या वर्गामध्ये त्यांनी धार्मिक व सामाजिक सलोख्याचा सुसंवादी (religious and social harmony) विचार प्रवाही ठेवला होता. हा विचार आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने सामील केला गेला. भारतात आयडिया ऑफ इंडिया (idea of India) ही संकल्पना वेळोवेळी बदलत गेली आहे. आयडिया ऑफ इंडिया ही संकल्पना कृषीशी संबंधित महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, विठ्ठल रामजी शिंदे, महाराजा सयाजीराव गायकवाड, शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, पंजाबराव देशमुख आणि यशवंतराव चव्हाण यांनी वेळोवेळी मांडलेली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये आणि स्वातंत्र्य उत्तर काळातील तीन-चार दशकांमध्ये कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडिया संकल्पना विकसित होत गेली. भारतीय स्वातंत्र्याचा




# कृषी स्वराज्याची संकल्पना आणि आयडिया ऑफ इंडिया संकल्पना


**प्रा.डॉ. प्रकाश पवार**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

अमृत महोत्सव साजरा करताना कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना कोणती होती? हा एक प्रश्न उपस्थित होतो. कृषीशी संबंधित आयडीया ऑफ इंडिया संकल्पनेचा अर्थ लावताना शिवरायांच्या विचारांचे व कार्यांची उदाहरणे आधुनिक भारतीय राजकीय विचारवंतांनी दिली आहेत. ऐंशीच्या दशकानंतर कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना हळूहळू धुसर आणि अस्पष्ट होत गेली (decline). यामुळे आजच्या काळातील नवीन आयडिया ऑफ इंडियाची (idea of New India) संकल्पना ही कृषी क्षेत्राला वगळून पुढे आलेली संकल्पना आहे. यामुळे आजच्या काळातील आयडीया ऑफ इंडिया मध्ये कृषी क्षेत्र हे परिघाच्या बाहेर दिसते. यामुळे कृषी क्षेत्रातील आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना आणि नव भारताची संकल्पना यामध्ये विषमता आणि भेदभाव सुस्पष्टपणे दिसतो. सत्तरीच्या दशकाच्या शेवटी शरद जोशी यांनी इंडिया आणि भारत असा फरक केला होता (१९७८). म्हणजेच शरद जोशी यांनी कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडिया या संकल्पनेचा ऱ्हास होत आहे ही गोष्ट अधोरेखित केली होती. ऐंशीच्या दशकामध्ये शरद जोशी यांनी कृषीशी संबंधित आयडीया ऑफ इंडियाची पुनर्रचना करण्याचा आग्रह धरला होता. परंतु त्यांनीच ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडिया पासून फारकत घेतली. त्यानंतर आयडिया ऑफ इंडिया या संकल्पनेतील कृषी क्षेत्राची हेळसांड झाली. कृषी क्षेत्राला पूर्णवेळ कृषिमंत्री मिळणे देखील दुरापास्त होत गेले, असे खुद्द शरद पवार यांनी त्यांच्या आत्मचरित्रात नोंदविले आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात शरद पवार यांनी कृषी क्षेत्राची जबाबदारी केंद्रात स्वीकारली (२००४-२०१४). दहा वर्षात कृषी क्षेत्राची डागडुजी करण्याचा प्रयत्न झाला. पन्नाशीचे दशक, साठीचे दशक आणि एकविसाव्या शतकातील आरंभीचे दशक अशी तीन ते साडेतीन दशके वगळता आयडीया ऑफ इंडिया संकल्पनेत कृषी क्षेत्र कुठे आहे हाच प्रश्न निर्माण होतो. म्हणजेच कृषिक्षेत्राला आयडिया ऑफ इंडिया मधून वगळण्यात आले होते. हे वास्तविक चित्र भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या प्रसंगीचे आहे. या

चित्रांमधून कृषीशी संबंधित फार काही सुस्पष्टपणे गोष्टी स्पष्ट होत नाहीत. यामुळे कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडिया ही संकल्पना कोणती होती या गोष्टीचा शोध घ्यावा लागतो.








यासाठी थेट आपणास महात्मा फुले यांच्या पासून शोध घ्यावा लागतो. आयडिया ऑफ इंडिया ही संकल्पना शिवरायांच्या जीवनाशी संबंधित होती. असा अन्वयार्थ आधुनिक काळामध्ये महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, विठ्ठल रामजी शिंदे, पंजाबराव देशमुख, पंडित जवाहरलाल नेहरू, यशवंतराव चव्हाण यांनी लावलेला आहे. त्यांनी शब्दार्था पेक्षा भावार्थ यांनी शिवरायांचे जीवन आणि आयडिया ऑफ इंडिया संकल्पना यांची सांधेजोड केलेली दिसते. शिवरायांच्या जीवन चरित्राचे हे एक आगळेवेगळे वैशिष्ट्य अधोरेखित केलेले आहे.

**महात्मा फुलेंची आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना**

आधुनिक काळात प्रथम महात्मा फुले यांनी आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना कृषीशी संबंधित मांडली होती. या गोष्टीचे आत्मभान जवळपास भारतामध्ये लोप पावलेले दिसते. परंतु महात्मा फुले यांच्या विचारांमध्ये कृषीशी संबंधित आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना मध्यवर्ती होती, असे दिसते. महात्मा फुले यांच्या समग्र वाङ्मयामध्ये याबद्दलची सरळ सरळ चार उदाहरणे सुस्पष्टपणे दिसतात.

एक, महात्मा फुले यांच्या विचारातील बळीचे राज्य किंवा बळीस्थान ही संकल्पना आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेतील कृषीचा अर्थ व्यक्त करणारी आहे.

दोन, महात्मा फुले यांनी शिवाजी महाराजांवर पोवाडा लिहिलेला आहे. शिवाजी महाराजांच्या वरील कुळवाडी कुलभूषण पोवाडा हा आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेतील कृषीचा अर्थ व्यक्त करणारा आहे. दुसऱ्या शब्दात महात्मा फुले यांनी आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेचा कृषीशी संबंध जोडताना बळीराजा आणि शिवराय या दोन महत्त्वाच्या राज्यकर्त्यांना मध्यवर्ती ठेवले. बळीराजा आणि शिवराय यांच्या विचारांमधील कृषीची संकल्पना महात्मा फुले यांनी आयडीया ऑफ इंडिया म्हणून अधोरेखित केली होती.

तीन, महात्मा फुले यांनी हरित स्वराज्याची संकल्पना कृषीशी संबंधित अधोरेखित केली होती.

चार, शेतकऱ्यांची शोषणातून मुक्ती हा अर्थ आयडीया ऑफ इंडिया संकल्पनेचा महात्मा फुले यांना अभिप्रेत होता. फुले यांनी शेतकऱ्यांच्या शोषण मुक्तीसाठी राज्य संस्थेने प्रयत्न करावेत अशी भूमिका घेतली होती. या चार उदाहरणांवरून सुस्पष्टपणे आयडिया ऑफ इंडियाची कल्पना कृषी संबंधित यांची होती असे दिसते.

**न्यायमूर्ती रानडे प्रणित कृषीची संकल्पना**

महात्मा फुलेंच्या नंतर कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडिया ची संकल्पना न्यायमूर्ती रानडे यांनी अधोरेखित केलेली दिसते. न्यायमूर्ती रानडे यांनी rise of the Maratha power हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात शिवरायांची प्रतिमा त्यांनी आयडिया ऑफ इंडिया या संकल्पनेशी जोडून मांडलेली आहे. भारतीय राष्ट्रवादाचा उगम त्यांनी शिवरायांमध्ये शोधलेला दिसतो. न्यायमूर्ती रानडे यांनी कृषीशी संबंधित आयडिया ऑफ इंडियाचे चार स्तंभ स्पष्ट केलेले दिसतात. एक, कृषीचे आधुनिकीकरण करणे हा त्यांच्या विचारातील एक महत्त्वाचा घटक होता. दोन, कृषी आणि औद्योगिक यांचा समन्वय निर्माण करणे हा दुसरा महत्त्वाचा आधारस्तंभ होता. तीन, कृषीला राज्य संस्थेने आर्थिक मदत करावी हा तिसरा आधारस्तंभ होता. चार, कृषीसाठी बँक आणि पतसंस्था स्थापन कराव्यात असा विचार त्यांनी मांडला होता. या विचारांमध्ये एक आयडिया ऑफ इंडिया ची संकल्पना आहे. या विचारांचा कृषीशी मूलभूत संबंध असल्याचे दिसते.

**शाहू महाराजांची कृषीची स्वराज्याची संकल्पना**

महात्मा फुले आणि न्यायमूर्ती रानडे यांच्या नंतर आयडिया ऑफ इंडियाच्या संकल्पनेतील कृषी क्षेत्राचे मूलभूत घटक शाहू महाराजांच्या विचारात आणि कार्यात सुस्पष्टपणे दिसतात. शाहू महाराज हे शिवरायांचे राजकीय वारसदार. त्यामुळे शाहू महाराजांचे शिवरायांच्या बद्दलचे आकलन हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. याबद्दलची काही महत्त्वाची उदाहरणे चित्तवेधक आहेत. एक, शाहू महाराजांनी कृषीसाठी पाणीपुरवठ्याचे धोरण निश्चित केले होते. त्यांनी त्यासाठी धरणाच्या बांधकामाचे काम सुरू केले होते. दोन, शाहू महाराजांनी कृषीवर आधारित कृषी औद्योगिक प्रकल्प सुरू केले होते. कृषी औद्योगिक समाजाची संकल्पना त्यांच्या विचारात होती. तीन, राज्यसंस्थेचा पाठिंबा कृषी क्षेत्राला त्यांनी दिला होता. चार, आर्थिक पतपुरवठा करणाऱ्या संस्था त्यांनी स्थापन केल्या. तसेच त्यांनी कृषी उत्पादनाला योग्य भाव मिळावा यासाठी प्रयत्न केला. या काही निवडक उदाहरणांमध्ये आयडीया ऑफ इंडिया संकल्पना कृषी संबंधित शाहूमहाराजांची होते असे सुस्पष्टपणे दिसते.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांची संकल्पना**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सरळ सरळ आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेला पाठिंबा दिलेला होता. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आयडिया ऑफ इंडिया या संकल्पनेत कृषिक्षेत्र हे मध्यवर्ती होते. मराठा राज्यसंस्थेची एक महत्त्वाची शाखा बडोदा येथे होती. त्या शाखेचे प्रमुख राजा सयाजीराव गायकवाड होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी कृषी क्षेत्राचे चार घटक आपल्या विचारात आणि कार्यात बिंबविले होते. एक, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी कृषीसाठी आधुनिक विज्ञान विज्ञानाचा प्रयोग सुरू केला. दोन, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी कृषीसाठी पाणीपुरवठ्याचे धोरण राज्यसंस्थेचे म्हणून निश्चित केले. तीन, गायकवाड यांनी कृषी क्षेत्राला आर्थिक मदत करणाऱ्या आर्थिक संस्था उभ्या केल्या. चार, कृषी उत्पादनाला योग्य भाव देण्यासाठी त्यांनी राज्यसंस्था शेतकरी वर्गाच्या पाठीशी उभी केली. या काही निवडक गोष्टींमधून सयाजीराव गायकवाड यांच्या विचारांमध्ये जशी आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना आहे तसेच त्यांच्या विचारांमध्ये कृषी प्रणित आयडिया ऑफ इंडियाची देखील संकल्पना आहे असे दिसते.

**महर्षी शिंदे प्रणित आयडिया ऑफ इंडिया**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांमध्ये आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना मध्यवर्ती होती. शिंदे यांनी विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात आयडिया ऑफ इंडिया संकल्पना वापरण्यास सुरुवात केली होती. शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात त्यांनी भारतीय ही संकल्पना वापरलेली आहे. या धारणे मध्ये आयडीया ऑफ इंडिया सुस्पष्टपणे दिसते. दुसरे उदाहरण म्हणजे शिंदे यांनी मार्च १९१८ मध्ये सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद मुंबईत भरवली होती. या परिषदेच्या मुख्य नावामध्ये त्यांनी अखिल भारतीय अशी संकल्पना वापरली आहे. शिंदे यांनी त्यांच्या आयडिया ऑफ इंडिया या संकल्पनेत कृषी क्षेत्र मध्यवर्ती ठेवलेले होते. या संदर्भातील काही निवडक उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

एक, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी बहिष्कृत समाजासाठी कृषीचे खेडेगावांमध्ये प्रयोग करण्याचा प्रकल्प हाती घेतला होता.

दोन, शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या परिषदा घेतल्या. शेतकऱ्यांचे मुख्य प्रश्न त्यांनी परिषदांमध्ये मांडले. तीन, शिंदे यांनी राज्यसंस्थेने कृषिक्षेत्राला पाठिंबा द्यावा अशी भूमिका घेतली होती. चार, महर्षी शिंदे यांनी स्वराज्याचा विचार गावगाड्यांमध्ये शोधला होता. शिंदे आणि गांधी यांच्या विचारांमध्ये या मुद्द्यावर फार साम्य होते.

**लोकमान्य टिळक प्रणित कृषी स्वराज्याची संकल्पना**

आधुनिक काळात लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सवाची सुरुवात केली. लोकमान्य टिळक यांनी कृषी स्वराज्याचा विचार मांडला होता. लोकमान्य टिळक विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात आमूलाग्र बदललेले होते. लोकमान्य टिळक यांनी १९१४ नंतर कृषी स्वराज्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांची चार वैशिष्ट्ये दिसतात. एक, लोकमान्यांनी स्वराज्याची संकल्पना मांडली. त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षाचा जाहीरनामा लिहिला आहे. त्या जाहीरनाम्यात त्यांनी राजकीय स्वातंत्र्याबरोबर कृषी स्वराज्याची तत्त्वेही मांडली आहेत. दोन, लोकमान्य टिळक यांनी कृषीचे आधुनिकीकरण करण्याचा विचार मांडला. तीन, राज्य संस्थेने पुढाकार घेऊन कृषीला मदत करावी अशी त्यांनी भूमिका डेमोक्रॅटिक पक्षाच्या जाहीरनाम्यात मांडली. चार, राज्यकर्त्या वर्गाने कृषी धोरण ठरवण्याचा त्यांनी विचार मांडलेला दिसतो. लोकमान्य टिळकांनी मांडलेल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या जाहीरनाम्याचा सविस्तर विस्तार पंडित नेहरूंच्या कृषी धोरणात दिसतो.



**महात्मा गांधी प्रणित आयडिया ऑफ इंडिया**

महात्मा गांधी यांची देखील आयडीया ऑफ इंडियाची एक संकल्पना होती. महात्मा गांधी यांच्या आयडीया ऑफ इंडिया या संकल्पनेत खेड्यांच्या पुनर्रचनेला मध्यवर्ती स्थान देण्यात आले होते. महात्मा गांधी यांनी कृषी हा घटक आयडिया ऑफ इंडियाचा पाया मानला होता. महात्मा गांधी यांनी कृषी या घटकाचे चार महत्त्वाचे आधार स्पष्ट केले होते. एक, खेड्यांची पुनर्रचना हा एक कृषीशी संबंधित त्यांचा प्रकल्प होता. महात्मा गांधी यांनी युरोपचे शहरीकरणाचे आणि औद्योगिकरणाचे प्रारूप नाकारले होते. दोन, कृषीवर आधारित छोटे छोटे उद्योग हा त्यांचा दुसरा महत्त्वाचा प्रकल्प होता. स्वयंपूर्ण खेड्यांची संकल्पना त्यांची कृषीप्रधान होती. तीन, कृषीची पुनर्रचना अन्नधान्य आणि आरोग्य या दोन गोष्टींशी त्यांनी जोडली होती. कृषी आधारित

जीवन पद्धती हा त्यांचा मुख्य विचार होता. चार, कृषी आणि पर्यावरण या दोन गोष्टींची सांधेजोड महात्मा गांधी यांनी केली होती. या चार घटकांमधून हरित भारत अशी धारणा महात्मा गांधींची अधोरेखित होते.

### डॉ. आंबेडकर प्रणित आयडीया ऑफ इंडिया

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची आयडी ऑफ इंडियाची एक संकल्पना सुनिश्चित आणि सुस्पष्ट होती. त्यांनी सातत्याने भारत ही संकल्पना मध्यवर्ती ठेवलेली होती. उदाहरणार्थ बहिष्कृत भारत. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांमध्ये बहिष्कृत भारत ही संकल्पना जशी औद्योगिक धोरणाशी संबंधित होती. तशीच ती कृषी धोरणाशी देखील संबंधित होती. डॉक्टर आंबेडकर यांनी अधोरेखित केलेल्या कृषी-औद्योगिक धोरणाच्या आधारे त्यांची आयडिया ऑफ इंडिया ची संकल्पना सुस्पष्टपणे व्यक्त होते.

या संदर्भातील काही निवडक उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, राज्य समाजवाद (state socialism) या संकल्पनेमध्ये डॉ. आंबेडकर यांनी शेतीशी संबंधित विचार मांडलेला होता. दोन, शेतीचे आधुनिकीकरण करण्याचा विचार डॉ. आंबेडकर यांचा होता. शेतीची उत्पादकता वाढवणे हा महत्वाचा विचार त्यांनी मांडला होता. तीन, बहिष्कृत समाजाला जमीन सरकारने द्यावी हा त्यांनी विचार मांडलेला होता. चार, कृषीला पाणी पुरवठ्याच्या आणि वीज पुरवठ्याच्या धोरणांचा पुरस्कार डॉ. आंबेडकर यांनी केला होता. या काही निवडक उदाहरणांमधून देखील त्यांच्या विचारातील आयडीया ऑफ इंडिया संकल्पनेत कृषीला जागा उपलब्ध होती असे दिसते. डॉ. आंबेडकर यांनी खेड्यांच्या पुनर्रचनेवर विश्वास ठेवला नाही. परंतु त्यांनी कृषीची पुनर्रचना करण्याचा विचार निश्चितपणे मांडला होता.

### नेहरूंची आयडिया ऑफ इंडिया संकल्पना

पंडित जवाहरलाल नेहरू यांची आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना डिस्कवरी ऑफ इंडिया या ग्रंथामध्ये स्पष्ट झालेले आहे. सुनील खिलानी यांनी नेहरूंची आयडी या ऑफ इंडिया संकल्पना स्पष्ट केलेले आहे. पंडित नेहरूंच्या आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेचा एक वैशिष्ट्यपूर्ण घटक कृषि हा होता. त्यांची आयडिया ऑफ इंडिया संकल्पना कृषी शिवाय पूर्ण होत नाही. या गोष्टीचे आत्मभान आज-काल फारच धूसर झालेले दिसते. पंडित नेहरू यांच्या आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेतील कृषीचा विचार पुढील काही तत्वांवर आधारलेल्या आहे. एक, कृषी क्षेत्राचे प्रश्न ज्या त्या वेळीच सोडविले पाहिजेत. कृषीचे प्रश्न पुढे ढकलून चालत नाहीत. दोन, कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण करण्याचा विचार नेहरूंनी मांडलेला होता. तीन, औद्योगिकीकरणासाठी चांगल्या कृषीचा विकास झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. कृषीची अधोगती म्हणजे उद्योगांची देखिल अधोगती असे त्यांचे सूत्र होते. चार, कृषी क्षेत्राला राज्यसंस्था आणि आर्थिक संस्थांचा पाठिंबा त्यांनी मिळवून दिला. पाच, आधुनिक पद्धतीच्या शिक्षणाचा उपयोग देखील त्यांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केला. सहा, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रतापगडावरती भाषणात शिवराय हे आधुनिक भारताचे एक प्रेरणा स्रोत आहेत अशी भूमिका मांडली होती. त्यांच्या या विधानाचा सरळ सरळ अर्थ शिवराय हे आयडिया ऑफ इंडिया या संकल्पनेचे एक प्रेरणास्रोत आहेत असा होतो.

### पंजाबराव देशमुख यांची आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना

पंजाबराव देशमुख यांची आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना कृषीशी संबंधित होती. पंजाबराव देशमुख यांच्या आयडीया ऑफ इंडिया संकल्पनेतील कृषी बद्दलची काही महत्त्वाची उदाहरणे पुढीलप्रमाणे दिसतात. एक, पंजाबराव देशमुख यांनी धर्माचा वैदिक वाङ्मयातील उदय आणि विकास हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी धर्माचा उदय आणि विकास शोधला आहे. परंतु या ग्रंथात त्यांनी नैसर्गिक शक्ती या कृषीशी संबंधित असणाऱ्या अधोरेखित केलेल्या आहेत. ही गोष्ट पंजाबराव देशमुख यांनी १९२६ साली स्पष्ट केली होती.

दोन, पंजाबराव देशमुख यांनी १९३३ नंतर धर्मभावना कृषी क्षेत्रामध्ये विकसित केली. त्यांनी कृषी क्षेत्रातील समस्या सोडवणे हाच धर्म भावनेचा मूळ गाभा अधोरेखित केला. पंजाबराव देशमुख यांच्या दृष्टीने शेतकऱ्यांची उन्नती हाच धर्म भावनेचा आशय होता. तीन, पंजाबराव देशमुख यांनी सहकारी चळवळीच्या मार्फत खरेदी-विक्री संस्थांचे जाळे देशभर विणले होते.

चार, पंजाबराव देशमुख यांनी सात फेब्रुवारी १९५५ रोजी भारत कृषक समाजाचे स्थापना केली. त्यांनी भारत कृषक समाजाच्या वतीने भारतीय शेतकऱ्यांचे अधिवेशन ३ एप्रिल १९९५ रोजी घेतले. ही देशमुख यांची संकल्पना भारत वाचक आहे. तसेच ही संकल्पना भारत कृषक वाचक आहे. यामुळे पंजाबराव देशमुख यांच्या विचारांमध्ये कृषी आधारित आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना मध्यवर्ती होती असे दिसते.

पाच, पंजाबराव देशमुख यांनी शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांनी शिवरायांचे प्रतीक शिक्षणासाठी निवडले. त्यांनी शिवाजी संस्थेमध्ये सुरू केला. म्हणजेच भारत कृषक समाजाचे प्रतीक शिवराय त्यांच्या दृष्टीने आहेत. हाच मुद्दा नैसर्गिक पद्धतीने शिवराय आयडीया ऑफ इंडियाचे प्रतीक आहेत असा विकसित होत जातो. हा मुद्दा विचक्षण विचारवंत पंजाबराव देशमुख यांनी विकसित केलेला आहे.

**यशवंतराव चव्हाण प्रणित आयडिया ऑफ इंडिया संकल्पना**

आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना कृषी जीवनातील अनुभवावर आधारित रेखाटण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. पंजाबराव देशमुख यांनी देखील कृषी जीवनातील अनुभवांवर आधारित आयडिया ऑफ इंडिया चे संकल्पना अधोरेखित केली होती. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी देखील कृषी जीवनातील अनुभवांवर आधारित आयडिया ऑफ इंडिया ची संकल्पना रेखाटली होती. पंजाबराव देशमुख आणि विठ्ठल रामजी शिंदे यांनी याआधी आधुनिक पद्धतीचे शिक्षण परदेशात घेतले होते. न्यायमूर्ती रानडे यांनी देखील पाश्चिमात्य पद्धतीचे शिक्षण घेतले होते. महात्मा गांधी यांनी आफ्रिका आणि युरोप येथील कृषी व्यवस्था पाहिलेली होती. तसेच शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी युरोपचा अनुभव घेतलेला होता. इतका विस्तृत अनुभव सुरुवातीच्या काळात यशवंतराव चव्हाणांचा नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पंडित जवाहरलाल नेहरू यांची आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना देखील पाश्चात्य शिक्षण पद्धतीवर आधारित विकसित झाली होती. या सर्वांपेक्षा वेगळे व्यक्तिमत्व यशवंतराव चव्हाण यांचे होते. यशवंतराव चव्हाण यांची आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना  देवराष्ट्रे या गावाच्या अनुभवातून उदयाला येते. तसेच चव्हाण यांची आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना कोल्हापूर मधील शिक्षणातून उदयास येते. त्यांच्या आयडिया ऑफ इंडिया संकल्पनेचे मूळ हे खेडे गावांशी संबंधित आहे. यामुळे यशवंतराव चव्हाण यांची आयडीया ऑफ इंडियाची संकल्पना वेगळी व कृषी संस्कृतीवर आधारलेले आहे. त्यांच्या या संकल्पनेची काही वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत. एक, यशवंतराव चव्हाण यांनी कृष्णाकाठ हे आत्मचरित्र लिहिले आहे. कृष्णाकाठ या नावामध्येच नद्यांच्या अवतीभवतीच्या कृषी संस्कृतीतील भारत असा अर्थ व्यक्त होतो. दोन, कृषी संस्कृती सामाजिक सलोखा व धार्मिक सलोखा यावर आधारलेल्या भारताची संकल्पना अधोरेखित करते. तीन, यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळ विकसित केली. चार, यशवंतराव चव्हाण यांनी कृषी क्षेत्राला राज्यसंस्थेने आर्थिक मदत करावी अशी भूमिका घेतली. पाच, यशवंतराव चव्हाण यांनी कृषी-औद्योगिक समाजाचे प्रारूप विकसित केले. आधुनिक भारताचा विकास कृषी-औद्योगिक प्रारुच्या मदतीने होईल असा त्यांचा ठाम विश्वास होता. यामध्ये कृषी औद्योगिक समझोता किंवा समतोल या गोष्टीला मध्यवर्ती ठेवलेले होते. सहा, यशवंतराव चव्हाण यांनी पुढाकार घेऊन पंडित जवाहरलाल नेहरू यांना प्रतापगडावरती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी आणले होते. तेव्हा पंडित नेहरू यांनी शिवराय हे आधुनिक भारताचे व सर्वांचे प्रेरणास्रोत आहेत अशी भूमिका घेतली होती. म्हणजेच थोडक्यात यशवंतराव चव्हाण यांनी शिवराय आणि आयडीया ऑफ इंडिया या संकल्पनांची सांधेजोड केली होती. सात, यशवंतराव चव्हाण यांना नेहरूंनी त्यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण खाते दिले होते. यशवंतराव चव्हाण यांनी तेव्हा शिवरायांच्या व्यक्तीमत्वामधून प्रेरणा घेऊन भारतीय संरक्षण खात्यात आमूलाग्र बदल केले. म्हणजेच थोडक्यात शिवरायांची ग्रँड स्ट्रॅटेजी आणि आयडिया ऑफ इंडिया यांची सांधेजोड यशवंतराव चव्हाण यांनी केली होती.

**नव भारताची संकल्पना**

नव भारताची संकल्पना (Idea of New India) एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात मांडली जात आहे. एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला जात आहे. याप्रसंगी एक चित्तवेधक प्रश्न उभा राहतो. तो प्रश्न म्हणजे महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंजाबराव देशमुख, पंडित जवाहरलाल नेहरू व यशवंतराव चव्हाण यांनी अधोरेखित केलेली कृषी-आधारित आयडिया ऑफ इंडियाची संकल्पना आज औचित्यपूर्ण आहे की नाही. या प्रश्नाचे उत्तर भारतातील सर्व नागरिकांना सारासार विचार करून द्यावे लागेल. एकविसाव्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या शेवटच्या तीन दशकांमध्ये कृषी-आधारित आयडिया ऑफ इंडिया ही संकल्पना अस्पष्ट होत गेली. कृषी-आधारित आयडी ऑफ इंडियाचा ऱ्हास होत गेला. कृषी-आधारित आयडीया ऑफ इंडिया या संकल्पनेला परिघाच्या बाहेर ढकलले गेले. या घटनेला जवळपास चाळीस वर्षे पूर्ण झाली आहेत. कृषी-आधारित आयडीया ऑफ इंडिया ही संकल्पना राज्यकर्ता वर्ग, धोरण निर्माते, धोरणाचे अंमलबजावणी करणारे प्रशासक, इलेक्ट्रॉनिक मीडिया, यांच्या विचारातून पूर्णपणे हद्दपार झालेली संकल्पना आहे. यामुळे भारतातील कृषी आधारित भूप्रदेशांची ओळख शेतकऱ्यांची आत्महत्या आणि बिमारू राज्य अशी निर्माण होत चाललेली आहे. ही विषमता व भेदभाव मुळात आयडिया ऑफ इंडिया या संकल्पनेतून कृषीआधारीत आयडीया ऑफ इंडिया वगळण्यामुळे (exclusion) झाला आहे. कृषी-आधारित आयडिया ऑफ इंडिया वगळण्याचा इतिहास पुढील काही काळात ५० वर्ष पूर्ण करणार आहे. म्हणजेच थोडक्यात कृषी क्षेत्राला वगळण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून ते आजपर्यंत जवळपास पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. यामुळे कृषी क्षेत्राच्या वाट्याला विषमता आणि भेदभाव या दोन गोष्टी आलेल्या आहेत. ही घटना उत्तर प्रदेशातील पूर्वांचल मध्ये, महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भ विभागात देखील स्पष्टपणे दिसते.

■■

**मध्ययुगातील व्यक्तींच्या नावापुढे पुण्यश्लोक उपाधी लावली गेली याची दोन उदाहरणे आहेत. छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती शाहू महाराज आणि अहिल्याबाई होळकर यांच्या नावापुढेच पुण्यश्लोक उपाधी आहे. या उपाधीवरून त्यांच्या स्वभावावर प्रकाश पडतो. त्यांच्या कारकिर्दीचा हा मनोज्ञ आढावा.**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

**डॉ.गणेश राऊत**

२०२५ च्या ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मास ३०० वर्षे पूर्ण होणार आहेत. यंदा ३१ मे २०२२ रोजी त्यांच्या जयंतीचे २९७ वे वर्ष आहे. आजही तीन शतके ओलांडत असताना आपण साध्वी अहिल्याबाईंचे कृतज्ञ स्मरण का करीत आहोत ? या प्रश्नातच त्यांचे मोठेपण दडले आहे. ज्येष्ठ वद्य सप्तमी शके १६७४ (३१ मे १७९५) या दिवशी त्यांचा जन्म झाला आणि श्रावण वद्य चतुर्दशी शके १७१७ (१३ ऑगस्ट १७९५) रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेताना होळकर घराण्याचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. 'पेशवे' या ग्रंथाचे लेखक श्रीराम साठे आणि विश्वकोश खंड क्र. २० यांच्या मदतीने अहिल्याबाईंचे कार्य समजून घेणे गरजेचे आहे.

**इतिहास** – होळकर घराण्याचा इतिहास थोडक्यात समजून घेणे गरजेचे आहे. ' पेशवे ' या ग्रंथानुसार होळकरांचे पूर्वज मथुरेत वास्तव्यास होते.मथुरा, मेवाड असा प्रवास करून हे घराणे (तत्कालीन उपनाम वीरकर) पुणे जिल्ह्यातील ' वाफ ' गावी आले. पुढे ते फलटण परगण्यातील मौजे ' होळमुरूम ' या जेजुरी जवळील गावी नीरा नदीकाठी स्थायिक झाले. जेजुरी येथील दैवत खंडोबा हे त्यांचे कुलस्वामी होय. या घराण्यातील महत्त्वाचे योद्धे आणि इतिहासकर्ता पुरुष म्हणजे मल्हारराव होळकर होत. या मल्हाररावांचे पिताश्री म्हणजे खंडूजी वीरकर खुटेकर उर्फ खंडुजी चौगुला हे होळ गावाचे ग्रामाधिकारी होते. होळ गावचे म्हणून ते पुढे होळकर



झाले. या खंडुजींचा विवाह तळोदे सुलतानपूर येथील भोजराज बारगळ यांच्या भगिनी जिवाई यांच्याशी झाला. १६९३ मध्ये त्यांना पुत्ररत्न झाले. त्यांचे नाव ' मल्हार ' असे ठेवण्यात आले. स्वपराक्रमाने त्यांनी हे नाव ' मल्हारराव ' केले.

मल्हारच्या लहानपणीच त्यांच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे मातोश्री जिवाई यांनी आपले बंधू भोजराज बारगळ यांच्याकडे जाण्याचा निर्णय घेतला. मामाच्या घरी रहात असताना मल्हारच्या गुणविशेषांची प्रचिती इतरांना येत होती. मल्हारचे लग्न तत्कालिन प्रथेप्रमाणे बालवयातच झाले. मामाश्रींच्या कन्या गौतमाबाई यांच्याशी मल्हारचा विवाह झाला. शेती आणि शेतीपूरक उद्योगात मल्हारी रममाण झाले होते. १७२१ मध्ये त्यांनी अंबाजीपंत पुरंदरे यांना एक पत्र पाठवून स्वराज्याच्या कामी हातभार लावण्याची इच्छा व्यक्त केली. हे पत्र 'ज्ञात – अज्ञात अहिल्याबाई होळकर' ग्रंथात विनया खडपेकर यांनी छापले आहे. १७२० मध्ये निजामाविरुद्धच्या लढाईतील पराक्रमाने मल्हारने पेशव्यांचे लक्ष वेधून घेतले. थोरल्या बाजीराव पेशव्यांनी मल्हारला शिलेदारी दिली. मल्हारमधील शौर्य, फौजेची टापटीप, तत्परता, चलाखी आणि चपळता पाहून सुरुवातीला १२५ घोड्यांचा मानकरी व पुढे ५०० मनसब देण्यात आली. थोरल्या बाजीरावांच्या सहवासात आणि उत्तर भारतात मल्हारीचे क्षितिज विस्तारले आणि मल्हारीचे मल्हारराव झाले.थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या काळात शिंदे आणि होळकरांचा उदय झाला. या दोघांनीही स्वपराक्रमाने आपले नाव उंचावले.

मल्हारराव माळव्याकडे वारंवार जाऊ लागले. १७२७ मध्ये मल्हाराव होळकरांकडे नर्मदा नदीच्या उत्तरेकडील प्रदेशातील अकरा महाल आले. थोरल्या बाजीरावांनी आखून दिलेल्या मार्गावर चालत मल्हाररावांनी या अकरा महलांचे ८४ महाल केले. होळकरांनी माळवा प्रांतातून मुगल वर्चस्व संपविले. माळवा मराठ्यांची कर्मभूमी झाली. भीमथडीच्या तट्टांनी माळवा व्यापला. माळव्यातील इंदूर भाग होळकरांचे मुख्य ठाणे झाले.

मल्हाररावांचे पुत्र खंडेराव (जन्म १७२३) यांचा विवाह करून देण्याचे मल्हारराव आणि गौतमाबाई यांच्या मनी आले. खंडेरावांसाठी स्थळाचा शोध सुरू झाला. बीड परगण्यातील चौंढी गावचे पाटील माणकोजी शिंदे आणि सुशिलाबाई यांच्या कन्या अहिल्याबाई यांच्याशी विवाह ठरला. अहिल्याबाई शिंदे घराण्यातून होळकर घराण्यात सूनबाई म्हणून गेल्या. लग्न झाल्यानंतर सुरुवातीचा काळ हा पोथ्या - पुराणे ऐकणे, व्रतवैकल्य आचरणे, सासू-सासऱ्यांच्या मनातील ओळखून त्याप्रमाणे कामे उरकणे यात अहिल्याबाई प्रवीण होत्या. त्यांनी आपल्या वर्तनाने सगळ्यांची मने जिंकून घेतली. अहिल्याबाईंच्या आगमनानंतर होळकर घराण्यातील आणखी एक चांगली गोष्ट घडली ती म्हणजे १७३५ मध्ये पेशव्यांनी खंडेरावांना जहागीर दिली. या जहागिरीचे सर्वाधिकार खंडेरावांस देण्यात आले. १७४० मध्ये खंडेरावांस शिलेदारी मिळाली. मल्हाराव आपल्या पुत्राचे प्रशिक्षण करीत होतेच. खंडेराव स्वतंत्रपणे युद्धभूमीवर जाऊ लागले. या निमित्ताने अहिल्याबाईंना रणभूमीचे दर्शन घडले. आपली सून अन्यांपेक्षा वेगळी आहे हे भारत गाजविणाऱ्या मल्हाररावांच्या लक्षात आले होते. मल्हाररावांनी तिच्याही प्रशिक्षणास सुरुवात केली. नोकरांवर वचक ठेवणे, सांडणीस्वारांची व्यवस्था पाहणे, राज्याच्या खर्चासाठी पैसा उभारणे, जखमी सैनिकांवर औषधोपचार करण्याच्या पद्धती या सगळ्या गोष्टी अहिल्याबाईंनी शिकून घेतल्या. होळकर घराण्यात नवऱ्याच्या उत्पन्नात स्त्रीचा वाटा राखून ठेवण्याची



पद्धत होतीच मात्र मल्हाररावांनी होळकरांचा खजिनाच अहिल्याबाईंच्या ताब्यात दिला. याच दरम्यान १७४५ मध्ये अहिल्याबाईंना पुत्ररत्न (भालेराव) झाले आणि तीन वर्षांनी १७४८ मध्ये कन्यारत्न ( मुक्ताबाई) झाले.

या सगळ्या काळात अहिल्याबाई कारभारात आब राखून होत्या. पंढरपूर देवस्थान संदर्भात पाठविलेल्या पत्रात सुद्धा त्यांचा करारीपणा दिसून येतो. असे सगळे आनंदात चालू असतानाच अहिल्याबाईंचे पती खंडेराव कुंभेरीच्या लढ्यात तोफेच्या गोळ्याला बळी पडले. होळकर कुटुंबियांवर नियतीने जणू घावच घातला. मल्हाररावांनी मुलाच्या मृत्यूनंतर ते स्थान आपल्या सूनबाईंना दिले. अहिल्याबाई राज्य कारभार पाहू लागल्या. मल्हारराव कोठेही स्वारीवर असले तरी पत्रव्यवहाराच्या माध्यमातून ते अहिल्याबाईंना मार्गदर्शन करीत होते. अशातच राघोबादादा पेशवे यांनी सर्वांच्या मदतीने अटकेपार झेंडे लावले. पुढे पानिपत युद्धाचा मराठी राज्यावर आघात झाला आणि त्याचे परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागले.

या घटनेची प्रतिक्रिया अहिल्याबाईंच्या मनातही उमटली. भविष्यातील घटना आणि इंग्रजांचा उदय, १७६४ बक्सारची लढाई यामुळे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना तोफखान्याकडे विशेष लक्ष देण्यास सुचविले. अहिल्याबाई त्याप्रमाणे कामास लागल्या. विनया खडपेकरांनी या संदर्भात जे भाष्य केले त्यावरून या दोघांच्याही मनोवृत्तीवर प्रकाश पडतो. त्या लिहितात - " मल्हारराव आणि अहिल्याबाई या सासरा - सुनेचे भावबंध म्हणजे अपूर्व असा तिहेरी गोफ होता. ते गुरु - शिष्य होते. बाप - लेक होते. आणि स्वामी - सेवकही होते. एकमेकांविषयी आदर बाळगून, एकमेकांची कदर करीत, न पटणाऱ्या खाचाखोच्यांच्या जागी सावधपणे संघर्ष पेटू न देता, एकमेकांवर विश्वास टाकत त्यांचा कारभार कसा एकदिलाने चाललेला होता."

१७६४-६५ च्या दरम्यान अहिल्याबाईंमधील युद्धनेतृत्वाची चुणूक गोहद येथे दिसून आली. ग्वाल्हेरच्या जवळ असणाऱ्या गोहद राज्यास धडा शिकवण्यासाठी त्यांनी

गोहदकरांच्या एका गढीवर तोफा रोखल्या. गोहदकरांना हा इशारा पुरेसा होता. ३ मे १७६५ च्या कारा उर्फ कुराच्या लढाईत होळकरांचा इंग्रजांकडून पराभव झाला. गनिमी कावा तंत्र इंग्रजांच्या आधुनिक तोफा आणि प्रशिक्षित सैन्यासमोर अपुरे पडले. याचा मोठा धक्का होळकरांना बसला. अहिल्याबाईंनी ओळखले की आधुनिकतेची कास न धरल्यास ' ज्याचे हत्यार श्रेष्ठ त्याची संस्कृती श्रेष्ठ ' हे दिवस येणार. २० मे १७६६ रोजी मराठी दौलतीला आणखी एक धक्का बसला तो म्हणजे मल्हाररावांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी आलमपूर गावी अखेरचा श्वास घेतला त्याचे नाव ' मल्हारनगर ' करण्यात आले. ' आया मल्हार ' अशी शत्रूच्या उरात धडकी भरवणारी बातमी कायमची अंतर्धान पावली.

होळकरांच्या सत्ताविस्ताराची सगळी जबाबदारी मालेराव यांच्यावर कागदोपत्री आली. सारे काही अहिल्याबाईंनाच निभावून न्यावे लागणार होते. मालेराव राज्यकारभार करू लागले आणि एक वर्षातच त्यांचा मृत्यू झाला. कौटुंबिक आघात, होळकरांच्या राज्याचे प्रश्न, वारसदार असे कितीतरी प्रश्न आ वासून उभे राहिले. अहिल्याबाईंनी या सगळ्यात बदल आणि सोयीस्कर जागा म्हणून महेश्वर नगरीची निवास म्हणून निवड केली. पूर्वी महेश्वर हे ठिकाण ' माहिष्मती ' म्हणून ओळखले जायचे. महेश्वरच्या भुईकोट किल्ल्यातून रोज नर्मदा नदीचे दर्शन घेऊन बाईंचा कारभार सुरू झाला. याच वेळी होळकरांचे कारभारी दिवाण गंगोबातात्या राघोबादादांशी संधान साधून होळकरांच्या सत्तेला अहितकारी ठरतील अशा गोष्टी करू लागले होते. नाक दाबले की तोंड उघडते या नियमान्वये अहिल्याबाईंनी थोरले माधवराव पेशव्यांस पुण्याला पत्र पाठवून तुकोजी होळकर यांच्या नावे परवानगी मागितली. राघोबांना पुढील शब्दात निरोप पाठवला की " खावंदांनी उगीच बाई माणसाशी लढायला येऊ नये. त्यात तुमचा मान राहणार नाही!आणखी अब्रू जाईल." रघुनाथरावांनी निरोप पोहोचताच प्रत्यक्ष भेटीत माघार घेतली. अहिल्याबाई मुलकी कारभार आणि तुकोजी होळकर लष्करी मोहिमांची जबाबदारी घेणार असे ठरले. या दिवशीच त्यांनी प्रतिज्ञा घेतली.

**" माझे कार्य प्रजेला सुखी करणे आहे. माझ्या प्रत्येक कृतीला मी स्वतः जबाबदार आहे. सत्तेच्या अधिकारामुळे मी येथे जे जे काही करत आहे त्या प्रत्येक कृत्याचा जाब मला परमेश्वरापुढे देणे आहे. परमेश्वराने ज्या जबाबदाऱ्या माझ्यावर सोपवल्या आहेत,त्या मला पार पाडावयाच्या आहेत."**

( संदर्भ – खडपेकर, पृ.७४)

कारभार हाती घेतल्यावर बाईंनी सरदार शिंदे यांना तीस लाख रुपयांचे कर्ज देऊन या घराण्यास सावरले. कारभार अधिकाधिक निर्दोष करण्याचा प्रयत्न केला. सामान्यातल्या



सामान्य माणसाची दखल घेऊन त्याला न्याय दिला. चित्रकूट पर्वतावर मंदिर बांधकाम, भगवान श्रीराम मूर्ती, रामपंचायतन, शेकडो धार्मिक ग्रंथांचे ग्रंथालय उभारणे, भारतभर प्रमुख राज्यात वकील नेमणे, नर्मदेच्या तीरावर घाट बांधणे इत्यादी कामांना त्यांनी गती दिली. मराठेशाहीतील यादवी, अंतर्गत वाद, शिंदे-होळकरांमधील स्पर्धा, पुणे दरबारातील ईर्षा यावर विधायक कामे हाच उपाय होता. यातूनच त्यांनी १७८३ च्या सुमारास गया क्षेत्री देवालय निर्मिती सुरू केली आणि त्यात स्वतःला गुंतवून घेतले. १७८५ मध्ये गयेला विष्णुपदाचे देवालय तयार झाले. शंभर फूट उंच, घुमटाकार छत,सोन्याचा कळस असे भव्य दिव्य बांधकाम झाले. मंदिराच्या आवारातील दुसऱ्या वास्तूस लोक आदराने अहिल्याबाईंचा वाडा म्हणू लागले. काशी येथील घाट, गंगेवर मनकर्णिका घाट,सोरटी सोमनाथ मंदिराचे बांधकाम, कोल्हापूरच्या देवी महालक्ष्मीच्या खर्चासाठी तरतूद इत्यादी गोष्टी त्यांनी आवर्जून केल्या. आपण होळकरांच्या राज्याचे विश्वस्त आहोत हे त्या कधीही विसरल्या नाहीत. त्यासाठी त्या सत्ता राखून होत्या. ही सत्ता त्यांना त्यांच्या धवल चारित्रातून मिळाली. तुकोजी होळकर, नाना फडणीस, महादजी शिंदे, पेशवे इत्यादी पुरुषप्रधान राजकारण क्षेत्रात त्यांनी कधी माघार घेतली नाही. यामुळेच दिल्लीचा बादशहा होळकरांशी स्वतंत्र पत्रव्यवहार करीत असे. शीख - राजपुत यांचाही अहिल्याबाईंशी स्वतंत्र पत्रव्यवहार होता. सर्वसामान्य प्रजेमुळे आपण आहोत हे त्या कधीही विसरल्या नाहीत.इंदूर, महेश्वर, उज्जैन येथे राहूनही त्यांची दृष्टी भारतभर होती, अथक परिश्रम करून स्वतःचे नाव अजरामर केलेल्या अहिल्याबाईंनी १३ ऑगस्ट १७९५ रोजी अखेरचा श्वास घेतला.



**कारकीर्द विशेष –** अहिल्याबाईंनी सारा पद्धती लोकांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने सौम्य करण्याचा प्रयत्न केला. पाटील - कुलकर्णी यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करणे, गावोगावी न्याय करणारे पंच नेमणे, पडीक जमीन लागवडीस प्रोत्साहन देणे, जमीन करार - पट्ट्याने देणे, पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधणे, महेश्वरमध्ये वस्त्रोद्योगास पाठिंबा देणे, टाकसाळीत नाण्यावर बिल्वपत्र व शिवलिंग छापणे, आसेतु हिमाचल अन्नछत्र उघडणे, विहीर खोदणे व त्या चिरेबंद करणे, पाणपोया - धर्मशाळा - पांथशाळा - आश्रमशाळा उभारणे, जनावरांसाठी उपचार व्यवस्था, सर्पदंशावर तात्काळ उपचार व्यवस्था, नदीच्या घाटावर स्त्रियांच्या स्नानाची व कपडे बदलण्याची व्यवस्था, मुंग्यांना साखर व जलचरांस कणकेच्या गोळ्या खाऊ घालणे, सढळ दानधर्म, सणवारास अन्नदान, कपडे वाटप, थंडीत उबदार कपडे वाटप इ. कामे त्यांनी सहज केल्याचे विश्वकोशात नमूद केले आहे.

मंदिर बांधकामातील त्यांचा पुढाकार म्हणजे अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, ऋषिकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे उभारली. सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ, काशिविश्वेश्वर विष्णुपाद, महाबळेश्वर मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग,पुणतांबे, चौंढी, नाशिक जांब (इंदूर), त्रंबकेश्वर येथील नद्यांना विस्तीर्ण घाट बांधले. गोकर्ण महाबळेश्वर, उज्जयिनी, रामेश्वर, भीमाशंकर येथे अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे - चार धाम येथे घाट, बागा, मंदिर, कुंड, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली. जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव - गौतमाबाई यांची छत्री, महेश्वरला मुक्ताबाईंची आठवण जपणारे मंदिर,कुंभेरीजवळ खंडेरावांची छत्री इ.बांधकामे त्यांनी आवर्जून केली.

दुर्मिळ ग्रंथसंग्रह गोळा केला त्यात निर्णयसिंधु, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा महात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास महात्म्य यांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांच्या सत्कारातील प्रमुख दोन नावे म्हणजे मोरोपंत कवी आणि शाहीर अनंतफंदी हे नावे पुरेशी प्रतिनिधीक आहेत.

**अन्य कार्य –** अंबागाव मंदिरात तेलवातीची व्यवस्था, आनंद - कानन येथील ज्योतिर्लिंग मंदिराचा जीर्णोद्धार, पंचवीस हजार रुपये खर्चून मनकर्णिका घाट बांधणे, गंगोत्री येथे चार मंदिरांचे बांधकाम व सहा धर्मशाळा, चिखलदरा येथे नर्मदा परिक्रमा करणारांसाठी अन्नछत्र, जगन्नाथपुरी मंदिराची व्यवस्था, देवप्रयाग येथे समुद्रसपाटीपासून २२३६ फूट उंचावर सदावर्त सुरू करणे अशी कितीतरी कामे त्यांनी केली. या सगळ्यामुळे त्यांचे नाव येथे नित्यस्मरणीय झाले.

■■




# बिहारमध्ये काहीतरी शिजतंय?

सध्या रमझानचा पवित्र महिना सुरु आहे. यानिमित्ताने दैनंदिन रोजे म्हणजेच उपवास सोडण्यासाठी 'इफ्तार'चे आयोजन केले जाते.

राजकीय पक्षांनी या 'इफ्तार'चे राजकारण सुरु केले.

अगदी काही राजकीय पक्षांनी तर हे निमित्त साधून आपल्या संभाव्य राजकारणाची दिशा ठरविण्यासाठी देखील या प्रसंगाचा उपयोग केला.

दिल्लीमध्ये एकेकाळी इफ्तारचे स्वरुप इतक्या मोठ्या प्रमाणात राजकीय झाले की शेवटी काही मुस्लिम विचारवंतांनी त्याबाबत हरकती घेतल्या आणि त्याचे 'राजकीय उत्सवी' स्वरुप कमी करण्यात आले. अन्यथा प्रत्येक राजकीय पक्षातर्फे, काही मातब्बर राजकीय नेत्यांतर्फे इफ्तारचे आयोजन होत असे, त्यात स्वतःचे राजकीय शक्तिप्रदर्शन केले जात असे. या सर्व ठिकाणी पत्रकारांना मुक्त प्रवेश असल्याने त्या इफ्तारच्या चविष्ट बातम्या वाचकांपर्यंत पोहोचत असत व संबंधित राजकीय पक्ष किंवा राजकीय नेत्यांना भरपूर प्रसिध्दीही मिळत असे.



सध्याच्या राज्यकर्त्यांना असलेल्या ॲलर्जीमुळे हे प्रकार दिल्लीत तरी अतिशय मोजके व मर्यादित झाले आहेत. पण आपण जाऊ बिहारमध्ये............राजधानी पाटण्यात! बिहारमध्ये इफ्तार राजकारण तूर्तास तरी जोरात असल्याचे दिसते.

२२ एप्रिल रोजी बिहारमधील विरोधी पक्षनेते व लालूप्रसाद यांचे राजकीय वारस तेजस्वी प्रसाद यांनी इफ्तारचे आयोजन केले होते.

विरोधी पक्षनेते म्हटल्यावर बिहारमधील अतिविशिष्ट निमंत्रितांमध्ये मुख्यमंत्र्यांपासून सर्वांची नावे असणेही स्वाभाविकच होते. त्यामुळे मुख्यमंत्री नीतीशकुमार यांना या इफ्तारचे रीतसर आमंत्रण पाठविण्यात आले.

आता ते या इफ्तारला हजर राहतात की नाही याची उत्सुकता राजकीय वर्तुळात अनेकांना होती.

कारण??

१५ एप्रिलला नीतीशकुमार यांनी आयोजित इफ्तारला तेजस्वी प्रसाद हे हजर राहू शकले नव्हते. म्हणूनच आता नीतीशकुमार काय करतात याकडे सर्वांच्या नजरा होत्या.



परंतु २२ तारखेच्या तेजस्वी प्रसाद यांच्या इफ्तारमध्ये नीतीशकुमार सहभागी झाले. दोन्ही नेत्यांमध्ये सदिच्छांची देवाणघेवाण झाली.

२०१७ मध्ये नीतीशकुमार यांनी आकस्मिकपणे राष्ट्रीय जनता दलाबरोबरचे संबंध तोडले होते. त्यामागे तेजस्वी यांच्याबद्दलच्या काही आरोपांचे कारण होते व तेव्हापासून दोन्ही पक्षात अतिकडवटपणा निर्माण झाला होता. पण गंगेतून बरेच पाणी वाहून गेले आहे.

दोन्ही नेत्यांमधील सौहार्द नजरेत



भरणारे होते. यानंतर २८ एप्रिलला नीतीशकुमार यांच्याच पक्षाचे नेते सलीम परवेझ यांनी आयोजित केलेल्या इफ्तारला तेजस्वी, त्यांचे बंधू तेज प्रताप हे दोघेही हजर राहिले. नीतीशकुमार देखील हजर होते. येथेही दोन्ही नेत्यांमध्ये अत्यंत चांगल्या रीतीने संवाद झाल्याचे सांगण्यात आले.

नीतीशकुमार यांनी तेजस्वी प्रसाद यांना दरवाज्यापर्यंत जाऊन निरोप दिला. त्यानंतर तेज प्रताप मागाहून येत होते. त्यांच्यासाठीही काही काळ थांबले व त्यांनाही निरोप दिला.

लालूप्रसाद यांच्यावर दिल्लीत उपचार सुरु असल्याने ते कोणत्याच इफ्तारला उपस्थित राहू शकले नाहीत.

पण राष्ट्रीय जनता दल आणि जनता दल (युनायटेड) यांच्यातील या वाढत्या आपुलकी व जवळिकीने भाजपमध्ये अस्वस्थता वाढलेली आहे.

दुसरीकडे नीतीशकुमार यांनी आता प्रदीर्घ मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीनंतर निरवानिरवीची भाषा सुरु केल्याने देखील त्यांच्या पक्षात काहीशी खळबळ आहे. कारण गेल्या काही दिवसात त्यांनी त्यांच्या लोकसभा व विधानसभा मतदारसंघांमध्ये जाऊन तेथील लोकांना आतापर्यंत त्यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानले.

याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न सुरु आहे. एकतर नीतीशकुमार यांना म्हणे उपराष्ट्रपतिपदाची 'ऑफर' भाजपकडून देण्यात आली आहे. त्यामुळे बहुधा ते आता बिहारमधून राष्ट्रीय पातळीवर जाण्याची तयारी करीत असावेत.

किंवा त्यांना राजकीय धक्के देण्याची जी सवय आहे त्यानुसार त्यांच्या मनात काहीतरी घोळत असावे!

गेल्या काही काळापासून त्यांचे व भाजपचे संबंध फारसे चांगले राहिलेले नाहीत. अनेक मुद्यांवर नीतीशकुमार यांनी भाजपपेक्षा वेगळी भूमिका घेतलेली असल्यानेच आगामी काळात ते कोणते राजकीय पाऊल उचलतात याचा अंदाज त्यांचे समर्थक बांधू लागले आहेत. पाहूयात, नीतीशकुमार आता कोणती नवी खेळी खेळण्याच्या तयारीत आहेत ते!

## निर्दयी राज्यकर्ते

मायाधर राऊत हे एक प्रख्यात ओडीशी नृत्य कलाकार आहेत. २०१० मध्ये त्यांचा पद्मश्री देऊन सन्मान करण्यात आला. जे कलाकार दिल्लीत वास्तव्य करु इच्छितात त्यांना केंद्र सरकारतर्फे निवासस्थान दिले जाते.

त्या योजनेअंतर्गत गुरु मायाधर यांनाही दक्षिण दिल्लीत निवासस्थान मिळाले होते.

जरी ही निवासस्थाने काही मुदतीसाठी असली तरी कलाकारांना मुदतवाढ दिली जाते. मायाधर यांच्या निवासस्थानाची मुदत २०२० मध्ये संपली. त्यानंतर दोन वर्षे मुदतवाढही देण्यात आली.

परंतु मायाधर यांचे वय आता ९० आहे. त्यांची प्रकृति आणि वैद्यकीय उपचारासाठी त्यांना आणखी काही काळ मुदतवाढ हवी होती.

सध्याचे केंद्र सरकार म्हणे नियमाचे फार पक्के आहे. त्यामुळे त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयाकडे जाऊन गुरु मायाधर यांच्या हकालपट्टीची नोटिस मिळवली. एवढेच नव्हे तर दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांना २५ हजार रुपयांचा दंडही सुनावला आहे. याबरोबर केंद्र सरकारचे कर्मचारी गुरु मायाधर यांच्या घरी गेले आणि त्यांनी त्यांचे सामान रस्त्यावर काढले. ९० वर्षांच्या





मायाधर राऊत यांना धड चालताही येत नाही. त्यात दिल्लीत मरणाचा उन्हाळा सुरु आहे. परंतु दिल्लीपति राज्यकर्त्यांना काही फरक पडत नाही. कलाकारांसाठी म्हणून जवळपास सत्तावीस ते तीस घरे राखीव ठेवण्यात आली आहेत.

सध्या त्यातील निम्मीच घरे भरलेली आहेत व उरलेली रिकामी आहेत. म्हणजेच मायाधर राऊत यांना आणखी मुदतवाढ दिल्याने आकाश कोसळणार नव्हते. परंतु राज्यकर्त्यांमध्ये राज्यकारभाराबरोबरच माणुसकी देखील असावी लागते. तीच सध्या गायब आहे! पूर्वीचे किस्से यावेळी आठवल्याखेरीज रहात नाहीत.



अटलबिहारी वाजपेयींना मूत्रपिंडाचा गंभीर आजार झाला होता. त्यावेळी अमेरिकेत अत्याधुनिक उपचार व्यवस्था होती. राजीव गांधी यांनी अटलजींचा समावेश संयुक्त राष्ट्रसंघाला जाणाऱ्या शिष्टमंडळात केला आणि त्या वास्तव्यात उपचार करुन घ्यावेत असे त्यांना सांगितले होते. याचा उल्लेख वाजपेयी नेहमी करीत असत.

काँग्रेसचे माजी अध्यक्ष सीताराम केसरी यांची खासदारकी गेल्यानंतर दिल्लीत त्यांच्याकडे राहण्यासाठी घर नव्हते व वैद्यकीय उपचार चालू असल्याने त्यांची अडचण झाली होती. पण वाजपेयी त्यावेळी पंतप्रधान



होते आणि त्यांनी केसरी यांना त्यांचा खासदार निवास उपचार चालू असेपर्यंत कायम ठेवण्यास सांगितले होते. याला औदार्य व माणुसकी म्हणतात. दुर्दैवाने आताच्या राज्यकर्त्यांमध्ये ती तिळमात्र राहिलेली नाही!

# आता करोना विषाणू संशोधनातही केंद्रीकरण??

वर्तमान राज्यकर्त्यांमध्ये केंद्रीकरणाच्या रोगाची लागण मोठ्या प्रमाणात आहे.

प्रशासनात आणि इतरही विविध क्षेत्रात सर्व सूत्रे आपल्याच हाती कशी राहतील यासाठी सध्याच्या राज्यकर्त्यांनी सातत्याने प्रयत्न चालवले आहेत. वेगवेगळे कायदे करुन केंद्र सरकारच्या हाती अंतिम सत्ता व अधिकार कसे राहतील हे प्रकारही त्यांनी केले आहेत व करीत आहेत.




करोनाचा विषाणू हा अतिजलगतीने आपले स्वरुप बदलतो हे आता जागतिक पातळीवर मान्य झाले आहे. त्यामुळेच मूळ करोना साथीच्या नंतर करोना विषाणूच्या सुधारित आवृत्तीने म्हणजेच डेल्टा विषाणूने दुसऱ्या लाटेत प्रचंड धुमाकूळ घातला आणि असंख्य-अगणित लोकांचे प्राण घेतले. त्यानंतर ओमिक्रॉन नावाच्या विषाणूच्या तिसऱ्या आवृत्तीचा उदय झाला. परंतु त्याचा फारसा त्रास लोकांना झाला नाही. तर साध्या माणसाच्या भाषेत सांगायचे झाल्यास हा विषाणू सभोवतालचे वातावरण आणि अन्य घटकांनुसार आपले स्वरुप बदलतो हे सिध्द झाले आहे. म्हणजेच मुंबईच्या वातावरणाशी जुळलेला करोना विषाणू हा कदाचित पुणे किंवा नाशिक किंवा अन्यत्र सापडणाऱ्या करोना विषाणूसारखाच हुबेहूब असेल असे खात्रीशीरपणे सांगता येणार नाही. त्यामध्ये काहीतरी बदल असेल आणि त्यामुळेच त्यावरील उपचार पध्दती देखील वेगवेगळी राहू शकते.

या विविध विषाणूंची क्रमवारी आणि त्यांच्या स्वरुपाची माहिती एकत्र, संकलित करणे, त्याचे विश्लेषण करणे आणि त्या आधारे संबंधितांना उपचार पध्दतीबाबत मार्गदर्शन करणे या उद्देशाने केंद्र सरकारने देशातील २८ प्रयोगशाळांना जोडणारी एक केंद्रीय यंत्रणा उभारली आहे.

या केंद्रीय यंत्रणेकडे या प्रयोगशाळांनी त्यांच्या परिसरातील विषाणूंचे नमूने, त्यामुळे होणाऱ्या आजाराची लक्षणे, प्रत्यक्ष आजाराचे स्वरुप वगैरे माहिती पाठवली जाते.

परंतु कोणत्याही वैज्ञानिक प्रक्रियेत माहितीची जास्तीतजास्त देवाणघेवाण ही संबंधित संशोधनाला मोठ्या प्रमाणात मदत करीत असते. त्यातूनच निष्कर्ष काढणे अधिक सुलभ होतेच परंतु त्या निष्कर्षात दोषाचे प्रमाण कमी राहते असा अनुभव आहे.

परंतु सध्याच्या केंद्रित सत्तेला हे मान्य नाही. त्यांच्या आदेशानुसार प्रयोगशाळांनी त्यांची माहिती केंद्रीय यंत्रणेकडे पाठविल्यानंतर ती केंद्रीय यंत्रणा त्यावर अध्ययन, संशोधन, विश्लेषण या प्रक्रिया करुन त्याचे निष्कर्ष जाहीर करते व त्याचे अनुसरण इतरांनी करणे अपेक्षित आहे.

व्वा, काय आदेश आहे! तोही एका जीवघेण्या विषाणूच्या संशोधनाबद्दल! यासंदर्भात विविध प्रयोगशाळांच्या संशोधकांनी आपली नाराजी प्रकट केली आहे. आम्ही माहिती पाठवतो त्याचप्रमाणे इतरांनी पाठवलेली माहितीही आम्हाला मिळाल्यास व त्यावर व्यापक चर्चा व आदानप्रदान झाल्यास या रोगावर हमखास इलाज शोधण्यास मदत होईल.

परंतु केंद्र सरकारने ते साफ नाकारले आहे. केंद्रीय यंत्रणेकडून झालेले संशोधन व विश्लेषणच अंतिम असेल असा त्यांचा निर्णय आहे.

काही संशोधकांनी तर फटकळपणे म्हटले आहे की केवळ






केंद्रीय यंत्रणेलाच सर्व ज्ञान आहे आणि आम्ही बाकीचे अज्ञानी आहोत असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे काय?

या संशोधकांची तक्रार योग्यच आहे. पण त्यावर केंद्र सरकारचे अधिकारी मखलाशी करताना म्हणाले की अशी माहिती मुक्तपणे संबंधितांना दिली व ती कुठे कुणाकडून बाहेर फुटली तर ते अवघड व अडचणीचे होईल. म्हणून ही केंद्रित व्यवस्थाच ठीक आहे.

आता मुद्दा लक्षात घ्या!

केंद्रित व्यवस्थाच या राज्यकर्त्यांना हवी आहे. करोनासारख्या गंभीर आजाराबाबत देखील हे सरकार मोकळेपणाने आणि व्यापक रीतीने विचार करु शकत नाही. त्यांना सर्व अधिकार व सूत्रे स्वतःच्या हातात ठेवायची आहेत.

अशा केंद्रीकरणाच्या रोगाने पछाडलेल्या सरकारपासून सामान्य माणसाने स्वतःला वाचवायचे कसे?

करोनाच्या दुसऱ्या लाटेत किडामुंगी सारखी माणसे मेली पण राज्यकर्ते बिनधास्त राहिले. या मृत्युंना जबाबदार कोण? तुम्हाला आठवतंय ना? नोटाबंदीनंतर नोटा बदलण्यासाठीच्या लायनीत उभे राहून दीडशे भारतीय नागरिकांनी प्राण गमावले. त्याला जबाबदार कोण? नोटाबंदी करणारे राज्यकर्तेच ना? मग करोनाबाबत त्याचीच पुनरावृत्ती होणार काय?

## सुषमा स्वराज यांच्या वारसदार कोण???

भाजपमध्ये एकेकाळी राजमाता विजयाराजे यांना एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान होते. भाजपचा महिला चेहरा कोण असा प्रश्न केल्यानंतर राजमाता विजयाराजे यांचेच नाव अपरिहार्यपणे समोर येत



असे. त्यांचे ते स्थान पक्षातील सर्वांनीच निर्विवादपणे मान्य केलेले होते.

विजयाराजे यांच्यानंतर ते स्थान सुषमा स्वराज यांना प्राप्त झाले.

सुषमा स्वराज यांची उत्तम वक्त्या म्हणून ख्याति होती. हिंदी व इंग्रजीत अस्खलितपणे त्या बोलत.

कर्नाटकातील बल्लारी मतदारसंघात त्या सोनिया गांधी यांच्या विरोधात उभ्या राहिल्या होत्या. त्यावेळी अल्पावधीत त्यांनी कन्नड भाषा शिकून व त्या भाषेत भाषणे देऊन सर्वांना चकित केले होते. गुजरातमध्ये त्यांना



स्टार प्रचारक म्हणून पाठविल्यानंतर त्यांनी तेथेही गुजराती भाषेतून भाषणे करुन सर्वांनाच धक्का दिला होता.

शरद पवार यांना 'शरदराव' किंवा कधीकधी 'शरदभाऊ' म्हणूनही त्या संबोधत. पण आता या दोन्ही महिला नेत्या हयात नाहीत. त्यांची जागा कोण घेणार?

सध्या भाजपमध्ये वरिष्ठ मंत्र्यांमध्ये अर्थमंत्री निर्मला सीतारामन या एक आहेत. तर त्यांच्यानंतर वस्त्रोद्योगमंत्री




स्मृति इराणी यांचेही नाव घेतले जाते.

याखेरीज मंत्र्यांमध्ये मीनाक्षी लेखीही आहेत. परंतु विजयाराजे किंवा सुषमा स्वराज यांच्यासारखे त्यांचे स्थान अद्याप निर्माण झालेले नाही.

निर्मला सीतारामन या इंग्रजीभाषक आहेत व हिंदी त्या बोलत असल्या तरी त्यात सफाईदारपणा नाही. पण त्यांना अर्थशास्त्र कळते असे म्हणतात व त्यामुळेच ते ती जबाबदारी सांभाळत आहेत.

स्मृति इराणी या महत्वाकांक्षी महिला नेत्या आहेत. त्यांना उच्चपद:स्थांचा वरदहस्तही लाभलेला आहे. मुख्य म्हणजे त्या बहुभाषिक आहेत. त्यांना मराठी, गुजराती, हिंदी, इंग्रजी या भाषा अवगत आहेत व त्यात त्या सफाईदारपणे बोलू शकतात. बंगाली भाषाही त्यांना येते व त्यांनी पश्चिम बंगालमध्ये भाषणेही केली आहेत. असे असले तरी निर्मला सीतारामन किंवा स्मृति इराणी या सुषमा स्वराज यांची जागा घेऊ शकलेल्या नाहीत याचे कारण दोघीही शीघ्रकोपी आहेत. सुषमा स्वराज यांचा स्वभाव आक्रमक होता परंतु रागीट किंवा शीघ्रकोपी नव्हता. समोरच्याने कितीही चिथावले तरी त्याचा शांतपणे मुकाबला करण्याची त्यांची विशेष हातोटी होती. या दोन महिला नेत्यांमध्ये या गुणाचा अभाव आहे.

निर्मला सीतारामन यांची शैक्षणिक बाजू उजवी आहे. त्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या स्नातक होत्या.

स्मृति इराणी यांची शैक्षणिक बाजू हिणकस



आहेच परंतु वादग्रस्तही आहे. निर्मला सीतारामन केवळ त्यांच्या आढ्यतेखोर आणि विरोधी पक्षांना तुच्छ लेखण्याच्या त्यांच्या चेहऱ्यामुळे अप्रिय आहेत. परंतु स्मृति इराणी यांनी वादग्रस्त विधाने करुन स्वतःची प्रतिमा मलिन करुन घेतलेली आहे.

आता कानोकानी आलेल्या माहितीनुसार असे समजते की स्मृति इराणी यांनी त्यांच्या नव्याने प्रतिमानिर्मितीसाठी काही लोकसंपर्क संस्थांची(पब्लिक रिलेशन्स फर्म) मदत घेण्यास सुरुवात केली आहे. शीघ्रकोपीपणा, आक्रस्ताळेपणावर मात करुन समोरच्याचा शांतपणे प्रतिवाद कसा करायचा याचे धडे त्यांनी या संस्थांकडून घेण्यास सुरुवात केल्याचे समजते. त्याचे उदाहरण म्हणून अलीकडेच त्यांना विमानप्रवासात एका महिला काँग्रेस कार्यकर्तीने महागाईबाबत काही प्रश्न केले असता त्यांनी शांतपणे कशी उत्तरे दिली याचे व्हिडिओ सोशल मीडियावर पसरविण्यात आले होते. तो या प्रतिमानिर्मितीचाच भाग होता असे सांगतात.

स्मृति इराणी यांनी त्यांच्या आक्रमक आणि आक्रस्ताळ्या विधानांमुळे कुप्रसिध्दी मिळवली होती. परंतु आता त्यांनी बहुधा त्यात बदल करण्याचे ठरविलेले असावे.

भाजपला महिला नेत्याचा चेहरा हवाच आहे. त्यादृष्टीने ही तयारी असावी. भाजपच्या सर्वोच्च निर्णय मंडळात म्हणजेच संसदीय मंडळात विजयाराजे, सुषमा स्वराज होत्या. आता ती जागा रिकामी आहे. तेथे कुणाची वर्णी लागेल तो भाजपचा महिला चेहरा मानावा लागेल.

मीनाक्षी लेखी या बऱ्याच लहान व तुलनेने राजकीय नवख्या आहेत. परंतु त्यांचे स्मृति इराणी यांचे फारसे सख्य नसल्याची चर्चा पक्षातून ऐकू येते. अर्थात या इतर गोष्टी झाल्या.



सुषमा स्वराज यांच्या जागी कोण? त्यांच्या वारसदार कोण याची उत्सुकता सर्वांनाच आहे!

## हिमाचल प्रदेशाला नवा चेहरा मिळणार?

या वर्षाच्या अखेरीला हिमाचल प्रदेशात विधानसभा निवडणुका अपेक्षित आहेत. सध्या तेथे भाजपचे सरकार आहे आणि जयराम ठाकूर हे मुख्यमंत्री आहेत. ही त्यांची पहिलीच कारकिर्द आहे.

हिमाचलमध्ये वीरभद्रसिंग हे काँग्रेसचे अनभिषिक्त नेते होते. परंतु त्यांचे निधन झाल्याने काँग्रेसकडे तेवढ्या तोलामोलाचा नेता नसल्याने नेतृत्वाची एकप्रकारे पोकळीच आहे.

स्वाभाविकपणे भाजपला विजयासाठी फारसे परिश्रम करावे लागतील अशी स्थिती तूर्तास आढळत नाही. परंतु भाजपकडे स्थिती उलटी आहे. तेथे नेतृत्वाची पोकळी तर नाहीच पण वाजवीपेक्षा नेत्यांची गर्दी आहे. त्यामुळे भाजपकडे मुबलक नेत्यांची समस्या आहे.

भाजपचे सध्याचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा हेच मुळी हिमाचलचे आहेत. एकेकाळी त्यांची नजर हिमाचलच्या मुख्यमंत्रीपदावर होती.

परंतु मोदी-शहा यांनी त्यांना दिल्लीच्या राजकारणात गुंतवून ठेवले. त्यामुळे त्यांना त्या इच्छेवर पाणी सोडावे लागले.

भाजपच्या तरुण नेत्यांपेकी एक व सध्याचे क्रीडा, माहिती व प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर हेही हिमाचलचेच आहेत आणि तेही मुख्यमंत्रीपदावर नजर ठेवून आहेत.





मुख्य म्हणजे हिमाचलचे माजी मुख्यमंत्री प्रेमकुमार धूमल यांचे ते पुत्र आहेत. धूमल हे दोनवेळेस मुख्यमंत्री होते. गेल्या निवडणुकीत ते हरले किंवा त्यांना हरविण्यात आले असे म्हणतात.

आता त्यांचेही वय झाले आहे त्यामुळे त्यांचे राजकीय वारस म्हणून अनुराग ठाकूर यांच्याकडे पाहिले जाते.

अनुराग ठाकूर यांनी गेल्या काही काळात अत्यंत वादग्रस्त, जात्यंध व सांप्रदायिक चिथावणीखोर अशी विधाने करुन कुप्रसिध्दी मिळवली.

किंबहुना त्यांच्या या आचरणाची पावती म्हणूनच त्यांना आधीच्या अर्थ राज्यमंत्रीपदावरुन बढती देऊन कॅबिनेट दर्जा देऊन क्रीडा व माहिती प्रसारण खाते दिले असावे. परंतु घराणेशाहीच्या नावाने बोटे मोडणारे विश्वप्रिय ब्रह्मांडनायक ही हिमाचली घराणेशाही चालवून घेणार काय?

कारण असे सांगतात की यांचे वडिल मुख्यमंत्री असताना त्यांना केंद्रात मंत्री करण्यास ब्रह्मांडनायकांनी विरोध केला होता.

प्रेमकुमार धूमल (अनुराग यांचे वडिल) हरल्यानंतर व मुख्यमंत्री नसताना त्यांनी अनुराग यांना मंत्री केले. त्यामुळे अनुराग यांची मुख्यमंत्रीपदासाठी



कितीही इच्छा असली तरी राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा साहेब आणि ब्रह्मांडनायक त्यांना ती संधी देतील काय हा प्रश्न आहे.

## भाजपच्या खाद्य हुकुमशाहीला फाटा ........ मंत्र्यांकडूनच!

गुढी पाडवा म्हणजेच चैत्र प्रतिपदा ते राम नवमी या काळात उत्तर भारतात बहुसंख्य ठिकाणी नवरात्रि उत्सव पाळला जातो.

या काळात लोकांची श्रध्दा चरमसीमेवर असते.

एरव्ही दररोज मटण-चिकनवर ताव मारणारी मंडळी या नऊ दिवसात मटण व चिकनचे पूर्ण वैरी झालेले असतात. त्यामुळेच नवरात्रि उत्सव संपला की लगोलग दुसऱ्या दिवशी राजधानी दिल्लीत मटण व चिकनच्या खपात विक्रमी आणि अनेक पटींनी वाढ झालेली असते. यावर्षी कट्टरपंथीयांनी मटणविक्रीवरच हे नऊ दिवस बंदी घोषित केली होती. यासाठी कोणता सरकारी आदेश काढण्यात आलेला नव्हता. पण केवळ कट्टरपंथीयांच्या दहशतीमुळे असंख्य मटण-चिकन विक्रेत्यांनी आपण होऊनच बंद पाळला.

साफसफाईसाठी आणि मटण-चिकन विक्री फारशी होत नसल्याने दुकानदारांनी विक्रीच बंद ठेवली.

आता जरा दुसऱ्या चित्रावर नजर टाकू. गुढी पाडवा हा दक्षिणेतही मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. तेलंगणा व आंध्र मध्ये 'उगादी' नावाने तो साजरा होतो. तर या दिवशी केंद्रीय राज्यमंत्री जी. किशन रेड्डी यांनी त्यांच्या निवासस्थानी ईष्टमित्र व पत्रकारांसाठी उगादी भोजन आयोजित केले होते.

तेलुगु परंपरेनुसार खाद्यपदार्थांची रेलचेल होती.

हैदराबादी बिर्याणी ही भारतात लोकप्रिय आहे. आता अस्सल बिर्याणी ही मटणाचीच मानली जाते. त्यामुळे मंत्रीमहोदयांना मटण कसे व कोठून मिळाले हा मोठ्ठा प्रश्न! तरीही त्यांनी अत्यंत चवदार अशी ही बिर्याणी आपल्या अतिथींनी खिलवली.

आंध्र-तेलंगणातील 'मँगो मटण' ही अशीच एक खासियत आहे. कच्च्या कैरीची चव असलेले मसालेदार मटण तोंडाला पाणी आणतेच.

याखेरीज आंध्रच्या किनारपट्टीवरील खास पदार्थ म्हणजे भलेमोठे प्रॉन्स (कोळंबी). 'प्रॉन्स फ्राय' हा असाच लोकप्रिय पदार्थ!

तर मंत्रीमहोदयांनी त्यांच्या पक्षाच्या(भाजप) मटणविरोधी भूमिकेला न जुमानता ही सामिष पदार्थांची रेलचेल असलेली मेजवानी पार पाडली.

आपल्याला भोजनाची आणि भोजन देण्याची आवड आहे असेही त्यांनी यानिमित्ताने सांगितले. या मेजवानीला भाजपची काही मोजकी नेते मंडळीही हजर होतीच.

हुकुमशाही कशाचीही करा परंतु अमुकच खा, तमुकच नका खाऊ अशी 'खाद्य हुकुमशाही' किंवा 'खाद्य एकाधिकारशाही' कुणी चालवून घेणार नाही याची जाणीव भाजप नेतृत्वाला बहुधा झालेली नसावी.





त्यामुळेच 'बीफ'च्या विरोधात मोहिम सुरु होताच भाजपचीच ईशान्य भारतातील अनेक नेते मंडळी चिडली होती आणि त्यांनी भाजपच सोडण्याच्या धमक्या दिल्या. ते परवडणारे नव्हते कारण मग तेथील अनेक राज्यातील भाजप पुरस्कृत सरकारे पडली असती.

तेव्हा ही खाद्य एकाधिकारशाही बंद झाली पाहिजे!

■■



# भागवत धर्माची पताका महाराष्ट्राने फडफडत ठेवावी

## शेवटचे पान



१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस. १ मे १९६० रोजी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश स्थापन केला. स्वर्गीय चव्हाण साहेबांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वामुळे नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्यात एक नवीन पर्व सुरू झाले. मराठी माणसांचे राज्य निर्माण व्हावे यासाठी त्याअगोदरच्या काळात मोठा संघर्ष संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने महाराष्ट्राने अनुभवला. गेल्या वर्षी आपण महाराष्ट्राची एकसष्ठी साजरी केली. पण संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर यांच्यासह संयुक्त महाराष्ट्र आजपर्यंत मिळालाच नाही. पण हक्काने मुंबई मात्र महाराष्ट्राची झाली. इतक्या प्रदीर्घ कालावधीत आपण काय कमावले व काय गमावले याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

एक आठवण आहे. १९४८ मध्ये भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भात दार कमिशनने अहवाल दिला. या अहवालात महाराष्ट्र राज्यावर अपमानास्पद टिपणी करण्यात आली होती. मुंबईचा विकास गुजराथ्यांनी केला असा वारंवार उल्लेख होता. पुढे तर तत्कालीन द्विभाषिकाचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी पुढील ५००० वर्ष मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही असे ठणकावून सांगितले होते. खर तर त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळ अधिक जोमाने पुढे गेली. पण स्थापनेपासूनच दिल्लीने महाराष्ट्राला कायम सापत्न वागणूक दिली. मराठी माणसांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा व अस्मितेचा विषय म्हणजे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणे. आजही या विषयी अजूनही निर्णय होऊ शकत नाही. सत्तेच्या सारीपटावर दिल्लीची सत्ता कुणाकडेही असली तरी सुध्दा महाराष्ट्राला मात्र सन्मान मिळणे दूरच राहते. मुंबई महाराष्ट्राला मिळाल्यामुळे असंतुष्ट असलेले लोक मुंबई देशाची आर्थिक राजधानी ही ओळख सुद्धा पुसून टाकण्याच्या तयारीत आहेत.

खर तर ज्याला आपण महाराष्ट्र धर्म म्हणू शकतो (या ठिकाणी सध्या चालू असलेल्या भोंग्यांच्या राजकारणाचा कुठलाही संबंध नाही) तो म्हणजे वारकरी पंथ. महाराष्ट्र धर्म कुणालाही वगळणारा नव्हता व नसेल. महाराष्ट्राची कल्पना कायम भारताच्या कल्पनेशी पूरक राहिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या प्रतिकांनी देश धर्म व महाराष्ट्र धर्म वेगळा मानला नाही. दुर्दैवाने महाराष्ट्राचा विचार करताना प्रदेश, जात, धर्म, वंश याबाबतीत मात्र वैचारिक चर्चा होण्या ऐवजी टोळी युद्ध सुरू झाले आहे. राज्याच्या निर्मितीमध्ये कोणतेही मतभेद नव्हते. चव्हाण साहेबांच्या बरोबरीने भाऊसाहेब हिरे, प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, कॉम्रेड. डांगे, एस. एम. जोशी या सगळ्या महारथींनी एकत्रित येऊन महाराष्ट्र स्थापनेची मुहूर्त मेढ रोवली. आज मराठी माणूस विस्तारलेल्या जगात पराक्रम गाजवित आहे, अशा वेळी गर्जा महाराष्ट्र माझा जय जय महाराष्ट्र माझा ही डफावर थाप देऊन शाहिराने दिलेली हाक ऐकून आपण जागे होणार आहोत का? एका भयानक कोरोना संकटातून बाहेर पडल्यानंतर नवा विचार पुढच्या पिढीला देणार आहोत का? पंढरीचा विठूराया हेच महाराष्ट्र धर्माचे दैवत. त्यामुळे संत ज्ञानेश्वर महाराजांनी व तुकाराम महराजांनी दाखविलेल्या पंढरीच्या वाटेवर आपण पुरोगामी महाराष्ट्राचा ध्वज उंचावर फडकवत ठेवण्यासाठी कटिबद्ध होऊया, यासाठी अंतर्मुख व्हायला हवे.

जय महाराष्ट्र!!!